म. ग्रं. सं. ठाणें.

REFBK-0005617

॥ श्रीरामसमर्थ ॥


श्रीआनंदवनभुवन–ग्रंथमाला

पुष्प–२



श्रीशिवशाहीचा

ले ख ना लं का र



आ० बा० जोशी

आवा चांदोरकर

श्रीशिवराज्याभिषेक वर्ष–२६०

मूल्य–२ रु.

[डांकव्यय—८३]

मालेचे संपादक आणि प्रकाशकः—आवा चांदोरकर, शनिवार २६३, पुणें.

मुद्रकः—सदाशिव रामचंद्र सरदेसाई, बी.ए., एल्एल्.बी., नवीन समर्थ विद्यालयाचा
'समर्थ भारत' छापखाना, ९४७ सदाशिव, पुणें २.


॥ श्रीरामसमर्थ ॥

श्रीआनंदवनभुवन–ग्रंथमाला

जेणें होये उपरती । अवगुण पालटती ॥
जेणें चुके अधोगती । त्या नांव ग्रंथ ॥—श्रीसमर्थ

आनंदवनभुवन पंचक

आ. भु. कुलदेव चाफळनिवासी राक्षस कुलनिर्दालक देववंदविमोचक श्रीरघुवीर		आ. भु. कुलदेवी प्रतापगिरिनिवासी असुरमर्दिनी श्रीरामवरदायिनी



आ. भु. योगेश्वर सज्जनगिरिनिवासी महाराष्ट्र धर्माचार्य श्रीसमर्थ रामदास		आ. भु. धनुर्धर रायगिरिनिवासी देवब्राह्मणस्वराज्य संस्थापक शिवराय

अनुक्रमणिका

		पृष्ठ
१.	निवेदन	५
२.	उपन्यास	८
३.	लेखनालंकार—उत्तरार्ध	२३
४.	कोश	११३
५.	सूचि	११९

॥ श्रीरामसमर्थ ॥

निवेदन

" बहुताचें मनोगत हातीं । घेतलें पाहिजे ॥ "

—श्रीग्रंथराज दासबोध–१२×१०×३७

१ श्रीसमर्थांची इच्छा निराळी च होती ! आपण, गेल्या वर्षी, म्हणजे शिवराज्याभिषेक शकाच्या २५९ व्या वर्षी माघ शुद्ध पौर्णिमेच्या दिवशीं, या आपल्या आनंदवनभुवन-ग्रंथमालेस प्रारंभ केला; आणि तिच्यांत " श्रीसमर्थांचें भविष्यपुराण अथवा श्रीवनभुवनी " हें पुस्तक पहिलें पुष्प म्हणोन गोंवून प्रसिद्ध केलें, त्या पुस्तकाच्या प्रारंभींच्या पृष्ठा वर, प्रत्येक महाष्ट्रीयानें सतत डोळ्यां पुढें ठेऊन मनन किंवा निदिध्यास करावयाचें एक पंचायतन, आपण छापलें आहे. पंचायतनांतील पहिलें स्थान " आनंदवनभुवन "या देवब्राह्मणभूमीस दिलें गेलें आणि त्यास अनुसरून मालेंतील पहिलें पुष्प, श्रीसमर्थांनीं केलेल्या त्या भूमीच्या गौरवाचें म्हणोन प्रसिद्ध झालें हें यथायोग्य च झालें. त्या नंतर, दुसरें पुष्प, त्या पंचायतनांतील दुसऱ्या स्थानाचा विषयीभूत जो " आनंदवनभुवनकुलदेव-चाफळनिवासी श्रीरामप्रभु " त्याच्या वर्णनाचें म्हणजे च त्या पवित्र चाफळखोऱ्यांत श्रीसमर्थांनीं स्वराज्यसंस्थापनेच्या कामीं काय काय यंत्रणा केली तिच्या सविस्तर वर्णनाचें निघावें, अशी आपली इच्छा असणें साहजिक आणि क्रमप्राप्त च होतें, परंतु आपणां सर्वांहून श्रीसमर्थांची इच्छा निराळी च होती आणि ती तशी होती म्हणून च आज आपल्या सर्वांना म्हणजे साऱ्या आनंदवनभुवनाला एका महत्तम वस्तूचा लाभ झाला !

२ वर सांगितलेल्या श्रीसमर्थकृत चाफळयंत्रणेच्या साधनांची जुळवाजुळव चालली असतां, एके दिवशीं " मोडी लिपीची उत्क्रांति " कसकशी झाली याविषयीं एक विस्तृत टांचण लिहावें अशी कल्पना संपादकांच्या मनांत आली. मागें दहा वर्षां खालीं अशी कल्पना सुचल्या वरोन आबा चांदोरकर यांनीं तिला अनुलक्षून बरेंचसें साहित्य मिळवून ठेविलें होतें; त्यांत आणीक साधनांची भर घालावयाची असेल, तर पुणें येथील पंतप्रधान–लेख्यशाला पाहून, तिच्यांतील लेखांची आपल्या कामास उपयोगी पडेल अशी चांचणी करावी असें आम्हीं ठरविलें. नंतर रीती प्रमाणें, ही लेख्यशाला पहाण्या विषयीं आणि तिच्यांतील लेखांचा उपयोग करण्या विषयीं सांप्रतच्या राज्यसंस्थेकडे अनुज्ञा मागितली आणि तिनें उदार अंतःकरणानें ती तत्काळ दिली, या साठीं संपादकद्वय त्या संस्थेचे आभारी आहेत.

३ या शाळेंतील लेखांचें एक आदर्श पुस्तक राजश्री गोविंदराव सरदेसाई रियासतीकार यांनीं थोडे दिवसां पूर्वी छापून प्रसिद्ध केलें आहे. त्या वरोन शाळेंतील एकंदर लेखसागराची कल्पना येईल. या सागरांतून सरदेसायांनीं जवळ जवळ दोन लाख पत्रें निवडलीं आणि त्यांचे ४० वर खंड प्रसिद्ध करून महाराष्ट्रावर उपकाराचें ओझें करून ठेविलें. त्यांच्या च साहाय्यानें

संपादकां मधील एक, चांदोरकर यांचा या शाळेंत प्रवेश झाला; या साठीं दोघे हि संपादक, गोविंदरावांचे ऋणि आहेत. शाळेंत, पत्रांचीं ३७ सहस्र बासनें आहेत; त्यांत आयव्यय आणि वृत्तीविषयक च बहुत असोन, शेष बासनें ऐतिहासिक वृत्तांतांचीं आहेत. यांतील आपल्या कामाला उपयोगी पडतील अशीं अनेक बासनें चांदोरकरांनीं पाहून, शक १५०० पासून शक १७४० पर्यंतची मोडी लिपीचीं उत्क्रांतिदर्शक वळणें टिपून घेतलीं. तीं घेतांना सहजगत्या कांहीं ऐतिहासिक व्यक्तींचीं हस्ताक्षरें (वळणांचीं निदर्शक म्हणोन) टिपलीं गेलीं; हें काम आपाततः झालें; तें सर्व दृष्टी समोर आल्या वर संपादकांच्या मनांत असा एक विचार आला जे, शिवशाहींतील साऱ्या प्रख्यात व्यक्तींचीं हस्ताक्षरें गोळा करून आणि त्यांचीं छायाचित्रें काढवन, त्या त्या चित्रा जवळ त्या त्या व्यक्तीचें महत्त्वाचें वर्णन देऊन एक स्वतंत्र पुस्तक च प्रसिद्ध करावें. या कामा साठीं पुन्हा राज्यसंस्थेची अनुज्ञा मागितली. तदनंतर शाळेंतील जवळ जवळ दोन शें च्या वर बासनें पाहिलीं; एका बासनांत साधारणतः दोन सहस्र पत्रें असतात; म्हणजे सामान्यतः चार लक्ष पत्रांची परीक्षा करावी लागली. या निवडणुकींत बऱ्याचशा ऐतिहासिक व्यक्ती हस्तगत झाल्या. निवडणुकीचें साधारण धोरण पुढील प्रमाणें ठेविलें होतें:— प्रथम होतां होईल तों, व्यक्तीच्या हस्ताक्षराचें सबंध च पत्र मिळवावयाचें, तसें न आढळल्यास मग जास्तींत जास्त ओळी असलेलें घ्यावयाचें, तसेंहि न गंवसल्यास मग सरते शेवटची " हे विनंति " लिहिलेलें स्वीकारावयाचें ! या पुस्तकांत हें धोरण राखल्याचें वाचकांच्या दृष्टीस आपोआप पडेल; आणि त्या मुळें एकादें पत्र सबंधच्या संबंध त्या व्यक्तीच्या हातचें आहे, तर दुसरें पांच सहा ओळींचे हस्ताक्षरांचें आहे, आणि तिसरें केवळ " हे विनंती "चें च आहे, हा जो विरोध पुस्तकांत दिसून येतो, त्याचें हि कारण लक्ष्यांत येईल. वरील काम अत्यंत किचकट आणि त्रासाचें होतें, पण तें करीत असतां चांदोरकरांस, शाळेंतील मुख्य अधिकारी राजश्री हरिपंतनाना गुरुजी आणि त्यांचे सहकारी राजश्री पुरंदरे-वाघोलीकर-याडगीकर या मंडळींनीं, तसेंच तत्रस्थ रा० साळवे-पाटणकर-देसाई यांनीं हि अत्यंत सौजन्यानें वागविलें; हें त्यांचें ऋण संपादकां वर निरंतरचें राहील. रा० सरदेसायांचें काम अद्यापि चालूं असल्यानें त्यांचे कार्यदर्शी राजश्री विसु भाऊ दिघे, मराठ्यांच्या उत्तरेंतील मोहिमा, भाग १, या महत्त्वाच्या पुस्तकाचे संपादक आणि इतिहाससंशोधक, शाळेंत काम करीत असतात. त्यांनीं हि चांदोरकरांस वेळोवेळीं आणि अनेक प्रकारें सहाय्य केलें आहे. तथापि, आपल्या या ऋणाचा उल्लेख करूं नये अशीं त्यांची आम्हांस सांगी असल्यानें आम्हीं या प्रसंगीं या पेक्षां जास्त कांहीं लिहीत नाहीं आणि त्यांचें ऋण-विमोचन हि करीत नाहीं ! लेख्यशाळेंतील जमविलेल्या पत्रांत कांहीं प्रसिद्ध ऐतिहासिक व्यक्तींचीं हस्ताक्षरें मिळालीं नाहींत; तेव्हां इतरत्र खटपट करून तीं मिळविलीं. सारांश, या पुस्तकांत प्रसिद्ध झालेलीं हस्ताक्षरांचीं पत्रें बरींचशीं लेख्यशाळेंतील आणि शेष राहिलेलीं ठिकठिकाणांहून मागून आणलेलीं आहेत. त्या नंतर या सर्व पत्रांचीं परिवर्तितछापाचीं छाया-चित्रें येथील राज्यसंस्थेच्या चित्रशाळेंत काढवून घेतलीं. हें काम फार डोळेफोडीचें असतां हि,

तेथील सर्व कार्यकर्त्यांनीं अत्यंत दक्षतेनें तें पार पाडलें. जणूं काय, आपल्या पुढें असलेल्या (चित्रांच्या) पानांवर त्या त्या व्यक्तींनीं येऊन आपल्या हातांनीं त्या त्या ओळी किंवा अक्षरें लिहिलीं आहेत ! आमचीं पत्रें कांहीं पिवळीं, कांहीं काळीं, कांहीं छिद्रांनीं भूषित तर कांहीं अत्यंत जीर्ण म्हणून अस्पष्ट अशीं असतां हि, या मंडळींनीं त्यांचें रूपांतर उत्कृष्ट केलें हें त्यांना भूषणभूत आहे. या शाळेचे मुख्य अधिकारी रा० प्रधान आणि रा० कोटकर यांनीं, आम्हीं त्यांना दिलेल्या त्रासा कडे दुर्लक्ष्य करून, उलट सहानुभूतीच्या दृष्टीनें हें काम केलें; म्हणून त्यांचे आणि त्यांच्या एकंदर सहकाऱ्यांचे आम्ही आभारी आहों. संभाजीमहाराज छत्रपति (थोरले) यांचें मूळ पत्र आम्हांस मिळालें नाहीं; त्याचें छायाचित्र " साधनचिकित्सा " या पुस्तकांत छापलें आहे, त्यांतून तें आम्हीं घेतलें आहे; भेद एवढा च जे, तें फार सूक्ष्म आहे आणि या पुस्तकांतील वाढवून मोठें केलेलें आहे.

४ असलें पुस्तक सांप्रत एक हि नाहीं. आतां पर्यंत प्रसिद्ध झालेल्या ऐतिहासिक पुस्तकांत वर्ण्यव्यक्तींचीं हस्ताक्षरें छापलेलीं आढळतात; पण त्यांची संख्या एक तर थोडी आहे आणि जी आहे ती निरनिराळ्या पुस्तकांतून आहे. एका पुस्तकांत आणि तीं हि अडीचं शेंच्या वर हस्ताक्षरें प्रसिद्ध झालीं आहेत असें हें च पहिलें पुस्तक होय ! असें पुस्तक निघावें अशी बहुत इतिहासप्रेमी विद्वानांची इच्छा अनेक वर्षां पासोन होती आणि तशी ती त्यांनीं आमच्या जवळ प्रगट हि केली होती. त्यामुळें आम्हीं या "बहुतांचें मनोगत हातीं घेण्या "च्या उद्योगास हात घातला. कामास प्रारंभ केला तो गेल्या वैशाख शुद्ध षष्ठीस केला आणि आज कामाची समाप्ति होत आहे ती मार्गशीर्ष शुद्ध षष्ठीच्या दिवशीं होत आहे. आजचा दिवस संस्मरणीय आहे. आज च २७४ वर्षां पूर्वी प्रतापगडच्या श्रीरामवरदायिनीस थोरल्या महाराजांनीं बत्तीस दांतांच्या एका बोकडाचा बळी देऊन, तुळजापूरच्या भवानीचें, वडिलांचें, वडील बंधूचें आणि महाराष्ट्र धर्माच्या अपमानाचें " उसणें घेतलें "! योगायोग असा जे, त्या दिवशीं गुरुवार होता. तसा आज सुद्धां गुरुवार च आहे ! सारांश, गेल्या सात महिन्यांत जे श्रम, कामाची ओढ आणि द्रव्याचा व्यय झाला त्यांचा बराचसा परिहार श्रीनारायणांच्या कृपेनें आज (हें पुस्तक हातां वेगळें) होत आहे हें पाहून संपादकांच्या मनांस परम संतोष होतो !

•

संपादक

उपन्यास

"बहुतांचें संकल्पित जें तें होतें चि निश्चयें कार्य।"

—मोरोपंत. हरिवंश, २३X४८

१ निवेदनाच्या पहिल्या परिच्छेदाच्या शेवटीं आपण असें म्हटलें आहे जे, "आपणां सर्वांहून श्रीसमर्थांची इच्छा निराळी च होती आणि ती तशी होती म्हणून च आज आपल्या सर्वांना म्हणजे साऱ्या आनंदवनभुवनाला एका महत्तम वस्तूचा लाभ झाला!" अशी ही महत्तम वस्तु कोणती? ज्या वस्तूच्या प्राप्ती साठीं उभ्या महाराष्ट्रानें सतत पांच तपें तपश्चर्या केली, जिच्या साठीं आमचे मित्र कै० पांडोबा पटवर्धन यांनीं जावळीचें खोरें धुंडाळलें, जिच्या करितां ती० कै० गोविंदरावनाना चांदोरकर यांनीं चाफळखोऱ्यांतील श्रीसमर्थांचे "बुद्धीचे महाबळ आणि राजकार्यनियुक्त" दिवाकर उपाध्ये यांचा लेखसंग्रह पालथा घातला, खंडोबाच्या पालीच्या खराडे देशमुखांचें घर, श्रीसमर्थांचे एकनिष्ठ भक्त शंकररावजी देव यांनीं जिच्या साठीं कानाकोपऱ्या सुद्धां झाडलें, जिच्या लाभा साठीं महाराष्ट्रेतिहासाचे जिवलग मित्र कै० पुरुषोत्तम शेठ मावजी एक लक्ष रुपये देण्यास सिद्धहस्त होते, जिच्या करितां इतिहाससेवक कै० दत्तोपंत पारसनीस यांनीं सातारच्या छत्रपती महाराजांचा सर्व शेष लेखसंग्रह पालथा घातला, जिच्या साठीं कै० विनायकराव भावे यांनीं मावळचा वारा खाल्ला, जिच्या करितां रियासतकार गोविंदराव सरदेसाई यांनीं आपल्या संगतीं महाराष्ट्राच्या एकंदर आणि जन्मजात स्वभावाला अपरिचित अशा जदुबाबूस कारीचा डोंगर धावडावयास लाविला, जिच्या साठीं भारताचार्य चिंतामणराव वैद्य यांनीं जयपूर–अंबरचे राजप्रासाद सूक्ष्मपणें शोधले, जिच्या साठीं राजसेवेंत असतांना हि काव्येतिहाससंग्रहाचे आद्य संस्थापक आणि आजच्या महाराष्ट्रांतील इतिहाससंशोधकांचे पितामह कै० काशीनाथबाबा साने यांनीं गांवेंच्या गांवें पालथीं घातलीं, सर्व पटवर्धनी लेखसंग्रह छापून, प्रसिद्ध करून, उत्तर–पानपत–इतिहास महाराष्ट्राच्या पदरांत टाकणाऱ्या कै० वासुदेवशास्त्री खऱ्यांनी जिचे साठीं खेड शिवापूरच्या देशपांड्यांच्या घराचे उंबरठे झिजविले, जिच्या साठीं देहभान विसरून आनंदाची समाधि लावण्यास आणि जिच्या प्राप्ती साठीं वाटेल तें सहाय्य करण्यास सामंत खंडेरावतात्या मेहेंदळे सतत बद्धपरिकर आहेत, जिचें वर्णन लोकमान्यांच्या 'केसरी'मध्यें तात्काळ द्यावयास नरसोपंततात्या केळकर आणि जनार्दनपंततात्या करंदीकर सिद्ध आहेत, आपल्या जवळची वांटेल ती ऐतिहासिक सामुग्री वांटेल त्याला आणि वांटेल त्या वेळीं निःसंकोचपणें दाखविणारे सामंत गंगाधररावआबा अमात्य (मुजुमदार) आणि पंडित दत्तो वामन धनपारखे, जिचें प्रगटीकरण भारतेतिहासमंडळाच्या वार्षिक-इतिवृत्तांतून करण्याची संधि केव्हां लाभते म्हणून अनुष्ठान मांडून बसले आहेत, आणि सरते शेवटीं महाराष्ट्रेतिहासमंदिराचा कळस आणि उपर्युक्त सर्वांना इतिहासाचे शाळाशुद्ध धडे घालून देणारे आणि ह्यामुळें त्यांचे

आणि आम्हां संपादकांचे गुरु " महाराष्ट्रेतिहाससमर्थ " विसुभाऊ राजवाडे यांनीं जिच्या लाभा साठीं पिसाऊर पासून रामेश्वरा पर्यंतचें भारतवर्ष पालथें घातलें, अशी ही लोभनीय वस्तु कोणती ? अशी ही महाराष्ट्राला ललामभूत वस्तु म्हणजे **गोब्राह्मणप्रतिपालक आणि महाराष्ट्र-राज्यसंस्थापक थोरले श्रीशिवराज छत्रपति यांचें हस्ताक्षर !**

२ संपादकांना झालेल्या या हस्ताक्षरप्राप्तीचें श्रेय त्यांचें नसून, त्यांच्या मागें वर उद्धृत केलेल्या एकूण एक व्यक्तींची तपश्चर्या उभी असल्यानें त्या सर्वांचें आहे, एवढें च नव्हे तर त्याच्या दर्शना साठीं आतुर झालेल्या उभ्या महाराष्ट्राचें आहे ! आम्हीं केवळ श्रीसमर्थांच्या सभेंतील त्यांचे पादरक्षाधर आहोंत ! पंतप्रधानलेख्यशाळेंतील काम चालूं असतां, एके दिवशीं महाराष्ट्रेतिहासप्रेमी आणि शिवरायाच्या निकटवर्ति आप्तांच्या एका घराण्यांतील एका सद्गृहस्थां कडून त्यांच्या घरचा जुना लेखसंग्रह पहाण्यास संपादकांना अनुज्ञा मिळाली. तें काम चालू असतां अकस्मात् हा अलभ्य लाभ झाला ! या सद्गृहस्थांचें नांव प्रसिद्ध करावें अशी आमची (वाचकां प्रमाणें च) इच्छा होती; पण " प्रियं कृत्वा मौनं " अशा महंताच्या कोटींतील जुन्या वळणाची ही व्यक्ति असल्यानें आम्ही या कामीं तरी असमर्थ आहों ! हें मूळ पत्र आमच्या स्वाधीन करण्यापूर्वी च ही अट त्यांनीं आम्हां कडोन मान्य करून घेतली त्या मुळें दिलेल्या वचनास आम्हांस पारखें होतां येत नाहीं, याची महाराष्ट्रानें क्षमा केली पाहिजे. हें मूळ पत्र हातीं आल्या वर संपादकांना (आणि कोणास हि) अमृतलाभ झाला असें वाटल्यास

आश्चर्य नाहीं ! प्रथमदर्शनीं च (छत्रपतींच्या लेखनप्रशस्तीचा दंडक सतत ध्यानांत असल्यानें) पत्राच्या मूलत्वा विषयीं आणि तदनंतर त्याच्या शेवटीं महाराजांनीं स्वहस्तें लिहिलेल्या अक्षरां विषयीं संपादकांना निर्वाळा पटला. पुढें पत्र शिरोधार्य करून घरीं आणल्या वर आम्हांस पत्राच्या आणि अंत्य अक्षरांच्या विरुद्ध जेवढ्या शंका घ्यावयाच्या तेवढ्या उकरून काढून, त्यांचें सर्वस्वीं निर्मूलन झाल्या नंतर त्याचें छायाचित्र काढविलें. उपरांत तें छायाचित्र आणि तें मूळ पत्र येथील प्रख्यात, विद्वद्वरिष्ठ आणि इतिहाससंशोधनाच्या सर्व शाखांतील तज्ज्ञ अशा तीन सद्गृहस्थांना दाखविलें; त्यांनीं हि सूक्ष्म छाननी करून **पत्रांच्या आणि महाराजांच्या हस्ताक्षरांच्या सत्यते विषयीं महाराष्ट्रास एकमुखानें ग्वाहि दिली आहे.** त्या मुळें, या पुढें महाराष्ट्रानें या विषयीं मनांत यत्किंचित् हि शंका-कुशंकास थारा देऊं नये !

३ असा संशयी वर्ग पूर्वी होता आणि आतां हि आहे. संशय घ्यावा पण तो कोणत्या गोष्टी विषयीं घ्यावा याला कांहीं नियम आहे. सूर्यग्रहणाच्या दिवशीं सूर्याचा प्रकाश, पुस्तक वाचण्या इतपत पडला होता कीं मोहऱ्यांतील खडे निवडण्यास दिसतील इतपत पडला होता, या विषयीं एखादे वेळीं संशय घेतला तर शोभेल; पण, भर वैशाखांत निरभ्र आकाश असतांना दिवसां सूर्यप्रकाश दिसत नाहीं, नव्हें सूर्याचा च ठाव आहे कीं नाहीं अशी शंका घेणाऱ्यास काय म्हणावें ? अशा शंकिताची कोटी कोणती धरावी ? पण दुर्दैव असें जे, असा एक वर्ग देशांत आहे आणि खेदाची गोष्ट म्हणजे, तो इंग्रजी शिकलेल्या म्हणून स्वतःस विद्वान आणि चिकित्सक

म्हणवून घेणाऱ्या लोकांत आहे. या शिक्षणाची थोरवी काय आहे हें गेल्या दोन तीन पिढ्यांच्या ध्यानी (अपवाद सोडल्यास) जरी पूर्णपणें आलें नसेल, तरी सांप्रतच्या पिढीच्या आलें पाहिजे. या शिक्षणानें काय लाभ झाला असेल तो, मेकॉले जाणो ! पण, पूर्वजां विषयीं अनादर, स्वधर्मा विषयीं (औदासिन्य च नव्हे तर उलट) तिरस्कार, अनेक पिढ्यांचे अनुभव घेऊन बसविलेल्या आमच्या आचारांविचारांचा उपहास, ज्यांनीं राज्यें स्थापिलीं आणि चालविलीं ते मूर्ख होते ही भावना, ज्यांनीं दोन दोन, तीन तीन तपें एखाद्या विषयाचा अभ्यास करण्यांत आयुष्य घालविलें, त्यांचा, स्वतः त्या विषयाचा उंबरठा हि न चढतां टारगटपणें करावयाचा उपहास, जगांत मी च काय तो शहाणा अशी अहंमन्यवृत्ति, शील किंवा चारित्र्य हें थोतांड आहे असें म्हणून मतस्वातंत्र्याच्या नांवा खालीं यथेष्ट आचार इत्याद्यनेक लाभ मात्र आमच्या पदरांत पडले आहेत हें सत्य आहे ! इंग्रजी शिक्षणा विषयीं मत देण्याचें हें स्थळ नाहीं आणि आम्हांस त्या विषयीं विशेष सांगावयाचें हि नाहीं. शिक्षण म्हणजे ज्ञान, केव्हां हि चांगलें च. उत्तम बीं पेरलें तर उत्तम फळ येईल हा सिद्धांत आहे. पण, बीं कीड़खाद असल्यास त्या पासून उत्तम फळाची अपेक्षा कशी धरावी ? इंग्रजी शिक्षण ज्या वेळीं द्यावयास प्रारंभ झाला त्या वेळीं तें चालूं करणाऱ्यांच्या मनांत काय होतें तें त्यांचें त्यांना ठाऊक. एवढें खरें जे, हें " वाघीणीचें दूध " (?) पिऊन क्रूरकर्मा बनलेल्या मूळच्या गोवत्सांनीं आपल्या वैदिकधर्मरूपी गोमातेच्या कंठावर सुरी ठेविली ! आमचें हें म्हणणें कोणास (इंग्रजी शिकलेल्यास) कडू वाटेल, तेव्हां असले लोक ज्यांच्या अभिप्रायास वेदतुल्य म्हणून माना डोलवितात अशा एका टोपीवाल्याचें च म्हणणें पुढें देतोः—विल्यम राबिन्सन नांवाच्या टोपीवाल्यानें By Temple Shrine and Lotus Pool या नांवाचें एक पुस्तक लिहिलें आहे, त्यांत पुढील वाक्यें आहेतः—That a strong tide of infidelity has set in among the multitudes of Hindus who have received an English education. Their trust in the faith of their ancestors has been destroyed. They have cast aside all serious thoughts on the subject of religion (pp. 129). Students were taught that morality was not based on religion (pp. 130). Your student lets all the pure water go, but retains all the filth that was in the water just as a sponge does. He swells up like a sponge and his modesty is in a ratio to his knowledge that no arithmetic can calculate (pp. 128). असे स्पंज देशांत उत्पन्न झाल्या वर श्रीशिवाजीमहाराज अक्षरशत्रू होते हा सिद्धांत दृढमूल होण्यास उशीर काय ?

४ हा सिद्धान्त शक १७४० पर्यंत कोणा महाराष्ट्रीयाच्या बुद्धीला सुचला नाहीं, आणि म्हणून तो खरा कीं खोटा हें ठरविण्या साठीं मोठमोठे वाद कोणीं माजविले नाहींत ! शिवाजी-महाराज हे दोन पातशाह्या पायातळीं घालणाऱ्या ' महाराज ' शहाजीराजांचे चिरंजीव होते; आपल्या राजसभेंत कोणी नवखा पंडित आल्यास त्याला समस्या घालून त्याच्या विद्वत्ततेची चांचणी घेणाऱ्या पित्याचे लाडके चिरंजीव होते, दादोजी कोंडदेवांच्या हातां खालीं ते शिक्षित

५५१८
नोंद नं.
[६११]
इ. ५५१८
ग्रंथ

झाले होते, श्रीसमर्थांच्या अनुग्रहा पासोन म्लेच्छक्षयदीक्षा घेऊन दीक्षित बनले होते, शास्ता खानानें कुचाळीचा संदेश पाठविला असतां त्याला संस्कृत श्लोक रचून उत्तरास सवाई प्रत्युत्तर देणारे होते; अश्वांच्या विषयीं त्यांची आवड फार असल्यानें कोठें हि एकादा चांगला घोडा दिसला तर " यस्याश्वास्तस्य राज्यं । यस्याश्वास्तस्य मेदिनी । यस्याश्वास्तस्य सौख्यं च । यस्याश्वास्तस्यैव साम्राज्यं ॥ " हा श्लोक पटकन् तोंडांतून काढीत, श्रीसमर्थ त्यांना " बुद्धिवंत, सर्वज्ञपणें सुशील आणि जाणता राजा " म्हणत, सर्व बखरकार त्यांना एकमुखें साक्षर म्हणत, भारतरामायण त्यांनीं लहानपणीं वाचलें होतें, त्यांनीं श्रीसमर्थांवर मराठी आणि हिंदी काव्य केलें होतें, म्लेच्छभाषेनें भ्रष्ट झालेल्या मराठीला एक स्वतंत्र संस्कृत कोश रचवून त्यांनीं शुद्धीकृत केलें, श्रीग्रंथराजाचें त्यांचें नित्य वाचन होतें, आग्र्याच्या राजसभेंत औरंगाशीं शुद्ध फारशींत त्यांचा खटका उडाला, वामन पंडित त्यांना सर्वज्ञ म्हणत, त्यांनीं " आपल्या स्वतःच्या हस्ताक्षराचें पत्र आल्या विना संभाजीराजांना पाठऊं नये " अशी स्पष्ट आज्ञा मथुरेच्या मोरोपंत प्रधानांच्या मेव्हण्यास केली होती (असें मुसुलमान इतिहासकार खाफीखान म्हणतो) इत्यादि, महाराजांच्या साक्षरतेच्या अनेक गोष्टी शक १७४० पूर्वीच्या मराठ्यांस माहीत होत्या; म्हणून त्यांना त्यांच्या साक्षरतेची शंका आली नाहीं. तसें च महाराजांचे समकालीन चौकस फिरंगी (पोर्तुगीज), वलंदेज (डच), फरासीस (फ्रेंच) आणि इंग्रेज इत्यादि भारतवर्षांतील, त्या त्या देशांतील व्यापारी मंडळींचे अधिकारी यांना सुद्धां, महाराजांच्या साक्षरतेची यत्किंचित् हि शंका नव्हती. उदाहरणार्थः-(१) रेव्हिंग्टन म्हणतोः-" पत्र शिवाजीराजांच्या **हातांत च** द्यावें; नाहीं तर कारकून लोक दुसरा च मजकूर त्यांना सांगतात. " (ले० ८४८); यावरून **महाराजांना वाचतां येत होतें.** (२) सुरत रेसिडेन्सी डच कंपनीचा अधिकारीः-" शिवाजीराजांनीं **स्वहस्त लेखानें** (by an autograph letter) फ्रेंचांना कळविलें " (ले० १३५१); या वरोन **महाराजांना लिहितां येत होतें.** (३) सुरत इंग्रजी वखारः-" तहाबद्दलचे **शिवाजीराजांच्या सहीचे** (signed by Sevagy) कागद आले "(ले० १६४०); या वरून **महाराजांना सही सुद्धां करतां येत होती.** (४) ऑक्झेंडन म्हणतोः-" **राजानें सही केल्याची** वार्ता निराजीपंतांनीं सांगितली " (The Raja had signed them). सारांश, महाराजांना वाचतां येत होतें, लिहितां येत होतें, एवढेंच नव्हे तर आपल्या नांवाचीं हस्ताक्षरें हि लिहितां येत होतीं, हें १७४० पूर्वीच्या वरील परक्या साक्षीदारांनीं च सिद्ध केलें आहे (वरील उतारे शिवकालीन पत्रसारसंग्रहांतील आहेत). पण पुढें काळ फिरला आणि एका टोपीवाल्यानें " Shivajee could never write his name " हें वाक्य हळूं च आपल्या बखर सदृश चोपड्यांत जाणून बुजून छापलें ! जाणून बुजून म्हणण्याचें कारण त्याला सातारच्या छत्रपतींच्या लेखसंग्रहांत जशीं अनेक मूल पत्रें पाहावयास मिळालीं, तसें महाराजांच्या हातचें एकादें तरी पत्र मिळालें असलें पाहिजे. सटरफटर पत्रें मिळतात, महत्त्वाचीं संधीपत्रें पहावयास सांपडतात आणि असलें एकादें हि पत्र **महाराजांच्या वंशजाच्या** संग्रहांत

मिळत नाहीं एवढेंच नव्हें तर वर दिलेल्या त्याच्या पितामहांचीं आणि प्रपितामहांचीं, सुरत, मुंबई इत्यादि ठिकाणच्या कोठ्यांतील मूळ पत्रें त्याला आढळत नाहींत याचे वर कोण्या सुबुद्धाचा विश्वास बसेल ? ग्रांटनें असें खोटें आणि निंदार्ह वर्तन कां केलें त्याचें कारण वरील इंग्रजी अवतरणांत आलें आहे. डफाच्या या थापेवर अनेक विद्वान् लोक झुलत होते आणि कांहीं द्रामुष्यायण इतिहासलेखक त्याची च री ओढीत होते. त्याचा परिहार शक १८४३ मध्यें आबा चांदोरकर यांनीं " श्रीशिवरायाची साक्षरता " हा निबंध लिहून केला (भा० इ० सं० मं० त्रैमासिक, वर्ष २, अंक १–४ पहा). त्यांत या विषयाचा सांगोपांग ऊहापोह केला आहे आणि अनेक उदाहरणें देऊन, महाराजांना लिहितां वाचतां येत होतें हें सिद्ध केलें आहे. त्यांतील केवळ एक च उदाहरण येथें देऊं. पूर्वी वादप्रसंगीं दिव्यें करीत; हें दिव्य करावयाचें असल्यास त्या साठीं राजाची अनुज्ञा लागे. ही अनुज्ञा राजानें स्वहस्तें लिहून द्यावी लागे. शिवाजीमहाराजांच्या वेळीं आणि पुढें हि असल्या राजाज्ञेस " खास दस्तक " किंवा " हात रोखा " म्हणत. असला एक " हात रोखा " शक १५९० मध्यें शिवाजीमहाराजांनीं, गोविंद विश्वनाथ पानशी आणि रामजी कृष्ण गांवखंडेराऊ या दोघांस, सोनोरीच्या कुळकर्णा विषयीं भांडण चाललें असतां आणि दिव्य करावयाची वेळ आली असतां दिलें आहे (वाड--वतनपत्रें आणि निवाडपत्रें. पृ० २४-२५ पहा). या प्रमाणें बारा वर्षां पूर्वी महाराजांच्या साक्षरतेचा **स्पष्ट निवाडा** झाला असतां हि मधून मधून पुन्हा हो ना च्या वादाची धूळ वर्तमानपत्रांच्या कोठ्यांतून उडतेच ! या वृत्तीस काय म्हणावें तें आम्हांस समजत नाहीं; तिला संशयीवृत्ति म्हणावें, कीं अहंमन्यता म्हणावी, कां मत्सर म्हणावा ? असल्या संशयी लोकांचें समाधान कोणीं करावें ? त्यांचें " ज्ञान खोटें, वैराग्य पोरटें भाव वेर्थ, (शिवाजीमहाराजां वरील) प्रीति वेर्थ, जिणें वेर्थ, पक्ष वेर्थ, पांडित्यगिरी वेर्थ, श्रेष्ठता वेर्थ, " एवढें च नव्हें तर त्यांचें "सर्व कांहीं वेर्थ " होय असें श्री समर्थ म्हणतात, आम्ही म्हणत नाहीं ! असल्या संशायितांची संगती धरल्यास संशयो च वाढतो असें हि त्यांचें च सांगणें आहे. अशांची संदेहवृत्ति अजून हि न भंगल्या मुळें वरील बोलिलेंचि पुन्हां बोलावें लागलें. आतां या पुढें मात्र बोलण्याचें कारण उरलें नाहीं; महाराष्ट्रानें आतां बोलण्याची सीमा च गांठली ! प्रत्येक महाराष्ट्रीयास आतां निर्वेधपणें महाराजांच्या एक नव्हें तर **चौदा अक्षरांचें** सतत दर्शन घेतां येईल ! मूळ पत्राचें जें छायाचित्र घेतलें आहे, तें मूळाच्या पाऊणपट मापांत घेतलें आहे. छायाचित्र घेतल्या नंतर आणि वर सांगितलेल्या तीन तज्ज्ञांना दाखविल्या नंतर मूळपत्र त्याच्या धन्याच्या स्वाधीन करण्यांत आलें. पत्राच्या स्वरूपाचें वर्णन पुढें आलें आहे.

५ वर दुसऱ्या परिच्छेदांत " छत्रपतींच्या लेखनाचा दंडक " असे शब्द आले आहेत; या दंडका वरोन च संपादकांनीं आणि त्या तीन तज्ज्ञांनीं हें पत्र, **मूळ पत्र** च आहे असें ठरविलें. या दंडकाचें येथें थोडेसें दिग्दर्शन करूं. राजे लोक उठल्या सुटल्या पत्रें न खरडतां मोजकी च पत्रें लिहितात हें सर्वत्रांना ठाऊक आहे. असलीं मोजकीं पत्रें ज्यांना पाठवावयाचीं, त्यांत राज्यसंस्थेंतील वरच्या पायरीचे अधिकारी, विश्वासु राजकारणी पुरुष, गुरु, स्वतःचीं मुलेंबाळें

किंवा निकटचे आप्त आणि त्या आप्तांच्या ओळीस वसण्यास योग्य असतील असे सेही एवढ्या व्यक्तींचा समावेश होतो. ही च राजमान्य रीत छत्रपतींच्या पत्रलेखनांत आढळते. थोरल्या शाहु-छत्रपतींचीं आतां पर्यंत जीं हस्ताक्षरांनीं अंकित पत्रें प्रसिद्ध झालीं आहेत, तीं अशा च लोकांना लिहिलेलीं आहेत, हें इतिहाससंशोधकांना ठाऊक आहे. केव्हां, केव्हां, हीं पत्रें सबंध असतात तर केव्हां, केव्हां, सबंध पत्र लेखकानें लिहून संपविल्या वर शेवटचीं कांहीं अक्षरें छत्रपतीनीं लिहिलेली असतात. या शेवटच्या अक्षरां विषयीं हि एक नियम बांधलेला आहे. अष्टप्रधान किंवा अत्यंत घरोब्याची व्यक्ति यांना लेखका कडून लिहिविलेल्या पत्राचे शेवटीं **" बहुत लिहिणें तरी तुम्ही सूज्ञ असा "** हें समाप्तिवाक्य छत्रपती **स्वहस्तें** लिहीत असत. ही पद्धति इतिहाससंशोधकांच्या पूर्ण परिचयाची असल्यानें त्यांना विशेष सांगण्याची आवश्यकता नाहीं. सामान्य वाचकांनीं या नियमाच्या सत्यते साठीं छायाचित्र पान दोन मधील श्री० थो० राजाराम छत्रपति, थोरले शाहु-छत्रपति (दोन पत्रें), धाकटे शाहुछत्रपति आणि श्री० प्रतापसिंहछत्रपति यांचीं पत्रें पहावीं म्हणजे त्यांचें आपेआप समाधान होईल. या नियमास अनुसरून च श्रीशिवाजीमहाराजांनीं बापाजी नरसिंगराव आणि विठोजी सितोळे यांना लेखका कडून लिहिविलेल्या पत्रांचे शेवटीं **" बहुत लिहिणें तरी तुम्ही सूज्ञ असा "** हें समाप्तिदर्शक वाक्य **आपल्या हातानें** लिहिलें आहे. **आतां त्या विषयीं कोणीं हि शंका घेऊं नये.** पत्राच्या मथळ्या वर महाराजांची " प्रतिपच्चंद्र " ही मुद्रा नाहीं, याचें कारण हें पत्र घरोब्याचें आहे; तशी ती मुद्रा असती तर तें राज्य-कारभारविषयक पत्र बनलें असतें आणि मग त्या खालीं हीं महाराजांचीं समाप्तिदर्शक अक्षरें हि आलीं नसतीं ! या असल्या अक्षरांच्या पुढें समाप्तिमुद्रा करण्याची चाल असे (क्वचित् प्रसंगीं म्हणजे अगदीं च साध्यासुध्या प्रसंगीं आणि लहानशा पत्रा वर ही मुद्रा आढळणार नाहीं. उ० छायाचित्राच्या दुसऱ्या पानांतील चौथ्या अंकाचें थो० शाहुमहाराजांचें छोटेसें पत्र). ही समाप्ति-मुद्रा " मर्यादेयंविराजते " अशी असून ती च थेट थोरल्या महाराजां पासून शेवटच्या महाराजां पर्यंत होती. शक १५६८ च्या दोन राजपत्रांवर थोरल्या महाराजांची ही च मुद्रा पत्राच्या शेवटीं केलेली आढळते (चतुर्थसंमेलनवृत्त, पृ० ६९, ७१); आणि ती च आपल्या पत्राच्या शेवटीं हि आहे. आपल्या पुस्तकांत ही च मुद्रा थो० राजारामछत्रपति, धाकटे शिवछत्रपति, थो० शाहुछत्रपति, धाकटे शाहु किंवा तिसरे शिवछत्रपति यांच्या पत्रांच्या शेवटीं केलेली आहे. सारांश, **थोरल्या महाराजांचें हें पत्र असून त्याच्या शेवटीं त्यांचीं १४ हस्ताक्षरें आहेत हें निश्चित ठरल्या मुळें** आम्हीं तर म्हणतों च आणि आम्हां सहित साऱ्या महाराष्ट्रानें हि म्हणावें जेः—

आतां होणार तें होयेना कां । आणि जाणार तें जायेना कां ।
तुटली मनांतील आशंका । श्री शिवाक्षराची ॥

—(मूळांत थोडा फेर करून. श्रीदासबोध- ६ × २ × ४४)

६ श्रीसंभाजीमहाराज (थोरले) यांचें पत्र कसें मिळालें इत्यादि वृत्तांत त्या पत्राचे संदर्भाचे ठिकाणीं दिला आहे. महाराष्ट्राला शिवरायाच्या हस्ताक्षराचा जसा महत्तम लाभ झाला तसा या शंभु-छत्रपतीच्या हस्ताक्षराचा महत्तर लाभ झाला आहे; कारण यांचें हि हस्ताक्षर महाराष्ट्रांत प्रथम च प्रसिद्ध होत आहे. साधनचिकित्सा या ग्रंथांत हें पत्र केवळ शंभुकालीन पत्र म्हणून छापलें आहे. पत्रांतील अमुक अक्षरें शंभुछत्रपतींचीं, अमुक पंडितराय यांचीं, अमुक अमात्यांचीं आणि अमुक सचिवांचीं असा निर्देश त्या पुस्तकांत कोठें हि केलेला नाहीं; एवढें च नव्हें तर पत्रांतील लेखनार्थ हि सांगितलेला नाहीं. या सर्व गोष्टी या पुस्तकांत मांडल्या असल्यानें वर म्हटल्याप्रमाणें शंभु-छत्रपतींचीं (आणि पंडितरायादिकांचीं) हस्ताक्षरें प्रथम च आपल्या समोर येत आहेत. हें पत्र म्हणजे दानपत्र असून तें संस्कृतांत लिहिलेलें आहे. अशीं च ३।४ संस्कृत दानपत्रें थो० राजारामछत्र-पतींचीं प्रसिद्ध आहेत (वाड–सनदापत्रें). मात्र आपल्या दानपत्राचा विशेष हा जे, यांत पितामह (शहाजीराजे) आणि पिता (शिवराय) यांचें वर्णन आलें असतां शंभुछत्रपतींनीं त्यांच्या आयुष्यांतील महत्त्वाच्या प्रसंगांचा नामनिर्देश केला आहे; तसें च स्वतःच्या आयुष्यांतील प्रसंग हि उद्धृत केले आहेत. ह्या सर्व प्रसंगांतील कांहीं प्रसंग जुने आणि कांहीं अश्रुतपूर्व आहेत. थो० राजारामछत्रपतींच्या दानपत्रांत हा प्रकार आढळत नाहीं.

७ या पितापुत्र थोरल्या छत्रपतींच्या हस्ताक्षरां नंतर, पुढील जीं इतर छत्रपती, मुख्य प्रधान, अमात्यादि शेष प्रधान, छत्रपती आणि मुख्य प्रधान यांच्या राण्या आणि स्त्रिया, तथा प्रख्यात सामंत आणि सत्पुरुष इत्यादींचीं हस्ताक्षरें प्रसिद्ध होत आहेत, हा सुद्धां एक प्रकारें महा-राष्ट्रास महत् लाभ आहे. कारण या १६ पृष्ठांत ज्या व्यक्ती आल्या आहेत, त्यांतील पुष्कळशा व्यक्तींचीं हस्ताक्षरें आपल्या दृष्टीस प्रथम च पडणारीं आहेत; असल्या प्रकारचें पुस्तक हें पहिलें च आहे. पुस्तकांतील छायाचित्रांचीं एकूण पृष्ठें (" १ अ " धरून) अठरा आहेत. पहिल्या पानांत थोरले श्रीशिवाजीमहाराज यांचें साग्र पत्र आहे तर थोरल्या शंभुछत्रपतींच्या दानपत्राच्या (पाव भागाच्या) उताऱ्यानें १ अ हें पान व्यापलें आहे. दुसऱ्या पानांत इतर छत्रपती आणि त्यांच्या राण्या असोन, तिसऱ्यांत गादी वरील मुख्य प्रधान आणि त्या (भट) घराण्यांतील व्यक्ती आहेत, चवथ्यांत प्रधान-घराण्यांतील स्त्रिया, समशेरबहादर, अलिबहादर आणि अष्ट-प्रधानांतील पंत अमात्य घराणें आहे. सचिव, मंत्रि, न्यायाधीश, सुमंत यांनीं पांचवें पान अलं-कृत केलें आहे तर सहाव्यांत प्रतिनिधि, राजाज्ञा, मुजुमदार (अमात्य), आणि छत्रपतीघरा-ण्याचे आप्त (रायभानजी भोंसले, अक्कलकोटकर आणि नागपूरकर) भोंसले ही मंडळी बसली आहे. सातव्यांत सेनापति जाधव, वाडीकर आणि माळेगांवकर जाधव, करमाळेकर आणि फल-टणकर निंबाळकर मंडळी आहे. आठव्यांत शिर्के, घाटगे, कदम, मोहिते ही छत्रपतींची आप्त-मंडळी आणि बर्वे, चासकर, इचलकरंजीकर, बारामतकर ही मुख्यप्रधानांची आप्तमंडळी आहेत. याच मंडळींतील रास्ते,पेठे, ओंकार, मेहेंदळे, गाडगीळ हीं घराणीं आणि रेटरेकर, पुरंदरे, मोघे, पाटण-कर, नेवाळकर हीं प्रधानपंतांचीं स्नेहांकित घराणीं नवव्या पानांत आलीं आहेत. दहाव्या पासून

पुढें सतराव्या पाना पर्यंत मराठीसाम्राज्यांतील प्रख्यात मराठे, प्रभु, सारस्वत, पारशी, ब्राह्मण आणि इतर ज्ञातींतील घराणीं आलीं आहेत. सतराव्या पानांत प्रथम एक निवाडपत्र असून (यांचा साग्र उलगडा त्या ठिकाणीं पहावा), नंतर श्रीसमर्थादि सत्पुरुष आणि (काम संपावयाच्या वेळीं मिळाल्या मुळें येथें देण्यांत आलेल्या) प्रधानघराण्यांतील चार स्त्रिया यांची प्रतिष्ठा केली आहे. या प्रमाणें सामान्यतः सतरा (खरोखर अठरा) पानांची रचना आहे. दहाव्या पासून सोळाव्या पर्यंत जीं घराणीं आहेत त्यांत मराठ्यांचीं १९।२० असून, सारस्वत, प्रभु, यांचीं सात, पारशी एक, ब्राह्मणाचीं तेहतीस आणि इतर पांच घराणीं आहेत. यांतील सर्व व्यक्तींचीं नांवें शेवटीं दिलेल्या सूचींत आलीं आहेत.

८ एकंदर १८ पानें धरून अडीच शें व्यक्ती या संग्रहांत आल्या आहेत. या संग्रहाचा हा विशेष आहे जे, यांत **तेवीस स्त्रियांचीं हस्ताक्षरें** आलीं आहेत. त्यांत छत्रपतींच्या राण्या पांच, पंतप्रधानांच्या स्त्रिया पांच, त्यांच्या घराण्यांतील म्हणजे इचलकरंजीकर, ओंकार, वारामतकर इत्यादिकांच्या पांच आणि शेष राहिलेल्या मराठे–ब्राह्मणादि सामंत घराण्यांतील आहेत. स्त्रियांचीं आणखी हि हस्ताक्षरें देतां आलीं असतीं, पण तत्कालीन स्त्रिया अक्षरशत्रू नव्हत्या एवढें च आम्हांस सिद्ध करावयाचें होतें, म्हणून या पेक्षां अधिक संख्या द्यावयाची आवश्यकता भासली नाहीं. ज्या साम्राज्यांत स्त्रिया सुद्धां लेखन करितात, त्या साम्राज्याचा संस्थापक निरक्षर होता असें प्रतिपादणाऱ्यांची कोटी, या जीवसृष्टींत कोणत्या पायरीची आहे हें ती (चार खाणींची) सृष्टी निर्माण करणारा ब्रह्मदेव च जाणें ! पुस्तकांत उलगड्याचा जो अनुक्रम दिला आहे तो असा:–प्रथम लेखकाचें नांव देऊन, तेथें त्याचा जन्म, मृत्यु आणि त्याच्या आयुष्यांतील महत्त्वाचे प्रसंग ग्रथित केले आहेत; ज्यांचीं आढळलीं त्यांचीं निधनस्थळें हि दिलीं आहेत; तसें च गंवसलेल्या त्यांच्या मुद्रा हि त्यांच्या त्यांच्या नांवां खालीं दिल्या आहेत; मुद्रा द्याव्या, ही कल्पना मागून सुचल्या वरोन (त्या मुळें सर्व ठिकाणें धुंडाळावयास सवड न झाल्यानें) कांहीं व्यक्तींच्या मुद्रा राहिल्या गेल्या. कांहींच्या दोन दोन (किंवा अधिक) मुद्रा सांपडल्या त्यांचा हि संग्रह केला. श्री० नानास्वामि प्रधान यांच्या पुण्याच्या समाधिस्थाना (काष्ठ सेतूच्या–लकडी पुलाच्या उजवी कडे कां डावी कडे या) विषयीं आम्हीं सर्व प्रकारें शोध करून आणि मिळालेले सर्व पुरावे ग्रथित करून **स्पष्ट निवाडा** केला आहे. लेखकांची ओळख देणें या नियमांतून स्पष्ट च छत्रपति आणि पंतप्रधान यांना (आणि क्वचित् नाना श्रीकरणाधिपा सारख्या थोड्याशा व्यक्तींना) वगळलें आहे; कारण त्यांचा वृत्तांत प्रसिद्ध आहे. या प्रमाणें लेखकाची ओळख दिल्या वर छायाचित्रांत त्या व्यक्तीचें म्हणून जेवढें पत्र छापलें गेलें आहे, तेवढ्याचें बाळबोधी मध्यें रूपांतर केलें आहे आणि त्यांतील त्या व्यक्तीचें हस्ताक्षर जाड ठशांत छापलें आहे. एकाद्या व्यक्तीचें पत्र सर्वच्या सर्व तिच्या हातचें असल्यास तें सगळें च जाड ठशांत घेतलें आहे. हस्ताक्षराचें छायाचित्र घेतांना, प्रारंभीं त्या व्यक्तीचें नांव यावें अशी योजना केल्यानें, मधील पत्राच्या घड्या घालाव्या लागल्या; त्यामुळें नांवाची ओळ आणि हस्ताक्षराची ओळ या ओळीं एका पुढें एक

वाचतांना वाचकांचा घोंटाळा होण्याचा संभव आहे. कांहीं (पण फार च थोड्या) छायाचित्रांत लेखकाचें नांव दिसत नाहीं; याचें कारण मूळ पत्रांत लेखकाच्या नांवाच्या थेट मागील अंगास च त्याचें हस्ताक्षर आलें आहे. त्या मुळें आणि कोणती हि युक्ति करून नांव आणि हस्ताक्षर दोन्हीं चित्रांत आणतां येईनात म्हणून नांव सोडून हस्ताक्षराचें च तेवढें चित्र घेतलें आहे. चित्राच्या पानांत दोन दोन कोठे करून त्यांत पत्रें बसविली आहेत. अर्थात् पत्राची रुंदी मर्यादित झाली; त्या मुळें रुंदींतिलं कांहीं अक्षरें कांहीं ठिकाणीं कापलीं गेली. तीं अक्षरें वाळवोधी रूपांतरांत [ ] या चौकटी कंसांत दिलीं आहेत. कांहीं लेखकांनीं मूळ पत्रांत च अक्षरें गाळलीं आहेत; तीं संदर्भासाठीं म्हणोन { } या कंसांत आणि मूळांतील च पण चित्रांत न आलेलीं अक्षरें ( ) या कंसांत दिलीं आहेत. पत्राच्या रूपांतराचे शेवटीं संदर्भ म्हणून शब्द देऊन त्याच्या पोटांत मूळ पत्रांतील विषयाची त्रोटक फोड केली आहे. पुस्तकांतील सर्व काल सूक्ष्म छाननी करून दिले आहेत; म्हणजे प्रथमतः इतरत्र असलेल्या मूळ लेखां मधून ते घेतले आहेत, तसें ते न सांपडल्यास मग शकावल्यांतून उध्दृत केले आहेत; आणि तेथें हि न आढळल्यास मग रिसायती–इतिहास असल्या साधनांची जोड केली असून सरते शेवटीं वखरी-टिपणें यांचा आश्रय केला आहे. इतकी सावधानता ठेवल्या वर हि चुकी होण्याचा संभव आहे पण त्यास उपाय नाहीं. कांहीं व्यक्तींचीं निरनिराळ्या (वयांच्या) अवस्थेंतील वळणें दर्शविण्या साठीं दोन दोन पत्रांचीं चित्रें काढविलीं आहेत. चित्रपान दुसरें अंक दोनचें चित्र "रामसूनोः शिव" छत्रपति यांचें आहे. या पत्रांतील शेवटचीं **" लेखनालंकार " ही अक्षरें या छत्रपतींच्या हातचीं नाहींत.** एक तर या प्रसंगीं या छत्रपतींचें वय आठ होतें (हे ' भ्रांत ' होते हें प्रसिद्ध च आहे. तसें च हे भर वयांत येण्या पूर्वीं च पदच्युत झाले होते; त्यामुळें त्यांच्या हस्ताक्षरप्राप्तीची आशा दुर्लभ आहे) आणि दुसरी महत्त्वाची गोष्ट म्हणजे **राजपत्रांच्या शेवटीं लेखनालंकार ही समाप्तिदर्शक अक्षरें छत्रपतींनीं लिहावयाचीं नसून अमात्यांनीं लिहावयाचीं असा लेखनप्रशस्तींतील कडक नियम च आहे.** थोरल्या महाराजांना राज्याभिषेक झाल्यावर जो " कानुजाबता " या लेखन-प्रशस्तीचा म्हणून [illegible] गेला, त्यांत " अमात्य याणीं...फडनिशी, चिटनिशी पत्रावर निशाण करावें " असा नियम केला आहे (वाड–सनदापत्रें, पृ० १२३). हें निशाण म्हणजे हस्ताक्षर, कोणतें असे त्याचा स्पष्ट उच्चार अष्ट प्रधानांच्या इतिहासांत आला आहे तो असाः– " पंत अमात्य यांचें राजमंडळांत असें काम होतें कीं, ... राजपत्रावर " **लेखनालंकार** " व वारसुद व तारीख इतकीं निशाणें होत होतीं " (पृ० २१६). या नियमाचा प्रत्यक्ष पुरावा या पुस्तकांतील थोरल्या संभाजीछत्रपतींच्या संस्कृत नेमणूकपत्राच्या (चित्रपान १ अ) शेवटीं रघुनाथ नारायण हणमंते अमात्य यांनीं " नारायणध्वरींद्रस्य रघुनाथाभिधः सुतः । आमात्योदानपत्रेस्मिन्लेखनालंकृतिंव्यधात् " असें म्हणून स्वहस्तानें मोडींत " **लेखनालंकार** " हीं अक्षरें लिहिलीं आहेत (छायाचित्राच्या नेहमींच्या मापांत, हें पत्र अतीशय लांब असल्यानें पुढील ओळी आणि त्या मुळें ही हि ओळ घेतां आली नाहीं), यांत सांपडतो. या अक्षरांनीं

आतां पर्यंत मोठमोठ्या इतिहाससंशोधकांचीं अनेक वार दिशाभूल केलेली आहे. या अक्षरांकित (तसें च " मोर्तबसुद " म्हणजे च लेखनालंकार या अक्षरांकित) अशीं थोरल्या महाराजांचीं कांहीं पत्रें मागें कांहीं संशोधकांना उपलब्ध झालीं होतीं. त्यां वरून हीं च महाराजांचीं हस्ताक्षरें होत, असें त्यांनीं सर्वत्र प्रसिद्ध केलें होतें (पाटगांव-मौनीबुवा, लेख. यांतील " लेखनालंकार "; भा० इ० सं० मंडळ त्रैमासिक, व० १३, अं० ४, पृ० ८९ आणि ९१; तसें च श्रीशिवछत्रपतींनीं दिलेला एक अपूर्व निवाडा, यांतील शेवटचा " मोर्तबसुद ". रामदास आणि रामदासी मासिक, व० ६, अंक ६३।६४). पण आतां वरील विवेचना वरोन आणि प्रत्यक्ष प्रमाणा वरोन हीं **अक्षरें** छत्रपतींचीं नसतात तर **अमात्यांचीं असतात** हें निर्विवाद स्पष्ट झालें ! पुस्तक वाचतांना वाचकांच्या डोळ्यांत एक गोष्ट चटकन् भरेल; ती म्हणजे त्यांच्या कानाला अपरिचित वाटणारी भाषा ! परंतु ज्यांनीं मालेचें पहिलें पुस्तक वाचलें असेल त्यांच्या ध्यानांत ही गोष्ट त्या वेळीं च येऊन गेली असेल जे, मालेनें स्वतः साठीं जे नियम पाळावयाचे ठरविलें आहे, त्यांतील " होतां होईल तों म्लेच्छ (अरबी, फार्सी, इंग्रेजी) शब्द वापरावयाचा नाहीं, त्यांच्या स्थानीं पूर्वी रूढ असलेला अथवा नसल्यास नूतन संस्कृत किंवा संस्कृतोद्भव शब्द बनवून तो ध्यावयाचा " हा एक प्रमुख नियम आहे. पहिल्या पुस्तकांत राज्यकारभार–विषयक शब्द थोडे आल्यानें वाचकांना तें पुस्तक वाचतांना फारसें अवघड वाटलें नसेल. पण या पुस्तकांत घेतलेलीं सर्व पत्रें बहुधां राज्यकारभाराचीं असल्यानें त्यांतील म्लेच्छ शब्दांना जे मराठी किंवा संस्कृत प्रतिशब्द योजले आहेत, ते वाचकांना अवघड जातील याची संपादकांना जाणीव आहे! एवढें च नव्हें तर सामान्य लोकांच्या तोंडीं बसलेल्या म्लेच्छ शब्दांचें उच्चाटन करून तेथें वापरलेल्या दुसऱ्या शब्दां कडे पाहून कांहीं जण आम्हांस दोष हि देतील. तथापि, आम्हीं योजलेल्या बहुतेक प्रतिशब्दांच्या मागें इतिहास आहे हें त्यांनीं कृपापूर्वक लक्ष्यांत घ्यावें. उदाहरणार्थ, " मुजुमदार " या फारशी शब्दाला " अमात्य " हा शब्द आम्हीं वापरला तर कोणी फारसा आक्षेप घेणार नाहीं, पण अत्यंत रूढ अशा " (नाना)साहेब पेशवे " आणि " (नाना) फडणीस " यांना " (नाना) स्वामी पंत (किंवा मुख्य) प्रधान " आणि " (नाना) श्रीकरणाधिप (किंवा करणिक) " असे जे आम्हीं प्रतिशब्द योजिले आहेत, ते त्यांना फारसे आवडणार नाहींत; कदाचित् त्या साठीं आमची कुचाळी हि होईल. तथापि जुने लेख ज्यांनीं वाचले आहेत त्यांच्या हें (थोडासा प्रयत्न करून) ध्यानांत येईल जे, नारो शंकर, गोविंद बल्लाळ, अंताजी माणकेश्वर इत्यादि नामांकित सामंत, नानासाहेब (प्रधान) यांस " नाना स्वामी " अशा च संबोधनाचीं पत्रें लिहीत; म्हणजे " साहेबा "च्या ठिकाणीं " स्वामी "ची योजना करावयास असा इतिहासाचा आधार आहे! ताम्रपत्रादि प्राचीन लेख वाचणारांना आठवत असेल च जे, देवगिरीकर यादवराजांचे फडणीस जे हेमाद्रि त्यांना त्या प्राचीन लेखांतून " श्रीकरणाधिप " किंवा " श्रीकराणिक " असें नामाभिधान दिलेलें आहे. तेव्हां " फडणीस " च्या जागीं " श्रीकरणाधिप–करणिक " जो येऊन बसतो आहे तो आपल्या

या प्राचीन अधिकाराच्या बळा वर च वसतो आहे! या विरहित जे अनेक संस्कृतादि प्रतिशब्द योजिले आहेत, त्यांना राज्यव्यवहार कोश, ताम्र-शिलाशासनें आणि ऐतिहासिक पत्रव्यवहार यांचा आधार आहे; आम्हीं होऊन निर्माण केलेले असे प्रतिशब्द अत्यल्प आहेत. प्रथम, प्रथम या शब्दांनीं अडखळल्या सारखें होईल खरें, पण थोडीशी संवय झाली म्हणजे मायभाषा दूषित करावयाच्या पापांतून आपण मुक्त होणार नाहीं काय? ही संवय आपल्यास जडावी म्हणोन पुस्तकांत आलेल्या अशा शब्दांचा एक छोटासा कोश शेवटीं दिला आहे. मराठी (निदान राज्यकारभारांतील मराठी) शुद्ध असावी हा थोरल्या महाराजांचा हेतु, पुढील राज्याधिकाऱ्यांनीं हि दृष्टी पुढें ठेवून तसा उद्योग चालूं ठेविला होता. भारतवर्षांतील तत्कालीन मोठ्या, छोट्या, तसें च मराठी साम्राज्याच्या मांडलिक आणि मित्र संस्थानांतून साम्राज्याचे सुमंत अथवा लेखक नियुक्त केलेले असत. त्यांच्या वतीनें साम्राज्याशीं पत्रव्यवहार करावा लागे; तसें च तत्कालीन सार्वत्रिक नियमा प्रमाणें त्या पत्रव्यवहारा खालीं संस्थानिकानें समाप्तिदर्शक अशीं कांहीं अक्षरें लिहावीं लागत. असल्या प्रकारच्या आतां पर्यंत आढळलेल्या पत्रव्यवहारांत हीं अक्षरें बाळबोधी आणि **मोडी** अशीं दोन्ही प्रकारचीं सांपडतात. या प्रमाणें, या ठिकाणीं थोरल्या महाराजांचा हेतु अनुसरला जात होता हें सिद्ध होतें. असलीं कांहीं उदाहरणें द्यावीं म्हणून या पुस्तकांत पांच सहा पत्रें बुद्धयां छापिलीं आहेत. हे पत्रलेखक, पारशी, कोळी, बेरड, रजपूत, मुसुलमान इत्यादि जातींचे असोन, त्यांतील कांहीं संस्थानिक तर कांहीं सामंत आहेत. यांच्या मधील केवळ एकानें लेखनसमाप्तीचीं अक्षरें बाळबोधींत लिहिलीं असून उरलेल्या सर्वांनीं **मोडी** अक्षरें लिहिलीं आहेत!

९ जुन्या ऐतिहासिक पत्रांतून कालाचा जो उल्लेख येतो तो सुरु (अ० शुहूर् = महिने) सन (अ० सना = वर्ष) या गणनेचा येतो. त्याचा आरंभ हिजरी शका पूर्वी २२ वर्षें म्हणजे ता० २४ मे इसवी सन ६०० रोजीं झाला. सुरु सना वरून इसवी सन काढणें झाल्यास मृगा पूर्वी त्यांत ६०० आणि मृगा नंतर ५९९ मिळवून काढावा आणि त्यांतून ७८ उणें करावेत म्हणजे शालिवाहन वर्ष निघेल. पत्रांतून या सुरु वर्षाची गणना अंकांनीं न करतां अक्षरांनीं करण्याची रीत आहे. या वर्षांत १ पासून १० आणि २० पासून (दहंचा आंकडा) १०० पर्यंत, तसेंच पुढें शतं आणि सहस्र या अंकांना निरनिराळीं नांवें आहेत. तीं अशीं:—

१ इहिद्दे	११ इहिद्दे अशर	१२२ इसन्ने अशरीन मय्या
२ इसन्ने	२० अशरीन	२०० मय्या तैन.
३ सल्लास	३० सल्लासीन	३०० सल्लास मय्या
४ आर्बा	४० अर्बैन	४०० अर्बा मय्या
५ खमस	५० खमसैन	५०० खमस मय्या
६ शीत	६० शीतैन	१००० अल्फ

७ सब्या	७० सब्बैन	११०० मय्या व अल्लफ
८ सम्मान	८० सम्म नीन	१२०० मय्या तैन व अल्लफ
९ तिस्सा	९० तिस्सैन	१२३० सल्लासीन मय्या तैन व अलफ
१० अशर	१०० मय्या	१३१३ सल्लास अशर सल्लास मय्या व अलफ.

उ० इसवी सन १७६० मे २७ पूर्व = ११६० सु० सन; २७ तारखेनंतर = ११६१ सु० सन. म्हणजे या वर्षीं २७ मे रोजीं मृग लागतो म्हणून तत्पूर्वीं सु० स० ११६०; यांत ६०० मिळविले म्हणजे इ० स० १७६० येतो; तसेंच मृगा नंतर सु० स० ११६१; यांत ५९९ मिळविले म्हणजे हि १७६० येतो. यांत च ७८ उणें केले म्हणजे शालिवाहन शक १६८२ येतो. आतां ११६० हीं संख्या वाचण्याची रीत. सीतैन = ६० + मय्या = १०० + व अल्लफ = १०००, सर्व मिळून ११६०; तसें च ११६१ = इहिद्दे = १ + सीतैन = ६० + मय्या = १०० + अल्लफ = १००० = ११६१ या प्रमाणें स्थूल मानानें संख्या काढतां येतात. आम्हीं या पुस्तकांत आमच्या सदोदितच्या रीती प्रमाणें सर्वत्र शालिवाहन वर्ष वापरलें आहे.

१० सर्व सामान्य पत्रें आणि तीं हि मोठमोठ्या व्यक्तींनीं लिहिण्याची तत्कालीन रीत अशी होती जे, पत्रारंभीं " श्री " लेखकानें लिहून पुढें रेघ ओढून ठेवावयाची; मग त्या रेघे वर मुख्यानें आपल्या हातानें आपल्या कुलदेवतेचें नांव लिहावयाचें. त्या नंतर सर्व पत्र लेखकानें पुरें करावयाचें आणि शेवटीं मुख्यानें " हे विनंति " किंवा " हे आशीर्वाद " लिहून पत्र पुरें करावयाचें. या शेवटच्या अक्षरांत, ज्याला पत्र लिहिलें असेल त्याच्या माना प्रमाणें हे विनंतीच्या ठिकाणीं " हे विज्ञापना, " " कळावें बहुत काय लिहिणें हे विज्ञापना " इत्यादि प्रकार असत. मुख्यास आणखी लेखन करावयाचें असल्यास, हे विनंतीच्या आधीं, तो, तें करी. महत्त्वाचीं पत्रें किंवा अगदीं च घरगुतीं पत्रें सर्वच्या सर्व मुख्य व्यक्ति स्वहस्तें लिही. या घरगुती पत्रा प्रमाणें च राजकीय पत्रांत सुद्धां बहुधां हा च नियम प्रचारांत असे. छत्रपतींची पत्रलेखनपद्धति कशी असे हें वर आलें च आहे. पूर्वीच्या पत्रांत श्रीकार काढल्या नंतर " राजमान्य राजश्री.....(येथें त्या व्यक्तीचें नांव असतें) यांसी " अशा दोन ओळी लिहून झाल्या वर मग खालीं पत्राच्या मुख्य लेखनास प्रारंभ करतांना " अखंडित लक्ष्मी आलंकृत " अशीं अक्षरें लिहून पुढें थोडी मोकळी जागा सोडून नंतर पत्रलेखक (श्रीं, पोष्य या अक्षरांनीं प्रारंभ करून) आपलें नांव लिही आणि पुढें पत्रांतील लेखन होई. नवशिक्या वाचक दिशाभुलीनें " अखंडित लक्ष्मी आलंकृत " या पदाचा संबंध पत्रलेखकाकडे लावतो, पण तें चूक असून, त्याचा खरा संबंध ज्याला पत्र लिहिलें त्याच्याशीं असतो; म्हणजे पत्र वाचतांना प्रथम " अखंडित लक्ष्मी आलंकृत " हीं अक्षरें वाचून मग वरच्या " राजमान्य राजश्री "ची ओळ त्या पुढील नांवासह वाचावयाची आणि नंतर खालचें पत्रलेखकाचें नांव वाचून सर्व पत्र वाचण्यास प्रारंभ करावयाचा. देव किंवा साधु यांच्या विषयीं पत्रें लिहितात, त्यांत हि पत्राच्या वर किंवा एका कोपऱ्यांत त्या

देवाचें नांव लिहितात आणि मग पत्रांत त्या देवाचें नांव आलें असतां नुसतें " श्री " लिहून तिच्या पुढें मोकळी जागा सोडतात याचा अर्थ त्या ठिकाणीं त्या देवाचें नांव उच्चारावयाचें. श्रीकारा पुढील देवता, या, निरनिराळ्या घराण्यांच्या निरनिराळ्या पण ठराविक असत. पंत प्रधानांच्या घरगुती पत्रांत, मागें सांगितल्या प्रमाणें " श्रीर्जयति " असे, सचिव घराण्याची " श्रीरामचंद्र, " बारामतकर जोशांची " श्रीशंकर, " पंतअमात्यांची "श्रीरामचंद्र"इ० देवता असत. आतांपर्यंत " श्रीआई आदिपुरुष " ही देवता केवळ प्रतिनिधींची च होती अशी समज़त आहे; पण आपल्या या पुस्तकांत तो च श्रीकार, रामचंद्रपंत अमात्यांच्या पत्रांत (छा० चि० ४, अं० ८) त्यांनीं स्वहस्तें काढलेला आहे; त्या वरून मूळची ती देवता त्यांची असून पुढें प्रतिनिधी घराण्यानें घेतली असें दिसतें. पुस्तकांत शिवकालीन हस्ताक्षरें थोडीं आहेत; प्रधानकालीन बहुत. याचें कारण उघड आहे जे, तीं अक्षरें फारशीं उपलब्ध नाहींत. पुढें मागें उपलब्ध झाल्यास आणि श्रीसमर्थांनीं तसा योग आणल्यास त्यांचें हि प्रकाशन होईल. अक्षरां वरोन माणसाची परीक्षा करण्याचें एक शास्त्र आहे. आम्हांला वाटतें त्या वरून बनविलेला सिद्धांत अपुरा होत असावा. उदाहरणार्थ, सखारामबापूंचें हस्ताक्षर वेडें वांकडें आहे (छा० चि० १०, अं० १६) म्हणून त्यांची बुद्धि सदोदित वक्र होती असा सिद्धांत बांधल्यास, महादजी शिंदे यांचें अक्षर (छा० चि० १५, अं० ४) मोकळें आणि स्वच्छ असल्यानें त्यांना अत्यंत सरळ वृत्तीचें गणावें लागेल; पण वस्तुतः पाटीलबावांच्या मनाची ठेवण कशी होती, हें इतिहासवेत्त्यांना ठाऊक च आहे! श्री० राघोबादादास्वामी यांचा भोळा स्वभाव कांहीं त्यांच्या (छा० चि० ३, अं० ११) अक्षरांत प्रतीतीस येत नाहीं. आणखी असें जे, वयोमाना प्रमाणें प्रत्येक व्यक्तीच्या अक्षरांत अंतर पडतें; म्हणजे तरुणपणचें चांगलें अक्षर म्हातारपणीं ढोवळ आणि कांपरें असतें (हें लक्ष्यांत यावें म्हणून पुस्तकांत एका च व्यक्तीचीं असलीं भिन्नावस्थेंतील अक्षरें, आपण तीन चार ठिकाणीं जाणूनबुजून छापिलीं आहेत). सारांश, अक्षरां वरोन व्यक्तीचीं परीक्षा करणें जरा धाडसाचें आहे म्हणून आम्हीं असल्या सिद्धांताला वर " अपुरा " म्हटलें आहे. तथापि, असल्या शास्त्राचा कोणीं अभ्यासु असेल तर त्याला या पुस्तकांत अभ्यास करण्यास मुबलक क्षेत्र आहे खरें! जुन्या लेखांचीं मषीपत्रें त्या वेळीं दौलताबाद, औरंगाबाद,जुन्नर, एरंडोल, नागपूर या आणि इतर नगरांत होत असत. लेखनास जी मषी ध्यावयाची ती इतकी चांगली करीत जे, मषीपत्र भिजलें तरी तीं फिक्की होत नसे. मषीपत्रास तुरटीचें पाणी (आणि इतर औषधें) लावीत म्हणून त्यास कसर लागत नसे. या आपल्या पुस्तकांत (छा० चि० ८ अं० १३) बाबूजी नाईक बारामतकर यांचें वर्णन, इतर सर्व व्यक्तींच्या वर्णना पेक्षां थोडसें अधिक आहे; याचें कारण, नाइकां विषयीं आज पर्यंत जो इतिहास प्रसिद्ध झाला आहे तो निव्वळ एकपक्षी आहे, त्या मुळें तो विकृत स्वरूपांत झाला आहे. सरदेसाई यांनीं पंतप्रधानलेख्यशाळेंतील लेखांची आतां पर्यंत जीं ३०।३५ पुस्तकें प्रसिद्ध केलीं आहेत, त्यां वरून नाइकांचा वरील इतिहास खोटा ठरत आहे. हा इतिहास आतां खऱ्या स्वरूपांत, नाइकांचे विद्यमान

धंशज आणि या पुस्तकाच्या संपादकद्वयांतील एक रा० आ० वा० जोशी यांनीं लिहिण्यास प्रारंभ केला आहे; थोड्या च दिवसांत हें पुस्तक बाहेर पडेल. तत्पूर्वी, इतिहासज्ञांना आगामी चरित्राची त्रोटक रूपरेषा कळावी म्हणून नाइकां विषयीं अधिक वृत्तांत दिला आहे. मालेचें जें नांव आहे, त्याचें वैशिष्ट्य म्हणून आनंदवनभुवनाचें एक भूमिरेखाचित्र स्वतःच्या कल्पनेनें नवीन निर्माण करून मालेच्या संपादकांनीं, पहिल्या पुस्तकांत छापलें आहे. त्याच्या प्रतिकृति (संपादकांची अनुज्ञा न घेतां) महाराष्ट्रांतील कांहीं पुस्तकांत छापावयास प्रारंभ झाला आहे ही मोठ्या आनंदाची गोष्ट आहे! संपादक असें समजतात जे, आपली भूमिरेखाचित्राची कल्पना महाराष्ट्रास संमत आहे; त्या मुळें ज्या लेखकांनीं मालेच्या या चित्राची प्रतिकृति करतांना आणि ती छापतांना, मालेच्या संपादकांची अनुज्ञा घेण्याची शिष्टांची रीत पाळली नाहीं, त्या विषयीं संपादकांस राग येत नाहीं किंवा वाईट हि वाटत नाहीं ! या पुस्तकांत श्रीशिवाजीमहाराज शाकर्ते यांच्या पासोन श्री० धा० बाजीराव प्रधान यांच्या पर्यंत २५० व्यक्तींचीं **हस्ताक्षरें** आलीं आहेत; त्या व्यक्तींचा थोडासा वृत्तांत आणि त्यांच्या मुद्रा हि दिल्या आहेत; म्हणजे या साऱ्या व्यक्ती " शिवशाहीं "(महाराष्ट्र साम्राज्यां)तील आहेत. तेव्हां हा सारा विचार करून, पुस्तकाला " **श्रीशिवशाहीचा लेखनालंकार** " हें नांव दिलें आहे! दुसरें, या २५० व्यक्तींच्या लेखनालंकारांचा अगदीं प्रमुख लेखनालंकार म्हणजे **श्रीशिवछत्रपतींचें हस्ताक्षर** होय; त्या मुळें हि पुस्तकाला वरील नांव देण्यांत औचित्य आहे. सर्व प्रकारें शोध करून पुस्तकांतील एकंदर वृत्तांत लिहिला आहे, तथापि दृष्टिदोषानें त्यांत चुका राहण्याचा संभव आहे. तशा त्या आहेत असें साधार कोणीं कळविल्यास संपादकद्वय, त्यांचे बहुत आभारी होतील.

११ या प्रमाणें या पुस्तकाचें सामान्य स्वरूप आहे. यांत ज्या व्यक्तींचीं हस्ताक्षरें आलीं आहेत त्या सर्व प्रख्यात व्यक्ती आहेत. चुकून माकून एखादी अख्यात व्यक्ति यांत आली असेल किंवा एखादी प्रख्यात व्यक्ति यावयाची राहिली असेल; पण राहिली याचें कारण तिचें अक्षर सांपडलें नाहीं म्हणून. आलेल्या सर्व व्यक्तींनीं शिवसाम्राज्या साठीं 'अखंड नाना धारणा' धरून, 'राजकारणाच्या अखंड नाना चालना' केल्या आहेत हें इतिहासज्ञांना विदित च आहे. इतक्या व्यक्तींचा समावेश पुस्तकांत करण्याचा प्रधान हेतु, त्यांच्या हस्ताक्षरांचें दर्शन व्हावें हा तर आहे च, तथापि तें होत असतां, त्या प्रत्येकीनें भारतवर्षाच्या कल्याणा साठीं काय काय प्रयत्न केले त्यांची हि आठवण होऊन आपल्या सर्वांच्या हातून यथाशक्ति कांहीं तरी देशाला " सजेलसें " कृत्य व्हावें हा दुसरा हेतु आहे. " कोडें सांकडें संकट । नाना संसार खटपट । अवस्ता लागतां चटपट ।" आपण या व्यक्तींचें "नामस्मरण करावें ॥" (श्री० दा० ४×३×६). या व्यक्तींतील देशोद्धारक व्यक्तीं विषयीं पूर्ण निष्ठा ठेवावी. " जैसा जैसा घडे संग । तैसे गुह्याचे रंग " पालटतात, तसें आपण सरड होऊं नये! श्रीसमर्थचरणीं अखंड निष्ठा ठेवावी. तिच्या योगें ' संकटें नासतील, विघ्नें निवारतील आणि उत्तम पदाची प्राप्ति होईल ! संपादकांनीं पूर्वी च सांगितलें आहे जे, आम्ही दोघें हि श्रीसमर्थांचे पादरक्षाधर आहों; हें पुस्तकाचें कार्य श्रीं नीं च केलें आहे, आम्हीं

नव्हें. जेथें " सकळ करणें जगदीशाचें " आहे, तेथें हें पुस्तकरचनेचें कार्य तरी कोणाचें असणार ? सारांश, संपादक, श्रीसमर्थचरणीं विनीत होऊन एवढें च म्हणतात जेः—

महाराष्ट्राच्या साभिमानें । कृपा केली श्रीदाशरथीनें ॥
श्रीसमर्थ-शिवकृपेचीं वचनें । तो हा " लेखनालंकार " ॥


श्रीसमर्थचरणरज,

आ० बा० जोशी,
बारामतीकर,
आबा चांदोरकर.

पुणें, मार्गशीर्ष शुद्ध षष्ठी, गुरुवार
शिवराज्याभिषेक शक २६०

लेखनालंकार

उलगडा


मराठी ग्रंथ संग्रहालय
स्वच्छ प्रत
सं.....सं.....
सं.....

[पुढील कविता आमचे मित्र 'मोरानुज' (रा० दत्तात्रय नारायण बोकील) यांनीं स्वत:च्या श्रीसमर्थशिवरायांच्या वरील भक्तीनें केली. बोकील, हे, प्रख्यात सखाराम बापू यांचे वंशज असल्यानें त्यांचा या शिवशाहीशीं संबंध येणें साहजिक आहे.]

शिवशाही—लेखन—अलंकार

शार्दूल०:—

शिष्य श्रीप्रभुचा समर्थ पहिला लोकोपकारास्तव
वर्षें द्वादश तापसी बनुनियां गायत्रि सिद्धीभव;
शाही श्रीप्रभुची पुन्हा वसविण्या शाहासुता बोलवी
ही विद्या पढवी तयासि मग, जे म्लेछांस उच्छेदवी. १

लेखा देत तयास पाठ पहिला दादो-जिजा-श्रीगुरू
" खड्गा घेइं, उचीत दंड करणें, गो-विप्र-पीडाकरूं;
नक्षा दूर करीं, मदांध समरीं मारीं, प्रजा सूखवीं;
माझी ही भगवी ध्वजा उभवुनी, श्रीराम संतोषवीं. " २

स्रग्धरा:—

अप्राप्य स्थान जेथें लिखित बहु असे शूर-धीमान् जनांचें
लंकेशारिप्रसादें प्रतिक मिळविलें दिव्य हस्ताक्षरांचें;
कार्या संपादकांच्या परिणत यश ये, द्योतवी जें जगाला;
रक्षीं, लक्षीं, गुणज्ञा शिवकरलिखिता दर्शवीत्या बुधाला. ३

—मारानुज—




मसुरल अनाम राजेश्री बापाजी नरसीगराव व विठोजी सिंतो
ले देसमुख पा पुणें प्रति राजेश्री शीवाजि राजे उपरी तु
म्ही नारो कृस्ण धडफले हजूर पाठविले त्याणी येउनु मा
लुम केलें कीं कदीम हक देसमुख होनु १९०६ येकुणी से
सा व गावखंडी व इनामती व वाजे हक व देसकुलकर्णी होनु
५९४ पांच से चौऱ्याणव आहेत त्या वरी ईनामती खंड
णी माहाराज साहेबाचे कारकीर्दीस गावखंडी व वाजे हक व
इनामती माफ करुनु यैन हका वरी देसमुखा कडे होन ३०५
तीन से पांच व देसकुलकर्णी होनु ९५ पंच्याणव येणें
प्रमाणें च्यार से होनु घ्यावयाचा तह आहे त्या प्रमाणें मा
हालचे कारकून आजार लावितातीं हालीं मोगलाचे धामधु
मेने मुलुक वैरान जाला आहे या करितां दस्त माफीक
ईनामती खंडणां घ्यावयाचा हुकूम केला पाहिजे
म्हणनुनु मालुम केले त्या वरून माहालच्या कारकुनास
हुकूम अलाहिदा सादर केला अस ते दस्त माफीक
तुम्हा पासून ईनामती खंडनीचा वसूल घेतील ब

[पाठीमागें]

हुत लिहिणे तरी तुम्ही सूज्ञ असा मर्या
देयं विरा
जते [स० गु०]

Govt Photozinco Office Poona, 1933.



॥ मतं मे श्रीशिवराजपुत्रस्य श्रीशंभुराज ॥
॥ छत्रपतेः पद्मोपरि के वितं ॥ श्री ॥ ॥

ओ ॥ स्वस्ति श्रीमदखिलस्वचिंतमहार्हमाणिक्यवर्मोद्यत्
हेममयमुरव्यरत्नोपशोभितखड्गवल्लिक्ष्मानिरंजिव
दरिभ्राणिहिनखांशुमालिकाक्षीणाक्षिनक्षेत्रायचाऽनतं
विहितचूस्त्रविसारविरत्नन्मस्तकतेपताकापंक्ति
पवित्रीकृतसमस्तदुर्ग्रहदुर्योगसंगीतशास्त्रानु
सारिगंधर्वसिद्धकिन्नरसाध्यास्रचोगएकेठमाधुर्य
रंगत्संगतसमाचचितगानातुरूढीकृतमनोहा
रतरलितसप्तालंकृतीगूनदविमिर्मितविविधज
स्रयानजालारंठलनर्तनिश्चएकिंचचासुचभ्रमी
धरसमुदायस्रासमावसुधासिंधुमध्यपयनिश्चेलो
चपचत्रावर्तिकाविकुछबाहेवरवीवर्णनीमग्रधा
नवस्तुप्राधान्यात्वर्तिश्रुतिदिवसप्रेक्षुल्लबकुंठ
अचलकाकीर्त्यपकाशोककुटजकल्हारनाग
पुन्नागमल्लिकामालतीकेतकीजातिवेलावल्लिव
लितालंकृतमाकर्तिनित्यलाजीवेत्रनुपुरुगतिर्निर्ज
बुनिंबुजंबीरजंभीरोस्तापरिनतपारिजातगाजिगाजि
तरुवल्लीलंचितमाधवीमिळनमुरुगमुकुलितच
सांक्रनंजुळमंजरीसमास्वादल्लमत्तकोकिळकाल
कंठसमानव्यसेयोगिहृद्याह्लादकमुक्तिमानिनीमा
नच्छंलकनिर्वासितरत्नमेसाद्यसिनाबीजहार्घ्यसिद्धा

संमाधुकरी
खानदेश मंडळी

Gov.t Photozinco office, Poona, 1933

[छायाचित्र—पान १]

लेखक:—स्वराज्यसंस्थापक थोरले श्रीशिवाजीमहाराज छत्रपति. महाराज शहाजी राजे आणि मातुश्री सौ० जिजाबाईआऊ यांचे धाकटे पुत्र. **जन्म:**—फाल्गुन वद्य ३ शक १५५१ शुक्रवार, शिवनेरी दुर्ग. **मृत्यु:**—चैत्री पौर्णिमा शक १६०२ शनिवार, रायगिरी; तेथें च समाधिस्थल.

पत्राचें स्वरूप:—हें मषीपत्र जुनरी असून सांप्रत सर्व पिवळें धमक झालें आहे; याच्या उजव्या हाता कडील वरचा अर्धा भाग काळसर झालेला आहे. उजवी कडे अथवा डावी कडे समास न सोडतां, पत्राच्या या टोंका पासून त्या टोंका पर्यंत रेघा ओढून लेखन केलें आहे. या सर्व रेघा, सबंध एक-टांकी ओढलेल्या नसून तुटक आहेत; म्हणजे प्रथम थोडीशी रेघ ओढून तेवढ्या पुरतीं अक्षरें तिच्या खालीं लिहावयाचीं आणि तीं लिहून झाल्या वर पुन्हां थोडीशी रेघ ओढावयाची आणि तिच्या खालीं तेवढ्या पुरतीं अक्षरें लिहावयाचीं, त्या नंतर पुन्हां थोडीशी रेघ आणि तेवढ्या अक्षरांचें लेखन, असा हा एकंदर लेखनप्रकार आहे. पत्र सर्व सुरक्षित आहे; दोन ठिकाणीं साधारण छिद्रें पडलीं आहेत, तथापि त्या मुळें अक्षरांस किंचित् हि धक्का लागलेला नाहीं. पत्राचें मोजमाप असें:—पत्राची सबंध लांबी २० अंगुळें आणि रुंदी १३ अंगुळें असून, पत्राच्या पहिल्या ओळीच्या वर ४ अंगुळें उंचीची जागा रिकामी सोडलेली आहे. पत्रा वर " श्री "कार किंवा तत्सदृश नमनाचीं अक्षरें नाहींत. पत्र पाठपोट लिहिलेलें असून एकंदर ओळी १७ आहेत; पोटांत १६ ओळी असून पाठी मागें केवळ १ च ओळ आणि तिच्या शेवटीं महाराजांची समाप्तिमुद्रा आहे. ही शेवटची ओळ च महाराजांच्या हातानें लिहिलेली आहे! हिच्यांत " हुत लिहिणे तरी तुम्ही सूज्ञ असा " हीं १३ अक्षरें महाराजांनीं मोडींत लिहिलीं आहेत!! तसें च पोटांतील शेवटच्या म्हणजे १६ व्या ओळींतील शेवटचें म्हणजे २० वें अक्षर जें " ब " हें हि महाराजांनीं च लिहिलें आहे. महाराजांच्या हस्ताक्षरांचीं स्थानें अशा प्रकारें (पोट आणि पाठ अशीं) दोन ठिकाणीं असल्यानें, प्रथम, पत्राचीं दोन छायाचित्रें घेतलीं आणि तदनंतर तीं दोन चित्रें एका खालीं एक जोडून त्यांचें एक स्वतंत्र तिसरें छायाचित्र घेतलें. आपल्या दृष्टी पुढें जें चित्र दिसत आहे तें हें असें (दोहोंचें एक केलेलें) आहे. या कृती मुळें चित्रांतील शेवटच्या ओळींतील आणि तिच्या वरील ओळींतील अंतर, वरील सर्व ओळींतील परस्पर अंतरां पेक्षां थोडेंसें जास्त दिसतें. लेखकानें " मसूरल " पासून म्हणजे पत्राच्या प्रारंभा पासून (पोटांतील) १६ व्या ओळींतील " वसूल घेतील " येथ पर्यंतचें लेखन केलें आहे. त्याच्या अक्षराचें माप, उंची ३ यव आणि रुंदी २॥ ते २॥। यव, असें आहे. त्याचें अक्षर ठोंसर, घळघळीत, सुवाच्य आणि कोठें हि न खोडलेलें, तसें च जाड टांकाच्या लेख-णीनें लिहिलेलें आहे. त्याची मषी काळी च आहे पण कोठें कोठें थोडीशी अस्पष्ट झालेली आहे; तथापि कोणतें हि अक्षर झडलेलें नाहीं. त्याच्या लेखनांतील, " श्रीं (श्री), सी, मु, पु, जी, फ, लु, हो, सा, रि, च्या, या, च, चा, ण, णें, ली, फी, ऊ, दा, म्हा, " हीं अक्षरें निःसंशय तत्कालीन वळणाचीं आहेत. महाराजांच्या (" शिवाजी " या) नांवांतील " जि " हें अक्षर ऱ्हस्व लिहिलें आहे; ही हि पद्धत तत्कालीन च आहे. उदाहरणार्थ, (भा० इ० मं० च्या चतुर्थ संमेलनवृत्तांत पृष्ठ ६८ आणि ७० वर) गुरुवर्य राजवाडे यांनीं महाराजांचीं जीं दोन मूळ पत्रें छापिलीं आहेत त्यांत महाराजांच्या नांवांतील " जि " ऱ्हस्व च आहे. पत्रांत " येऊनु, होनु, करुनु, म्हणनुनु " अशीं त्या वेळचीं उकारांत रूपें आहेत; एके ठिकाणीं सहा या शब्दाच्या स्थानीं " सा " असा शब्द लिहिला आहे. हें हि रूप तत्कालीन च होय. उदाहरणार्थ, " येकवीस सहस्र सा सें जपा । नेमून गेली ते अजपा ॥" असें श्रीसमर्थांनीं श्रीग्रंथ-

राजांत म्हटलें आहे (१७-५-१); या ओंवींतील " सा " म्हणजे सहा (६) होत. या प्रमाणें च पत्रांतील " येकुणीसे सा " म्हणजे १९०६ होत. सारांश, लेखकानें लिहिलेल्या पत्राचें सामान्य रूप असें आहे.

श्रीमन्महाराजांचीं हस्ताक्षरें:—आतां महाराजांच्या हस्ताक्षरां विषयीं थोडेंसें दिग्दर्शन करूं. वर सांगितलें आहे च जे, महाराजांनीं या पत्रावर एकंदर (पोटांत १ आणि पाठीवर १३ मिळून) **चौदा अक्षरांचें लेखन स्वहस्तें केलें आहे!** या राजलिखित अक्षरांची सर्वसाधारण उंची ३ यव तर रुंदी २॥ ते ३ यव आहे. महाराजांच्या लेखणीचें टोंक सूक्ष्म तोडलेलें असल्यानें, त्यांचीं सर्व अक्षरें, लेखकाच्या अक्षरां पेक्षां थोडींशीं सूक्ष्म दिसतात. या अक्षरांची मषी लेखकाच्या मषी पेक्षां अधिक काळी असल्यानें त्यांचें सर्व स्वरूप अधिक काळें कुळकुळीत आहे. अक्षरवटिकेंतील विशेष पुढील प्रमाणें आहेत:- पोटांतील " **ब** " हें अक्षर त्या आणि इतर सर्व ओळींतील लेखकाच्या अक्षरां पेक्षां थोडेंसें मोठें आहे; कारण उघड च आहे. पाठीच्या सर्व अक्षरां वरील शिरोरेघ प्रथम अर्धवट उमटल्यानें पुन्हां तिच्या वर च दुसरी तुटक रेघ ओढली आहे; पहिलीचा अर्धवट ओढलेला फटकारा मूळ पत्रा वर स्पष्ट दिसत आहे. पाठी वरील पहिलें "**हु**" हें अक्षर एकटांकी आहे आणि त्याच्या उकाराचें गुंडाळें थोडेंसें लांब ओढलेलें आहे. " **त** "चा प्रारंभ शिरोरेघे वरून केला असून त् कार एकदां काढून, मग लेखणी उचलून कान्हा लिहिला आहे आणि त्याला शेवटीं गुंडी मारली आहे. " **लि** " चा प्रारंभ त प्रमाणें च शिरोरेघे वरून घेऊन खालीं गुंडी मारून तिचा फांटा शिरोरेघेच्या जवळ नेऊन मग तिचा खालीं नेलेला फटकारा " त " आणि "हु" अक्षर यांच्या मधोमध नेऊन सोडला आहे; हें अक्षर सर्व एकटांकी आहे. "**हि**" या अक्षराच्या वर पहिली शिरोरेघ तुटल्यानें तिच्या प्रारंभा पासून वेलांटीच्या मागें अर्ध्या स्थळा पर्यंत (शिरोरेघे) चें स्थळ रितें आहे; ही तुटक रेघ येथ पासून " री "च्या प्रारंभा पर्यंत पुन्हां ओढली आहे; " हि " चा प्रारंभ तुटक्या शिरोरेघे पासून करून मध्यंतरीं गुंडी न मारतां तशी च शिरोरेघे वर उंच वेलांटी देऊन पुढें तिचा फटकारा थोडासा बाहेर काढला आहे; हें सर्व अक्षर एका टांकाचें च आहे. " **णे** " मोडी लिहिला आहे; त्यांत प्रथम मोडी " स " लिहून मग लेखणी उचलून त्याच्या वरची रेघ शिरोरेघे वरून खाल पर्यंत ओढली आहे, नंतर कान्हा स्वतंत्र ओढून त्याला उजवी कडे वांक मारलेला आहे आणि मग मात्रा लिहिली आहे. " **त** " याचा प्रारंभ पहिल्या " त " सारखा शिरोरेघे वरून वळण घेऊन न करतां त्या रेघेला जोडून च पण अधिक वांक मारून केला आहे आणि मग टांक उचलून सरळ कान्हा जोडला आहे. " **री** " यांतील " र " हा बालबोधी लिहिला आहे; त्याच्या नंतर जी शिरोरेघ ओढली आहे ती थेट पत्राच्या उजव्या कडेस जाऊन पोहोंचली आहे. " र " काढल्या नंतर टांक उचलून वेलांटी शिरोरेघे वरून घेऊन एका च झटक्यांत उजवी कडे खालीं आणिली आहे. " **तुम्ही** " हीं दोन अक्षरें टांक न उचलतां एका च वेळीं लिहिलेलीं आहेत; " तु " चा प्रारंभ शिरोरेघे वरून वळण घेऊन मग ती रेघ खालीं आणून आणि तीस गुंडी मारून, डावी कडून पुन्हां शिरोरेघेच्या बऱ्याचशा उंची वर नेऊन उजवी कडे आणून, तेथें च तिला अर्धा " म् " कार जोडला आहे; या " म् " काराचें टोंक वर शिरोरेघेस नेऊन भिडविल्या वर तेथें च त्याला मोडी " ही " जोडली आहे आणि तिचें शेंवटचें टोंक शिरोरेघे वर थोडेंसें आणून सोडलें आहे; ही "ही" सुद्धां मागच्या "ही" सारखी च विना गुंडीची आहे. " **सू** " ची प्रारंभीची रेघ शिरोरेघे वरून पोकळ बांक घेऊन खालीं आणल्या वर तीस गुंडी मारून ती पुन्हां शिरोरेघेस भिडवून तीस मोडी दीर्घ ऊकार जोडला आहे; त्याचें शेंपूट शिरोरेघेच्या वर थोडेंसें निघालेलें आहे. सर्व अक्षर एकटांकी आहे. " **ज्ञ** " हें अक्षर बाळबोधी आहे; प्रथम

" इ " कार ढोबळ गुंडीचा घेतला आहे; नंतर लेखणी उचलून मधील आडवी रेघ वांकडी काढून आणि तिला च मध्यंतरीं गुंडी देऊन म्हणजे " न " कार काढून, तीच रेघ वर पर्यंत ओढून तिला च खाल पर्यंत कान्हा ओढला आहे. " अ " हें अक्षर मोडी आहे; याचा प्रारंभ शिरोरेघेच्या खालून वांकण घेऊन ती च रेघ वर शिरोरेघेस जोडून खालीं आणून आणि मध्यें कोंच मारून मग वांक देऊन पहिल्या वांकणास न भिडवितां खालीं मोठें पोट काढून ती च रेघ थेट शिरोरेघेच्या वर नेऊन तिला च " **सा** " हें अक्षर जोडलें आहे. " सा " हा जुना मोडी वळणाचा आहे; पण त्याचे वर च समाप्तिमुद्रा उमटली गेल्यानें तो संबंध दिसत नाहीं; असो. याप्रमाणें महाराजांच्या अक्षरवटिकेचें स्वरूप आहे ! या १४ अक्षरांत केवळ एक च (री) अक्षर बाळबोधी असून शेष १३ अक्षरें निव्वळ मोडी आहेत. " तुम्ही " आणि " असा " हीं चार अक्षरें प्रत्येकीं दोन दोन प्रमाणें एकमेकांस जोडलेलीं असून शेष अक्षरें सर्व सुटीं सुटीं आहेत. अक्षरांचें वळण उत्तम असून तीं सर्व सुवाच्य आहेत. प्रत्येक अक्षर " घडसून सुंदर केलें " आहे, एवढें च नव्हे तर या अक्षरवटिकेच्या लेखकाच्या श्रीमत्सद्गुरूंनीं म्हटल्या प्रमाणें च " वाटोळें सरळें मोकळें । वोतलें मसीचें काळें । कुळकुळीत वळी चालिल्या ढाळें । मुक्तमाळा " जैशा ॥ अक्षरमात्र तितुकें नीट । नेमस्त पैस काने नीट । आडव्या मात्रा त्या हि नीट । आर्कुलीं " वेलांट्या ॥ पहिलें अक्षर जें काढिलें । ग्रंथ (येथें, आपण " ओळ " म्हणूं) संपे तों पाहात गेलें । " येका टांकें चि लिहिलें । ऐसें वाटे ॥ अक्षराचें काळेपण । टांकाचें ठोसरपण । तैसें चि वळण वांकण । " सारिखें चि ॥ वोळीस वोळी (येथें, " अक्षरासीं अक्षर " असा पाठ घ्यावा) लागे ना । आर्कुली " मात्रा भेदी ना । खालिले वोळीस स्पर्शेना । अथवा लंबाक्षर ॥ कोठें शोधासी आडेना । चुकी पाहतां " सांपडेना । गरज केली हे घडेना । लेखका पासुनी ॥ जनास पडे मोहन ऐसें करावें ॥ भोवतें स्थळ " सोडून द्यावें । मधें चि चमचमीत ल्याहावें ॥ कागद झडतां हि झडावें । न लगे चि अक्षर ॥" (ग्रंथराज १९ × १ × २-११), प्रत्येक अक्षर आहे ! असल्या लेखका विषयीं श्रीसमर्थ म्हणतात, " ऐसा " पुरुष तो पहावा । म्हणती लोक ॥" ! आणि आजच्या महाराष्ट्रानें तरी असें कां म्हणूं नये ? पण आज तो पुरुष प्रत्यक्ष कसा दिसणार ? श्रीसमर्थांनीं म्हटलें आहे, " थोर पुरुष निघोनि जाती । त्यांच्या "सुरता करूनि ठेविती ॥" अशा, महाराजांच्या चार पांच सुरता (चित्रें) सांप्रत प्रसिद्ध च आहेत. त्या चित्रांचें दर्शन घेऊन महाराष्ट्रानें त्यांच्या जवळ काय मागणें मागावें, तें हि श्रीं नीं सांगून ठेविलें आहे. महाराजां जवळ त्यांचा " देवांब्राह्मणांचें मन्हाष्ट-राज्य स्थापण्याचा साक्षेप " मागावा आणि त्यांस अनुसरून महाराष्ट्रानें आपलें " चालणें " ठेवावें !

म्लेच्छ शब्दांचें उच्चाटन:—महाराजांनीं राज्यकारभारांतील म्लेच्छ शब्दांचें उच्चाटन करण्याचें कार्य " राज्यव्यवहारकोश " निर्माण करवून केल्याचें प्रसिद्ध आहे; तें कार्य या पत्राच्या नंतरचें आहे; तथापि त्या कार्यास आरंभ कोशाच्या पूर्वी च किंबहुना या पत्राच्या हि आधीं झाला होता असें म्हणण्यास या पत्रांत थोडेंसें गमक सांपडतें. या पत्राच्या पूर्वीचीं महाराजांचीं जीं कांहीं आज्ञापत्रें प्रसिद्ध झालीं आहेत त्यांचा सामान्यतः प्रारंभ " अज़् रख्तखाने राज़श्री सिवाजी राजे दामदौलतहु बजानेब कारकुनानि हाल व इस्तकबाल पाा + + + + बिदानद " (अज़् = पासून; रख्तखाना इ राजश्री = राजश्री ची लेख्यशाला; दामदौलतहू = श्रीमंत किंवा अखंडित-लक्ष्मीअलंकृत; बजानेब = स, प्रति; कारकुनानी = कारकून् या फारसी शब्दाचें अनेक वचन कारकुनान्, इ हा षष्ठीचा प्रत्यय; हाल = सांप्रत; व = आणि [मराठी भाषेंत म्लेच्छ म्हणजे अरबी आणि फार्सी शब्द इतके घुसले आहेत जे, ' व ' हा शब्द मूळचा अरबी आहे हें सहसा कोणाच्या हि लक्ष्यांत येणार

नाहीं ! संस्कृतांतील ' वा ' चा अर्थ " अथवा " असा आहे आणि या ' व ' अरबी शब्दाचा अर्थ " आणि " असा आहे]; इस्तकवाल = भावी; पाा = परगणे; बिदानद = आज्ञा केली जाते जे), अशा प्रकारानें होत असे. या पत्रांत, प्रारंभ निराळ्या प्रकारचा (पहिलें विशेषण शितोळे यांचें आहे) आणि तो हि म्लेच्छ शब्दाचा असला, तरी पूर्वीच्या ' बजानेव ' शब्दास गचांडी देऊन तेथें ' प्रति ' असा संस्कृत शब्द योजला आहे; तसें च ' पेशकश ' च्या ठिकाणीं ' खंडणी', ' गर्गशा ' च्या ठिकाणीं ' धामधूम ', ' बेचिराख ' चे स्थानीं ' वैराण ', ' पेष ' च्या स्थानीं ' सादर ' असे संस्कृत-प्राकृत नूतन प्रतिशब्द निर्माण करून त्या त्या ठिकाणीं योजिले आहेत. त्यांच्या पूर्वीच्या आज्ञापत्रांत मात्र असले म्लेच्छ शब्द आढळतात. या पत्रांत आणखी कांहीं म्लेच्छ शब्द राहिलेले आहेत हें खरें आहे (पत्रांत एकूण १३८ शब्द असून त्यांत ४८ म्लेच्छ शब्द आहेत), पण येथें एवढें च सांगावयाचें जे, महाराजांनीं म्लेच्छ शब्दांना अर्धचंद्र देण्याच्या कामास या वेळे पासून, किंबहुना याच्या हि पूर्वी पासून प्रारंभ केला होता.

पत्राचा कालः—दुःखाची गोष्ट म्हणजे या पत्रांत लेखनकालाचा–निसटता हि–उल्लेख कोठें हि केलेला नाहीं ! त्या मुळें प्रथम मनास वाईट वाटतें. तत्रापि, पत्रांतील लेखनार्था कडे दृष्टि दिल्यास अगदीं च निराश होण्याचें कारण नाहीं. त्या लेखनार्था वरून सामान्य पणें लेखनकालाचा शोध लाविता येतो. पत्रांत अशा ज्या शोधदर्शक गोष्टी किंवा गमकें आहेत त्यांचा आतां अनुक्रमानें विचार करूं. पहिल्या गमका वरोन पहिल्या धडाक्यास हें स्पष्ट ठरतें जे, पत्र राज्याभिषेकपूर्व आहे. कारण, राज्याभिषेक झाल्या वर, " कागदपत्रीं स्वस्तिश्री शक सिंहासना वर बसले त्या दिवसा पासून नियत चालविला " (सभासद, पृ० ६९). या आपल्या पत्राचा प्रारंभ " स्वतिश्रीराज्याभिषेक शक " असा नाहीं, म्हणजे हें पत्र ज्येष्ठ १५९६ च्या पूर्वीचें आहे. अभिषेका पूर्वी " मशुरलअनाम " हा शब्द " राजमान्य " या शब्दाच्या जागीं सर्वत्र वापरीत असत आणि अशा शब्दानें (तसें च, पूर्वी सांगितलेल्या " अजरख्तखाने " अशा शब्दानें हि) पत्राचा प्रारंभ होत असे. आतां पत्रांतील दुसऱ्या गमका वरून निश्चितपणें लेखनकाल १५९६ च्या पुष्कळ मागें जातो. हें गमक म्हणजे पत्रांतील " माहाराज साहेबाचे कारकीर्दीस " हे शब्द. माहाराज म्हणजे शहाजीमहाराज होत. या म्हणण्यास शक १५९०च्या पौषांतील एका पत्राचा स्पष्ट पाठपुरावा आहे. हें आज्ञापत्र हि शिवाजीमहाराजांनीं च "मशरुल अनाम बाबाजी राम देशपांडे प्रांत पुणें" यांस लिहिलें आहे. त्यांत "पहिले पासून सालाबाद हैबतखान व मलीकअंबर व **माहाराजसाहेबांचे कारकीर्दीस** व हालीचे कारकीर्दीस जैसे चालिले " असें च लिहिलें आहे (राजवाडे, १८-३३). येथें शहाजी महाराजांच्या नांवाचा उल्लेख **विद्यमानार्थी** केला आहे. पत्रकालीं ते विद्यमान नसते तर कैलासवासी असा शब्द त्यांच्या (माहाराज या) नांवा पूर्वी अवश्य आला असता. शहाजीमहाराज शक १५८५ माघ शुद्ध षष्टीस दिवंगत जहाले; म्हणजे तत्पूर्वीचें हें पत्र आहे. आतां याच्या हि पूर्वी हा काल कोठ पर्यंत जातो तें पाहूं. दादाजी कोंडदेऊ हे १५६९च्या आश्विन वद्य १३च्या दिवशीं वारले. पंत, जावत्काल जिवंत होते तावत्काल पुणें प्रांताचा (शहाजीमहाराजांचा) कारभार ते च करीत, म्हणजे त्यांच्या च नांवाचीं आज्ञापत्रें निघत. सांप्रतचें पत्र शिवराजांच्या नांवाचें आहे याचा अर्थ हें पत्र १५६९च्या आश्विना नंतरचें आहे. आतां १५६९ आश्विन ते १५८५ माघ या दोन कालां मधील केव्हांचें तरी हें पत्र आहे हें निश्चित. पत्र ज्यांना लिहिलें आहे त्यांचीं नांवें " बापाजी नरसिंगराव व विठोजी सितोले " अशीं असून हे दोघे हि पुणें प्रांताचे देशमुख होते. हें देशमुख घराणें निजामशाही पासोन पुण्यास असून, सांप्रत हि याच घराण्या कडे या प्रांताची देशमुखी आहे. या घराण्याचा

मूळ पुरुष दसमोजी नाईक कस्तुरे अथवा सितोले; त्यांचे पुत्र अडबोजी आणि त्यांचे मालोजी. यांना चार पुत्र; त्यांतील पहिले दोन वोवाजी आणि विठोजी. वोवाजी यांच्या पुत्राचें च नांव बापाजी; म्हणजे बापाजी हे विठोजीरावांचे पुतणे. आपल्या पत्रांत या च दोघांचीं नांवें आलीं आहेत. बहुधां बापाजी हे वडील शाखेचे असतील म्हणून त्यांचें नांव आधीं आणि मग त्यांच्या चुलत्याचें नांव मागाहून लिहिलें असावें. विठोजीरावांचें नांव एका निर्णयपत्रावर शक १५६४च्या ज्येष्ठांत आलें आहे (राजवाडे–१८-२५). तसें च त्यांचें (शेवटचें) नांव दुसऱ्या एका शक १५७९च्या निर्णयपत्रांत हि आलें आहे (उक्त. १७, १७); म्हणजे १५६४ ते १५७९च्या मधील काळांत विठोजीराव विद्यमान होते. पत्रांतील " नारो कृष्ण धडफळे " हे या विठोजीरावांचे कारभारी. यांचे वडील कृष्णाजी रंगनाथ यांचा उल्लेख शक १५६०च्या एका निर्णयपत्रांत आला असून त्यांत च विठोजीराव शितोळे यांची साक्ष आहे. तसें च नारोपंतांच्या गणेश आणि विनायक या दोन पुत्रांच्या नांवांचें एक पत्र १६०२ मधील आढळलें आहे; म्हणजे नारोपंतांचा काळ १५६१ ते १६०१चा येतो. सितोळे घराण्याचे कारभारी धडफळे होते अशा अर्थाचीं पत्रें राजवाडे खंड १५।१६।१७।१८ यांत बरीं च आलीं आहेत. विठोजीरावांच्या वरील उल्लेखावरून पत्र १५६९ ते १५७९ च्या आसपासचें आहे. या काळांतील हें पत्र आहे कीं नाहीं तें समजण्यास पत्रांतील इतर गमकें पाहूं. तिसरें गमक, " माहाराज साहेबांचे " कारकीर्दीस...(इनामदारांपासून) च्यारसे होनु घ्यावयाचा तह आहे ", हें वाक्य आणि चवथें गमक " हालीं मोगलाचे धामधुमेने मुलुक वैरान जाला आहे " हें वाक्य होय. महाराज म्हणजे शहाजी-महाराज हें आपण वर म्हटलें च आहे. शहाजीमहाराजांनीं पुणें प्रांतांतील या वृत्तिवंतांशीं राज-उत्पन्ना साठीं जो संधि (तह) केला तो केव्हां केला? राजवाड्यांच्या विसाव्या खंडांतील तेराव्या लेखांका वरोन (" अज रुखतखाने माहाराज राजश्री शाहाजी राजे दामदौलतहू.....ऐसियास साल मजकुरी कुल इनाम अमानत करणें म्हणोनु माहालास एकंदर खुर्दखत सादर आहे.....तरी साहेबीं मेहेरबान होऊन आपला इनाम आपले दुमाले केला पाहिजे " इत्यादि) शहाजीमहाराजांनीं (वरील पत्रांत सुद्धां शहाजी राजांना " माहाराज " ही पदवी लाविलेली आहे हें येथें अवश्य लक्षांत ठेवणें) शक १५७३च्या चैत्रांत सबंध सुपें प्रांतांतिल वृत्ती प्रतिबद्ध केल्या होत्या हें ठरतें; पुढें या वृत्तिवंतांशीं संधि करून महाराजांनीं त्यांच्या वृत्ती त्यांना परत दिल्या. या वरोन आपल्या पत्रांतील सितोळे देशमुखाशीं शहाजीमहाराजांनीं केलेला संधि या १५७३च्या वेळचा आहे असें ठरतें. म्हणजे पत्राचा काल १५६९ च्या पुढें १५७३ पर्यंत आला. आतां चवथ्या गमकाचें जें वाक्य आहे, त्यांतील प्रसंग केव्हां घडला? वाक्यांत " हालीं मोगलाचे धामधुमेनें " असे शब्द स्पष्ट आहेत. मोंगलाशीं महाराजांचा पहिला पण प्रसिद्ध असा खटका शक १५७९ मध्यें उडाला. त्या वर्षाच्या वैशाखांत जुनर नगरा वर चढाई करून महाराजांनीं अगणित खंडणी घेतली; त्या मुळें मोंगलाचा सेनापति नौसिरखान यानें महाराजांच्या प्रांतास उपसर्ग देण्यास प्रारंभ केला. त्या वर ज्येष्ठांत स्वतः महाराजांनीं चढाई करून त्याला अमदा-नगरीं समूळ बुडविला. भूषणनें या युद्धाचें वर्णन " अहमदनगरके ठाण किरपान लै के नवसेरीखानते खुमान भिऱ्यो बलते " या कवित्तांत उत्तम केलें आहे (शिवराजभूषण, पृ० १०८, कवित्त ३०७). या वरोन पत्रांतील ' मोंगलाची धामधूम ' म्हणजे ही १५७९च्या वैशाख-ज्येष्ठांतील धामधूम होय. सारांश, चार गमकांचा निष्कर्ष पाहिला म्हणजे या पत्राचा लेखनकाल शक १५७९चा वैशाख येतो. शिवाजीमहाराजांनीं वडिलां प्रमाणें च सर्व वृत्तिवंतांच्या वृत्ती प्रतिबद्ध केल्या होत्या हें प्रसिद्ध च आहे. " राजश्री कैलासवासी स्वामींचे वेलेस आपलीं (देशमुख, देशकुळकर्णी तथा मोकदम ता। कानदखोरें

यांचीं) वतनें अमानत करून हक्काच्या मोइनी करून देत असत " (राजवाडे, १६-४३; १७-३८), असें कानदखोरें उपप्रांताचे देशमुख म्हणतात. तत्रापि, जे वृत्तिवंत स्वराज्यसाधनाचे कार्यीं उपयोगीं पडत, त्यांना त्यांच्या वृत्ती सदय अंतःकरणानें महाराजांनीं परत सोडल्या आहेत. बापूजी हैबतराव इत्यादि सिलिंबकर देशमुख यांना, " हे गलबत्या मध्यें आपले जमेतीनिसीं साहेबाचे मसलतेस येऊन एकतारी केली त्या वरून देशमुखा वर मेहेरबान होऊन आजराम~हामती इनाम.....कुलबाब दिधले," या प्रमाणें पूर्वी प्रतिबद्ध केलेली वृत्ति परत दिली (राजवाडे, १७. १७). असा च प्रसंग या वेळीं उद्भवला होता. सितोळे देशमुखांची ही वृत्ति महाराजांनीं पूर्वी प्रतिबद्ध केली असावी. आतां या वेळीं, देशमुख हे मोंगलास जाऊन मिळूं नयेत म्हणून आणि त्यांनीं आपण होऊन विनंति केल्या वरून, महाराजांनीं नौसरीशीं युद्ध करण्या (ज्येष्ठा) पूर्वी वैशाखांत, देशमुखांना शहाजीमहाराजांनीं ठरविलेल्या संधीला अनुसरून त्यांची वृत्ति प्रतिबंधांतून मोकळी करून, त्यांच्या स्वाधीन केली. एवढें च नव्हे तर त्या संधी प्रमाणें ध्यावयाच्या राजउत्पन्नांत हि त्यांना अनुप्रमाण सूट दिली. सारांश, या पत्राचा लेखनकाल १५७९ शकांतील वैशाख होय.

इनाम तिजाईचा तहः—देशमुख देशपांडे आदि करून वृत्तिवंतां पासोन राजानें त्यांच्या वृत्तीच्या उत्पन्ना वर खंडणी (राजउत्पन्न) ध्यावयाचा संधि शिवाजीमहाराजांच्या वेळीं त्यांनीं आणि तत्पूर्वी शहाजीमहाराजांनीं केला होता हें वर आलें आहे. हे लोक स्वामीकार्यीं उपयोगी पडल्यास ही खंडणी त्यांना सोडून देत; असलें एक उदाहरण वर दिलें आहे. शक १६२५ पौष शु० १५ चें एक " शंकराजी नारायण सचिवांचें शामजी हरि नामजाद प्रांत मावळ यांस " आज्ञापत्र आहे; त्यांत ते सांगतात, " संताजीराव सिलिंबकर देशमुख तर्फ गुंजणमावल, हे, औरंगजेबाच्या राजगडा वरील चढाईत " स्वामीकार्या वर पडले अशास इनामाची तिजाई व हक्काची चौथाई देशमुखा पासोन दिवाणांत वसूल " ध्यावयाचा तह आहे, त्यास सांप्रत हा तह दूर करून संताजीचा पुत्र प्रतापजी यास इनाम तिजाई व " हकाची चौथाई माफ केली असे " (राजवाडे १७ × ४२). राजानें ही तिजाई घेण्याचा धारा तेव्हां पासून आज पर्यंत सुद्धां चालूं आहे; सांप्रत तिजाईस " जुडी " म्हणतात. साधारण पणें एका रुपयांत पांच आणे (कोठें कोठें त्या पेक्षां अधिक अथवा स्वल्प) अशी हि जुडी आज घेतात.

आपल्या पत्राचें साक्षीपत्रः—आपल्या या पत्रांत " कदीम हक देसमुख होनु १९०६... " व गांवखंडी... देसकुलकर्णी होनु ५९४ ... आहेत. त्या वरी इनामती खंडणी माहाराज साहेबाचे "कारकीर्दीस गांवखंडी व बाजे हक व इनामती माफ करुनु यैन हका वरी देसमुखा कडे होन ३०५...व " देसकुलकर्णी ९५...येणें प्रमाणें च्यारसे होनु ध्यावयाचा तह आहे" या प्रमाणें लेखनार्थ आहे. या च अर्थाचें, पुणें प्रांताच्या देसकुलकर्ण्यांचें, या च कालाचा उल्लेख करणारें पत्र पूर्वी प्रसिद्ध झालें आहे; त्याचा कारणा पुरता उतारा येथें देऊं, म्हणजे आपल्या या पत्राच्या निरनिराळ्या अंगांचें जास्त स्पष्टीकरण करण्याची आवश्यकता भासणार नाहीं. हें पत्र राघो बलाळ सुभेदार यांस मोरो त्रिमल (प्रधान) यांनीं शक १५९७ ज्येष्ठ शु० १ या दिवशीं लिहिलें आहे. त्यांत ते म्हणतात, " देसकुलकर्णी पा। पुणे इही " एउनु वर्तमान सांगितलें कीं, देसमुखास व आपणास, पेसजी रा। दादाजी कोंडदेऊ सुबेदार, तिही " इनामती खंडणीचा तह दरसाल दिधला. बेरीज होनु पा। ४००

" देशमुख होनु	देशकुलकर्णी होनु
३०५	९५

" येणे प्रमाणे खंडणीचा तह दिधला " (राजवाडे १८×४०). या च अर्थाचें केसो त्रिमळ यांचें,

मराठी ग्रंथ संग्रह
स्थळ
सं.
ता.

विनायक उमाजी सुभेदार यांस १६०५ कार्तिक शुद्ध १० चें दुसरें पत्र आहे (उक्त, पृ० ४८). या दोन साक्षीपत्रां वरून आतां स्पष्ट ठरलें जे, पुणें प्रांताच्या देशमुख देशपांड्यां पासोन, त्यांच्या नेमणुकी वर छत्रपतींनीं खंडणी घ्यावयाचा ठराव, प्रथमतः रा० दादोजी कोंडदेऊ यांनीं (अर्थात् च महाराजांच्या म्हणजे शहाजीमहाराजांच्या राजवटी मध्यें) केला. पुढें कठीण प्रसंग आल्यानें उत्पन्न कमी झालें. तेव्हां त्या ठरावा प्रमाणें तथापि उत्पन्नाच्या प्रमाणा वर राज्यदाय किंवा राजउगवणी घ्यावी म्हणून आपल्या पत्रांत बापाजी आणि विठोजी सितोले यांनीं श्रीमन्महाराज शिवाजीराजांना विनंति केली आणि ती त्यांनीं मान्य केली. तसली च विनंति वरील दोन पत्रांत पुणेंकर देशकुलकर्ण्यांनीं एकदां मोरोपंत प्रधान आणि दुसऱ्यानदां केसोपंत प्रधान यांना पुढें वऱ्हा च वर्षांनीं केली आहे. सारांश, या दोन साक्षीपत्रां वरोन आतां आपल्या सांप्रतच्या पत्रा विषयीं कोणती हि, यत्किंचित् सुद्धां, प्रसंग आणि काळ यांची शंका उरली नाहीं.

पत्राचें स्पष्टीकरण:—मसुरल अनाम (अरबी – मश्हूर् = प्रसिद्ध, अल् किंवा रा = ला, चतुर्थीचा प्रत्यय, अनाम् = लोक. म्हणजे लोकांना ख्यात किंवा लोक – मान्य, असे जे), **राजश्री** (श्री चें जुनें रूप; श्री वर मात्रा) **बापाजी नरसीगराव** (शितोले घराण्याचें कुलदैवत नृसिंह आहे. तसें च त्या घराण्यांत दत्तक पुत्र घेतल्यास त्याच्या स्वतःच्या नांवा पुढें वडिलाचें नांव न लावितां त्या ठिकाणीं " नरसिंगराव " असें देवाचें नांव लावण्याची चाल पूर्वी पासोन आज पर्यंत चालूं आहे. विद्यमान पुरुष सामंत मालोजीराव हे दत्तक असल्यानें, ते आपल्या नांवा पुढें वडिलांच्या [रामचंद्रराव या] नांवाच्या ठिकाणीं नरसिंगराव असें च नांव लावितात. मागें सांगितल्या प्रमाणें अडबोजी यांना बोवाजी, विठोजी, मालोजी, तानाजी असे चार पुत्र होते. बोवाजीचे पुत्र बापाजी होत. त्यांना ज्या अर्थीं नरसिंगराव असें पद जोडलें आहे, त्या अर्थीं ते दत्तक असावेत) **व** (अरबी – व = आणि. या अक्षरा विषयीं आपण मागें फोड केली आहे) **विठोजी** (बापाजीचे धाकटे चुलते) **सिंतोले** (सि वर अनुस्वार चुकून पडला आहे) **देसमुख** (देशमुख्य), **पा** (फारशी पा = पर्गना, म्हणजे उपप्रांत), **पुणें, प्रति** (यांसी), **राजश्री शीवाजि** (' शी ' बाळबोधी आणि दीर्घ आहे; ' वा ' बाळबोधी, ' जि ' मधील ज मोडी असून वेलांटी ऱ्हस्व आहे) **राजे** (या शब्दा पुढें सन्मानदर्शक, तत्कालीन पद्धती प्रमाणें तीन यव स्थळ रिकामें सोडलें आहे). **उपरी** (री बालबोधी) " **तुम्ही** (येथून महाराजांचे शब्द) **नारो कृष्ण धडफले** (' रो ' बाळबोधी, ' ध ' बाळबोधी, ' फ ' जुन्या वळणाचा) **हजुर** (अ० हुझुर् = समक्ष) **पाठविले. त्याणी येउनु माळुम** (अरबी मअलूम् = ज्ञात, विदित) **केलें कीं** " (फारशी कि = जे. जुन्या मराठी पद्यवाङ्मयांत येणाऱ्या ' कीं ' चा अर्थ किंवा असा आहे; हा फारशी ' कीं ' त्याहून निराळा. हा सुद्धां मराठींत इतका खोल वर रुतला आहे जे, सामान्य लोकांना त्याची जात मुळीं च ओळखतां येत नाहीं! येथें महाराजांचे शब्द संपून धडफळ्यांची विनंती चालू झाली) "**कदीम** (अ० कदीम् = पुरातन) **हक** (अ० हक् = स्वामित्व, नेमणूक) **देसमुख** (देशमुखीचे)**होनु** (तामिळ – होन; संस्कृत सुवर्ण = सोनें = सोन = होन. या पासून एक सोन्याचें नाणें; सामान्यतः आजचे ३॥ रुपये मूल्य. ' हो ' जुन्या वळणाचा) **१९०६ येकुणी से** (येक उणे वीस शें) **सा** (सहा. या अक्षरा विषयीं वर आपण फोड केली च आहे) **व** (आणि) **गावखंडी** (प्रत्येक गांवीं, शेतकऱ्या पासोन प्रत्येकीं खंडी मागें धान्य रूपानें घ्यावयाची नेमणूक) **व इनामती** (अ० इन्आम् = देणगी, वृत्ति; अनेकवचन इन्आमात + इ, हा षष्ठीचा प्रत्यय. इनामती = वृत्तीचें) **व बाजे** (फा० बअझि = अवांतर, इतर) **हक व देसकुलकर्णी** (देशपांडे यांचे) **होनु ५९४ पांच से चौऱ्याणव** (' चौं ' बाळबोधी)

आहेत. त्या वरी ईनामती खंडणी, माहाराज साहेबाचे (शहाजी महाराजांच्या, 'सा' जुन्या वळणाचा) कारकीर्दीस (फा० कार्कर्द् = राजवट, राजशासनकाल; त्या कालीं. 'र' बाळबोधी) गावखंडी व बाजे हक व इनामती माफ (अ० मुआफ् = सूट, क्षान्त. 'फ' जुन्या वळणाचा) करुनु, यैन (अ० ऐन् = मूल, मूळचा ठरलेला, भर) हका वरी, देसमुखाकडे होन ३०० तीन से (सें, शें) पांच ('पा' जुन्या वळणाचा) व देसकुलकर्णी होनु ९५ पंच्याणव; येणें प्रमाणें च्यार से होनु घ्यावयाचा ('या' जुन्या वळणाचा) तह (फा० तह्=संधि, ठराव) आहे. त्या प्रमाणें माहालचे (अ० महल्=ग्रामगण, उपप्रांत) कारकून (फा० कार्कुन् =पत्रलेखक, एक लहान अधिकारी. पहिल्यानें 'ना' लिहून मग त्याचा 'न' केला आहे) आजार (फा० आझार्=उपद्रव, त्रास) लावितातीं (जुनें अनेकवचनी रूप = लावितात) हालीं (फा० हाली=सांप्रत) मोगलाचे (फा० मुघोल. सं० मंदग. मंदग+ल (स्वार्थक)=मंअगल= मंगल=मोंगल. यांचा उल्लेख भारतांत भीष्मपर्वांत आहे. सांप्रत अफगाणिस्थानाच्या उत्तर प्रांतांत हे राहतात. दिल्लीकर औरंगझेबा कडील) धामधुमेने (चढाईनें) मुळुक (अ० मुलक्= राज्य, देश. 'मु', 'ळु' दोन्ही जुन्या वळणाचे) वैरान (उध्वस्त, पडित) जाला आहे. या करितां दस्त (फा० दस्त्=सारा, कर, पट्टी) माफीक (अ० मुवाफिक्=योग्य, प्रमाणें. 'फी' जुन्या वळणाची) ईनामती खंडणी घ्यावयाचा हुकूम (अ० हुक्म् =आज्ञा) केला पाहिजे. " (येथ पर्यंतची विनंति नारो कृष्ण घडफळे यांची, या पुढें महाराजांच्या आज्ञेचे शब्द आहेत) " म्हणनुनु माळुम केले. त्या वरून माहालच्या कारकुनास ('र' बाळबोधी) हुकूम आलाहिदा (अ० अलाहिदा= वेगळा, पृथक्. 'दा' जुन्या वळणाचा) सादर केला (पाठविला) असे. ते दस्त माफीक तुम्हा पासून ईनामती खडनीचा ('ख' वर अनुस्वार नाहीं, 'चा' बाळबोधी) वसूल (अ० वसूल्= आवक, उत्पन्न, उगवणी,) घेतील " (येथें महाराजांची आज्ञा संपली). " बहुत लिहिणे तरी तुम्ही सूज्ञ असा " (हीं लेखनसमाप्तीचीं अक्षरें साक्षात् महाराजांच्या हातचीं असून त्यांच्या पुढें त्यांची लेखनसमाप्तीची मुद्रा आहे).

पत्राचा संदर्भः—पत्रांतील लेखनार्था वरोन असें दृष्टोत्पत्तीस येतें जे, कठीण प्रसंगीं उपयोगी पडावा म्हणून, आपल्या स्वतःच्या प्रांतांतील, पूर्वापार मुसुलमान राजवटींत मिळालेल्या वृत्ती, नेमणुका इत्यादि उपभोगणाऱ्या वृत्तिवंतां पासून आणि नेमणूकधाऱ्यां पासून त्यांच्या मूळ उत्पन्नांतील कांहीं अंश स्वतःच्या राजभांडारांत घेतला जावा, असा संधि शहाजीमहाराजांनीं केला होता. असल्या च प्रकाराची व्यवस्था (संरक्षक–निधि) पुढें हि, शिवाजीमहाराजांनीं वेळोवेळीं केलेली आहे. उपर्युक्त संधि दादोजी कोंडदेवांनीं (अर्थात् शहाजीमहाराजांच्या वतीनें) केला. या मुळें, पुणें उपप्रांताच्या देशमुखास १९०६ होन आणि देशकुळकर्ण्यास ५९४ होन, मिळून दोघांस एकूण २५०० होनांचें उत्पन्न नेमणूक (हक्क) म्हणून मिळत असे. यांतील " गावखंडी, बाजे हक्क व इनामती " इतक्यां साठीं सामान्यतः ९०० होन सूट देऊन म्हणजे ज्यांचे त्यांस देऊन, शेष राहिलेल्या १६०० होनां वर शहाजीमहाराजांनीं, चौथाई म्हणून, देशमुखांनीं ३०५ होन आणि देशकुळकर्ण्यांनीं ९५ होन मिळून एकंदर ४०० होन राजभांडारांत भरणा करावयाचा संधि केला (" इनामाची तिजाई व हकाची चौथाई देशमुखा पासून दिवाणांत घ्यावयाचा तह आहे. " राजवाडे १७×४२,). म्हणजे, नेमणूकधाऱ्यांना निव्वळ नेमणूक म्हणोन ९०० होन ठेविले आणि शेष १६०० ही द्रव्यसंख्या, राज्यदाय मागण्यास पात्र ठरवून, त्याची चौथाई भांडारांत भरणा करण्यास नियुक्त केली. या प्रमाणें नियुक्त चौथाई सुद्धां पुरेपूर देण्यास मोंगलाचे धामधुमे मुळें, आपण असमर्थ आहों, तरी उगवणीच्या प्रमाणानें द्रव्यसंख्या सुटींत घालावी,

अशी विनंति बापाजी आणि विठोजी सितोळे देशमुख यांनीं या प्रसंगीं शिवाजीमहाराजांना केली. ती मनास आणून महाराजांनीं उपप्रांताच्या अधिकाऱ्यास एक वेगळें आज्ञापत्र पाठविलें; आणि त्या च अर्थाचें दुसरें आज्ञापत्र उपर्युक्त देशमुखांना त्यांच्या उपयोगा साठीं म्हणून जें सादर केलें, तें च सांप्रतचें पत्र होय.

महाराजांची मुद्राः—(अष्टकोणी) " प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता ॥ शाहसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ॥ "

[छायाचित्र पान १ अ]

लेखकः—थोरले श्रीसंभाजीमहाराज छत्रपति; शककर्ते श्रीशिवाजीमहाराज आणि राणी सौ० सईबाई यांचे पुत्र. जन्मः—ज्येष्ठ शुद्ध १२।१५७९ पुरंदर दुर्गीं. मृत्यु (वध):—फाल्गुनी अमावास्या १६१०, तुळापुरीं. समाधिस्थलः—तुळापूर (येथें दहन-स्थळ म्हणून) आणि वडु तर्फ पाबळ प्रांत जुन्नर (येथें वध स्थळ म्हणून) वृंदावन (शाहु छत्रपति रोजनिशि, पृ. ३६).

पत्रः—[मूळ पत्राचें छायाचित्र जें दिलें आहे तें बाळबोधी आहे; त्यामुळें त्याचें पुन्हा बाळबोधी ठशांतील रूपांतर येथें छापण्याची आवश्यकता नाहीं. वाचकांना छायाचित्र सहज वाचतां येईल.]

संदर्भः—श्रीसंभाजीमहाराज यांनीं मंचकारोहण केल्या नंतर 'सुंदरी देवी'(तुळजापूरची भवानी)ला वार्षिक नेमणूक करून दिल्याचें, हें आद्यंत संस्कृत नेमणूकपत्र आहे. प्रारंभीं " नमस्तुंगशिरश्चुंबि " असा श्रीशंभु(शिखर शिंगणापूरचा श्रीमहादेव, भोंसले घराण्याचा कुलदेव, त्या)चा नमनाचा श्लोक आहे (असा श्लोक, पुढें श्रीराजाराम छत्रपतींनीं दिलेल्या एका दानपत्राच्या प्रारंभीं हि आढळतो—वाड. सनदापत्रें, पृ.२१७). त्याच्या खालीं "ब्रह्मानंदं परमसुखदं०" हा प्रसिद्ध सद्गुरु-नमनाचा दुसरा श्लोक लिहिला आहे (हे दोन श्लोक छायाचित्रांत घेतले नाहींत). त्याच्या खालीं महाराजांची पिंपळपानी मुद्रा आहे; ती अशीः—"श्री० श्री शंभोः शिवजातस्य मुद्रा द्यौरिव राजते ॥ यदंकसेविनीं लेखा वर्तते कस्य नोपरि ॥ त्याच्या खालील दोन ओळी स्वतः महाराजांनीं आपल्या हातानें लिहिल्या आहेत; ओळी अशाः—

॥ मतं मे श्रीशिवराजपुत्रस्य श्रीशंभुराज ॥:
॥ छत्रपतेः यदत्रोपरि लेखितं ॥ छ ॥ श्री ॥ ॥ छुः

यांतील 'लेखितं' पदाचा अर्थ 'लिहविलेलें' असा ध्यावयाचा. या छत्रपतीच्या हस्ताक्षरांच्या संमती नंतर, नेमणूकपत्रास प्रारंभ झाला आहे. या पत्राच्या " स्वति " पासून, " दुर्वासनाबीजहार्धरेखा " पर्यंतच्या वांस ओळींचें च छायाचित्र घेतलें आहे; पत्राच्या एकंदर ओळी, "स्वति" पासून मोडी " लेखनालंकार" पर्यंतच्या १४९ आहेत. प्रारंभीं डाव्या हातास अस्पष्ट दिसणारी अंडाकृति मुद्रा रा. मोरोपंत पिंगळे यांची असावी; ती अशीः—" एषा श्रीशिवराजेंद्रमुख्यामात्यस्य सत्यधृक्। मुद्रा मोरेश्वरस्यास्तां भद्रासद्रागदायिनी." या मुद्रे खालीं (१) "अनुमतं च दानाध्यक्ष मोरेश्वर पंडि (२) त रायस्य शुभमस्तु छु" या दोन आडव्या ओळी, त्या वेळचे पंडितराव मोरेश्वर यांनीं स्वहस्तें लिहिल्या आहेत.पत्राच्या शेवटच्या १४९ व्या ओळीचा शेवट मोडींत " लेखनालंकार " या शब्दानें नारायणध्वरींद्राचे पुत्र रघुनाथ (रघुनाथ

नारायण हणमंते) अमात्य यांनीं केला आहे (छायाचित्रांत ही ओळ आलेली नाहीं). त्याच्या खालीं मोडींत (१)"संमत आबाजी (२) सोनदेव सचीव" अशा दोन ओळी आबाजी सोनदेव यांनीं स्वहस्तें संमतिदर्शक म्हणून लिहिल्या आहेत. पहिल्या ६५ ओळी प्रशस्तिपर आहेत; तींत बाणाच्या कादंबरीच्या धर्तीं वर लांब लांब सामासिक विशेषणें योजलेलीं आहेत. त्या नंतर पत्रांतील ऐतिहासिक प्रसंगांच्या उल्लेखांस प्रारंभ होतो. हे प्रसंग आणि शोध थोडक्यांत पुढें देऊं. (१) वंशनाम ' भृशवल ' (भोंसले) आहे. (२) कुल ' भानु ' दिलें आहे. (३) ओळ ६५ ते ७० पर्यंत. शहाजीराजांचा कनकगिरी-ग्रहणाचा प्रसंग वर्णिला आहे. राजांनीं कर्णाटक हस्तगत केला, तेव्हां कनकगिरीच्या पाळेगारास जिंकून तो गिरी घेण्याचें काम राजांनीं आपले वडिल चिरंजीव संभाजीराजे यांचेवर सोंपविलें होतें. त्यांच्या संगतीं अफजल हि होता. अफजल हा, शहाजीराजांचा मनांतून द्वेष करीत असे. युद्ध चालूं असतां अफजलच्या विश्वासघातानें संभाजीराजांना अग्नियंत्राचा गोळा लागून कैलासवास प्राप्त झाला. तदनंतर शहाजीराजांनीं घनघोर युद्ध करून गडा वर आपला ध्वज लाविला (शक १५७७). ही गोष्ट वरील ५ ओळींत आहे. या नंतर, अफजलनें विजापुरास चढाडी करून राजां वर धरणें आणविलें; पुढें हि राजांना विजापुरीं घेऊन जाण्याचें काम त्यानें च केलें. या कारणां मुळें त्याचे वर भोंसलेकुलाचा रोष झाला. (४) ओळ ७० ते ७३ पर्यंत. उपरिलिखित रोषभाजन अफझलाचा वध शिवाजीमहाराजांनीं कसा केला त्याचें वीररसात्मक वर्णन केलें आहे; त्यांत वादभूत ' विचव्या 'चा उल्लेख स्पष्ट केला आहे (" अफजल्लकक्षस्थलोद्दालन बिछूछालनोछलितरुधिर "). त्या मुळें या पुढें बिचव्याचा वाद तुटला असें स्पष्ट म्हणण्यास प्रत्यवाय नाहीं. अफजलाच्या रक्तानें सर्वांग भरलेल्या महाराजांना येथें नरसिंहाची उपमा अत्यंत समर्पक शोभते ! महाराजांच्या प्राणा वरील हा बिकट प्रसंग होता. (५) ओळ ७३ ते ७७. यांत " दिल्लींद्राभिमाननिधानीभूतमातुल " शाहिस्ताखान याच्या थोरल्या महाराजांनीं केलेल्या मर्दनाचें वर्णन, पार्थ–जयद्रथ–प्रसंगाची उपमा देऊन केलें आहे. (६) ओळ ७७ ते ७९. यांत थोरल्या महाराजांनीं " यौवनारंभगृहीतम्लेच्छक्षयदीक्षा " घेतल्याचें स्पष्ट दिग्दर्शित केलें आहे. (७) ओळ ७९ ते ८० मध्यें औरंगाच्या विनंती वरून विजापूरकरांचें पारिपत्य करून त्यांस मांडलिक कसें बनविलें आणि या आपल्या पराक्रमानें औरंगाचा, थोरल्या महाराजांनीं कसा रेंच उतरविला तें सांगितलें आहे. (८) ओळ ८० ते ८६ मध्यें भागानगरकर शरण आल्या वरून थोरल्या महाराजांनीं त्याला आपल्या कृपेची पांखर घालून, त्याचें सैन्य सहाय्यास घेऊन सर्व कर्णाटक हस्तगत केलें हा प्रसंग आहे; म्हणजे ४।५।६।७।८ हे पांच प्रसंग शिवाजीमहाराजांचे आहेत. हे सर्व प्रसंग म्हणजे महाराजांच्या एकंदर चरित्राचें सार होत. (९) ओळ ८६ ते ८७ मधील प्रसंग अपूर्व आणि आज पर्यंत अज्ञात असा आहे. यांत, " इंद्रप्रस्थाधिनाथानें आपल्यास मल्लयुद्धाची आज्ञा केली पण आपण ती बालभाव असतांना सुद्धां झिडकारून टाकिली " असें संभाजीमहाराज म्हणतात. हें दानपत्र शक १६०२ मधील असल्यानें या पूर्वी शंभुराजांची आणि औरंगाची गांठ केवळ, ते पिताजींच्या संगतीं आगऱ्यास गेले, त्या वेळीं च पडली असें (आज पर्यंतच्या प्रसिद्ध असलेल्या ऐतिहासिक साधनां वरोन) ठरतें. त्या काळीं (ज्येष्ठ १५८८) त्यांना आठवें वर्ष संपून नववें लागलें. पिता-पुत्रांना केवल दृष्टिबंधन असल्यानें, रामसिंगानें छोट्या राजांना औरंगा कडे मधून मधून नेलें असेल. छोटे राजे अत्यंत सुंदर (" सुरत पाक ") असल्यानें औरंगजेब त्यांना पहाण्या साठीं वेळोवेळीं आणवीत असेल हि. अशा एकाद्या प्रसंगीं, त्यानें या सिंहशावकास आपल्या पदरच्या एकाद्या बालमल्लाशीं जुंझ करावयास सांगितलें असेल. पण बालवयांत च म्लेच्छक्षयदीक्षा घेणाऱ्या दीक्षिताच्या या बाल वीर पुत्रानें

त्या म्लेच्छराजाची आज्ञा लाथाडली यांत आश्चर्य नाहीं ! बहुधां या वेळेपासून च औरंगाच्या मनांत संभाजीमहाराजां विरुद्ध चिरस्थाई वैरभाव उत्पन्न झाला असावा. (१०) ओळ ८७ ते ९६. संभाजी-राजांच्या तारुण्यसहजप्रकटप्रभावानें दिपून गेलेल्या दुष्ट दुर्मंत्र्यांनीं सापत्न मातेच्या विचारानें शिवाजी-महाराजांच्या मनांत राजांच्या विरुद्ध किंतु उत्पन्न केला; तेव्हां " वडिलांची इच्छा प्रमाण," म्हणून राजे दूर झाले. मंत्र्यांची सूचना " वडील मुलास राज्य देऊं नये " अशी होती हें स्पष्ट च आहे. या प्रसंगाचा लाभ घेऊन, औरंगाचा सेनापती दलेल यानें राजांना आपल्या कडे बोलावून आणि त्यांना सप्त सहस्त्री देऊन, त्यांच्या सहाय्यानें भूपाळगिरि आणि इतर कांहीं ठाणीं घेतली. (११) ओळ ९७ ते १०४. पण पुढें दलेलासुराच्या चढेल वर्तना मुळें चिडून आणि पत्नीच्या प्रेरणेनें, दलेलास मिळवून दिलेलीं ठाणीं पुनरपि परत घेऊन, कुटुंबा सह संभाजीराजे हे शिवाजीमहाराजांना येऊन भेटले; महाराजांनीं त्यांना क्षमा करून आपलें पुत्रवात्सल्य प्रगट केलें. (१२) ओळ १०४ ते १०८. थोरल्या महाराजांच्या निधना नंतर शंभुराजे, छत्रपति झाले; त्या प्रसंगीं कवि कलशाचें सहाय्य त्यांना थोडें फार झालें. (१३) १०८ ते ११३. शंभुराजांनीं ' मंचकारोहण ' केलें (जेधे शकावलींत, राजांनीं श्रावण शुद्ध पंचमीस मंचकारोहण केलें असा तिथीचा उल्लेख आला आहे. त्या नंतरचें हें दानपत्र आहे). या पुढें १२० व्या ओळी पर्यंत संभाजीमहाराजांची प्रशस्ति आली आहे. (१४) ओळ १२० आणि १२१ यांत दानाचा काल देऊन पुढील ओळींत दानाचें म्हणजे नेमणुकीचें वर्णन आहे; हें (२४ गुंजांचा एक वराह होन अशा) दहा सहस्र होनांचें दान वार्षिक आणि वंशपरंपरागत आहे. या विरहित एक हत्ती शृंगारलेला आणि सालंकार पांच घोडे देऊन, दरवर्षीं एक लक्ष भोजन घालावयाचा ठराव केला आहे. ही नेमणूक ' सुंदरीमंदिरमंडनार्थ ' दिलेली आहे. ही सुंदरी देवी म्हणजे भोसल्यांची कुलदेवी, तुळजा-पूरची श्रीभवानी होय, हें स्पष्ट दिसतें. पुढें या देवीस रामसूनोः शिवछत्रपतींनीं ब्राह्मणी गांव दान केला आहे. पत्रांत ते म्हणतात " श्री क्षेत्र तुळजापूर हें स्वामींचें आराध्यदैवत, बहुत थोर, जागृत स्थळ अनादि " (वाड–सनदापत्रें, पृ० १९१). या पुढें दानपालनाचें महत्त्व सांगणारे पांच श्लोक आहेत. त्यांत स्वतःच्या भावि वंशजांना खालील प्रमाणें विनंती केली आहेः–" ये पालयंति मम धर्ममिमं समग्रं तेभ्यो मया विरचितोंजलिरेष मूर्ध्नि ॥ "

पत्राचा कालः—ओळ १२० मध्यें हा काल असा दिला आहेः—" युग्मव्योमरसेंदुसंवलित-समातिक्रांत नृपशालिवाहनशक रौद्रवत्सर नभस्य सित दशमींदुवासर " म्हणजे शक १६०२ भाद्रपद शुद्ध दशमी सोमवार; म्हणजे च राज्याभिषेक शक सात होय.

पत्रांतर्गत व्यक्तीमुद्राः—वर संभाजीमहाराजांची ख्यात मुद्रा आलेली च आहे, त्या विरहित दुसरी ऐकीव मुद्राः—" श्रीमत्छिवभक्तथुद्रेकादधिगतधरणीसमस्तसाम्राज्यवर्धिनि ॥ शंभोः छत्रपतेर्मुद्रा मोदप्रदा जयति ॥" (२) सौ० मातुश्री राणी येसूबाई यांची मुद्राः—" श्रीसखीराज्ञीजयति ॥ " (३) रा० मोरेश्वर पंडितराय यांची मुद्राः—" श्रीचिंतामणीचरणशरण ".

[छायाचित्र–पान २]

(१) **लेखकः**––थोरले श्रीराजारामछत्रपति. शककर्ते श्रीशिवाजीमहाराज आणि राणी सौ०सोयराबाई यांचे पुत्र. जन्मः–फाल्गुनी पौर्णिमा १५९१. मृत्युः–फाल्गुन वद्य अष्टमीसह नवमी १६२१. समाधिस्थलः–सिंहगड. मुद्राः–०श्री॰धर्मप्रद्योतिताशेषवर्णा दाशरथेरिव । राजा रामस्य मुद्रेयं विश्ववंद्या विराजते ॥ (२) ०श्री॰प्रतिपच्चंद्रलेखेववर्धिष्णुर्विश्ववंदिता । शिवसूनोरियं मुद्रा राजारामस्य राजते ॥ (३) श्रीराजारामछत्रपती ॥ ही मुद्रा चैत्र १६१२ मधील आहे (राजवाडे १५×३७६). [पहिली मुद्रा राजचिन्हें धारण केल्या वर केली. दुसरी थोरले महाराज वारल्या वर कारभाऱ्यांनीं थोरल्या महाराजांच्या मुद्रेची च प्रत म्हणून केली आणि तिसरी संभाजीमहाराजांना धरल्यानंतर आणि स्वतः राजचिन्हें धारण करण्या पूर्वी केली असावी असें वाटतें.]

पत्रः––...हुल दशमी रविवासरे क्षत्रियकुलावतंस श्रीराजारामछत्रपति यांणीं समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री रामचंद्र पंडित अमात्य हुकुमतपन्हां यासि आज्ञा केली ऐसी जे आंबा(जी).....(ला)ऊन देऊन गोतमुखें वर हक निवाडा करवणें जाणीजे बहुत लिहिणे तरी तुम्ही सूज्ञ असा [समाप्ति मुद्रा] " मर्यादेयं विराजिते "

संदर्भः—" हाटग्राम सासवड येथील ज्योतिष, उपाध्येपण आणि कुळकर्णपण या संबंधें पुरंदरे यांच्या मधील वादाचा गोतमुखें निवाडा करण्याची आज्ञा " करणारें आज्ञापत्र (राजशक २६ आश्विन वद्य १०).


(२) **लेखकः**—दुसरे श्रीशिवछत्रपति. थोरले राजारामम्हाराज आणि राणी सौ० ताराबाई यांचे पुत्र. जन्मः––ज्येष्ठ वद्य ४ । १६१८. मृत्युः—चैत्र शुद्ध २।१६४८. मुद्राः––०श्री॰प्रतिपच्चंद्रलेखेव वर्धिष्णुर्विश्ववंदिता । रामसूनोः शिवस्यैषा मुद्रा भद्राय राजते ॥ कोल्हापूरच्या राज्याचे संस्थापक; सांप्रत यांचा वंश कोल्हापुरास राज्य करीत आहे.

पत्रः—... कुलावतंस श्रीराजा शिवछत्रपती यांणी राजश्री ..... होऊन महसूल हुजूर ये येसे करणें लेखनालंकार [समाप्ति मुद्रा] " मर्यादेयंविराजते "

संदर्भः––" पुणें येथील राजोद्यान आणि गांवा बाहेरील मळ्या यांची लावणीसंचणी करण्यासाठीं गंगाजी पवार यास आज्ञा " पत्र (राजशक ३२ आषाढ बहुल ८). हें उद्यान पुण्यास सांप्रतच्या धान्यागाराच्या उद्यानाच्या पाठीमागें होतें (इ० सं० ऐ० टि० भा० १, पृ० १). पत्रांतील "लेखनालंकार" हीं अक्षरें अमात्यां(रामचंद्रपंतां)चीं आहेत; **छत्रपतींचीं नाहींत.** विशेष उलगडा उपन्यासांत पहा.

(३) **लेखकः**—थोरले श्रीशाहु(तिसरे शिवाजी)छत्रपति. संभाजीमहाराज आणि राणी सौ० येसूबाई यांचे पुत्र. जन्मः–वैशाख वद्य ७ ।१६०४. मृत्युः– मार्गशीर्ष वद्य ३।१६७१. समाधिस्थलः–माहुलीसंगम. मुद्राः–०श्री ◡ वर्धिष्णुर्विक्रमैर्विष्णोः सा मूर्तिरिव वामनी । शंभुसूनोरसौ मुद्रा शिवराजस्य राजते ॥

पत्रः—श्रीराजा शाहुछत्रपती स्वामी यांणीं समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधी राजमान्य राजश्री बाजीराव पंडित प्रधान यांसी आज्ञा केली ऐसी जे मौजे कोपरगांव.....(अम)लदारास ताकीद करून गांवास उपसर्ग लागो न देणे जाणीजे बहुत लिहिणें तरी सूज्ञ असा [स० मु०] "मर्यादेयंविराजते."



Gov't Photozinco Office Poona, 1933.

Govt. Photozinco Office. Poona. 1933

संदर्भः—" कोपरगांव, ग्रामगण कुंभारी प्रांत दौलताबाद हा गांव उमापति भट गंगाधर भट ऋषि यास दान दिल्याचें " वृत्तिपत्र (राजशक ६२ आश्विन बहुल ११).

(४) लेखकः-थोरले श्रीशाहुछत्रपति. हस्ताक्षर, वळण दुसरें, वृद्धावस्थेंतील.

पत्रः-.....ऊन लिहिल्या प्रमाणे पाटील हुजूर पाठऊन देणे रा गोवीदराव यास आज्ञा केली आहे त्तर हे पाटलावीसी लिहीत्तील याप्रमान पाटील साडवन सुदन आसा

संदर्भः-बालाजी (बाजीराव) पंडित (प्रधान) यांना, " दीड वर्षा पूर्वी, नारायणगांवचा पाटील तान्नांनीं पकडून नेला असतां त्यास सोडविण्या विषयीं आज्ञा केली तरी हि, ती पाळली नाहीं म्हणून दटावणीचें " आज्ञापत्र. वरील गांवाची पाटिलकी महाराजांची असोन तिचे कारभारी श्री० नानास्वामि होते. पत्रांतील " गोविंदराव " म्हणजे गोविंद खंडेराव संदेशलेखक होत.

(५) लेखकः--श्रीरामराजे (अथवा धाकटे राजाराम) छत्रपति. कोल्हापूरकर श्रीशिवछत्रपति (अनुक्रमांक २) आणि राणी सौ० भवानीबाई यांचे पुत्र. थोरले शाहुमहाराज यांचे दत्तक पुत्र. मा० ताराबाई यांनीं आपल्या पतीचें नांव (राजाराम) उच्चारावें लागूं नये म्हणून, यांच्या मूळ नांवाचा फेर-फार करून " रामराजे " असें नांव ठेविलें. जन्मः-शक १६४७ पूर्व. मृत्युः-मार्गशीर्ष शुद्ध १० १६९९. मुद्राः-(१) श्री० गौरीशंभुवरप्राप्त प्राज्य साम्राज्यसंपदा। शिवसूनोरियं मुद्रा रामराजस्य राजते ॥ (२) (सरदेशमुखाची) स्वस्तिश्रीसुखदामुद्राप्रतापोत्कर्षवर्धिनी। सरदेशमुखस्येषा रामराजस्य राजते ॥

पत्रः--आपल्यासमान रामराजे दंडवत विनंति ..... श्वीकार करावे रवाना छ १३ माहे रजब हे विनंति

संदर्भः—चिंचवडचे देवांना " मकरसंक्रमणाचे तील शर्करायुक्त पाठविले आहेत, ते घेऊन श्वीकार करण्याची विनंति " केलेलें पत्र (पौष शुद्ध १४। १६८५).

(६) लेखकः—तिसरे श्रीशिव(अथवा धाकटे शाहु.)छत्रपति. त्रिंबकजी वावीकर भोंसले यांचे पुत्र. मूळ नांव विठोजी. रामराजे यांनीं दत्तक घेऊन नांव शिवाजी ठेविलें. मृत्युः-वैशाख शुद्ध ९ शक १७३०. मुद्राः-श्रीशंभोःपदकमलसेवाभिहृदयावहा। मुद्रैषा शाहुराजस्य रामसूनोर्विराजते ॥

पत्रः—श्रीराजा शिवछत्रपतीस्वामी यांणीं राजमान्य राजश्री बालाजी जनार्दन यासी आज्ञा केली यैसी जे स्वा.....(मनो)लीकडे बाबेचा यैवज यावा जाणिजे बहुत काय लिहिणे [स० मु०] " मर्यादेयंविराजते "

संदर्भः--" परशुरामभाऊ पटवर्धन यांना उपसर्ग देऊं नये " म्हणून, प्रीतिराव चव्हाण यांस आज्ञापत्र (राजशक १२३ माघ बहुल ६).

(७) लेखकः--श्रीप्रतापसिंहछत्रपति. धाकटे शाहुमहाराज आणि राणी सौ० आनंदीबाई यांचे पुत्र. जन्मः-माघ शुद्ध ७।१७१४. मृत्युः-आश्विन शुद्ध ५।१७६९. मुद्राः-० श्री ॰ गौरीनाथवरप्राप्ता शाहूराजात्मजन्मनः। मुद्रा प्रतापसिंव्हस्य भद्रा सर्वत्र राजते ॥

पत्रः--प्रति प्रतापसिंव्हराजे दंडवत् विनंति उपरि ये.....पाठविल्या त्या पावल्या बहुत काय लिहिणे हे विनंती

संदर्भः—" संस्थान धावडशी कडील आंब्याच्या डाल्या पावल्या " म्हणून पत्र (वैशाख शुद्ध १४।१७४५). [इंग्रजानें श० १७४३ ज्येष्ठ शुद्ध ५ या दिवशीं श्रीप्रतापसिंहमहाराज यांना गादी

वर बसवून " गौरनाल आलपिष्टण बहादूर मुख्य प्रधान " अशी मुद्रा चालू केल्याचा प्रवाद त्या वेळीं होता].

(८) लेखक:--श्रीशहाजी(अप्पासाहेब)छत्रपति. प्रतापसिंहछत्रपति यांचे धाकटे बंधु. जन्म:-शक १७२४. मृत्यु:-शक १७७०. मुद्रा:-॰श्री ॰ स्वतिश्रीशिवसंप्राप्ताश्रियः श्रीशाहुजन्मनः ॥ श्रीमच्छाहाजिराजस्य श्रीमुद्रेयं विराजते ॥

पत्र:--मुा तारीख २७ फेबरवारी सन १८४७ इसवी बहुत काय लिहिणे

संदर्भ:--कृष्णाजी नाईक जोशी, मराठी साम्राज्याचे द्रव्यपरीक्षक यांचे पणतु केसो कृष्ण (टिपू कडील मराठ्यांचे सुमंत कृष्णराव नारायण यांचे पुत्र) जोसी यांना " बळवंतराव भोसले राजाज्ञा यांच्या लग्नाची (लग्न-फाल्गुन वद्य २ गुरुवार १७६८) पाठविलेली कुंकुमपत्रिका". या बळवंतराव राजाज्ञांची मुद्रा:-॰श्री ॰ श्रीराजा शहाजीछत्रपतिस्वामीचरणी तत्पर । बळवंतराव राजकुवर उमराव बाहादर निरंतर ॥ कृष्णराव नारायणांची मुद्रा:-॰श्री ॰भवानी शंकर चरणि तत्पर । कृष्णराव नारायण निरंतर ॥

(९) लेखक:—थोरले श्रीसंभाजीमहाराज, कोल्हापूरकर. थोरले राजारामछत्रपति आणि राणी सौ॰ राजसबाई यांचे पुत्र. जन्म-साधारणतः शक १६१९. मृत्यु-मार्गशीर्ष शुद्ध १३।१६८२. मुद्रा:-॰श्री॰प्रतिपच्चंद्ररेखेववर्धिष्णुर्विश्ववंदिता । शंभूछत्रपतेर्मुद्रा रामसूनो विराजते ॥

पत्र:—अपत्ये संभाजीराजे साष्टांग दंडवत प्रणाम ... [प]त्री साभालास अविस्मरण करून साभाल करणार वडील आहेत हे विनंती

संदर्भ:—" मा॰ ताराबाई यांना त्यांच्या वात्सल्या विषयीं " आभारदर्शक पत्र (भाद्रपद शुद्ध ८ । १६७४. या माहिन्यांत इंग्लंडांतील पार्लमेंटांत ग्रेगोरियन कालादर्शाचा न्यायनिर्वध पसार होऊन, या महिन्यांतील सप्टेंबराच्या ३ च्या तारखेस १४ वी तारीख म्हणण्याचें ठरलें. त्या मुळें, वरील पत्राची १६ वी तारीख, जुन्या पद्धतीनें ५ वी आली होती).

या छत्रपतींची स्थानदेवता जी कोल्हापूरची महालक्ष्मी तिची मुद्रा:-॰ श्री ॰॰ त्रैलोक्याभयदात्री श्रीकरवीरनरेश्वरी । मुद्रा तस्या जगन्मातुर्वर्वर्ति सकलेश्वरी ॥

(१०) लेखक:—राणी ताराबाई आऊ. हंसाजी हंविरराव मोहित सेनापति यांच्या कन्या. थोरले राजारामछत्रपति यांच्या राणी सीताबाई. पुढें, सासरच्या नांवा पेक्षां माहेरचें ताराऊ हें च नांव प्रसिद्ध होतें. जन्म:-शक १५९७. मृत्यु:-मार्गशीर्ष शुद्ध १२ । १६८३. समाप्तिमुद्रा:-"लेखन शुध." यांनीं च वास्तविक कोल्हापूरची गादी स्थापिली.

पत्र:—(शा) बान सुा इसने खमसैन मया अलफ देणे छ छ

संदर्भ:—" नीरवांगी गांव पिसाल यांचे कडे असल्यानें त्यांना तेथील उत्पन्न विना आक्षेप देण्या विषयीं ", इंदापूर उपप्रांताचे देशमुख, देशपांडे यांना आज्ञा (आषाढ वद्य २ । १६७३).

(११) लेखक:-राणी सौ॰ सकवारबाई. रामोजी शिर्के यांच्या कन्या राणुबाई. थोरले शाहुमहाराज यांच्या (पुढील काळांतील) थोरल्या राणी. महाराजां समागमें सती गेल्या. मार्गशीर्ष वद्य ३।१६७१.

पत्र:—श्रीमंत् सौभाग्यादिसंपन्न मातुश्री बाईसाहेब याणी राजमान्य राज[श्री]

[पाठीमागें]

सही

संदर्भ:—महादाजी अंबाजी पुरंदरे यांस, घरगुती पत्र.

(१२) **लेखक**:--राणी मा० सगुणाबाई. शेवटचे शहाजीछत्रपति यांच्या राणी.

पत्र:-जमा असेत ता। १८ जयानेबारी सन [१८५९]

संदर्भ:-" वांई येथील रास्ते यांच्या श्रीकाशीविश्वेश्वराच्या दानभूमींच्या उत्पन्ना " विषयीं आज्ञापत्र.

(१३) **लेखक**:--राणी मा०सौ०सगुणाबाई.बऱ्हाणजी मोहिते यांच्या कन्या. थोरले शाहुमहाराज यांच्या (पुढील काळांतील) धाकट्या राणी. मृत्यु:-भाद्रपद शुद्ध १३।१६७०, जेजुरी येथें. उत्तरकार्य संगममाहुली येथें.

पत्र:--आज्ञापत्र सरकार दरुनी माहाल वाडा दुसरा त॥.....मोर्तब सुद **रूजु**

संदर्भ:--भोसें येथील सायाचीं पानें आणण्यास वेठी पाठविणे विषयीं, आज्ञापत्र (कार्तिक वद्य ७ १७६२).

(१४) **लेखक**:--राणी सौ० जिजाबाई. तोरगळकर शिंदे यांच्या कन्या. कोल्हापूरकर थो• संभाजीछत्रपति यांच्या तिसऱ्या राणी. मृत्यु:-माघ वद्य ११।१६९४.

पत्र:--आपत्यें सौभाग्यादिसंपन्न जिजाबाई साीां दंडवत विनंति येथील कुशल जाणून वडिली निजानं(द वैभव).....**हे वीनंती**

संदर्भ:--" संक्रांतीचे तीळ पावल्याचे " मा० ताराबाई यांना पत्र (प्रविष्टतिथि पौष वद्य ९।१६७५).

[छायाचित्र-पान ३]

(१) **लेखक**:—श्रीमंत बाळाजी विश्वनाथ अथवा थोरले नानास्वामि भट, मुख्यप्रधान. जन्म:-साधारणतः शक १५८२. मृत्यु:-चैत्र शुद्ध ६।१६४२. समाधिस्थल:-सासवड. मुद्रा:-ॅ श्री० राजा शाहु नरपती हर्षनीधान । बाळाजी विश्वनाथ मुख्य प्रधान ॥

पत्र:--सेवक बालाजी विस्वनाथ सेनाकर्ते नमस्कार.....[पाठी मागें] कार्यभाग घेत जाणें जाणिजे छ ६ जमादिलोवल **निदेश समक्ष** [स० मु०] " मोर्तबसुद "

संदर्भ:--या वेळीं थोरले नानास्वामि हे प्रधान नसून " सेनाकर्ते " होते. या वेळची त्यांची मुद्रा:--ु० श्रीउमाकांतपदांभोजभजनासक्तसमुन्नतेः ॥ बाळाजी विश्वनाथस्य मुद्रा वीजयतेतरां ॥ "सासवड येथील अत्रे-पुरंदरे यांच्या मधील कुलकर्णाचा वाद" त्या विषयीं पत्र (ज्येष्ठ शुद्ध ७।१६३४).

(२) **लेखक**:—श्रीमंत बाजीराव बल्लाळ मुख्यप्रधान. बाळाजी विश्वनाथ आणि सौ०राधाबाई यांचे पुत्र. जन्म:-साधारणतः शक १६२०. मृत्यु:-वैशाख शुद्ध १३। १६६२. समाधिस्थल:-रावेरखेडीं, नर्मदातीर. ज्या जागीं अंत झाला तेथें समाधि आणि जेथें नर्मदेच्या पात्रांत अग्निसंस्कार झाला तेथें वेदिका आहे. मुद्रा:-०श्री०राजा शाहु नरपति हर्षनिधान । बाजीराव बळाळ प्रधान ॥

पत्र:—.....[कडी] ल कासीबा समागमे उतरें पाठविली पाही [जे] त हा असिर्वाद

संदर्भ:—सर्व पत्र श्रीमंतांच्या हातचें. " पीतांबर काढविण्या साठीं " चिमाजीआप्पा यांस पत्र. कांहीं ठिकाणीं श्रीमंतांच्या पत्रव्यवहारांत " श्रीराजा शाहु नरपति हर्षनिधान। विश्वनाथसुत वल्लाळ प्रधान " अशी हि वडिलांची च मुद्रा आढळते (शक १६४४).

(३) **लेखकः**—श्रीमंत बाळाजी बाजीराव अथवा धाकटे नानास्वामि मुख्य प्रधान. थोरले बाजीराव आणि सौ० काशीबाई यांचे पुत्र. **जन्मः**—मार्गशीर्ष वद्य १३।१६४३. **मृत्युः**—ज्येष्ठ वद्य ६।१६८३. **समाधिस्थलः**—"दहन (लकडी)पुलाचे दक्षणेस केले "(राजवाडे. ६, पृ० ४८६). सांप्रतच्या लकडी सांडव्या जवळ, गांवांतून बाहेर पडतांना उजव्या हाताला नदीच्या पात्राच्या प्रारंभीं कांठाला लागून खडकावर जी समाधि आहे, ती च नानास्वामींची असावी असें निश्चित वाटतें. समाधिस्थला करितां, खडक चोहों कडून तोडून अलग केला आहे. त्या वर बाहेरील संरक्षक दगडी वेदि साधारण ४ हात उंच, १० हात चौरस, घडीव दगडांची असून वर हि पाषाणबंधी आहे. पूर्वे कडील अंगास दोन्ही कोंपऱ्यांत दोन भोंकें आहेत. या वेदीला लागून खडका पासून वर पर्यंत (पूर्वेकडे) उत्तरोत्तर कमी होत गेलेल्या चार पायऱ्या आहेत. समाधी कडे तोंड केल्यास डावे हातचे कोपऱ्यांत खडका वर ध्वज पुरण्या साठीं ६ अंगुळें व्यासाचा खळगा आहे. मुख्य समाधि, दहनभूमी पासून, संरक्षक वेदीच्या वर १॥ हात उंच, म्हणजे एकंदर ५॥ हात उंच असून, ४ हात चौरस पाषाणमय आहे. वर, मध्या वर एका च सबंध पाषाणाची लिंग सहित शाळुंका आणि तिच्या जवळ पश्चिमाभिमुखी नंदी (गळ्यांतील आणि इतर अलंकारां सहित) आहे. शाळुंकेची नाळ थेट याम्योत्तर दिशेस आहे. पिंडी वरील तीर्थ दहनभूमी वर च पडावें अशा हेतूनें, नाळेच्या शेवटीं अर्धवर्तुळ भोंक खाल पर्यंत ठेविलें आहे. मुख्य समाधी वरील शाळुंका ४ बोटें उंच आहे. नंदीची उंची १ हात आहे. मुख्य समाधी वर मेघडंबरी अथवा आच्छादन करण्या साठीं चारही कोपऱ्यांत ३ अंगुलें चौरस भोंकें आहेत. समाधी वर कोठें हि शक इ० कांहीं नाहीं. संरक्षक वेदीचा वायव्य कोपरा, खडका पर्यंत, आज (कोजागर्ति पौर्णिमा शक १८५५) ढासळलेला आहे. त्याची आणि एकंदर समाधीची जीर्णोद्धार करण्याची जागृति पुणेंकरांना होईल काय ? इंग्रेजानें पुणें नगराची पहाणी करून मि० लाईट याच्या हातचें जें भूमिरेखाचित्र शक १७९१-९४ मध्यें छापिलें आहे, त्यांत हें स्थल स्पष्टपणें दिग्दर्शित केलें आहे.

मुद्राः—० श्री॰राजा शाहु नरपति हर्षनिधान । बाळाजी बाजीराव मुख्य प्रधान॥ (२)० श्री राजाराम नरपति हर्षनिधान । बाळाजी बाजीराव मुख्य प्रधान ॥

पत्रः—विनंति सेवक बालाजी बाजीराव कृता[नेक] ..... (रुप)ये ३० तीस बाकी रुपये १४९७० चवदा हजार नवसे सतर पावले सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना

संदर्भः—शामलाचें युद्ध. शाहुमहाराजांना विनंतिपत्र. " महाराजांनीं बाजीरावस्वामि आणि फत्तेसिंगबाबा यांना धाडण्या साठीं १५ सहस्र रु० पाठविले, त्यांत खोटे ३० रु० निघाले; उरलेले १४९७० रु० तीर्थरूपा कडे पाठवितो, " म्हणून (वैशाख वद्य ३।१६५५). या प्रसंगीं श्री० नानास्वामि हे मुख्य प्रधान नव्हते. श्री० बाजीरावस्वामि जिवंत होते.

(४) **लेखकः**—श्रीमंत विश्वासराव बल्लाळ. नानास्वामि आणि सौ॰ गोपिकाबाई यांचे प्रथम पुत्र. **जन्मः**—श्रावण शुद्ध २ । १६६४. **मृत्युः**—पौष शुद्ध ८ । १६८२, पानपतावर.

पत्रः— ... [लग्ना]करितां मजल दर मजल येऊन पोहे{ च }तो (म्हणून) पाठविले आहे विदित जाले पाहिजे (हे वि)ज्ञापना

संदर्भः—" निंबाळकरा कडील लग्नास जातों म्हणून नानास्वामि आणि भाऊस्वामि यांना पत्र. "हे विज्ञापना," या अक्षरांतील " हे वि " हीं अक्षरें मूळ पत्रांत च फाटलीं आहेत. या वेळीं विश्वासरावांचें वय ७ वर्षांचें होतें. या पंतप्रधान घराण्यांतील मंडळी, परस्परांस घरगुती पत्रें लिहितांना पत्रारंभीं " श्रीजेयति " असा श्रीकार लिहीत (ज्येष्ठ शुद्ध १३ । १६७१).

(५) **लेखक**:—श्रीमंत माधवराव बल्लाळ मुख्य प्रधान. नानास्वामि आणि सौ० गोपिकाबाई यांचे दुसरे पुत्र. जन्मः–माघ वद्य ११ । १६६६. मृत्युः–कार्तिक वद्य ८।१६९४. समाधिस्थलः–थेऊर. मुद्राः— ˘ श्री ० राजाराम नरपति हर्षनिधान । माधवराव बल्लाळ मुख्य प्रधान ॥

पत्र:—...मागाहून लिहून पाठविले जाईल रा छ ९ जिल्हे■ बहुत काये लिहिणे हे विनत्ती

पी छ १६ जिल्हेज तिसा चैत्र हा फत्तेअली वैगरे सांडणीस्वार

संदर्भ:—" हिंदुस्थानच्या देशाक्रमणाच्या वेंचाची व्यवस्था करणें " म्हणून नाना श्रीकरणाधिप यांना पत्र. श्रीमंतांच्या अक्षरां विरहित सारें पत्र हरिपंत फडके यांच्या हातचें. प्रविष्टतिथि नाना यांच्या हातची (चैत्र शुद्ध १२ । १६९१).

(६) **लेखक**:—श्रीमंत नारायणराव बल्लाळ मुख्य प्रधान. नानास्वामि आणि सौ० गोपिकाबाई यांचे पांचवे पुत्र. जन्मः–श्रावण शुद्ध ३।१६७७.वधः–भाद्रपद शुद्ध १४।१६९५,मंगळवार. समाधिस्थलः–" (लकडीं) पुला पाशीं नेऊन दहन केलें " (का० इ० सं० पं० प्र० श०, पृ० २८). नानास्वामींच्या पली कडे ओंकारेश्वराच्या अंगास थोड्याशा अंतरा वर पाषाणाची एक लहान समाधि आहे. ती श्रीमंतांची असावी असें वाटतें. मुद्राः–०श्री˘ राजाराम नरपती हर्षनिधान । नारायणराव बल्लाळ मुख्य प्रधान ॥

पत्र:—अपत्य नारायणरायाचे सां नमस्कार विज्ञापना ता.....(आ)हेत त्यांचे कसें करावें याची आज्ञा केली पाहिजे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

संदर्भ:—श्री० थोरले माधवराव यांना " होळकरा कडील प्रतिबंधा " विषयीं पत्र. रावांचें हस्ताक्षर सोडून सारें पत्र नाना श्रीकरणाधिप यांच्या हातचें (ज्येष्ठ वद्य ४।१६९०). या वेळीं श्री० नारायणराव हे मख्य प्रधान नव्हते.

(७) **लेखक**:—श्रीमंत माधवराव नारायण अथवा सवाईरावस्वामी मुख्य प्रधान. नारायणराव आणि सौ० गंगाबाई यांचे पुत्र. जन्मः—वैशाख शुद्ध ७।१६९६. मृत्युः—आश्विन शुद्ध १४।१७१७. मुद्राः—(१) ० श्री ˘ राजाराम नरपती हर्षनिधान । माधवराव नारायण प्रधान ॥ (२) ० श्री ˘ राजा शाहु नरपती हर्षनिधान । माधवराऊ नारायण प्रधान ॥

पत्र:—विद्यार्थी माधवराव नारायण सां नमस्कार ..... (प्रायश्चि)त देविले त्या प्रो त्याणी घेउन मग पारनेरास गेले बहुत काय लिहिणे लोभ असों दीजे हे विनंति

संदर्भ:—" एक ब्राह्मण यवन झाला त्याच्या संसर्गीयांना प्रायश्चित देणें " म्हणून न्याया-

(८) **लेखक**:—श्रीमंत चिमणाजी (चिंतामण ?) बल्लाळ अथवा चिमाजीआप्पा. बाळाजी विश्वनाथ आणि सौ० राधाबाई यांचे दुसरे पुत्र. जन्मः—साधारणतः शक १६३०. यांचें नैतिक वर्तन अत्यंत शुद्ध होतें. वसईच्या फिरंगी मुद्राधाऱ्याची पत्नी यांनीं हातीं सांपडली असतां, तिचा गौरव करून परत पाठविल्याची गोष्ट (थोरल्या श्रीशिवाजीमहाराज यांच्या सारखी) प्रसिद्ध च आहे. मृत्युः—पौष शुद्ध १०।१६६२. समाधिस्थलः—पुणें, ओंकारेश्वराचे देवळाच्या बाहेर, महाद्वाराच्या उत्तरे कडे, नदी कडे जाण्याच्या वाटे वर, मंदिराच्या उत्तरे कडील ओवरींतील देवा समोर २० हातां वर समाधि. तिचा खालील भाग घडीव दगडांचा अष्टकोणी; प्रत्येक भाग ३ हात रुंद आणि ४ हात उंच; तिच्या मध्या वर ३ हात चौरस आणि ४ हात उंच घडीव दगडी वेलपत्तीचें कोरीव काम केलेलें वृंदावन. त्यांत पश्चिमे कडे समाधीच्या सपाटी पाशीं कोनाड्यांत शाळुंके सहित शिवलिंग; शाळुंकेची नाळ उत्तरे कडे. समोर सालंकार

घडीव नंदी. खालचा समाधि आणि वरील वृंदावन मिळून श्रीं० आप्पास्वामी आणि त्यांच्या पत्नी सौ० सती अन्नपूर्णाबाई यांचें स्मारक फार उत्तम प्रकारें साधलें आहे.

पत्रः--चिरंजीव राजश्री बाबुराव फडनीस यास चिमणाजी बलाल आसीर्वाद उपरि माणकोजी कडु बारगीर हुजूरपागा व गंगा(जी कडु)

संदर्भः--सर्व पत्र चिमाजीआप्पा यांचे हातचें. "माणकोजी आणि गंगोजीस २०० रु० दिल्या विषयीं" घरगुती.

(९) **लेखकः**-श्रीमंत सदाशिवराव भाऊस्वामि. चिमाजीआप्पा आणि सौ० अन्नपूर्णाबाई यांचे पुत्र. जन्मः--श्रावण शुद्ध १।१६५२. मृत्युः--पौष शुद्ध ८।१६८२, पानपतावर. तेथें सांप्रत छत्री बांधलेली आहे. मुद्राः-- श्री ० राजा शाहु चरणीं तत्पर । सदाशिव चिमणाजी निरंतर ॥

पत्रः--.....(वि)नंती आहे कितेक आसाम्या पेशजी करार आहेत त्या सर्व विसी आज्ञा करणे ते करावी चाकरी केली पुढे तेथे आसल्या किफा(येत च होईल)

संदर्भः--नानास्वामि प्रधान यांना, " विसाजी वलाळ गद्रे यांचे विषयीं," पत्र.

(१०) **लेखकः**--श्रीमंत जनार्दनबाबा. थोरले बाजीराव आणि सौ० काशीबाई यांचे शेवटचे पुत्र. जन्मः--श्रावण शुद्ध २ । १६५७. मृत्युः--आश्विन वद्य ७।१६७१, सातारा येथें.

पत्रः—यानी काही न केले लटक्या च गोष्टी सागीतल्या बरे दिसत नाही आधी योग्यता असल्याने बरे दिसते.....

संदर्भः—" सखाराम बापू, नाना, इ० च्या उल्लेखांचें " घरगुती पत्र.

(११) **लेखकः**—श्रीमंत रघुनाथराव बाजीराव अथवा दादास्वामी मुख्य प्रधान. थोरले बाजीराव आणि सौ० काशीबाई यांचे मधले पुत्र. जन्मः--श्रावण शुद्ध १३।१६५६. मृत्युः--मार्गशीर्ष वद्य ३।१७०५. समाधिस्थल-कोपरगांव जवळचें सितापखेड. मुद्राः-(१) श्रीसांबः सपुत्रो विजयते। राजा शाहु नरपती हर्षनिधान । रघुनाथ बाजीराव मुख्य प्रधान ॥ (२) सांबपदपंकजलीनस्य मुद्रेयमपराजिता । बाजीराव तनूजस्य रघुनाथस्य विराजतां ॥

पत्रः--चिरंजीव राजश्री नाना यासी रघुनाथ बाजीराव आसीर्वाद उपरि येथील कुशल जाणून स्वकीयें लिहीत गेले पाहिजे विशे (ष)...

संदर्भः--सर्व पत्र श्री० दादास्वामींच्या हातचें. नाना पुरंदरे यांस; घरगुती.

(१२) **लेखकः**--श्रीमंत धाकटे बाजीरावस्वामि अथवा बाबास्वामि मुख्य प्रधान. राघोबादादा आणि सौ० आनंदीबाई यांचे दुसरे पुत्र. जन्मः-पौष शुद्ध ६।१६९६. मृत्युः-पौष शुद्ध १२।१७७२. समाधिस्थल-ब्रह्मावर्त. मुद्राः- श्री ० राजा शाहु नरपति हर्षनिधान। बाजीराव रघुनाथ मुख्य प्रधान ॥

पत्रः--चिरंजीव राजश्री चिमण्या यांसि बाजीराव रघु[नाथ प्र]धान आसीर्वाद उपरि कुंपिणी इंग्रज.....(ब)हुत काय लिहिणे हे आसिर्वाद

संदर्भः—श्री० चिमणाजीआप्पा धाकटे यांना पत्र. " इंग्रजांच्या विद्यमानें तुमची वार्षिक नेमणूक २ लाखांची ठरली " म्हणून (फाल्गुन शुद्ध ४।१७३२).

(१३) **लेखकः**—श्रीमंत चिमणाजी माधवराव मुख्य प्रधान. राघोबादादा आणि सौ०आनंदीबाई यांचे दुसरे पुत्र. जन्मः-चैत्र शुद्ध ९।१७०६. दत्तक- श्री० मा० यशोदाबाई (श्री० सवाई माधवराव

यांची पत्नी) यांच्या मांडीवर. प्रधानकीचीं वस्त्रें वैशाख वद्य ५।१७१८. पुढें काशीवास. मृत्युः–ज्येष्ठी अमावास्या १७५२. मुद्राः –०श्री०राजा शाहु नरपति हर्षनिधान । चीमणाजी माधवराव प्रधान ॥

पत्रः—पो॥ चिमणाजी माधवराव प्रधान नमस्कार विन(ती) ..... (जा)णिजे छ २१ सफर सुा सबा तिसैन मया व अलफ बहुत काय लिहिणे हे विनंति

संदर्भः—भवानी शंकर हैबतराव यांस. " महाडा कडील राजकारणा संबंधीं, " पत्र (श्रावण वद्य ७।१७१८). [यांच्या नंतर, मध्यंतरीं दोन महिने यांचे वडील—पण दत्तक–बंधु श्री० अमृतराव-स्वामि हे मुख्य प्रधान झाले होते. हे मूळचे भुसकुटे घराण्यांतील. श्री० दादास्वामींनीं यांना वैशाख शु० ३।१६९० या दिवशीं दत्तक घेतलें. पुढें चित्रकूट येथें वसति. मृत्युः–श० १७४५. मुद्राः–श्रीमंत अमृतराव रघुनाथ ।]

[छायाचित्र–पान ४]

(१) लेखकः—श्री० मातुश्री राधाबाई अथवा बाई. दादाजी जोगदेव नेवरेकर बर्वे यांच्या कन्या. श्री० बाळाजी विश्वनाथ प्रधान यांच्या पत्नी. मृत्युः–चैत्र वद्य २।१६७५. या फार राजकार्यपटु होत्या. काशीयात्रेस गेल्या असतांना, यांनीं, रजपुतांना मिळवून घेऊन दिल्लीकरां विरुद्ध राजकारण शिजविलें होतें.

पत्रः—श्रीयासह चिरजीव राजश्री बाजीराऊ यासि मातुश्री राधाबाई आसीर्वाद उपर येथील ... (पाही)जे हे आसीर्वाद

संदर्भः—" म्हैस पाठविल्या विषयीं " घरगुती पत्र. " आसीर्वाद " यांत " सी " च्या खालीं प्रथम ऋकार देऊन आणीक " वा " वर रफार लिहिला आहे.

(२) लेखकः—श्री० मातुश्री काशीबाई अथवा ताई. महादाजी कृष्ण चासकर, जोशी यांच्या कन्या. श्री० थोरले बाजीराव प्रधान यांच्या पत्नी. लग्न, साधारणतः शक १६३३. मृत्युः–कार्तिक वद्य १२।१६८०.

पत्रः—प्रति कासीबाई आसीर्वाद उपरि.....(स्थ)लास जाईल छ २१ सफर बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे आसीर्वाद

संदर्भः—काशीयात्रेंत असतांना " उत्तरे कडील ५ सहस्र यात्रा परत देशीं जात आहे, तीस सुखरूप पोहोंचविणें " म्हणून मल्हारराव होळकर आणि जयाजीराव शिंदे यांना लिहिलेलें आज्ञापत्र (फाल्गुन वद्य १४।१६६७).

(३) लेखकः—श्री० मातुश्री सगुणाबाई. रामाजी अनंत नाईक भिडे यांच्या कन्या. श्री० जनार्दनबाबा (थोरले बाजीरावस्वामि यांचे पुत्र) यांच्या पत्नी. लग्नः–वैशाख वद्य ५।१६६६. काशीयात्रा १६७९. मृत्युः–कार्तिक वद्य ४।१७०५. मृत्युस्थानः–जलालपूर.

पत्रः—अपत्यें सगुणेने नमस्कार विनंति ये(थील).....(आ)हे त्या वरून विदित होईल बहुत काय लिहिणे हे विनति

संदर्भः—काशीयात्रेस गेल्या असतांना गंगापार झोंसी (हल्लींचें बंगाल नागपूर आगगाडीचें झुंशी स्टेशन) येथून श्री० दादास्वामि यांना धाडलेलें घरगुती पत्र (चैत्र शुद्ध ३।१६७९).

(४) लेखकः—श्री० सौ० आनंदीबाई. राघो महादेव ओक, मलठणकर, यांच्या कन्या. श्री० राघोबादादा मुख्य प्रधान यांच्या धाकट्या पत्नी. **लग्नः**–मार्गशीर्ष शुद्ध १४।१६७८. **मृत्युः**–फाल्गुन वद्य ११।१७१५. **मृत्युस्थानः**–आनंदवल्ली.

पत्रः—सौ आनंदीबाई याचे आसीर्वाद...२॥ छ २३ शाबान बहुत काय लिहिणे हे आसीर्वाद

संदर्भः—" शर्करायुक्त तीळ पाठविले, ते पावल्याचें, " नाना श्रीकरणाधिप यांस पत्र (पौष वद्य ९।१६८८).

(५) लेखकः—श्री० सौ० भिऊबाई. श्री० बाळाजी विश्वनाथ प्रधान आणि सौ०राधाबाई यांच्या कन्या. बाबूजी नाईक जोशी, बारामतीकर यांचे धाकटे बंधु आबाजी (आबूराय) यांच्या पत्नी. **जन्मः**– साधारणतः शक १६२५-२६. **लग्नः**– १६३३. **मृत्युः**–ज्येष्ठ शुद्ध १०।१६६९. यांच्या इच्छेनुसार बाबूजी आणि आबाजी यांनीं पुणें येथील शनवार पेठेंत नदी कांठीं श्रीसिद्धेश्वराचें देवालय बांधून, देवपूजे साठीं शिवराम वासुदेव चित्राव यांस पिंपरी गांवीं भूमि दान केली. कार्तिक शुद्ध ६।१६७२.

पत्रः—चिरंजीव राजमान्य राजश्री नाना यांसि प्रति सौ भिऊबाई आसिर्वाद उपरि येथील कुशल जाणो (न)...(चिरजीव) व सौ उमाबाईस घेऊन येतील बहुत काये लिहिणे हे आसिर्वाद

संदर्भः—श्री० नानास्वामि प्रधान यांना " मातुश्री राधाबाई पुण्यास गेल्या विषयीचें, " पत्र. पत्रांतील सौ० उमाबाई म्हणजे श्री० सदाशिवरावभाऊ यांच्या पहिल्या पत्नी (ज्येष्ठ वद्य ६ शक १६६२ गुरुवार).

(६) लेखकः—श्री० मातुश्री गंगाबाई. कृष्णाजी हरि साठे यांच्या कन्या. श्री० नारायणराव-स्वामी प्रधान यांच्या पत्नी. **लग्नः**–वैशाख शुद्ध ९ । १६८५. **मृत्युः**–आषाढ शुद्ध ८।१६९९.

पत्रः—हे विनंती

संदर्भः—" पुण्यांत गडबड आहे म्हणून राजसेवेच्या दासी सिंहगडास पाठविल्या आहेत, " असें आनंदराव जिवाजी यांस पत्र (चैत्र वद्य २ । १६९६). रा० आनंदराव म्हणजे खाजगीवाले.

(७) लेखकः—श्री० समसेरबहादर. श्री० थोरले बाजीराव आणि (त्यांची रक्षा) बिबी मस्तानी यांचे पुत्र. **जन्मः**–शक १६५५ । ५६. **लग्नः**–आश्विन शुद्ध १३।१६७५. पत्नी निंबगीरीकर मेहेरबाई. **मृत्युः**–पौष शुद्ध ८ । १६८२ पानपतीं. **मुद्राः**–पत्रांत आली आहे.

पत्रः—श्री पांडुरंग

(राज)मान्य श्रीो समशर:बहादर सला(म)...(बहुत काय लि) [पाठीमागें] (मुद्राः–" श्री बल्लाळ चेरणीतत्पर समशेर बाहादर नीरतर ",) हिणें [स० मु०] " मोर्तब सुद "

संदर्भः—" जैनाबाद कडील उत्पन्न पावलें " म्हणून, रामाजी केशव यांस पत्र (माघ वद्य ११ शक १६७७). समशेरबाबा हे मुसुलमान आईच्या पोटीं जन्मले असतां हि पत्रावर " पांडुरंगा " चा श्रीकार स्वहस्तें लिहितात, एवढें च नव्हे तर मुद्रेंत सुद्धां श्री० नानास्वामीं(बाळाजी म्हणजेच बलाळा) चे चरण स्मरतात, ही गोष्ट हिंदु धर्मा वरील त्यांची निष्ठा आणि पितृकुलाची भक्ति उत्कटपणें दर्शवितें, हें विशेष लक्ष्यांत ठेवण्या सारखें आहे ! मस्तानी बिबीची कबर पाबळ येथें आहे.

(८) लेखकः—रा० रामचंद्रपंत अमात्य सेनाध्यक्ष. रा०निळो सोनदेव भादाणेकर यांचे पुत्र. **जन्मः**–साधारणतः शक १५७२. **मृत्युः**–साधारणतः शक १६३९. **मुद्राः**– श्री० रामजंगद्वंदितसंदेशा-

Govt Photozinco Office, Poona, 1933.





Gov.t Pholozinco Office Poona, 1933.

देशानंदविधायिनी । नीलकंठजनेर्मुद्रा रामचंद्रस्य राजते ॥. यांना थोरल्या शिवछत्रपतींनीं अमात्यपद दिलें. यांचें काम लेख्यशाळेचें लिहिणें, सर्व कार्यस्थानांची एकसंख्या आणि आयव्ययाची परीक्षा करणें, राजपत्रावर " लेखनालंकार " आणि लेख्य मिति घालणें. थोरल्या राजाराममहाराजांच्या वेळीं सर्व स्वराज्याची धुरा यांचे वर च असल्यानें यांना वरील पदवी महराजांनीं दिली. थोरल्या शाहुमहाराजांचे वेळीं हे करवीरा(संभाजीमहाराजा)कडे गेले. सांप्रतच्या गगनबावडे संस्थानचे संस्थापक. तेथें यांचा वंश सांप्रत राज्य करीत आहे.

पत्र:—सेवक रामचंद्र नीलकंठ नमस्कार सु॥ ख (मस)...अतर न करणें राजश्री कैलास-वा{सी} स्वामीचे कारकीर्दीस इनाम आनमानत नसेल साल दर साल भोगवटा असेल तरी चाल-वणे छ २०

[वरतीं]

आई आदि पुरुष

संदर्भ:—" पांडेस्वर येथील भूमि नरसिंह भट वैद्य मालशीरसकर यांस दान दिली आहे " म्हणून नरहरि आपदेव देशाधिकारी प्रांत पुणें यांस आज्ञापत्र (ज्येष्ठ शुद्ध ७।१६१६).

(९) लेखक:—रा० भगवंतराव अथवा शिवरामपंत किंवा बाजीराव अमात्य. रामचंद्रपंत यांचे पुत्र. जन्म:-माघी पौर्णिमा १५९८. यांचें आणि श्री० संभाजीराजे करवीरकर यांचें चांगलें नसल्यानें पुढें यांना श्रीरामराजे छत्रपती यांनीं शक १६७२ मध्यें अमात्यपद दिलें. हे तेजस्वी आणि मानी होते. रा० निळोपंत प्रधान यांच्या कन्या व्यंकुबाई यांना दिल्या होत्या. मृत्यु:-शक १६७७, पुणें येथें.

पत्र:—श्री रघुवीर

मुद्रा:-श्रीरामचंद्रचरण नीळकंठ सोनदेव शरण

आज्ञापत्र समस्तराजकार्यधुरंधर विश्वासनिधि.....सुरलीत हुजूर देणें जाणिजे छ ९ माहे जिल्हेज निदेश समक्ष

समाप्ति मुद्रा:-" लेखनसीमा समुळसती "

संदर्भ:—" भोसें येथील भोज्यग्राम स्वत:स मिळाल्या " विषयीं, तेथील ग्रामाधिकाऱ्यास आज्ञापत्र, पत्रा वरची मुद्रा आजाची च आहे (कार्तिक शुद्ध १०।१६७३). यांनीं कांहीं चेळ वडिलांची हि मुद्रा वापरली आहे ती:- " श्रीसीताराम चरण । रामचंद्र नीळकंठ शरण ॥ "

(१०) लेखक:—रा० भगवंतराव अमात्य. वृद्धावस्था. दुसरें अक्षरवळण.

पत्र:—श्री रघुवीर

स्नो भगवंतराऊ रामचंद्र आमात्य आसीर्वाद विनंती उपरी येथी(ल (... (साल) माारची घेऊन पाठवावी बहुत काय लिहिणे कृपा क(रणें हे विनति)

संदर्भ:—" घरगुती वेंचाची मागणी " विषयीं रामाजीबावा आणि महिपतराव यांस पत्र.

(११) लेखक:—रा० कृष्णराव अमात्य. भगवंतराव अमात्य यांचे पुत्र. हे करवीरकरां कडील अमात्य. पदप्राप्ति शक १६७२. मृत्यु:-शक १६८३.

पत्र:—अपत्यें कृष्णरायें चरणावरी मस्तक ठेवून सीरसाष्टांग.....सांगतां विदित होईल बहुत काय लिहू कृपा करावी हे विज्ञापना

संदर्भ:—" मिरजकरांनीं उपद्रव दिला " म्हणून पत्र (मार्गशीर्ष-१६७४).

(१२) **लेखक**:—रा० बाळकृष्ण वासुदेव अथवा बाबूराव किंवा आ(आं)बूराय हणु(नु)मंते अमात्य. मूळ पुरुष हनुमंता सारखा पराक्रमी म्हणून हे आडनांव पडलें. बाळकृष्णपंतांचे आजे जनार्दनपंत, चुलत आजे रघुनाथपंत आणि पणजे नारायणराव हे, थोरले शिवाजी, थोरले संभाजी आणि थोरले राजारामछत्रपति यांचे वेळीं प्रख्यात होते. रा० आबूराय यांना थो० शाहुमहाराजांनीं हें पद १६३० मध्यें दिलें. या घराण्यांत संस्कृत विद्येचें माहेरघर होतें. मृत्यु:—शक १६६१. मुद्रा:—छायाचित्र पान १७ पहा.

पत्र:—[मागें]...वारा रुपये देविले पाहिजेत ये विशी वि[शे]ष लिहिणे तरी आपण सर्वज्ञ आहे[त] कृपा असो दिल्ही पाहिजे हे विनति [पोटांत] पोष्ये आबुराये कृतानेक नमस्कार विनंति उ[परि] येथील कुशल जाणून स्वकीये कुशल लेखन करी[त]

संदर्भ:—" निजामाचा पराभव केला " म्हणून, थोरले बाजीरावस्वामी यांना उत्तेजनपर पत्र (शक १६५०).

(१३) **लेखक**:—रा० नीलकंठ बाबूराय अमात्य. बाळकृष्ण बाबूराय यांचे पुत्र. त्यांच्या मागें कांहीं दिवस हे अमात्य होते.

पत्र:—सेवक नीलकंठ बाबूराव आमात्य नमस्कार विनंति उपरी.....रबिलाखर बहुत काय लिहिणे

संदर्भ:—" उमरजच्या उत्पन्ना " संबंधीं, अंताजी वासुदेवांस पत्र.

(१४) **लेखक**:—श्री० अली बहादर अथवा कृष्णसिंग. समसेर बहादर आणि बिबी मेहेरबाई यांचे पुत्र. जन्म:—शक १६७९।८०. सागरच्या ईशान्येस बांदा येथें राजस्थापना (१७१०). पहिली पत्नी-दुलजबेगम. तिचे पुत्र धाकटे समशेर बहादर. दुसरी पत्नी—वक्षीबेगम, तिचे पुत्र झुल्फिकर अली. अली बहादरांचा मृत्यु (१७२४). मुद्रा:—श्रीमाधवचरणीं तत्पर । अली बहादर निरंतर ॥ या मुद्रेच्या प्रकारा संबंधीं या पानांतील समशेर बहादर (अं० ७) यांचे पत्रा मधील संदर्भ पहा.

पत्र:—अपत्य आलीबहादूर चरणावरी मस्तक ठेवून विज्ञा[पना].....(सेवे)सी श्रत होये हे विज्ञापना

संदर्भ:—" सहाय्य करण्या विषयीं विनंति " श्री० धाकटे बाजीरावस्वामि यांना पत्र. पत्रा वर सोन्याच्या पानाचे लहान लहान तुकडे जोडलेले असून, वरच्या तीन तुकड्यांत अनुक्रमें " कपाली," " जसा," " योग " असे मोडी शब्द अलीबाबा यांनीं च लिहिले आहेत. पत्राच्या पाठी मागें, मोडींत " कृष्णकमलपत्राक्षं स्मरामि च जनार्दनं " हा श्लोकार्ध हि मोडींत पण दुसऱ्यानें लिहिला आहे. बाबा यांचें नांव कृष्णसिंग आहे हें या श्लोकार्धाच्या प्रसंगीं ध्यानांत घेणें.

[छायाचित्र—पान ५]

(१) **लेखक**:—रा० शंकराजी नारायण सचिव. पुणें जवळील मांगदरी मूळगांव. मूळपुरुष, नारो मुकुंद. थो० शिवछत्रपतींचे पदरीं शक १५६५ त राहिले, नंतर भोरपगिरीचे सेनालेखक. यांचे पुत्र शंकराजी. मोरोपंत प्रधानांचे हाताखालीं १५९९ मध्यें लेखक. रामचंद्रपंत अमात्यांच्या संगतीनें वाढत वाढत सचिव झाले (१६१९). राजारामछत्रपतींच्या वेळीं यांनीं मोंगलाशीं युद्धें करून स्वराज्य सोडविलें म्हणून महाराजांनीं " मदारुलमहां " (विश्वासनिधि) पदवी दिली आणि मोंगलाईतील " सावोत्रा "

करर. गोळा करण्याचा अधिकार वंशपरंपरा दिला. यांचें काम लेख्यशाळा सांभाळणें, राजपत्रांची लेख्यावली ठेवणें आणि त्यांवर " रुजू सुरनवीस. सुरू सुद बार " अशीं अक्षरें लिहिणें. यांची " श्री-शंकराजी नारायण " ही च मुद्रा पुढील वंशजांनीं चालूं ठेविली होती असें अ० प्र० इतिहासकार म्हणतात; त्या मुळें पुढील वंशजांच्या स्वतंत्र मुद्रा आढळत नाहींत. सांप्रतच्या भोर संस्थानचे हे संस्थापक. यांचा वंश भोरास राज्य करीत आहे. मृत्युः–कार्तिक शुद्ध १२।१६२९ (आतुर संन्यास घेतला होता). समाधिस्थलः–आंववडें. मुद्राः–पत्रांत आली आहे. (२) श्रीरामभजनासक्त नारायण तनुजनेः । शंकरस्य शुभा मुद्रा पूर्णेंदुरिव राजते ॥

पत्रः—मुद्राः–– श्री शंकराजी नारायण

अभयपत्र समस्तराजकार्यधुरंधर विस्वासनिधि राजमान्य राजश्री शंकराजी पंडित सचिव तां मोरो विठ्ठ(ल) ..... उपसर्ग लागणार नाही अभय असे छ १७ रजब पा हुजूर

समाप्ति मुद्राः––पत्रावधिरयंभाति

संदर्भः—" थोरले शिवाजी आणि थोरले संभाजीमहाराज यांच्या राजवटींत श्रम साहस केलें, म्हणून पुणें प्रांताची देशपांडेपणाची वृत्ति पुढें चालविल्याचें, मोरो विठ्ठल, रामाजी गोविंद आणि मुकुंद कान्हो होनप, " यांना अभयपत्र (आश्विन वद्य ४। १६२८).

(२) लेखकः—रा० चिमणाजी नारायेण सचिव. शंकराजीपंतांचे पुत्र नाराणराव, त्यांचे हे दत्तक पुत्र. सचीवपदप्राप्ति शक १६५९. मृत्युः–शक १६७९. छत्रीः–भोर येथें. यांनींच भोर ही राजधानी केली.

पत्रः—पोष्य चिमणाजी नारायेण कृतानेक नमस्कार...काये लिहिणें कृपा लोभ असो दिल्हा पाहिजे हे विनति

संदर्भः—" निघोजे येथील महारांना, श्री० थोरले बाजीराव यांचे आज्ञे वरून परत पाठविण्या " विषयीं, चिमाजीअप्पा यांना पत्र.

(३) लेखकः—रा० सदाशिव चिमणाजी सचिव. हे चिमणाजी नारायणांचे वडील पुत्र. पदप्राप्ति शक १६८०. मृत्युः–ज्येष्ठ वद्य ५। १७०९.

पत्रः— [पाठीमागें]

(रा छ १६ माहे सवाल बहुत काय लिहि)णे लोभ असो दीजे हे विनंति

[आरंभीं]

पोष्य सदाशिव चिमणाजी सचीव नमस्कार विनंति उपरी येथील कुशल जाणोन स्वकीये

संदर्भः—नाना श्रीकरणाधिप यांना घरगुती पत्र (माघ वद्य ४। १६९१).

(४) लेखकः—मा ० भवानीबाई सचिव. रा० चिमणाची शंकर सचिव (शक १७२०-१७४९) यांच्या थोरल्या पत्नी आणि रा० आपाजीपंत राजउपाध्ये यांच्या कन्या. मृत्युः–फाल्गुन शुद्ध १।१७७६.

पत्रः—प्रति भवानीबाई आसिर्वाद विनंति उपरि येथी[ल]...(लिही)णे हे आसिर्वाद

संदर्भः—आनंदराव बाबूराव वैद्य वाईकर यांना घरगुती पत्र.

(५) लेखकः—रा० नारो राम मंत्रि. कोचरे (सांवतवाडी) गांवचे कुलकर्णी, सारस्वत. प्रथम शक १६२९ मध्यें धनाजी जाधव यांचे जवळ सेवेस राहिले; नंतर १६३४ त राजाज्ञा झाले; १६३५ त मंत्रीपद मिळालें. शक १६७० मध्यें रंगपंचमीच्या दिवशीं थोरल्या शाहुमहाराजांनीं, यांना रंगाचे ताक्यांत

सोडलें असतां अपघातानें मृत्यु पावले. मुद्राः--छायाचित्र पान १७ पहा. यांचें काम, पाकशाळेची व्यवस्था ठेवणें, राजपत्रावर " संमतमंत्री, " " बार " अक्षरें लिहिणें आणि राजकारण. यांचा वंश बांगणी आणि इसलामपूर येथें आहे.

पत्रः—श्रियासह चिरंजीव राजमान्य राजश्री नाना व राजश्री सदोबा यां प्रति नारो राम कृतानेक आसिर्वाद येथील कुशल जाणून स्वकीये कुशललेखन केलें पाहिजे विशेष मौजे पिंपरी व वड (गांव)

संदर्भः—नारोपंत आणि थोरले बाजीराव यांचा भाऊपणा फार असल्यानें, पंतांनीं श्री० नाना-स्वामि आणि श्री० भाऊस्वामि यांना " चिरंजीव " म्हणून पत्र ("घोडदळाच्या भांडणा विषयीं ") लिहिलें आहे. सर्व पत्र पंतांच्या हातचें आहे.

(६) लेखकः—रा० घनशाम नारायण मंत्रि. हे, नारो राम यांचे (प्रथम पुतणे, पुढें) दत्तक पुत्र. हे, रामराजे छत्रपति यांच्या राजवटींत वारले.

पत्रः—विनंति सेवक घनशाम नारायेण मंत्रि, कृतानेक वि(ज्ञापना)...(वि)च्यार याचे विचारे होईल तो सेवेसी लेहून पाठऊ सेवेसी स्वत होय हे विज्ञेति

संदर्भः—" उदाजी चव्हाणाच्या दंग्या " विषयीं, मा० ताराबाई यांना पत्र (पौष वद्य ९ । १६७४).

(७) लेखकः—रा० निराजी राउजी, न्यायाधीश. थोरले शिवाजीमहाराज यांचे राज-वटींतील. हे आग्र्याला, महाराजांबरोबर गेले होते. या कार्यामुळें शक १५८३ मध्यें त्यांना न्यायाधीश-पद दिलें. शक १५९१ मध्यें हे गोवळकोंडेकरा कडे सुमंत होते. या च वेळीं आगेंमागें ते वारले. यांचें काम निवाडे करणें, निवाडपत्रावर " संमत न्यायाधीश ", " बार " लिहिणें.

पत्रः—सेवक निराजी राऊजी कृतानेक नमस्कार विनति उपरि.....(क)रिता त्याची गोस्टी नाहीत यैसें दिसो न देणे हे आमच [बधु यैसे जा] णोन यासी वर्तत जाणे बहुत लिहिणे तरी गोसावी [सुज्ञा आ]हेती कृपा असो देणे हे विनंति

संदर्भः—" (थोरले) शिवाजीमहाराजांच्या आज्ञे प्रमाणें पुणें प्रांताच्या देशपांडेपणाचा अधिकार होनपां कडे चालूं देण्या " विषयीं, उपर्युक्त प्रांताच्या देशाधिकाऱ्यांना आज्ञापत्र (शक १५८७)

(८) लेखकः—रा० कोन्हेर गणेश न्यायाधीश. थोरले राजारामछत्रपति यांचे राजवटींतील. मुद्रा पत्रांत आली आहे. "श्री० श्रीराजारामैकनिष्ठस्य गणेशतनुजनेः कोनेरीरायस्यमुद्रान्यायाधीशस्यराजते.

पत्रः—अभयेपत्र समस्तराजकार्येधुरधर विस्वासनिधि राजमा [न्ये] राजश्री कोनेर पडित न्यायाधीश ता गोमाजी भास्कर व.....(ये)णे कोणे गोस्टीचा शक न धरणे ये विशी अभये असे रा छ १० सफर पा हुजूर

समाप्ति मुद्राः--" राजते लेखनावधि "

संदर्भः--" सासवडचे पुरंदरे-अत्रे भांडण " (श्रावण शुद्ध १२।१६२१).

(९) लेखकः—रा० रामशास्त्री बाळशास्त्री प्रभुणे, माहुलीकर. ऋग्वेदी, देशस्थ, गोत्र वासिष्ठ. प्रथम सातारकर अनगळ श्रेष्ठी यांचे शिष्य होते. भीकबाळीच्या दंतकथे प्रमाणें उपरती होऊन श्रीकाशीस शास्त्राभ्यास केला. शक १६७२ मध्यें राजाश्रित शास्त्री झाले; श्रीमंत युद्धावर गेले म्हणजे

शास्त्रीबाबा पर्वती वर देवदेवेश्वरास संततधार धरीत. त्यांनीं अग्निहोत्र घेतलें होतें. हे १६८० त न्यायाधीश झाले, ते शेवट पर्यंत त्या च जागेवर होते. मध्यंतरीं श्री० नारायणरावांच्या वधा साठीं दादास्वामींना "देहांत प्रायश्चित्त" सांगून, अधिकारन्यास करून पांडववाडीस राहिले. पुन्हां शक १६९९ मध्यें नाना श्रीकरणाधिप यांनीं त्यांना बोलावून, त्यांचें पद त्यांच्या हातीं दिलें. शास्त्रीबावांना एकंदर वार्षिक नेमणूक ३००० रुपयांची होती. मृत्युः–कार्तिक शुद्ध ३।१७७१. उत्तरकार्यास राज्यांतून ३२०० रुपये वेंचण्यांत आले. ग्रांट डफनें यांचें " अत्यंत निस्पृह, मराठी राज्या विषयीं एकनिष्ठ आणि त्या राज्यांतील एक प्रचंड शक्ति " असें यथार्थ वर्णन केलें आहे. यांचा वाडा पुण्यास सांप्रतच्या रमणोद्यानाच्या ठिकाणीं होता. विद्यमान वंश– माहुली येथें.

पत्रः––प्रति रामशास्त्री आसीर्वाद उपरि तुम्ही.....(रा छ २ सवाल सुा इहिदे समानीन म) या व आलफ बहुत काय लिहिणे हे आशिर्वाद

संदर्भः––" सखुबाई शिंदे यांस. प्रायश्चितप्रकरणीं " पत्र (आश्विन शुद्ध ३।१७०२).

(१०) लेखकः—रा० आनंदराव रघुनाथ भोपळे, औरंगाबादकर, सुमंत. यांनीं थो० शाहुमहाराजांना राज्या वर आणण्याच्या कामीं श्रम केले होते; म्हणून त्यांनीं यांना शक १६३० मध्यें सुमंतपद दिलें. निजाम आणि सवाई जयसिंगाचे राजसभेंत आपल्या कडील सुमंत होते. मृत्युः–शक १६७०. यांचें काम परराष्ट्रीय राजकारण करणें, राजपत्रावर ' संमत सुमंत ' लिहिणें. मुद्राः–छायाचित्र पान १७ पहा.

पत्रः—पोष्य आनंदराव रघुनाथ कृतानेक नमस्कार वि(नंति) ..... नादडास तो कोणी नाही बरानपूरचा हि येतो त्यास ठेवीत नाही ऐसा काही कारभाराचा आंत नाही सुक्रवारी भेटी जाली संतोशाची बोली त्या उपर ते आपले घरचे कार(भारात आहेत)

संदर्भः—थोरले बाजीराव यांना पाठविलेलें " निजामा कडील वार्तापत्र ".

(११) लेखकः—रा० महिपतराव सुमंत. आनंदराव यांचे पुत्र. पदप्राप्ति शक १६७१.

पत्रः—सेवक महिपत आनदराऊ कृतानेक सा नमस्कार विनति उपरि येथिल क्षेम जाणो[न] ...बहुत काये लिहू कृपा करीत असीलें पाहिजे हे विनंती

संदर्भः—चिमाजीआप्पास्वामि यांना पाठविलेलें " निजामा कडील वार्तापत्र ".

(१२) लेखकः—रा० मल्हारराव कृष्ण सुमंत. आनंदराव यांचे दुसरे पुत्र कृष्णराव; त्यांचे हे पुत्र. यांचा वंश, सातारा, रिसवड, बारामती इकडे आहे.

पत्रः––सेवक मल्हारराव कृष्ण सुमंत कृतानेक...(बोल)वाल तेव्हां पाठवून देऊं बहुत काय लिहिणे कृपा लोभ कीजे हे विनंती

संदर्भः—" होळीच्या पोळांचे भांडणा " विषयीं, मोरोबादादा (श्रीकरणाधिप) यांना पत्र.

[छायाचित्र–पान ६]

(१) लेखकः—रा० गदाधर प्रल्हाद प्रतिनिधि, नाशिककर. प्रल्हाद निराजी यांचे पुत्र; निराजी रावजी न्यायाधीश यांचे नातु. प्रतिनिधीपद प्रथम थोरले राजारामछत्रपति यांनीं निर्माण करून प्रल्हादपंतांस दिलें. गदाधरपंतांनीं शक १६२९ पासून १६३३ पर्यंत काम केलें. मुद्राः–श्रीशंकर श्रीशाहुछत्रपति कृपानिधि । प्रल्हादसुत गदाधर प्रतिनिधी ॥

पत्रः–पो गदाधर प्रळहाद प्रतिनिधि आसिर्वाद. उपरि ये[थील] ...[प्र]माणे मजुरा होईल जाणिजे रा छ ७ रजब सुा (स) न इहिदे असरमया अलफ बहुत काय लिहिणे [स०मु०] "लेखनसिमा"

संदर्भः—" कृष्णाजी नाईक जोशी द्रव्यपरीक्षक सेवक राजमंडळ यांना, त्या जागेच्या नेमणुके साठीं द्रव्य आणि कापड मिळून ७०० रु० देणें, " म्हणून राजपत्र, नीलकंठ बलाळ यांस (भाद्रपद शुद्ध १०।१६३२).

(२) लेखकः–रा० श्रीनिवास अथवा श्रीपतराव परशुराम प्रतिनिधि. परशुराम त्र्यंबक किन्हई-कर, कुळकरणी प्रतिनिधि यांचे तिसरे पुत्र. परशुरामपंतांनीं थो० राजारामछत्रपतींच्या वेळीं मोंगलां पासून स्वराज्य सोडविलें म्हणून महाराजांनीं त्यांना हें पद दिलें. यांचें काम छत्रपतींचे राज्याधिकारी घेऊन राज्याचें रक्षण करून राज्यकारभार करणें. यांच्या पत्राचे शेवटीं 'निदेश समक्ष' आणि श्रीकारा-जवळ 'आई आदि पुरुष' हीं अक्षरें हे स्वतः लिहीत. श्रीनिवासराव यांनीं खटावकरांचा दंगा मोडला. यांना हें पद १६४० मध्यें मिळालें. यांनीं कर्नाटककर, शामल, निजाम, कोल्हापूरकर यांच्याशीं युद्धें केलीं, आणि १० लाखांचा प्रांत धार्मिकवृत्ति म्हणून दान केला. यांच्या कडे साम्राज्याचें जें उत्पन्न गोळा होई त्यास " जिल्हे बाब " म्हणत. या घराण्यांत हे राजकार्यधुरंधर, शूर आणि धार्मिक होते. मृत्युः–श. १६६९. मुद्राः–छायाचित्र पान १७ पहा. यांचा वंश सांप्रत औंध येथें राज्य करीत आहे.

पत्रः—सेवक श्रीनिवास परशराम कृतानेक ... (मु)काम कोणे स्थली आहे ते सविस्तर लिहिले पाहिजे लोभ असो दीजे हे विनंति

संदर्भः–" आपण स्वतः गंगातीरा हून पुण्यास आलों; श्री० बाजीरावस्वामि कोठें आहेत ? " म्हणून चिमाजीआप्पा यांना पृच्छापत्र.

(३) लेखकः—रा० जगजीवनराव अथवा दादोबा परशुराम प्रतिनिधि. परशुरामपंतांचे पांचवे पुत्र. पदप्राप्ति शक १६६९. यांचें आणि प्रधानांचें भांडण होतें. मृत्युः–शक १६७३. मुद्राः–ॴ श्रीआई-आदीपुरुष श्रीराजारामछत्रपतिस्वामी कृपानिधी ॥ तस्य जगजीवन परशुराम प्रतिनिधी ॥

पत्रः––श्रीयासह चिरंजीव राजमान्य राजश्री [सदा]सिवपंत यांसी प्रति जगजीवन पर[शराम] आसीर्वाद उपरि येथील कु[शल]

संदर्भः––सदाशिवपंत (भाऊस्वामि ?) यांना, " स्नेहाची अभिवृद्धि ठेवण्या विषयीं " घरगुती पत्र. सर्व पत्र दादोबा यांच्या हातचें (आषाढ वद्य ६ । १६६९).

(४) लेखकः–रा० भवानराव अथवा श्रीनिवासराव गंगाधरराव प्रतिनिधि. परशुरामपंत यांचे वडील पुत्र कृष्णाजीपंत त्यांचे पुत्र गंगाधर, यांचे हे पुत्र. हे " बारभाईं "त एक प्रमुख असून नाना श्रीकरणाधिप यांच्या विश्वासांतील होते. पदप्राप्ति शक १६७३. मृत्युः–आषाढ वद्य १२।१६९९.

पत्रः–पोष्य भवानराव गंगाधर कृतानेक नमस्कार वि[नंति] ... वस्तभाव सोडवण्याचे स्मरण असो द्यावे बहुत काये लिहिणें लोभ असो दीजे हे विनंति छ

संदर्भः—" विशाळगडा कडील चकमकी " विषयीं, सदाशिव पंडित (भाऊस्वामि)यांना पत्र.

(५) लेखकः—रा० श्रीनिवास अथवा भवानराव गंगाधर प्रतिनिधि. पंतांच्या अक्षरांचें दुसरें वळण.

मुद्राः—श्रीआईआदिपुरुष श्रीराजारामछत्रपतिस्वामिकृपानिधि । तस्य श्रीनिवासगंगाधर प्रतिनिधि

पत्रः—श्री आईआदि पुरुष

[५१]

सेवक श्रीनिवास गंगाधर प्रतिनिधि नमस्का[र] ... (बहुत काय लिहिणे) लोभ असो दीजे हे विनंति

सदर्भः—" पंतप्रधानांचा स्नेह रक्षणे; दुसरा विचार नाहीं " म्हणून रामचंद्रपंत यांना पत्र.

(६) लेखकः—रा० भगवंतराव त्र्यंबक प्रतिनिधि. परशुरामपंत यांचे दुसरे पुत्र त्र्यंबकराव यांचे हे पुत्र. भवानराव आणि भगवंतराव यांच्यांत भाऊबंदकी फार होती. यांना खानापूर इ० सेनादाय होता. मृत्युः—शक १६९७. मुद्राः—०श्री ~ आई आदी पुरुष श्रीराजाराम छत्रपती स्वामी कृपानिधि । तस्य भगवंतराव त्र्यंबक प्रतीनिधी ।।

पत्रः—श्री आई आदि पुरुष

पोष्य भगवंतराव त्र्यंबक प्रतिनिधि नमस्कार... बहुत काय लिहिणे लोभ आसो दीजे हे विनंति

संदर्भः—'वर्धनगड संबंधीं भांडण.' श्री० नानास्वामि प्रधान यांना पत्र (कार्तिक वद्य ६।१६८२).

(७) लेखकः—रा० पंताजी सीवदेव सोमण; राजाज्ञा. हें पद थोरले संभाजीमहाराज यांचे वेळीं निर्माण केलें. हे, थोरले राजारामछत्रपति, मा० ताराबाई आणि थोरले शाहुराजे यांच्या वेळीं या पदावर होते. अष्ट प्रधानां प्रमाणें राजपत्रां वर " संमत सरकार " हीं अक्षरें यांच्या हस्तें लिहिलीं जात. मृत्युः—श० १६५२ कार्तिक वद्य १२. मुद्राः—छायाचित्र पान १७ पहा.

पत्रः—विनती शेवक आज्ञाधारक पंताजी सीवदेव कृतानेक विज्ञापना विनति माहाराजाचे कृपादृस्टी करून या प्रातीचे वर्तमान येथास्थित असे विज्ञापना माहाराजाचे आज्ञापत्र सादर जाले तेथे आज्ञा

संदर्भः—" थोराताच्या दंग्यानें मावळ प्रांत उध्वस्त झाला " म्हणून, (शाहु)छत्रपति-स्वामि यांना पत्र. सर्व पत्र पंतांच्या हातचें.

(८) लेखकः—रा० नारो गंगाधर अथवा अयावा अमात्य. आडनांव प्रभुणे. गोत्र अगस्ति. लोणी भापकरचे कुळकरणी. भगवंतराव रामचंद्र हे, कोल्हापूरकर यांचे कडे गेल्यानें, थोरल्या शाहु महाराजांनीं यांना अमात्यपद दिलें. यानीं च श्री० थो० बाळाजीपंतनाना यांना वळवून श्रीशाहुमहाराजांकडे आणिलें. यांचें आणि प्रधान घराण्याचें नेहमीं सख्य असे. यांचे विद्यमान वंशज, सामंत गंगाधरराव नारायण मुजुमदार, वरिष्ठ विधिमंडळाचे सभासद असून पुणें येथें राहतात.

पत्रः—शेवेसीं चरणरज नारो गगाधर कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ २९ जिल्हेज मु॥ निबे देव्हारे स्वामीच्या कृपाकटाक्षेकडून व(र्तमान)

संदर्भः—" थोरले माधवरावस्वामि कर्नाटकाच्या युद्धा वर आहेत " म्हणून, नाना श्रीकरणाधिप यांना तिकडील वार्तापत्र. सर्व पत्र अयावा यांच्या हातचें (वैशाख शुद्ध ३ । १६९१).

(९) लेखकः—श्री० रायभानजी राजे भोंसले. हे तंजावरकर थोरले व्यंकोजीराजे यांचे अनौरसपुत्र. म्हणून यांना थो० शाहुमहाराज, "रायभान काका" म्हणत. हे महाराजांच्या (औरंगझेबाचे) बंदीच्या वेळीं त्यांच्या जवळ होते; पुढें दिल्लीकरा कडे सुमंताच्या कामा वर नेमले गेले. परशुरामपंत प्रतिनिधींच्या कामीं हे फार उपयोगी पडले. त्या वेळीं हे राजकार्यधुरंधर मंडळींत हि प्रमुख होते. मुद्रा पत्रांत आली आहे

पत्रः—०॥ छ अखंडितलक्षेमी आलकृत राजमान्ये स्नेहपूर्वक रायेभानजीराजे उपरी येथील कु[शल].....वर्तमान वेदमूर्ती सांगतां कळू येईल. विशेश काये लिहिणे तुम्ही सूज्ञ असा [समाप्ति मुद्राः—] " ~ ० मुद्रा रुद्राणिव विराज्यते ॥ "

संदर्भः—" सांप्रत राजश्री (थोरले शाहु)स्वामीचा आणि आपला शरीरसंबंध होण्या करितां वेदमूर्ति रा० मुद्गलभट उपाध्ये पाठविले आहेत, तरी हे गोस्टी चितीं धरून कार्यसिधी केली पाहिजे " म्हणून, विठोजी घाटगे यांना पत्र. पत्राचे मागें—

मुद्राः—" ˘ श्री ० भास्वद्रम्यकराभास्वद्रुद्रपादयोरिव मुद्रिकाः दाक्षायणिप्रेमराजद्राजभानो-र्विराज्यते " [हिचे वर १२ पाकळ्या असोन प्रत्येकींत १।१ अशीं पुढील १२ अक्षरें आहेत-" श्रीमत शिव राजन प्रणामोस्तु]

(१०) लेखकः—श्री० फत्तेसिंगबाबा (मूळ नांव राणोजीराव लोखंडे) राजे भोंसले. अक्कलकोट संस्थानचे संस्थापक. थो० शाहुमहाराजांनीं " चिरंजीव " मानलेले. **जन्मः**-साधारणतः शक १६२०. **मृत्युः**-कार्तिक शुद्ध ४। १६८२ **मुद्राः**-० श्री ˘ श्रीमत्छत्रपतेःशाहोश्चरणासक्तचेतसः । फत्तेसिंहस्य मुद्रेयं कौमुदीव विराजते ॥ (२) श्रीशिवशंभुस्वामिनिशाहूभूपेचपार्थिवोत्तंसे । परिणतचे-तोवृत्तेः फत्तेसिंहस्य मुद्रेयं ॥ (३) राजा शाहु छत्रपती चरणी तत्पर । फत्तेसिंग भोसले राजकुमर ॥

पत्रः—आपत्यें फतेसिंग भोंसले साष्टांग दंडवत कृता (नेक) ... (ते करा) वे रुद्राबवतार जालिया वगर निरशन होत नाही सुचनार्थ लिहिले आसे विशाद न मानावा हे विइःसो

संदर्भः—मा०ताराबाई यांना " ममता संपादून ध्यावी हे च इच्छा असे. काला सारिखे चालावे. साहेबी कालावर दीस्ट देऊन चालता सर्व हि अर्थ आपले ध्यानांत यतात. आपनास रक्षून जे करणे ते करावे " (या पुढील वाक्यें छायाचित्रांत आलीं आहेत) म्हणून पत्र (भाद्रपद बहुल १।१६७४. ता० २४।९।१७५२; जुन्या पद्धतीनें ता० १३।९।५२. या च महिन्यांतील ३ तारखेस १४ तारीख धरली गेली). मुसुलमानी बादशाही मुद्रे प्रमाणें बाबांच्या मुद्रेंत भोंसले छत्रपतीराजवंशांतील आपल्या मानीव तीर्थरूपाचें, पितामहाचें आणि प्रपितामहाचें अशीं (वंशावळी प्रमाणें) तीन नांवें आलीं आहेत. मुद्रेची ही रीत मराठी साम्राज्यांतील अखिल मुद्रांत अपूर्व आहे. यांचा वंश सांप्रत अक्कलकोटास राज्य करीत आहे.

(११) लेखकः—श्री० शहाजी राजे अक्कलकोटकर. फत्तेसिंहबाबांचे मूळचे पुतणे, नंतर दत्तक पुत्र. कर्नाटकांतील युद्धां वर मधून मधून जात. **मृत्युः**—शक १७११.

पत्रः—.....अलंकृत राजमान्य श्रीा शाहाजी भोंसले रामराम विनंति उपरि येथील ...बहुत काय लिहिणें लोभ असो (दीजे)

संदर्भः—श्री० राघोबादादास्वामि यांना, " मकरसंक्रमणाचे तीळ आपणांस पाठविले आहेत " म्हणून पत्र (पौष शुद्ध ८। १६८५).

(१२) लेखकः—रा० थोरले रघूजीबाबा भोंसले सेनासाहेबसुभा. नागपूर संस्थानचे संस्थापक बिंबाजीराव यांचे पुत्र. थोरले शाहुमहाराज यांचे चुलत साडू. यांनीं ओढ्या, बिहार, बंगाल स्वराज्यांत आणला. कर्णाटकांतील युद्धांत हे प्रमुख. एकदां यांनीं थो० शाहुमहाराजांचा प्राण वाघा पासून वांचाविला. वऱ्हाड, गोंडवन हे प्रांत हि स्वराज्यांत आणिले. यांचा आणि रा० बाबूजी नाईक, बारामतकर यांचा दाट ऋणानुबंध होता. यांच्या वर श्री० सौ० सगुणाबाई राणी यांचा लोभ असे. यांची भीति मोंगल आणि इंग्रज यांना फार वाटे. इंग्रजानें तर धावरून कलकत्त्यास गडा भोंवतीं परिखा खणली. यांचें आणि प्रधानांचें सख्य नव्हतें. निजामानें पुण्यावर चढाई केली असतां यांनीं मोगलाईत घुसून त्यास पायबंदी केली. यांनीं श्रीसमर्थसांप्रदायी देवदास गोसांवी यांचा उपदेश घेतला होता; म्हणजे हें घराणें श्री समर्थसांप्रदायी आहे. सांप्रतचे वंशज श्रीमंत राजे रघूजीराव यांनीं श्री बापू स्वामी चांफळकर यांचा

Govt.Photozinco.Office Poona./933

Govt Photozinco.Office Poona./933.

उपदेश घेतलेला आहे. मृत्युः–फाल्गुन शुद्ध ३।१६७६. मुद्राः–०श्री˘ श्रीशाहूराजपदांभोजभ्रमरायित चेतसः । बिंबात्मजस्य मुद्रैषा राघवस्य विराजते ॥ यांचा वंश नागपूर येथें नांदत आहे.

पत्रः—(आ)लकृत राजमान्य श्रो रघोजी भो(सले) [पाठीमागें] वरून कलेल रा। छ २१ रबिलाखर सुज्ञाप्रति विशेस काये लिहिणे कृपा लोभ आसू दिला पाहिजे हे विनति [स० मु०] " मोर्तबसुद "

संदर्भः--श्री० बालाजी पंडित (नानास्वामि) यांना, "बोलाविल्याप्रमाणें येतो" म्हणून पत्र.

(१३) लेखकः—रा०मुधोजीराव भोसले सेनाधुरंधर. थोरले रघूजीचे पहिल्या स्त्रीचे वडील पुत्र. यांच्या मातोश्री सुकाबाई आणि राणी सौ• सगुणाबाई या चुलत बहिणी. हे वडिलांचे नावडते, पण थो० शाहुमहाराजांचे आवडते. घोड्या वर बसण्यांत अत्यंत प्रख्यात. बस्तर, राजमहेंद्री इकडे यांनीं चढाया केल्या होत्या. यांनीं नरनाळादुर्ग आणि गावीलगड हस्तगत केले. रा० जानोजीबाबांत आणि यांच्यांत गादी विषयीं भांडण झालें. बारभाईंत हे श्री० दादांच्या कडे होते. पुढें रा० साबाजीबावांशीं हि यांचें भांडणें झालें. यांनीं इंग्रेजा कडून ३० लाखांची खंडणी घेऊन आपल्या राज्यांतून टिपू वर जाण्यास मार्ग दिला होता. मृत्युः–वैशाखी पौर्णिमा १७१० मुद्राः–(१) ० श्री˘ श्री शाहुराजप्रसादेन रघूजस्य यशोधनां । तत्सुनोस्तु मुधोनाम्नस्तेषा मुद्रा विराजते ।। (२) शाहुराजप्रसादेन रघूजी सुयशोधरः ।। तत्सुनोस्तु मुधोनाम्नस्तेषा मुद्रा विराजते ।। भद्रं ।।

पत्रः—श्रीां मुधोजी भोंसले सेनाधुरंधर.....छ १५ माहे रजब बहुत काये लिहिणें लोभ आसों द्यावा हे विनति [स० मु०] " मोर्तबसुद "

संदर्भः—" श्री० सवाई रावसाहेब युद्धा वर गेले तें समजलें, आम्हीं लवकर च येतों, " म्हणून मोरोबादादा श्रीकरणाधिप यांना पत्र.

(१४) लेखकः—रा० जानोजीबाबा भोसले सेनासाहेबसुभा. थोरले रघुजी यांच्या दुसऱ्या स्त्रीचे पुत्र. यांनीं कर्णाटक आणि बंगाल्यांत युद्धें केलीं. देवाजीपंत चोरघोडे यांनीं सायास करून बाबांस प्रधानां कडून सेनासाहेबसुभ्याचीं वस्त्रें आणल्यानें, पंत हे यांचे कारभारी बनले. प्रधानांनीं यांचा आणि मुधोजींचा समेट करून यांना सेनासाहेबसुभा आणि रा० मुधोजीबाबांना सेनाधुरंधर हीं पदें दिलीं. निजामानें यांच्याशीं वऱ्हाडा विषयीं साठचाळिशीचा संधि केला. श्रीमंत थोरले माधवराव यांचें आणि बाबांचें वांकडें येऊन युद्ध झालें. शेवटीं रा० गोपाळराव पटवर्धन यांनीं बाबांना श्रीमंतां कडून क्षमा करविली. मृत्युः–वैशाखी पौर्णिमा १६९३.

पत्रः—.....(ल)क्ष्मी आलंकृत राजमान्य श्रो जानोजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत.....विदित व्हावें म्हणोन लिहिलें असे रा। छ १९ माहे जमादिलावल सूज्ञा प्रति विशेष काये लिहिणे कृपा लोभ आसू दिला पाहिजे हे विनंती [स० मु०] " मोर्तबसुद "

मुद्राः— ˘ श्री० श्रीशाहुराजपदांभोजभ्रमरायितचेतसः विंबात्मजस्य मुद्रैषा राघवस्य विराजते ॥

संदर्भः--" आमचें (नागपूरकरांचें) परस्परांतील भांडण मिटलें; आज्ञे प्रमाणें दोघे हि (जानोजीराव आणि मुधोजीराव) सत्वर येतों, " म्हणून श्री० सदाशिवपंत गोसावी (भाऊस्वामि) यांना पत्र (पौष वद्य ७। १६८१). पत्रांत आलेली मुद्रा वडिलां(रघूजीबावां)चीं आहे.

[छायाचित्र—पान ७]

(१) लेखकः—रा० साबाजीराव भोंसले नागपूरकर, रघूजीबावांचे तिसरे पुत्र. यांचें आणि रा० जानोजीबावांचें भांडण होतें. बावांच्या पश्चात्, त्यांच्या पत्नी मा० दर्याबाई आणि साबाजीराव यांची एकी होऊन रावांस प्रधानांनीं सेनासाहेबसुभा केलें. पुढें यांचें आणि रा० मुधोजीबावांचें वांकडें आलें. बारभाईंत राव हे एक प्रमुख होते. पुढें मुधोजीबावांनीं यांचे वर चढाई करून यांना मारिलें. हें युद्ध पांचगांव येथें झालें. मृत्युः—पौष वद्य १०।१६९६. मुद्राः-ᵕ श्री ० रघुविर चरणीं तत्पर । साबाजी भोसले निरंतर ॥

पत्रः—[पाठीमागें] (आमचे ल)क्ष येक आहे ते च सदृढ आहे कलावे बहुत काये लिहिणे लोभ करावा हे विनति [स० मु०] " मोर्तबसुद "

[प्रारंभीं].....(राजमा)न्य श्रीो साबाजी भोसले सेनासाहेबसुभा दंडवत विनंति उ(परि)

संदर्भः—" बारभाई प्रकरण; श्री० दादास्वामींचा पाठलाग. कृष्णाजी नारायण जोशी दाखल जाले; नानाजी कृष्ण जोशी (सुमंत) वार्ता सांगतील, " म्हणून नाना श्रीकरणाधिप यांना पत्र (फाल्गुन शुद्ध ९।१६९५).

(२) लेखकः—मा० सुकाबाई भोंसली. या, रा० थोरल्या रघूजीबावांच्या पत्नी आणि थो० शाहुछत्रपति यांच्या धाकट्या राणी सौ० सगुणाबाई यांच्या चुलत भगिनी. यांचे च पुत्र थो० मुधोजीबावा.

पत्रः—[पाठीमागें] ... ... (बहुत) काये लिहिणें लोभ असों दीजे हे विनंति (पत्र) ता (न) सिगराज चोपदार. ... [प्रारंभीं] (प्री)तीपूर्वक सुकाबाई भोंसली दंडवत वि(नंति)

संदर्भः—" बांई कडील पळसी, दहिगांव, या गांवांना जिल्हेबाबीचा उपसर्ग न होऊं देण्या " विषयीं, श्री० नानास्वामि प्रधान यांना विनंतिपत्र.

(३) लेखकः—रा० धनाजी जाधवराव जयसिंगराव (पदवी), देशजेता. थो० संभाजी-राजाराम-शाहु छत्रपति यांचे प्रख्यात सेनापती. (दिल्लीकर) मुसुलमानांचें सैन्य यांना आणि रा० संताजी घोरपड्यांना चळचळ कांपे, त्यांचे घोडे पाणी पीतनासे झाल्यास, ते त्यांना म्हणत—" पानीमें धनाजी-संताजी दीख रहे क्यां ? " मृत्युः—शक १६३० ज्येष्ठ. मुद्राः—श्री शिवचरणीं तत्पर । धनाजी जाधव किंकर ॥ (२) ᵕ श्री० शंभु छत्रपती चरणीं दृढभाव । सेनापती जयसिंग जाधवराव ॥ (३) ᵕ श्री० राजारामचरणीं दृढभाव सेनापती । जयसिंग (धनाजी) जाधवराव ॥ यांचा वंश माळेगांवीं आहे.

पत्रः—... (ल)क्ष्मी आलंकृत राजमान्य श्रीों धनाजी जाधवराऊ दंडवत विनती उपरि... (त्याप्रमाणे) विचार करून बहुत लिहिणे तरी सूज्ञ असां छ १९ रबिलोवल हे विनति [स० मु०] " विलसति लेखनावधिमुद्रा "

संदर्भः—" शिवराम गंगाधर, विचार सांगून पाठविले आहेत, " म्हणून, श्री० प्रधानपंत यांना पत्र. यांतील " करून " हें करूं या शब्दाचें जुनें रूप होय.

(४) लेखकः—रा० चंद्रसेन जाधवराव. धनाजीराव यांचे दुसरे पुत्र. प्रथम थो० शाहु-महाराज यांचे तीन वर्षे सेनापती; मागून मराठी साम्राज्यांतून निघून निजामा कडे सेवेस राहिले. मृत्युः- शक १६७३.

पत्रः—(आलंकृ)त राजमान्य श्रीो चंद्रशेन जाधवराउ दंडव[त]...लेख करून पत्रे पाठऊन स्नेहाभिवृधि करीत गेले पाहिजे बहुत काये लिहिणे हे वीनंती

संदर्भः—" संक्रमणयुक्त शर्करा पाठविली ती स्वीकारली, " म्हणून थो० बाजीराव यांना पत्र.

(५) लेखकः—रा० रामचंद्रराव जाधव. चंद्रसेनराव यांचे पुत्र. निजामा कडील सामंत. अंतः-करणा पासून पंतप्रधानांचे विरुद्ध. यांनीं शक १६८५ मध्यें श्री० राघोबादादा यांचे वर मारेकरी घातले. शक १६९० मध्यें पंतप्रधान आणि निजाम एक होऊन नागपूरकर भोंसल्यावर चढाई करून गेले असतां, हे आंतून भोंसल्यांस मिळाले म्हणून निजामानें यांचा वध केला.

पत्रः—...श्रीो रामचंद्र जाधवराऊ दंडवत विनंति उपरि येथील ..... (उभये) पक्षी दुसरा विचार नाही तेथे विशेष काये लिहिणे लोभ आसु दीजे हे वीनती

संदर्भः—" पांढरे सामंतास फोडण्याचा प्रयत्न करीन, " म्हणून श्री० नानास्वामि प्रधान यांना (वरवरचें) पत्र.

(६) लेखकः—मा० आनंदीबाई जाधव. चंद्रसेन जाधव यांच्या पत्नी.

पत्रः—... (ल)क्ष्मी आलंकृत राजमान्य प्रति आनंदीबाई जाधव दंडवत विनंति ... (लि)हिणे लोभ असो देणे हे विनति

संदर्भः—" आमच्या प्रांतास राजसैन्य त्रास देतें तरी त्याचें निवारण करावें " म्हणून, श्री० नानास्वामि प्रधान यांना विनंति पत्र.

(७) लेखकः—मा० लक्ष्मीबाई जाधव. चंद्रसेन जाधव यांच्या घराण्यांतील (रामचंद्रराव यांच्या पत्नी?).

पत्रः—प्रति लक्ष्मीबाई जाधव दंडवत.....(श्रवण हो)ईल बहुत काये लिहिणे हे वीनती

संदर्भः—" आपल्या साह्यास येतों " म्हणून, मा० लक्ष्मीबाईंचें श्री० विश्वासरावस्वामि यांना पत्र (श० १६६७). पत्राचे शेवटची " हे वीनती " लक्ष्मीबाईंच्या हातची असावी, असें प्रथम वाटल्यानें तिचें छायाचित्र घेतलें; मागून असें वाटलें जे, तीं अक्षरें रामचंद्र जाधवराव यांनीं लिहिलीं असावीं; कदाचित् दोघांचीं हि वळणें एक सारखीं असण्याचा संभव आहे.

(८) लेखकः—रा० पिलाजीराव जाधवराव. वडिलांचें नांव चांगोजी, आईचें नांव हंसाई. थो० बाजीराव प्रधान यांचे अत्यंत जिवलग मित्र. त्यांच्या आणि पुढें श्री० नानास्वामींच्या सहित यांनीं अनेक युद्धें खेळून स्वराज्य वाढविलें. दमाजी थोरातांच्या बंदींतून श्री० थो० नानांना यांनीं च सोडविलें. राजा छत्रसाल यांना सोडविण्याच्या कामीं श्रीमंतांचे संगतीं हे होते; वसई युद्धांत हि होते. यांना सेनादायाची एकंदर अडीच लक्षांची नेमणूक होती. यांच्या कडे औरंगाबाद प्रांतांतील स्वराज्याचें उत्पन्न गोळा करण्याचा अधिकार होता. श्री० नानास्वामि यांना ' पिलाजीकाका ' संबोधित. यांचे वंशज वाघोलीस आहेत. यांच्या देव्हाऱ्यांत थो० बाजीराव यांचें मूळ चित्र पूजेस होतें. मृत्युः-आषाढ वद्य ६।१६७३. मुद्राः-०श्री' पांडुरंग चरणीं दृढभाव । चांगोजी सुत पिलाजी जाधवराव ।।

पत्रः—(राज)मान्य श्रीो पिलाजी जाधव दंडवत विनंति ये[थील]...(तो विचार प)त्री लि।। येत नाहीं विशष काये लिहिणे हे विनति [स० मु०] " मोर्तबसुद "

संदर्भः—"आमच्या पायास नारू झाला, बरा झाल्या वर येतों " म्हणून, थो० बाजीराव यांना पत्र.

(९) लेखकः—रा० संभाजीआप्पा जाधवराव. पिलाजीरावांचे धाकटे बंधु. यांचा आणि प्रधानांचा उत्तम स्नेह होता. हे हि पिलाजीरावां प्रमाणें देशाक्रमण करून साम्राज्य वाढवीत असत.

मुद्राः—श्रीराजा शाहु छत्रपती चरणी दृढभाव । संभुसिंग जाधवराव ॥ (२) ० श्री ˘ भवानी चरणी तत्पर। संभाजी जाधव निरंतर ॥

पत्रः—स्नेा संभाजी जाधव दंडवत विनंति उ(परि)...(चांभार...पाठविले आहेत म)विष्ट जाले असतील आपले पत्र आलियावरी चाभार न पाठवावे हा आर्थ नाही। विदित जाले पाहिजे विशष काये लिहिणे लोभ असो दीजे हे वीनती

संदर्भः—" आज्ञे प्रमाणें वाघोलीचे चांभार पाठविले आहेत " म्हणून, थो० चिमाजीआप्पास्वामि याना पत्र.

(१०) लेखकः—रा० सटवोजीराव जाधवराव. पिलाजीराव यांचे पुत्र. मृत्यु :-फाल्गुन शुद्ध २ ।१६६८. कर्नाटकयुद्धांत प्रधानांच्या सेवेंत वडिलां प्रमाणें तत्पर. दिल्ली-वोडसें-वसई इत्यादि युद्धांत हे लढले. मुद्राः- ० श्री ˘ पांडुरंग चरणीं दृढभाव । पिलाजीसुत सटवोजी जाधवराव ॥ यांचे कारभारी रा० केशव संभाजी चांदोरकर (प्रस्तुतच्या एका संपादकाचे पूर्वज) होते.

पत्रः—स्नेहाकिंत सटवोजी जाधवराव.....(पा)हिजे हे विनती

संदर्भः—वसई युद्ध; " रामचंद्र हरि पटवर्धन येथें (वसईस) आल्या वर आम्ही स्वामी पाशीं येतों " म्हणून, थोरले बाजीराव यांना पत्र.

(११) लेखकः—रा० सुलतानजी राऊ निंबाळकर. वडिलांचें नांव हैबतराव; त्यांना थोरले शाहुमहाराज यांनीं शक १६३० मध्यें सरलष्करचें पद दिलें. सुलतानराव हे या पदावर १६३७ ते १६४९ पर्यंत होते. पुढें हें निजामा कडे गेले. यांचे वंशज सांप्रत करमाळें येथें आहेत.

पत्रः—आलकृत राजमान्य श्रीं सुलतानजीराऊ निंबालकर दंडवत विनति उपरि..... कृपा असो दिल्ही पाहिजे हे विनति [स० मु०] " ० मोर्तावसुद ".

संदर्भः—" आम्ही नवाबा बरोवर आहों. आपण शामला कडील यश संपादून साताऱ्यास आला तें समजलें " म्हणून, थोरले बाजीराव यांना पत्र. या पत्रा वर सुलतानजी यांनीं हैवतरावांची च मुद्रा केली आहे, तीः-श्रीसीवचरणीं तत्पर। वापुजीसुत हणमतराव निंवाळकर ॥. सर्व पत्र सुलतानराव यांच्या हातचें.

(१२) लेखकः—रा० महाराव जानोजी जसवंत निंवाळकर अथवा रावरंभा सरलष्कर. हे सुलतानरावांचे पुत्र. निजामा कडील सामंत. यांनीं करमाळ्याचा गड बांधला. हे साधारणतः पंत-प्रधानांच्या स्नेहांत असत. मोंगलाईंतील सर्वांत मोठा मराठ्यांचा सेनादाय जो 'रावरंभा' त्याचे हे संस्थापक. निजामुल्मुल्क मेल्या वर गाजीउद्दीनास सहाय्य करून मोंगलाई हस्तगत करण्याच्या प्रधानांच्या मंत्रांत त्यांचें अंग होतें. मा० ताराबाईचा मंत्र मोडून सलाबतजंगाचें आणि प्रधानांचें सख्य यांनीं च करून दिलें. मृत्युः-आषाढ शुद्ध १२।१६८५.

मुद्राः-श्रीमल्हारीचरणीं तत्पर । रंभाजी निंबाळकर ॥

पत्रः--श्रीमत राजश्री पत प्रधान गोसावी यासी

छ अखडितलक्ष्मीअलकृत राजमान्ये [श्रो] माहाराऊ जानोंजी जसवत निबालकर कृतानेक द[डवत]

संदर्भः—" निजामा कडील वर्तमान " श्री० प्रधानास कळवितात. सर्व पत्र महाराव यांच्या हातचें; पत्रांत अनुस्वार फार.

(१३) **लेखक**:—रा० मुधोजीराव नाईक निंबाळकर (तिसरे). फलटणच्या संस्थानिकांचे पूर्वज. मुधोजीराव यांच्या वडिलांचें नांव जानोजीराव. हे पंतप्रधानांच्या सतत आज्ञेंत असत. यांची भक्ती श्रीब्रह्मेंद्रस्वामींच्या ठायीं होती. मृत्यु:—कार्तिक शुद्ध ४।१६९८. यांच्या पत्नीचें नांव सगुणाबाई. या फार सद्गुणी आणि राजकारणी होत्या. पतीच्या पश्चात् यांनीं संस्थानचा कारभार पुष्कळ वर्षें केला. यांचा वंश सांप्रत फलटण येथें राज्य करीत आहे.

पत्र:—श्रीो मुधोजी नाईक निबालकर दडव(त) ... बहुत काय लिहिणे ह वि(नति)

संदर्भ:—" सरंजाम जास्त वाढविण्या विषयीं, " श्री० प्रधानांस विनंतिपत्र.

(१४) **लेखक**:—रा० महादाजी निंबाळकर. पंतप्रधानांचे एक मोठे आणि विश्वासु सामंत. मृत्यु:—श्रावण शुद्ध १।१६८५, राक्षसभुवनचें युद्ध.

पत्र:— श्रीो राऊ माहादाजी निंबालकर दंडवत ... विशषे काये लिहिणे हे विनति

संदर्भ:—" चि० रावसाहेबाचें लग्न, वैशाख शुद्ध पौर्णिमा शक १६७७ रोजीं आहे. आपण यावें " म्हणोन, श्री० विश्वासरावस्वामि यांना पत्र.

[छायाचित्र—पान ८]

(१) **लेखक**:—रा० कान्होजीराजे शिरके. यांच्या वडिलांचें नांव राणोजीराव. कान्होजीरावांच्या धाकट्या भगिनी राणूबाई. या थो० शाहुमहाराज यांना दिल्या. सासरचें नांव राणी सौ० सकवारबाई. हरणाचे (प्रधान—जाधव) भांडणांत कान्होजी हे श्री० बाळाजी विश्वनाथ यांचे अंगास होते. यांची भक्ति श्रीब्रह्मेंद्रस्वामी वर होती; स्वामी, यांच्या कडून सौ० सकवारबाईंच्या कडे संधान बांधीत असत.

पत्र:—सकलगुणालंकरण अखडित लक्ष्मी आलंकृत राजमान्ये श्रीो कानोजीराजे सिर्के राम (राम) ... . [पाठीमागें] हुजूर देऊन छ माार...[स० मु० " मोर्तबसुद "] लिहिल्या प्राा वर्तुनूक करून हे विनति

संदर्भ:—" कोंकणांतील श्रीवर्धन, सुवर्णदुर्ग इ० प्रांतांच्या कारभाराचे नेमणुकी विषयीं, " शो० बाजीराव यांना पत्र (आश्विन वद्य ७। १६५५). " करू~ " = करूं.

(२) **लेखक**:—रा० आबाजीराव सर्जेराव घाटगे. हें घराणें कोल्हापूरकरां कडे सेवेस असे; पण त्यांच्याशीं यांचीं भांडणें चालत म्हणून हीं मंडळी प्रधानांशीं मिळून मिसळून वागत. मूळ पुरुष रा० कामराजराव. ब्राह्मणी राज्यांत माण प्रांताची देशमुखी मिळाली. चंद्रसेन जाधवांचे संगतीं आबाजी हे निजामा कडे गेले. त्यानें यांना कोल्हापूरकरांच्या हाता खालीं ठेवलें. यांचे वंशज कागलास राज्य करीत आहेत.

पत्र:—[पाठीमागें] ..... कृपा असो दीजे हे विनंती हे विनंति

[प्रारंभीं] ... श्रीो आबाजी सर्ज्याराऊ घाटगे दंडवत विनं(ति)

संदर्भ:—" उदाजी चव्हाण आणि मिरजकर यांच्या उपसर्गा विषयीं श्री० आईसाहेबांकडे विनंति करण्या साठीं," पंत अमात्य यांना पत्र.

(३) **लेखक**:—रा० नागोजीराव झुंझारराव घाटगे; वडिलांचें नांव पदाजी. यांचे मूळ पुरुष पहिले नागोजीराव. त्यांना इब्राहीम आदिलशहानें मलवडी देऊन तेथील सरदेशमुखी आणि झुंजारराव ही पदवी दिली होती. त्यांचे वंशज हे नागोजीराव. यांनीं राणी मा० जिजाबाई (कोल्हापूरकर)

यांच्या तडाक्यांतून रामराजे (छत्रपति) यांना लपविण्याचे कामीं मा० ताराबाई यांना साह्य केलें. दादोबा प्रतिनिधी यांचे दंग्यांत यांचा मृत्यु. या च घराण्यांत पुढें रा० सर्जेराव हे प्रसिद्धीस आले.

पत्रः—...राजमान्य श्रीो नागोजी जुझाररावं घाटगे विनति उपर येथील कुशल जाणोन स्वकीये लेखन केले पाहिजे विशेष पत्र पाठविले ते...

संदर्भः—" आज्ञे प्रमाणें सिद्धता करून सैन्यास येऊन मिळतों " म्हणून, श्री० नानास्वामि यांना पत्र. सर्व पत्र नागोजीरावांचें हातचें.

(४) **लेखकः**—रा० माधवराव कदम (वांडे). मूळगांव बांड्यांचें वडगांव (पुणें). वडिलांचें नांव रघूजीराव. माधवराव प्रथम श्री० ताराबाई यांच्या पक्षाचे होते, पण मागून थो० शाहुमहाराजांचे अंगास वळले. म्हणून महाराजांनीं यांचे धाकटे बंधु मल्हारराव यांस आपली मुलगी गजराबाई दिली. यांचें माहेरचें नांव राजसबाई. यांच्या मातुश्री वीरूबाई (ब्र० च० पृ० १३२ टीप). सांप्रत यांचे वंशज तोरखेडें (पश्चिम खानदेश) येथें असतात.

पत्रः—राजमान्ये श्रीों माधवराव कदम दंड[वत] ... (साहेब समर्थ आहे)त विशेष काये लिहिणें कृपां लोभ सदोदीत वृीधीमान कीजे हे विनति [स० मु०] " मोर्तबसुद "

संदर्भः—" श्री० दादास्वामीं जवळ सुरते कडे २ महिने सेवा केली " म्हणून, श्री० भाऊस्वामि यांना पत्र. पत्रा वरील मुद्रा वडिलांची आहे तीः—श्री मार्तंड चरणीं दृढभाव । कमळाजी सुत रघोजी कदमराव ॥

(५) **लेखकः**—रा० व्यंकटराव नारायण जोशी अथवा घोरपडे (थोरले). रा० नारो महादेव (इचलकरंजी संस्थानचे संस्थापक) आणि सौ० लक्ष्मीबाई यांचे वडील पुत्र. जन्म शक १६२३. यांना श्री० बाळाजी विश्वनाथ यांच्या कन्या अनूबाई दिल्या होत्या. लग्नः—शक १६४२. यांची मुलगी वेणूताई. या त्रिंबकरावमामा पेठे यांना दिल्या. प्रधानांशीं सोयरीक झाल्या वर त्यांनीं रा० व्यंकटराव यांना पुण्यास वाडा बांधून दिला. हे, प्रधानांच्या अनेक मोठ्या युद्धांत होते. थोरले चिमणाजीआप्पा वसई घेत असतांना, फिरंग्यांना पायबंद बसावा म्हणून व्यंकटरावांनीं गोव्या वर चाल करून मोठा जय मिळविला. त्याच वेळीं (शक १६६१) यांनीं इचलकरंजीचें ठाणें बांधून तेथें गादी स्थापिली. जंजिरायुद्धांत हि हे होते. मृत्युः—शक १६६७. मुद्राः— ˘ श्री० श्रीयः पतेः कृपापांगाद्वर्धिष्णुश्चंद्रबिंबवत् । व्यंकटेश प्रभोर्मुद्राशुद्धासांद्रा विराजते ॥ यांचा वंश सांप्रत इचलकरंजी येथें राज्य करीत आहे.

पत्रः—(श्री)

सकलगुणांलकरण अखंडित लक्ष्मीअलकृत राजमान्य राजश्री आपास्वामीगोसावी यांसी पोप्य व्यंकटराव नारायेण कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखनाज्ञा केली पाहिजे या नंतर आपण दक्षणें कडील वर्तमान लिहिले ते कलले अशास राजश्री गोंविदपतास

संदर्भः—" गोंवें युद्धांतील वार्तापत्र, " श्री० चिमाजीआप्पा यांना. सर्व पत्र रा० व्यंकटराव यांच्या हातचें.

(६) **लेखकः**—रा० वल्हाणजी मोहिते. हे, श्री० ताराबाई यांचे विश्वासु सामंत. शक १६७३ मध्यें दमाजी गायकवाड आणि पंतप्रधान यांच्या भांडणांत हे (ताराबाईच्या सांगी वरून) दमाजीबाबा कडे होते. हे श्रीसज्जनगडचे मुद्राधारी शक १६१४ च्या आश्विनांत होते. यांच्या कन्या, श्री० रामराजेछत्रपति यांना दिल्या. त्यांचें सासरचें नांव सौ० राणी सगुणाबाई.

मुद्राः–श्रीराजाशाहु चरणीं तत्पर । बऱ्हाणजी मोहिते निरंतर ॥ (२) ५ श्री० राजाराम नरपतेः । तस्य सेवक बऱ्हाणजी मोहिते ॥

पत्रः—...राजमान्य श्रीं बऱ्हानजी मोहिते दंडवत.....(कुशेल जाणून) स्वकी (ये) ... हे विनंति

संदर्भः—" बळवंतराव दिघे यांचे विषयीं, श्री० भाऊ स्वामि यांना, प्रशंसा पत्र. "

(७) लेखकः—रा० कृष्णाजीराव कदम (वांडे). मूळ पुरुष अमृतराव. राणी मा० ताराबाई यांच्या पदरीं राहिले. मोंगलाईंतील भोज्यग्राम घेण्याच्या कामीं नेमणूक. त्यांचे पुत्र त्रिंबकराव यांनीं गुजराथेंत चढाया केल्या. यांचे चुलत चुलत बंधु रा० रघूजीराव. त्यांचे पुत्र रा० माधवराव आणि त्यांचे हे पुत्र. यांनीं प्रधानांची सेवा अनेकवार केली.

मुद्राः—०श्री मार्तंडचरणीं दृढभाव । कृष्णाजी कदमराव ॥

पत्रीः—विनंति सेवक कृष्णाजी कदम दंडवत वि(नंति).....त्याची विले साहेबी करून देविली पाहिजे सेवेसी श्रुत होये हे विनति

संदर्भः—" आपण दिलेला घोडा पायांत अधु, तरी त्याच्या ठिकाणीं २ बछेरे देणें " म्हणून श्री० चिमाजीआप्पा यांना पत्र.

(८) लेखकः—रा० मल्हार दादाजी बर्वे नेवरेकर. यांच्या धाकट्या भगिनी, श्री० बाळाजी विश्वनाथ यांच्या पत्नी सौ० राधाबाई. मल्हारपंतांची मुलगी मनुताई या कृष्णराव चासकर यांना दिल्या. मल्हारदादा, हे, थो० बाळाजीनाना यांचे सहित घांटा वर आले; त्यांच्या च संगतीनें दादांनीं थो० शाहु-महाराजांसाठीं सैन्य जमविलें; त्या मुळें त्यांना महाराजांनीं गंगथडींतील सरदेशमुखीचे अधिकारी नेमिलें आणि कोठुरें गांवाची वृत्ति दिली. मृत्युः–शक १६७०. यांचा वंश कोठुऱ्यास आहे.

मुद्राः– श्रीशिवचरणीं तत्पर । मल्हार दादाजी सुभेदार ॥

पत्रः—विनति सेवक मलार दादाजी सां नमस्कार ... [पाठीमागें] कर्जाचे येवजी घेणे आ [हे] त्या प्रा यैव [ज] खरी [ज] हा वसूल घेतो विदित जाले पाहिजे हे विनति

संदर्भः—" वसई कडील वर्तमान, नासरजंग युद्धसन्मुख होणार, राया (बाजीरावां)बद्दल नाना प्रकारचें वृत्त बोलतात तरी तत्त्वतः वर्तमान कळविणें (मस्तानी प्रकरण) " म्हणून, श्री० चिमाजीआप्पांस पत्र (मार्गशीर्ष वद्य ६।१६६१).

(९) लेखकः—रा० कृष्णराव महादेव जोशी चासकर. यांच्या भगिनी लाडुबाई, या श्री० थो० बाजीराव यांना दिल्या; त्यांच्या सासरचें नांव सौ० काशीबाई. हें घराणें शिवकालीन आहे. मूळ पुरुष रा० महादजी कृष्ण. यांनीं थो० राजाराममहाराज यांचे वेळीं श्रम साहस केले म्हणून त्यांना खवली गांवाची वृत्ति मिळाली. त्यांचे पुत्र कृष्णराव. महादजीपंतांनीं रा० कान्होजीराव आंग्रे यांचा आणि थो० बाळाजीनाना यांचा स्नेह जमविला. कृष्णरावांना प्रधानांनीं चासचे वृत्तिवंत केलें. हे शामला वरील युद्ध आणि उत्तरे कडील देशाक्रमण यांत भागीदार होते. मृत्युः—चैत्र शुद्ध ९ । १६७६.

पत्रः—श्रीमंत् राजश्री चिमणाजीपंत स्वामीचे सेवेसी

सेवक कृष्णराव महादेव कृतानेक सां नमस्कार विनतों येथील कुशल जाणून स्वकीये लेखनाज्ञा केली पाहिजे विशेष आपण पत्र पाठविले तेथे आज्ञा केली की सौ।

संदर्भः—" सौ० लाडुबाईस बरें नाहीं म्हणून, आज्ञे प्रमाणें अंताजी रघुनाथ यांस पाठविलें आहे" म्हणून, श्री० चिमाजीआप्पा यांना पत्र. सर्व पत्र कृष्णराव यांच्या हातचें.

(१०) लेखक:—श्री० नारायणरावतात्या व्यंकटेश घोरपडे, इंचलकरंजीकर. रा० व्यंकटराव आणि अनुबाई यांचे पुत्र. यांची राजवट २५ वर्षांची असून तींत इचलकरंजी संस्थानच्या वैभवाचा कळस झाला. प्रधानांच्या संगतीं हे बहुतेक युद्धांत असत. रा० दमाजीराव गायकवाडांच्या सातारच्या युद्धांत यांनीं प्रधानां कडून भाग घेतला होता. हे, कापशीकर घोरपडयांना नेहमीं साहाय्य करीत. यांना श्रीमंतांनीं तेरदळचे देशाधिकारी केलें होते. शक १६७६ मधील कर्नाटक युद्धांत तिकडील राजांच्या खंडणीचे ठराव रा०तात्यांच्या विद्यमानें झाले. या वेळीं च धारवाड प्रांताचे, तात्या हे देशाधिकारी झाले. यांचें दैवत गिरीचे व्यंकटेश. त्याच्या यात्रेस हे गेले होते. जन्म:-शक १६४६. मृत्यु कार्तिक वद्य ८।१६९२. मुद्रा:- ० श्री ˘ जगद्वंदितसंदेशादेशानंदेविधायनी । व्यंकटेशजनेर्मुद्रानारायणस्यराजते ॥ ही मुद्रा रा० रामचंद्रपंत आमात्य यांच्या मुद्रेची च आवृत्ति आहे. रामचंद्रपंत आणि नारो महादेव हे अत्यंत स्नेही. करवीरकर श्रीसंभाजीमहाराजांच्या राजमंडळांत रा० नारोपंतांना सचीवपद मिळालें होतें. तेव्हां बहुधां त्यांनीं च अमात्यांच्या मुद्रे सारखी (त्यांच्या नंतर) आपली मुद्रा केली असावी. तिच्यांत नांवाचा फेर करून ती च त्यांच्या नातवांनीं उपयोगांत आणिली. मुद्रा दुसरी:- ˘ श्री० व्यंकटेश प्रसादेन व्यंकटेशतनूजनेः । नारायणाख्यरायस्यमुद्राजयतिसर्वदा ॥

पत्र:—सेवक नारायेणराव व्यंकटेश नमस्कार सुा सवा खमसेन ... [पाठीमागें] बहुत काय लिहिणें [स० मु०] " लेखनावध "

संदर्भ :—" शमसुद्दीन पीरजादे याचे विषयीं, " सदाशिव महादेव यांस पत्र.

(११) लेखक:—रा०सदाशिव केशव जोशी, केळशीकर. यांचे वडील केळशीहून निघून उद्योगा साठीं श्रीकाशीक्षेत्रीं स्थाईक झाले. थो० शिवाजीमहाराज आग्र्याहून सुटल्या नंतर काशीस आले असतां, सदाशिवराव यांनीं महाराजांची भेट घेऊन आपले कडे तेथील राजकारण आणि महाराष्ट्रीयांचें एकीकरण करण्याचें काम घेतलें. यांना तीन पुत्र झाले; त्यांतील मधले पुत्र आवूजी (आबाजी) यांना श्री० बाळाजी विश्वनाथ यांनीं आपल्या कन्या भिऊबाई दिल्या. त्या नंतर काशी कडील राजकारण आणि गंगे वरील घाट बांधण्याचें काम पंतप्रधानांनीं सदाशिवरावांवर च सोंपविलें. मृत्यु:-सामान्यतः शक १६५७. यांचा वंश पुणें, सातारा, सागर येथें नांदत आहे.

पत्र:--श्रीमत् माहाराज राजमान्य राजश्री बाजीरावजी स्वामीचे सेवेसी

पोष्ये सदासिव नाईक जोसी सास्टाग नमस्कार विनति उपरि येथील क्षेम जाणून आपले कुशललेखन सदैव लिहिले पाहिजे तु (म्ही)

संदर्भ:—" चि० आबाजी तुमचे जवळ आहे, सांभाळ करणें; घाटाचे खर्चास द्रव्य पाठविणें " हणून, थोरले बाजीरावस्वामि यांना पत्र (फाल्गुन शुद्ध १४।१६४७). सर्व पत्र सदाशिवराव यांच्या हातचें.

(१२) लेखक:—रा० कृष्णाजी केशव जोशी, नाईक, केळशीकर. सदाशिवराव नाईक यांचे धाकटे बंधु. थोरले शिवराय यांच्या राज्याभिषेकाच्या वेळीं " कारकून व मुत्सद्दी वगैरे " यांत हे समाविष्ट होते (अष्टप्रधान व० पृ० २९). पुढें तंजावरास श्री० व्यंकोजीराजे यांचे कडे सुमंत म्हणून गेले. थोरले शाहुमहाराज बंदींत असतांना, थो० राजाराममहाराज यांनीं त्यांच्या सुटके साठीं जे प्रयत्न केले, त्यांत नाईक होते. सुटके नंतर, शाहुराजांना राज्य मिळवून देण्याचे कामीं यांनीं अत्यंत

Govt.Photozincco.Office.Poona,1933.

श्रमसाहस केल्या मुळें, महाराजांनीं यांना सर्व साम्राज्याचे द्रव्यपरीक्षक करून, पिंपरी (वाघेरें ता॥ हवेली, प्रांत पुणें) गांव वृत्ति करून दिला. शक १६६२ मध्यें इकडील पसारा आटोपून यांनीं काशी-वास केला. यांचे पुत्र आणि नातु, आपल्या कडून निजाम आणि टिपू यांचे कडे सुमंत होते. मृत्युः-सामान्यतः शक १६६३. यांचा वंश सातारा येथें आहे.

पत्रः—सेवक कृष्णाजी नाईक जोसी सा॥ नमस्कार विनति उपरि स्वामीने पत्र पाठविले ते पावले लिहिले की भो द जा सी यांची वीस (हजाराची नेमणूक)

संदर्भः—" थो० बाजीराव आणि चिमाजीआप्पा यांना राजकीय देण्या विषयीं " पत्र. सर्व पत्र नाईक यांच्या हातचें.

(१३) लेखकः—" श्रीमत्सदाशिवात्मज बाबूजी नायक प्रभु ज्ञानी। धन्य म्हणावें ज्याला
" शुद्धगुणश्रवणतृप्त सुज्ञांनीं ॥ १ ॥ भीष्मद्रोणसम गुणें शांडिल्यसुगोत्रपद्मरवि दे हा। आश्रय, शंकर
" जैसा उपमन्युमना, मयूरकविदेहा ॥ २ ॥ जो धीरवीरहीर श्रीसिद्धेश्वरमहादयापात्र। श्रीमान् बाबूराय
" प्रभु ज्याचें शोभलें यशें गात्र ॥ ३ ॥ दाता, वक्ता, योद्धा, तेजस्वी, मानधन, असामान्य। अतुळें
" पितृप्रसादें मंडित देवव्रता असा मान्य ॥ ४ ॥ —मोरोपंत, आर्याभारत.

" —नाईक प्राक्तनवान, साहसी आहेत "—श्री० नानास्वामि पंतप्रधान.

मुद्राः—॥ श्री ॥ मत्सिद्धेश्वरांघ्र्यब्जभजनासक्तसन्मतेः। सदाशिवजनेर्मुद्रा बाबूरायस्य राजते ॥ ॥
[रा. पांडुरंग बाबूराव यांची मुद्राः—श्रीमत्सिद्धेस्वरांघ्रयब्जभजनासक्तसन्मते। बाबूरायजनेर्मुद्रा पांडुरंगस्य राजते ॥]

रा० बाबू(पू)जी अथवा बाबूराव सदाशिव जोशी नाईक बारामतकर. जन्मः—साधारणतः शक १६१६. सदाशिवराव आणि सौ० पार्वतीबाई यांचे वडील पुत्र. श्री० बाळाजी विश्वनाथ यांचे पासून श्री० सवाई राव्स्वामी पर्यंतच्या बहुतेक सर्व पंतप्रधानांच्या देशाक्रमणांत आणि राजकारणांत प्रामुख्यानें अंग घेणारी ही एक च व्यक्ति मराठी साम्राज्यांत होऊन गेली! प्रधानांच्या अनेक कठीण प्रसंगांत यांनीं जिवापाड श्रम घेतले; त्यांतील (१) थो० बाळाजीपंतनाना यांचें (स्वराज्यराजपत्र प्रकरणीं) दिल्लीस गमन; (२) थो० बाजीराव यांचीं माळवा, छत्रसाल-बंगष इ० युद्धें; (३) मा० राधाबाई यांच्या सह यात्रेस जातांना दिल्ली हस्तगत करण्या साठीं, सर्व रजपुतांना मिळवून घेऊन शिजविलेलें राज-कारण; (४) कर्नाटकाचें राजकारण, हे प्रसंग मुख्य होत. या वेळीं यांनीं इतकें उत्कृष्ट कार्य केलें जे, थो० बाजीराव यांच्या पश्चात् पंतप्रधानकीचें पद यांना देण्या विषयीं तत्कालीन राजसभेंतील प्रमुखां-तील कांहींनीं आणि विशेषतः राणी सौ० सगुणाबाई यांनीं शाहुराजां पाशीं प्रयत्न चालविला होता. या वेळे पासून नाईक हे आपल्या महत्त्वाकांक्षेच्या आड येणार अशी स्वतःची खोटी च समजूत करून घेऊन श्री० नानास्वामि यांनीं, नाइकांशीं शेवट पर्यंत वैर धरून, त्यांना वेळोवेळीं साधेल तेथें अडचणींत आणलें. या गोष्टी, विशेषतः छत्रपतींनीं नाइकांची कर्नाटकच्या देशाधिकारा वर केलेली नेमणूक आंतबट्ट्याची व्हावी म्हणून निजामास घरांत घेण्याची आत्मघातकी कारवाई आणि इतर कृष्णकारस्थानें आज पर्यंत प्रसिद्ध झालेल्या ऐतिहासिक साधनां वरून सिद्ध झालीं आहेत. तथापि हें सर्व विसरून, नाइकांनीं अत्यंत उदार अंतःकरणानें पंतप्रधानांच्या सर्व अडचणींच्या प्रसंगीं त्यांना सहाय्य च केलें. उ०:-(१) पानपता नंतरची उत्तर हिंदची व्यवस्था आणि देशाक्रमण; (२) चुलत्यापुतण्यांचें भांडण; (३) थोरले माधव रावांचा निधनप्रसंग; (४) श्री० नारायणराव यांचा वध; (५) बारभाई प्रकरण; आणि सर्वांत

महत्त्वाचा आणि ज्या मुळें पुढ स्वत: वर आणि स्वत:च्या भावी वंशजां वर, सर्व संस्थानचीं राखरांगोळी होण्याची आपत्ति ओढवून घेतली असा प्रसंग म्हणजे (६) श्री० सवाई रावस्वामींच्या जन्माचे वेळीं आणि पुढें त्या बाल प्रधानांच्या संरक्षणा साठीं यांनीं आपली बाल सून (दादास्वामि आणि सौ० आनंदीबाई यांची कन्या आणि बाबूजींचे वडील पुत्र पांडुरंगराव यांची पत्नी) सौ० दुर्गाबाई हिला पुरंदरा वर ठेवणें; इत्यादि. बाबूजी हे अत्यंत गुणज्ञ, शूरवीर, निस्पृह, न्यायी, स्पष्टवक्ते (तथापि मनाचे कोमल) होते. प्रसिद्ध महाराष्ट्रसरस्वतिकंठमणी कवि मोरोपंत यांचे हे आश्रयदाते होते, ही एक च गोष्ट त्यांच्या रसिकतेची साक्ष, महाराष्ट्रांत मराठी भाषा जिवंत आहे तों पर्यंत देत राहील! म्हणून, पंतांनीं त्यांची केलेली उपर्युक्त स्तुति अवास्तव नाहीं, हें, तत्कालीन इतिहासवाचकांस सहज पटेल. मृत्यु:- आश्विन शुद्ध ५ शक १६९९. यांचे वंशज सामंत माधवराव गणेश अथवा आबूराय बाबूराय जोशी बारामत(बावडे)कर हे प्रस्तुतच्या संपादकांतील एक संपादक होंत. हे पुणें येथें असतात.

पत्र:—श्रीमंत राजेश्री आपास्वामीचे शेवेशी

पोश्ये बाबूजी नाईक जोशी सां नमस्कार वीनंती उपरी स्वामीचे आशीर्वादें करू(न) मुकाम बुराणपुर सु(खरूप असो)

संदर्भ:—" मा० राधाबाई यांची यात्रा. सवाई जयसिंग यांच्याशीं दिल्ली हस्तगत करण्याचें राजकारण. " सर्व पत्र बालबोधी आणि नायकांच्या हातचें (फाल्गुन वद्य १०।१६५६).

(१४) **लेखक:—**रा० आबा(बू)जी सदाशिव जोशी, आबूराव (पदवी). सदाशिवराव यांचे मधले पुत्र. जन्म:-शक सामान्यत: १६१८-१९. हे, बाबूजी नाईक यांच्या प्रत्येक महत्त्वाचे प्रसंगांत सहकारी आणि पाठीराखे होते, त्या मुळें तत्कालीन लोकांत या दोघांना जी रामलक्ष्मणांची उपमा मिळाली होती, ती यथार्थ होती. हे, श्री० बाळाजी विश्वनाथ (प्रधान) यांचे जांवई. यांचें मूल बांचेना, म्हणून बाबूजींनीं आपले कनिष्ठ पुत्र नीळकंठराव यांस, यांच्या ओटींत घातलें.

पत्र:—श्रीमत् राजश्री पतप्रधान स्वामीचे सेवेसी

पोष्यें आबाजी जोंसी सा। नमस्कार विनति...(पत्रे श्री)हून आली आहेत त्यात घाटाचा मज (कूर) लिहिला आहे तो अर्थ चितांत आणू(न)

संदर्भ:—" दिपवाळी झाल्या वर मलारजी होळकरा समागमें बाबूजी हे चढाईवर निघतील " म्हणून, पंतप्रधानांस पत्र (भाद्रपद शुद्ध ९।१६५५). सर्व पत्र आबूजींच्या हातचें.

[छायाचित्र—पान ९]

(१) **लेखक:—**रा० सदाशिव शामराज रास्ते. शामजीपंत हे मूळचे वेळणेश्वरचे गोखले महाजनि. पूर्वी यांचे आजे हरि नारायण हे दाभोळ प्रांता कडील (रसद) करभार विजापूरकरा कडे भरण्याचें काम नियमित पणें करीत म्हणून रसदे=रसते=रास्ते हें उपनांव पडलें. घाटावर शामजीपंत आले. पुढें शामजी हरि यांचे दोन पुत्र भिकाजी नाईक आणि सदाशिव नाईक हे सातार्‍यास थो० शाहुमहाराजांच्या वेळीं श्रेष्ठीपणा करीत. यांचे वंशज पुण्यास असतात.

पत्र:—पोष्यांकित सदाशिव नाईक रास्ते कृताने(क) ु. [पाठीमागें] पाहिजेत बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे हे विनति

संदर्भः—" श्री० ताराबाई यांच्या कडील राजगृहाच्या नेमणुकी विषयीं," पंतप्रधान यांना पत्र.

(२) लेखकः—रा० गणपतराव भिकाजी रास्ते. भिकाजी नाइकांचे दुसरे पुत्र आणि श्री० नानास्वामि प्रधान यांचे मेव्हणे. हें घराणें पंतप्रधानांचे संबंधीं असल्यानें त्या वेळीं महत्त्वाचीं कामें या घराण्याच्या हातून घडलीं. भिकाजीपंतांस थो० शाहुमहाराजांनीं ५२०० ची सेनादाय नेमणूक करून दिली. त्यांची वडील कन्या म्हणजे श्री० नानास्वामींच्या पत्नी सौ० गोपिकाबाई. गणपतरावांना सहा भाऊ होते. त्या सर्वांनीं माळवा आणि कर्नाटक इकडे अनेक कार्यें साधिलीं म्हणून प्रधानांनीं त्यांना तिकडे सेनादाय दिला. स्वराज्यांत सर्वांत मोठा सेनादाय या च घराण्याचा होता. या घराण्यानें वांई, सातारा, तालीकोट इ० ठिकाणीं पेठा, घाट, वाडे, देवळें बांधिलीं. सांप्रत पुण्याच्या पहिल्या प्रतीच्या सामंत घराण्यांत हें च घराणें प्रमुख आहे.

पत्रः—पोष्ये गणपतराव भिकाजी रास्ते कृ(तानेक नमस्कार) ... (कळा)वें बहुत काये लिहिणे कृपा लोभ आसो द्यावा हे विनति

संदर्भः—" बारभाई प्रकरण " नाना श्रीकरणाधिप यांना पत्र (माघ वद्य १२ । १६९५).

(३) लेखकः—रा० आनंदराव भिकाजी रास्ते. भिकाजी नाइकांचे तिसरे पुत्र. यांना ३ सहस्र घोडदळाची नायकी होती. त्या साठीं साडे अकरा सहस्रांचा सेनादाय होता. बारभाईस अनुकूल. मृत्युः—शक १६५१. यांचे दत्तक पुत्र रा० माधवराव हे खरडेयुद्धांत होते.

पत्रः—पो॥ अनंदराव भिकाजी कृतानेक ..... [पाठीमागें] (अ)सो बहुत काये लिहिणे लोभ कीजे हे विनति

संदर्भः—" बारभाई प्रकरण. मोंगलास आपल्या कडे मिळवून घेतों " म्हणून, नाना श्रीकरणाधिप यांस पत्र (फाल्गुन शुद्ध १ । १६९५).

(४) लेखक—रा० त्रिंबकराव (मामा) विश्वनाथ पेठे. विश्वनाथ कृष्ण हे नागपुरकराकडे सुमंत होते. भोसल्यांनीं रा० त्रिंबकरावांना प्रधानां कडे आपल्या कडील म्हणून सुमंत ठेविले; नंतर प्रधानांनीं यांना आपल्या कडे सेवेस घेतले. कांहीं दिवस हे मा० ताराबाई यांचे (प्रधानां कडील) कारभारी होते. मामा, गेंडेमाळ युद्धांत प्रमुख असून मोतीतलाव युद्धांत त्यांनीं अप्रतिम शौर्य गाजविलें. बारभाईंत मुख्य सेनानायक. श्री० चिमाजीआप्पा यांच्या पहिल्या पत्नी सौ० रखमाबाई यांचे हे बंधु आणि श्री० भाऊस्वामि यांचे सावत्र मामा; म्हणून यांना त्या वेळीं 'मामा' हें सार्वत्रिक नांव पडलें. मराठी साम्राज्यांतील एक प्रमुख कार्यकर्ते आणि सेनापती. मृत्युः—चैत्री पौर्णिमा १६९६, कासेगांव येथें. श्री० धा० बाजीराव यांनीं पुढें या घराण्याचा सर्व सेनादाय प्रतिबद्ध केला. यांचा वंश चिंधोली आणि नाशिक येथें आहे. पुण्यास यांचा वाडा कसब्यांत तांबटाच्या टांक्या जवळ होता.

पत्रः—पोष्ये त्रिबकराव विस्वनाथ नमस्कार विनति उपरि आम्ही येथून कारकून रुकनुदौला कडे काडनूरसंगमास शोधा करितां रो॥ धोडो राम यास चिठी लिहून देऊन पा॥ होते ते जाऊन भेटून आले रुबरु या मसलतीस आम्ही तुम्हास अन (कूल ऐसे सांगोन पाठविले)

संदर्भः— " बारभाई प्रकरण. निजामास मिळवून घेण्याचा प्रयत्न करतों " म्हणून, बापू-नाना यांना पत्र (फाल्गुन शुद्ध १३। १६९५). सर्व पत्र मामांच्या हातचें.

(५) लेखकः—रा० बाबूजी गणेश ओक. यांचे चिरंजीव गंगाधरराव यांस श्री० चिमाजीआप्पा यांच्या कन्या बयाबाई दिल्या होत्या; तेव्हां ओक हें नांव बदलून " ओंकार " हें नवीन आडनांव

पंतप्रधानांनीं लावण्यास अनुज्ञा दिली. यांचें मूळ गांव बामणोली. बाबूजी हे निजामा कडे सुमंत होते. मृत्युः-आश्विन शुद्ध ७, शक १७१०. यांचे विद्यमान वंशज सामंत भास्करराव धुंडिराज ओंकार हे सांप्रत पुणें येथें राहतात.

पत्रः—पोष्य बाबूजी गणेश ॐकार कृतानेक साष्टांग नमस्कार (विनंति) ... (दिनानाथजी फणसे या समागमे पाठविले आहे व सकल वृत्त) हे जबानी सागतील ल्याजवरून शेवेसी श्रुत होईल बहुत काय लीहीणे कृपा लोभ आसो दीजे हे वीनती

संदर्भः—श्री० नानास्वामि यांना घरगुती पत्र (माघ वद्य १३).

(६) लेखकः—रा० बळवंतराव गणपत मेहेंदळे. मूळ गांव हरिहरेश्वर. गणपतरावांचे वडील बहिरवभट. यांना श्री० बाळाजी विश्वनाथ यांच्या भगिनी (पंतप्रधान होण्या पूर्वी) दिल्या होत्या. गणपतराव हे पथके होते. बळवंतरावांनीं उत्तर कडे आणि कर्नाटकांत पुष्कळ चढाया केल्या. तांदुळजाचे युद्धांत शौर्य गाजविल्यानें ५० सहस्रांचा सेनादाय यांना मिळाला. प्रधानांनीं यांना ४०० वेतनी घोडदळ स्वतंत्र ठेवण्यास दिलें. यांची मुद्राः- ˘० हरिहरेश्वर चरणीं तत्पर। बळवंतराव गणपत निरंतर ॥ बळवंतराव यांचें दुसरें नांव रामचंद्र. यांच्या धाकट्या भगिनी रा० जनार्दन बल्लाळ भानू यांना दिल्या; त्यांचे पुत्र प्रसिद्ध नाना श्रीकरणाधिप. बळवंतराव पानपतावर पडले (कार्तिकी अमावास्या १६८२). यांच्या पत्नी तेथें होत्या, त्या सती गेल्या. तेथें त्यांचें वृंदावन आहे. यांचे पुत्र कृष्णरावआप्पा. हे हि शूर असून यांनीं श्री० थो० माधवराव आणि श्री० सवाईरावस्वामि यांच्या राजवटींत अनेक महत्त्वाचीं कार्यें केलीं. कर्नाटकांत यांनीं कांहीं चढाया केल्या होत्या. यांचे विद्यमान वंशज सामंत खंडेराव चिंतामण मेहेंदळे हे पुण्यास असतात.

पत्रः—विनंति सेवक बलवतराव गणपत कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति उपर येथील वर्तमान ताा छ २४ रबिलाखर पावेतो मु (काम खांबगांव)

संदर्भः—" दमाजी गायकवाड साताऱ्या वर चढाई करून आले " म्हणून, श्री० नानास्वामि यांना पत्र. सर्व पत्र बळवंतराव यांच्या हातचें.

(७) लेखकः—रा० आपाजी राम गाडगीळ. हे श्री० नानास्वामि यांचे साडू. हे, अक्कलकोटकर श्री० फत्तेसिंगबाबा भोंसल्यांचे कारभारी होते. श्री० नानास्वामींचा यांचे वर लोभ असे. हे यजमाना समागमें युद्धां वर जात; हावेरीच्या (१६८६) युद्धांत हे होते. यांच्या पत्नीचें नांव सौ० सगुणाबाई; त्या भिकाजीपंत रास्ते यांच्या कन्या. यांचा वंश वांईस आहे.

पत्रः—विनति सेवक आपाजी राम कृतानेक...सेवेसी विनति लिहिली आहे बहुत काये लिहिणे हे विइःस

संदर्भः—" जानोजी भोसल्यांच्या विजापूर कडील सेवकांच्या प्रतिबंधा " विषयीं नाना श्रीकरणाधिप यांना पत्र (फाल्गुन वद्य २ । १६९०)

(८) लेखकः—रा० चिमणाजी दामोदर मोघे. मूळ गांव हरिहरेश्वर. प्रथम श्री० ताराबाईंच्या वेळीं राज्यांत सेवक. पुढें थो० शाहुमहाराज यांना प्रथम साह्य करणाऱ्या रा० कृष्णाजीपंत जोशी इत्यादि मंडळींतील एक; म्हणून महाराजांनीं यांना राजाज्ञा पद दिलें (शक १६३०); मध्यंतरीं कोल्हापूरकरांचे पंतप्रधान होते (शक १६५०). भट पंतप्रधान घराण्याचा आणि मोघे घराण्याचा अत्यंत घरोबा होता. मृत्युः-शक १६५५-५६. यांचे सांप्रतचे वंशज रा० सदाशिव बळवंत. हे रिंगणगांव येथें आहेत. मुद्रा :- ˘ श्री० राजा शंभु छत्रपति हर्षनिदान । दामोदरसुत चिमणाजी पंडित मुख्य प्रधान ॥

पत्रः—विनती पत्र सेवक चिमणाजी दामोदर सरसुबेदार व कारकून सुबेहाये प्रात दौलताबाद सेवेसी विज्ञापना स्वामीचे (कृपादृष्टी करून)

संदर्भः—" रा० सदाशिव नाईक जोशी, श्रेष्ठी यांचे पासून द्रव्य घेतल्या विषयीं," श्री० शाहु-महाराज यांना पत्र. सर्व पत्र चिमणाजीपंतांच्या हातचें.

(९) लेखकः—रा० वाजी भीम(व)राव रेटरेकर. रेटरें (जि० सातारा) येथिल देशस्थ ऋग्वेदी घराणें. पंतप्रधान घराण्याचा आणि या घराण्याचा जिव्हाळ्याचा संबंध प्रारंभा पासून शेवट पर्यंत होता. श्री० थो० बाळाजीपंतनानांनीं आपल्या मुलांचीं नांवें जशीं बाजीराव आणि चिमणाजी ठेविलीं, तशीं च भीमरावदादांनीं आपल्या दोन मुलांचीं नांवें बाजीराव आणि चिमणाजी ठेविलीं. स्वराज्याच्या शेवटच्या काळांत (बाळकृष्णपंत?) रेटरेकरांनीं इंग्रेजांस भेदे होण्या पेक्षां स्वतःच्या सेनादाया वर पाणी सोडून गरिबी पत्करली! बाजीराव रेटरेकर हे तारापूरच्या लढाईंत (पौष शुद्ध ११।१६६०) कामास आल्या वर श्री० बाजीराव आणि चिमाजीआप्पा प्रधान हे त्यांच्या (बाजीराव रेटरेकरांच्या) मातुश्री "वेणुबाई काकी यांस" लिहितात–" मी च तुमचा बाजीराव असा विवेक करून धीर धरावा "..... " आमचा तर भाऊ गेला...बाजीराव लौकिकानें गेला " (राजवाडे, ३., पृ० १७७).

पत्रः—पोष्यें बाजी भीमराऊ कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील क्षेम ता छ २४ जमादिलाखर मो भामगड पावेतो स्वामीचे कृपे करून कुशलरूप असो

संदर्भः—" सिद्दी सात प्रकरण. करवीरकर संभाजीमहाराजांचें साताऱ्यास आगमन; " थो० बाजीराव यांना पत्र (आश्विन वद्य ११।१६'५८). सर्व पत्र बाजीराव रेटरेकर यांच्या हातचें.

(१०) लेखकः—रा० आ(अं)बाजी (तात्या) त्रिंबक पुरंदरे.सासवडचे कुलकरणी आणि देशपांडे. यांचा आणि थो० बाळाजीनाना यांचा स्नेह. दोघे हि प्रथम रा०धनाजीराव सेनापतींच्या हाता खालीं होते. नाना हे प्रधान झाल्या वर तात्यांना ६० सहस्त्रांचा सेनादाय मिळाला. हें घराणें पंतप्रधानांच्या घराण्याशीं शेवट पर्यंत विश्वासु राहिलें. परस्पर घराण्यांचा निकट घरोबा असल्यानें गादी वरील पंतप्रधान तत्कालीन पुरंदरे पुरुषास (वयानें वडील असला तरी) पत्रांत " चिरंजीव " लिहीत. अंबाजीतात्यांचा मृत्युः–भाद्रपद शुद्ध ८।१६५६. या घराण्यांत प्रधानांचें कारभारीपण आणि छत्रपतींचें उपमंत्रीपद होतें. या घराण्याचे वंशज सांप्रत पुरंदर आणि पुणें येथें विद्यमान आहेत.

पत्रः—पो आबाजी त्रिबक सा नमस्कार विनति स्वामीचे कृपेकरून ता छ १४ रबिला-वल पावेतो सुखरूप असो राजश्री फत्तेसीगबावा सेखजी छ ११

संदर्भः—" शामलाच्या स्वारी " विषयीं, श्री० थोरले बाजीराव यांना पत्र. सर्व पत्र तात्यांच्या हातचें.

(११) लेखकः—रा० माहादाजी (महादेवबाबा) अंबाजी पुरंदरे. अंबाजीतात्यांचे दुसरे पुत्र. या घराण्यांत हे च प्रमुख होते. बाबूजी नाईक यांच्या विरुद्ध प्रधानपद श्री० नानास्वामींना देणाऱ्यांत हे प्रमुख होते. हे शूर असून कर्णाटक, कुकडी, बेदनूर इ० युद्धांत यांनीं नांव गाजविलें. मध्यंतरीं २।३ वर्षे यांचें प्रधानांशीं बितुष्ट आलें होतें. यांच्या नंतर प्रधानांचें कारभारीपण रा० नाना श्रीकरणाधिप यांच्या कडे आलें. मृत्युः–आश्विनी अमावास्या १६८२.

पत्रः—विनति सेवक माहादजी अंबाजी सा नमस्कार विनति उपरि येथील क्षेम ता छ १८ जोवल पर्यंत मु। का। इटावें पर्यंत सुखे पावलों तीर्थरुप चा (परामर्श केला)

संदर्भः—" अंबाजीतात्या श्री चे यात्रेहून परत आले, आपण त्यांचा चांगला परामर्श घेतला त्या विषयीं उपकृत आहें, " म्हणून, श्री० थोरले बाजीराव यांना पत्र (शक १६५६ भाद्रपद पूर्व). सर्व पत्र महादाजीपंतांच्या हातचें.

(१२) लेखकः—रा० मल्हार किंवा दादोबा तुकदेव पुरंदरे. हे, त्रिंबकराव यांचे वडील पुत्र तुकोपंत (अंबाजीचे वडील बंधु) यांचे पुत्र. मृत्युः–श्रावण शुद्ध १०। १६७६.

पत्रः—अपत्यें मल्हार तुकदेव कृतानेक साष्टांग नमस्कार.....(सविस्तर) लिहिले पाहिजे दरबारीचे वर्तमान पूर्वी च जासुद समागमे लेहून पाठविले आहे ती पत्रे पावली च आसतील विदित जाले पाहिजे सेवेसी श्रुत होये वि(ज्ञापना)

संदर्भः—श्री० थो० चिमाजीआप्पा यांना, गोरवाड येथून घरगुती पत्र.

(१३) लेखकः—रा० त्रिंबकराव सदाशिव अथवा नाना पुरंदरे. अंबाजीतात्यांचे वडील पुत्र सदाशिवराव, त्यांचे हे पुत्र. मृत्युः–मार्गशीर्ष शुद्ध ३।१६९०.

पत्रः––विनति इकडे पाऊस फार कृष्णवेणा यासी पाणी अतिशय आहे पाणी उतरले चिखल आमलसा थोडा जाहाला म्हणजे

संदर्भः—" श्रीमंतांचा घोडा ' फुलझडी ' नदीचा पूर ओसरल्या वर पाठवितों, " म्हणून, श्री० नानास्वामि आणि श्री० भाऊस्वामि यांना पत्र. सर्व पत्र नानांच्या हातचें.

(१४) लेखकः—वे० शा० सं० नारायण गोविंद टकले, दीक्षित, पाटणकर. यांनीं पैठणास तपश्चर्या केली. थो० शाहुमहाराज आणि थो० बाजीराव, यांच्या भजनीं लागले. कोंकणांतील आणि दख्खन मधील राजकारणांत यांचें अंग असे. पुढें यांनीं काशीस वास्तव्य करून, तिकडे अन्नछत्रें घातलीं आणि रा० सदाशिव नाईक, जोशी वारल्या नंतर त्यांचें तिकडील राजकारण पुढें चालविलें. मृत्युः–कार्तिक शुद्ध १४।१६७०. या वेळीं वय १०० वर होतें. यांचे वंशज पुढें कायगांव व शेंदुर्णी येथें राहिल्यानें त्यांना कायगांवकर आणि शेंदुर्णीकर अशीं नांवें पडलीं. शेंदुर्णीस विद्यमान वंशज सामंत गंगाधर यज्ञेश्वर दीक्षित असतात.

पत्रः—श्री कृष्ण

चिरंजीव राजश्री पंत प्रधान या प्रति नारायण दीक्षित कृतानेक आशिर्वा(द)

संदर्भः––श्री० नानास्वामि (प्रधान) यांना घरगुती पत्र.

(१५) लेखकः—रा० रघुनाथ हरि नेवाळकर. मूळ पुरुष रघुनाथपंत. राजापुरा जवळचे कोट येथील अष्टाधिकारी वृत्तिवंत. श्री० बाळाजी विश्वनाथांच्या वेळीं खानदेशांत राजसेवेस राहिले. यांचे पुत्र दामोदर आणि त्यांचे हरि. हरिपंतांनीं खानदेश, अहमदाबाद प्रांतीं देशाधिकाऱ्यांचीं कामें केलीं. त्यांचे पुत्र रघुनाथ हरि. यांना खानदेशांत पारोळें गांव पारितोषिक म्हणून मिळाला आणि झांशीचा देशाधिकार शक १६९२ त मिळाला. यांचे धाकटे बंधु शिवराव; त्यांचे पुत्र गंगाधरराव; त्यांच्या पत्नी सुप्रसिद्ध लक्ष्मीबाई (झांशीची राणी) होत.

पत्रः—विनंति शेवक रघुनाथ हरि कृतानेक (साष्टांग नमस्कार).....(बंदोबस्त स्वामीच्या) प्रतापे होईल तो करूं याची आज्ञा जहाली पाहिजे शेवेसी श्रुत होये हे विज्ञापना

संदर्भः—" नागपूरकर भोंसल्यांच्या भाऊबंदकी विषयीं " बापू आणि नाना श्रीकरणाधिप यांना पत्र (मार्गशीर्ष वद्य १४।१६९६). सर्व पत्र रघुनाथपंतांच्या हातचें.

[छायाचित्र—पान १०]

(१) लेखक:—रा० रामचंद्र गणेश कानडे (कोंकणस्थ). गणेश केशव हे सोनोरीचे राहणार. गणपतराव हे प्रथम श्री० थो० शाहुमहाराजांचे वेळीं उदयास आले. रामचंद्रपंत हे श्री० थो० माधवराव यांच्या आणि पुढील राजवटींतील प्रख्यात सेनापति होते. पानपताच्या वेळीं हे बालघांटा कडे होते. सावनूरचें युद्ध, रा० जानोजी भोसले यांच्या वरील चढाई, पानपता नंतरचें उत्तरे कडील देशाक्रमण, गोवर्धनचें युद्ध, अहंमदखान बंगशा वरील चढाई, खंडाळ्या खालचें इंग्रजांचें युद्ध इ० प्रसंगांत प्रमुख. बारभाईंत महत्त्वाची व्यक्ति. मृत्यु:—मार्गशीर्ष वद्य १।१७०२. यांचा वंश, औरंगाबाद, वैजापूर, परभणी इकडे आहे.

पत्र:—(वसू)ल घ्यावयाची आहे या वरि माहाळुगे नानचकरानी चुकविले त्यांना च ये(क) कारकून पाठवून तह करावा उतम आहे लोभ करावा हे विनति

संदर्भ:—" कर्नाटक युद्धा विषयीं " बलवंतराव मेहेंदळे यांना पत्र (भाद्रपद शुद्ध १०।१६८०). सर्व पत्र रा० रामचंद्रपंतांच्या हातचें.

(२) लेखक:—रा० कृष्णराव बल्लाळ काळे. हे मूळचे काशीचे. बाबूजी नाईक जोशी यांच्या मध्यस्थीनें राजसेवेंत आले. निजामाचे राजसभेंत आपले कडील सुमंत. श्री० राघोबादादांच्या उत्तरे कडील पहिल्या आक्रमणांत होते. यांनीं राक्षसभुवनाचे युद्धांत शौर्य गाजविलें. यांच्या कडून थो० माधवरावांनीं दादास्वामींना पकडून बंदींत ठेवविलें म्हणून या घराण्या वर श्री० धा० बाजीरावांचा पुढें रोष झाला. मृत्यु:—भाद्रपद वद्य १ शक १७०८.

पत्र:—विनंति सेवक कृष्णराव बलाल साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ता छ १८ रमजान मु॥ नजीक सिंदखेड स्वामीच्या कृपे कडून सेवकाचे वर्त(मान)

संदर्भ:—" निजामाच्या, भोंसल्या वरील युद्धा संबंधीं," श्री० दादास्वामि यांना पत्र (फाल्गुन वद्य ४।१६८७). सर्व पत्र कृष्णरावांच्या हातचें.

(३) लेखक:—रा० गोविंद कृष्ण काळे. निजामा कडे, आपल्या कडील सुमंत. कृष्णराव काळे यांचे पुत्र. श्रीरंगपट्टणचे युद्धांत होते (शक १७१२).. .श्री० सवाई माधवराव प्रधान यांचे वेळचे प्रख्यात राजकारणी. खर्ड्याचे युद्धांत आणि अष्टीचे शेवटचे जुंझांत हि होते. हे निस्पृह, स्पष्ट-वक्ते होते. यांच्या मध्यस्थीनें खर्ड्याचा संधि निजामानें केला. यांचे विद्यमान वंशज बारामतीस असतात. मृत्यु:—आश्विन १७४५.

पत्र:—सेवक गोविद कृष्ण साष्टांग नमस्कार विनति उपरि येथील क्षेम ता माघ शुध्ध द्वादसी पावेतो स्वामीचे कृपा द्रिष्टी करून वर्तमान यथास्थित असें विशेष मिर्जा मनु अबदुल (अजीज खान)

संदर्भ:—पंतप्रधानांस " राज्यकारभारा विषयींचें " पत्र. सर्व पत्र गोविंदरावांच्या हातचें.

(४) लेखक:—रा० जिवाजी गणेश लिमये अथवा खासगीवाले. यांचे वडील बंधु (शिवराम-आप्पा) आणि हे प्रथम इचलकरंजीकरां कडे होते. मा० अनुबाईंच्या मध्यस्थीनें श्री० थोरले बाजीराव यांचे सेवेस राहिले. आप्पांस, श्रीमंतांनीं सातारा आणि पुणें येथील वाडे बांधावयास सांगितलें. तें काम चांगलें झाल्यानें आप्पांस, प्रधानांनीं आपले गृहकारभारी नेमिलें (श्रावण वद्य ५ । १६५४). शिव-रामांचे पुत्र गोविंदराव हे थो० माधवरावांचे वेळीं प्रख्यात होते. यांचा वंश पुण्यास आहे. विद्यमान

वंशज सामंत हरिहर काशिनाथ हे होत. जिवाजीअण्णा हे श्री० नानास्वामि आणि श्री० थोरले माधवराव यांचे कारभारी. यांचे कडे शक १६७३ मध्यें सिंहगड होता. मृत्युः–शक १६८७.

पत्रः—विनंति सेवक जिवाजी गणेश साष्टांग नम[स्कार].....(स्वा)मी खावंद आहेत विदित जाले पाहिजे सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना

संदर्भः—" धान्य विकत घेतल्या विषयीं, " श्री० चिमाजीआप्पा यांना पत्र.

(५) लेखकः—रा० नारो(पंत नाना) आपाजी खिरे अथवा तुळशीबागवाले. पाडळी-(सातारा)चे कुळकर्णी. प्रथम खाजगीवाल्यांचा आश्रय. सांप्रतच्या तुळशीबागेंत पूर्वी खाजगीवाल्यांची खरोखरची तुळशी वाटिका होती. तेथील तुळशी तोडून आणण्याचें काम नारोपंतांकडे होतें. यांना श्री० नानास्वामींनीं पुणें प्रांताचे देशाधिकारी नेमिलें (शक १६७२); तेव्हां त्यांनीं ती वाटिका विकत घेऊन तेथें श्रीरामाच्या मूर्ती स्थापिल्या (शक १६८२). प्रधानांच्या राजवटींत यांनीं (पूर्वी मलीक अंबर यानें केली तशी) स्वराज्याची भूमिगणना केली. निजामानें पुणें जाळल्या वर थो० माधवराव यांनीं, नारो-पंतांच्या हातून तें पुन्हा वसविलें. नाना हे २५ वर्षें पुण्याचे देशाधिकारी होते. मृत्युः–फाल्गुन शुद्ध ५ १६९६. यांचा वंश पुण्यास आहे.

पत्रः—सेवेसी नारो आपाजी सां नमस्कार विज्ञापना ता छ ७ रजब पावेतो मुा जेजुरी वर्तमान येथास्थित असे

संदर्भः—" जेजूरीच्या यात्रेंत स्वामींचा हत्ती आला होता, तो गुरवांनीं विकला " म्हणून, श्री० प्रधानपंतांस पत्र. सर्व पत्र नानांच्या हातचें.

(६) लेखकः—रा० गोविंदराव बल्लाळ खेर किंवा वुंदेले. नेवरेकर कुळकर्णी. हे, मल्हार दादाजी बर्वे यांच्या मध्यस्थीनें थो० बाजीराव यांचे जवळ शिष्य म्हणून राहिले. मग मल्हारराव होळकरांच्या हाता खालीं देशाक्रमणास जाऊं लागले. यांना वुंदेलखंडची देशाधिकारी शक १६५५ मध्यें मिळाली. यांनीं सागरची स्थापना १६५८–५९ मध्यें केली. मृत्युः–पानपतीं, मार्गशीर्षा पौर्णिमा १६८२.

पत्रः—सेवक गोविद बलाल नमस्कार विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीय लिहित जाणे विशेष फर्कांबादवाल्यानी अकबरपूर

संदर्भः—" नजीबखानाचे चढाई विषयीं " पत्र (शक १६८२). सर्व पत्र गोविंदराव यांच्या हातचें.

(७) लेखकः—रा० बाळाजी गोविंद खेर. गोविंदराव खेर यांचे पुत्र. वुंदेलखंडचे देशाधिकारी. पानपता नंतर यांनीं सागर आणि इतर प्रांत पुन्हां हस्तगत केला. मृत्युः–शक १७२२. यांचा वंश जबलपूर, नागपूर, सागर इकडे ' राजे ' या आडनांवानें प्रसिद्ध आहे.

पत्रः—विनंति सेवक बालाजी गोविंद कृ(तानेक).....(आज्ञा) केली पाहिजे सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना

संदर्भः—श्री० थो० माधवराव यांना पत्र. " गंगेच्या २५ आणि यमुनेच्या २५ कावडी पाठविल्या " म्हणून (आषाढ वद्य १ । १६९४).

(८) लेखकः—रा० विसाजी कृष्ण चिंचाळकर अथवा बिर्नावाले. मूळ गांव तेरवण (राजापूर). कृष्णाजीपंत पुरंदरास सेवेस होते. विसाजीपंतांचा श्री० नानास्वामींच्या वेळीं राजपथकांत प्रवेश झाला. ते शक १६७९ पासून कर्नाटकांतील युद्धांत होते. पुढें स्वतंत्र पथके झाले. नंतर सेना-मुखा वर नेमणूक झाल्यानें बिर्नीवाले आडनांव पडलें. थो० माधवरावांचे हे फार विश्वासु होते. पानपता

Govt Photozincco Office, Poona, 1933.

Govt Photozinco Office. Poona, 1933.

नंतर, पुन्हां सर्व उत्तरे वर यांनीं मराठ्यांचें वर्चस्व स्थापिलें म्हणून, पुण्यास परत आल्या वर यांच्या वर श्रीमंतांनीं सोन्याचीं फुलें उधळविलीं. मृत्युः–शक १७०७. यांचा वंश पुण्यास आहे.

पत्रः—श्रीमंत राजश्री पंतप्रधान स्वामीचे सेवेसी

पो॥ विसाजी कृष्ण कृतानेक नमस्कार विनंति येथील कुशल स्वामीचे कृपेकडू[न]

संदर्भः—" दाभाडे सेनापती कडील राजनेमणुकीच्या आयव्यया " विषयीं, पंतप्रधानांस पत्र. सर्व पत्र विसाजीपंतांचे हातचें.

(९) लेखकः—रा० धोंडो बल्लाळ गोखले. मूळ गांव तळेंखांजण. यांना प्रथम परशरामभाऊ पटवर्धनांचे हाता खालीं सेनादाय मिळाला. बदामी–टिपू वरील युद्धांत प्रख्यात झाल्यानें धारवाडचे देशाधिकारी झालें. कर्नाटकांतील या वेळच्या युद्धांत प्रमुख. धोंडजी वाघा वर गेले असतां हलीहाळ येथें मृत्यु पावले (आषाढ शुद्ध ८ । १७२२).

पत्रः—विनति शेवक धोडो बलाल गोखले कृतानेक सां॥ नमस्कार विज्ञापना ऐसी जे आमचे निसबतीस सिलेदार आहेत त्या पौ॥ काही आसामीनो नवाब निजामअली

संदर्भः—" स्वतुरग्यांनीं नबावा कडून आगामी द्रव्य घेतल्या " विषयीं पंतप्रधान यांना पत्र. (ज्येष्ठ शुद्ध ५ । १७१५). सर्व पत्र धोंडोपंतांच्या हातचें.

(१०) लेखकः—रा० नरहर गणेश अथवा बापू गोखले. रा० धोंडोपंतांचे पुतणे. जन्मः–शक १६९९. धोंडजी वाघा वरील चढाई पासून मराठी साम्राज्याच्या शेवट पर्यंतचे सुप्रासिद्ध सेनापति. अष्टी येथें स्वतःचा प्राण देऊन श्री० रावबाजींचा प्राण यांनीं वांचविला (माघ शुद्ध १५ । १७३९). यांना १२ लाखांचा सेनादाय होता. इंग्रजांचा लिंगो वकील, बापूंना भेदी बनविण्यास आला असतां, त्यांनीं दिलेलें उत्तर प्रसिद्ध च आहे! यांचा वंश पुणें, धारवाड येथें आहे.

पत्रः—पो॥ बापूजी गणेश सां॥ नमस्कार विनंति उपरि बा॥ देणे सिलेदार धर्माजी गाइकवाड गु॥ सुलतानजी शेटगे यास ता॥ छ २३ जावल सन इसने अशर

संदर्भः—" धर्माजी गायकवाड याच्या देण्या " विषयीं पत्र (चैत्री अमावास्या १७३५). सर्व पत्र बापूंच्या हातचें.

(११) लेखकः—रा० नारो शिवराम चक्रदेव. हरिपंत फडके यांचे पुत्र रामचंद्रबाबा यांचे, हे लेखक आणि नाना श्रीकरणाधिप यांचे विश्वासु. टिपू वरील बदामीचे युद्धांत हे होते. महाडचें (नानांचें) कारस्थान यांच्या मुळें फळास आलें. नाना, पुन्हां कारभारी झाल्या नंतर त्यांनीं यांना सेनापति नेमिलें (शक १७१८). दौलतराव शिंद्यांनीं नानांच्या विरुद्ध केलेले अनेक डांवपेंच यांनीं उलथवून टाकिले. परशुरामभाऊ आणि बापू गोखले यांच्या मधील काळांत हे च साम्राज्याचे सेनापति होते. यांचा वंश पुण्यास आहे.

पत्रः—सेवेसी नारो सिवरांम चक्रदेव यांचे सां॥ नमस्कार विनंति रा॥ गोविंदराव पवार व परशराम कदम चिरं(जीव)

संदर्भः—घरगुती पत्र. सर्व पत्र नारोपंतांच्या हातचें.

(१२) लेखकः—रा० गंगाधर (गंगोबाताया) यशवंत चंद्रचूड. मूळ गांव निंबगांव, खंडोबाचें (पुणें). तेथील जोशी-कुळकर्णी. मूळ आडनांव धनपावडे. थो० बाजीराव यांनीं यांना प्रथम राजकार्यसभेंत घेऊन मग आपल्या वतीनें मल्हारराव होळकरांचे करणिक नेमिलें. पुढें मल्हाररावांनीं, यांना कारभारी केलें. यांनीं एकदां अबदाली वर चढाई केली होती (१६८२). प्रधानांच्या घरगुती

भानगडींत, विशेषतः चुलत्यापुतण्यांचे भांडणांत हे पडल्यानें थो० माधवरावांनीं यांना बंदींत ठेविलें होतें. मृत्युः–चैत्र शुद्ध ८ । १६९६. यांचे विद्यमान वंशज सामंत नानापंत हे पुणें येथें असतात.

पत्रः—विनंति सेवक गंगाधर येशवंत व (रामाजी यादव).....लिहिळे आहे शेवेसी श्रृत होये हे विज्ञापना

संदर्भः—" चंद्रग्रहण झाल्या नंतर मल्हारराव होळकर हे वाफगांवा हून निघून मांडवगडा कडे गेल्या " विषयीं, श्री० पंतप्रधानांना पत्र.

(१३) लेखकः—रा० यशवंतराव गंगाधर चंद्रचूड. गंगोबातात्यांचे चिरंजीव. होळकरां कडे सेवेस.

पत्रः—सेवक येशवंतराव गंगाधर सां नम(स्कार)...(त्या)प्रां० मशारनिले खरीदी करितील कार्य घरचे जाणून लि॥ असे तर आपला यखादा भला. माणूस बरोबर देऊन तां० मजकुरी खरिदी करवावी बहुत काये लिहिणे लोभ कीजे हे विनंति

संदर्भः—" कोन्हाळ्याचे आपाजीपंत यांस दाणे विकत घेण्याचें " आज्ञापत्र.

(१४) लेखकः—रा० दिवाकर (देवाजीपंत) पुरुषोत्तम चोरघोडे. " सख्या–देवा–विठ्ठला ! " या प्रसिद्ध तीन शहाण्यांतील शहाणे ! ऋग्वेदी देशस्थ. प्रथम नागपूरकर भोंसल्यांचे सेनापति कोन्हेर राम कोल्हटकरां चे शिष्य. यांनीं पंतप्रधानां कडून जानोजीबाबा भोंसले यांना सेनासाहेबसुभ्याचें पद मिळवून दिलें. श्री० नानास्वामि यांची पंतां वर कृपा होती. पुढें सखारामबापूंच्या वतीनें श्री० दादा-स्वामींचे पक्षपाती बनल्या मुळें थो० माधवरावांनीं यांना बंदींत ठेविलें; कांहीं काळानें सुटका झाल्या वर बारभाईंत मिळाले. मृत्युः–शक १७०३. यांचा वंश नागपुरास आहे.

पत्रः—सां० नमस्कार विनंति उपरि चिटी पाठविली पावली तुम्ही भोजनउतर येनार तर हरगीज न येन

संदर्भः—" कासेगांवच्या लढाई "विषयीं नाना श्रीकरणाधिप यांना पत्र (शक १६९५). सर्व पत्र देवाजीपंतांच्या हातचें.

(१५) लेखकः—रा० विठ्ठल (विनायकदास) सुंदर परशरामी, राजाबहादूर प्रतापवंत. देशस्थ यजुर्वेदी. तीन शहाण्यांतील तिसरे, संगमनेरचे राहणारे. रामदासपंत(राजा रघुनाथदासा)च्या वळ-णानें निजामअल्ली कडे यांचा प्रवेश. निजामानें यांना कारभारीपणा दिल्या वर (शक १६८४), पंत प्रधानांच्या (दादास्वामि आणि थो० माधवराव) भांडणांत यांनीं मराठ्यांचें राज्य नामशेष करण्याचा कट रचला. दुसरे शहाणे देवाजीपंत यांचे वतीनें जानोजी भोंसल्यांना फोडून श्री० रामराजे छत्रपति यांना नाकर्ते ठरवून, जानोजीस प्रधानकी देऊन, भटप्रधानांना समूळ उच्चाटण देण्याचा हा कट होता; त्याला अनुसरून निजामानें पुण्या वर स्वारी केली. पण दादास्वामींनीं जानोजीची समजूत घालून हा कट उधळून लावला. त्या नंतर राक्षसभुवन येथें श्री० दादांनीं निजामाचा पराभव केला, त्या वेळीं विठ्ठलपंत मृत्यु पावले (श्रावण शुद्ध २ । १६८५). यांचा वंश, हैद्राबाद आणि संगमनेर येथें आहे. यांच्या सेनादायास तिकडे " गणेश जहागीर " म्हणतात.

पत्रः—सेवक विठल सुंदर सां० नमस्कार विनंति उपर येथील क्षेम तां० छ २ माहे सफर स्वामीप्रतापें येथास्थित जाणोन स्वानंदवभवलेखनार्थ आज्ञा निरोपिली पाहिजे या नंतर मौजे उकलगाव तां० वेलापूर पां० सं(गमनेर)

संदर्भः—" आतारअल्लीच्या गांवच्या भोज्यग्रामा विषयीं," श्री० नानास्वामि यांना पत्र. भाषा अत्यंत लाघवी. सर्व पत्र पंतांच्या हातचें.

(१६) **लेखकः**—रा० सखाराम (बापू) भगवंत बोकील. हिवरें (पुणें) येथील कुळकरणी. थोरले शिवाजीमहाराज यांच्या वेळचे पंताजी गोपीनाथ यांचे धाकटे भाऊ यमाजी, त्यांचे धाकटे पुत्र गंगाधर, त्यांचे भगवंत आणि त्यांचे पुत्र बापू. तीन शहाण्यांतील पहिले. जन्मः—शक १६३८. श्री० नानास्वामींनीं, प्रथम यांना, श्री० भाऊस्वामि कर्नाटकचे आक्रमणावर गेले असतां त्यांचे कारभारी नेमिलें, पण त्यांचें पटलें नाहीं म्हणून श्री० दादांचे कारभारी नेमिलें. तेव्हां पासून शेवट पर्यंत यांनीं त्यांचा च पक्ष उचलला. उत्तर प्रधानांच्या राजवटींत हे प्रमुख वनले. नाना श्रीकरणाधिपांचें आणि यांचे शेवट पर्यंत जमलें नाहीं. बारभाईंत प्रमुख असून हि श्री० दादांच्या (इंग्रजांच्या) कडे भेदाचीं पत्रें पाठविल्याचें सिद्ध झाल्या मुळें बंदींत पडले. ते तेथें च मृत्यु पावले (भाद्रपद वद्य ५ ।१७०३). पानपता पासून सालबाई (ं संधी)पर्यंत सर्व मराठी साम्राज्या वर यांची छाप होती. यांचा सेनादाय ५।।। लाखांचा होता. यांचा वंश सासवड, हिवरें येथें आहे.

पत्रः—विज्ञापना रविवारी वितिपात आहे काही संशय आसिला तरी निश्चये करून गोपालरायाची चिटी रवाना करावी योगिणी पाहावयाच्या आसिल्या तरी पाहाव्या हे विज्ञापना

[छायाचित्र—पान ११]

(१) **लेखकः**—रा० रामचंद्र हरि पटवर्धन. मूळ गांव कोतवडें, मूळ पुरुष हरभट; यांचा जन्म, साधारणतः शक १५८७. हे रा० नारो महादेव घोरपडे इंचलकरंजीकरांचे उपाध्याय. त्यांच्या पदरीं असतांना पुढें सौ० अनुबाई यांनीं त्यांना आपल्या माहेरीं पाठविलें. हरभटांचा मृत्यु, मार्गशीर्ष वद्य १, १६७२. त्यांची समाधी पुण्यास आहे. त्यांना एकंदर ७ पुत्र. १ कृष्णाजी, २ बाळाजी, ३ रामचंद्र, ४ त्रिंवक, ५ गोविंद, ६ भास्कर, ७ महादेव. रामचंद्रपंत, गोविंदराव इ० पुत्र प्रथम पुण्यांत राजकार्य-सभेंत होते, मग स्वतुरगी झाले. गोविंदराव हे थो० बाजीराव यांचे पाशीं आणि रामचंद्रपंत हे श्री० चिमाजीआप्पा जवळ असत. रामचंद्रपंत यांना थो० बाजीराव यांनीं २॥ सहस्र घोडदळांचे सेनापति केलें. माळव्याच्या युद्धांत (१६५७ सालीं) हे जुंझले होते. तसें च वसईच्या रणसंग्रमांत होते. त्यांत घायाळ होऊन वारले (आश्विन शुद्ध ७। १६६१). या घराण्यानें शक १६८२ पासून १८०२ पर्यंत मराठी साम्राज्याची सेवा करून कीर्ति मिळविली. घराणें मोठें असल्यानें प्रधानांच्या प्रत्येक देशाक्रमणांत पटवर्धनांचे बहुधा १४। १५ मुख्य पुरुष मदतीस असत. श्री० दादास्वामी आणि श्री० धाकटे बाजीराव यांचा या घराण्यावर रोष होता. दक्षिणेंतील सांप्रतच्या सर्व पटवर्धन संस्थानांचे संस्थापक हरभटांच्या वरील पुत्रांतील तीन पुत्र होत.

पत्रः—[पाठीमागें] (रामा)जीपंत यास (आज्ञा)पत्र पेसजीचे सनदे प्रमाणे वर्तणूक करणे गावास का(डीमात्र उपसग्र न देणे)

[प्रारंभीं] विनंति सेवक रामचंद्र हरि कृनानेक साष्टांग नमस्कार

संदर्भः—" वायाळ मंडळीच्या गांवास उपसर्ग होतो " म्हणून श्री० सदाशिवरावभाऊ यांना पत्र.

(२) **लेखकः**—रा० त्र्यंबक हरि पटवर्धन. हरभटांचे चौथे पुत्र. हे कर्नाटकांतील रणसंग्रामांत विद्यमान असत. मृत्युः—फाल्गुन वद्य १४। १६९३.

पत्रः—विनंति सेवक त्र्यंबक हरि कृतानेक (साष्टांग नमस्कार) .... सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति

संदर्भः—" कर्नाटक स्वारी " विषयीं श्रीमंत प्रधानांस पत्र.

(३) लेखकः—रा० गोविंद हरि पटवर्धन. हरभटांचे पांचवे पुत्र. थो० बाजीराव यांनीं यांना रा० इंद्रोजी कदमांच्या पथकाचें करणिक केलें. इंद्रोजीचे पश्चात् तें च पथक यांना मिळालें. यांनीं कर्नाटकांत पुष्कळ कामें केलीं. त्या मुळें त्यांना मिरजेचा गड मिळाला आणि ८ सहस्र घोडदळ ठेवण्यास अनुज्ञा मिळून त्या साठीं २५ लाखांचा सेनादाय नेमला गेला. यांचे पुत्र रा० गोपाळराव यांच्या देखत वारल्यानें धक्का बसून हे त्या नंतर लवकर च वारले. मृत्यु शक १६९४.

पत्रः—सेवक गोविंद हरि नमस्कार विनति उपर.....आपण हवाला देविला ते पावले मिति कार्तिक वद्य त्रितीया छ १५ जिलकाद बहुत काये लिहिणे हे विनंति

संदर्भः—" राजभांडारांतून २० सहस्र रु० पावल्या " विषयीं चिरंजीव गंगाधरपंतांस पत्र.

(४) लेखकः—रा० गोपाळराव गोविंद पटवर्धन. गोविंदरावांचे पहिले पुत्र. हे श्री० माधवराव प्रधानांच्या पक्षास असत. हे, रा० गोविंद शिवराम खाजगीवाले आणि रा० बाबूजी नाईक जोशी हे तिघे साडू साडू होते. कर्नाटकांतील स्वाऱ्यांत पटवर्धन प्रमुख, त्यांत हि गोपाळराव विशेष प्रमुख असत. तिकडील संस्थानिक विशेषतः हैदर, यांना फार वचके. हे अत्यंत शूर होते. भोंसल्यां वरील चढाईंत हि होते. मृत्यु माघ शुद्ध २ । १६९२.

पत्रः—राजश्रीयांविराजित राजमान्य राजश्री बलवंतराव स्वामी गोसावी यांसि

पों गोंपालराव गोविंद व मल्हारराव भिकाजी कृतानेंक नमस्कार विनंति उपरि येथील कु(शल)

संदर्भः—रा० बळवंतराव मेहेंदळे यांना, " चित्रदुर्गयुद्धा " विषयीं पत्र सर्व पत्र गोपाळराव यांच्या हातचें.

(५) लेखकः—रा० गंगाधरराव गोविंद पटवर्धन. हे गोविंदरावांचे चौथे पुत्र. यांना रा० वामनरावांच्या पश्चात् सेनादाय मिळाला. हे मिरजेस राहून कारभार करीत. नाना श्रीकरणाधिपांच्या हे लोभांतील. यांचे वेळीं यांच्यांत आणि रा० चिंतामणराव पांडुरंग यांच्यांत सेनादायाच्या वांटण्या झाल्या. यांच्या कडे मिरज आणि ४॥। लाखांचा सेनादाय आला. हे मिरज संस्थानचे संस्थापक. यांचे वंशज येथें आणि मिरजमळ्यास सांप्रत राज्य करीत आहेत. मृत्यु शक १७३१.

पत्रः—विद्यार्थि गंगाधरराव गोविद सां नम(स्कार) ..... [पाठीमागें] (कार्यसिद्धी) करावी बहुत काय लिहिणे लोंभ करावा हे विनंति

संदर्भः—" चि० केशवराव आणि चि० चिंतामणराव यांचे व्रतबंध, अनुक्रमें माघ शुद्ध पंचमी आणि दशमी शक १७०१ रोजीं आहेत " म्हणून वे० शा० सं० रामशास्त्री यांना कुंकुद्दीपत्र.

(६) लेखकः—रा० परशुरामभाऊ रामचंद्र पटवर्धन. रामचंद्र हरींचे पुत्र. श्री० सवाई रावस्वामींच्या राजवटींतील साम्राज्याचे मुख्य सेनापति. जन्मः—श्रावण शुद्ध ८ । १६६२. वडिलांचें पथक यांचे कडे आलें. रा० भाऊ प्रथम सावनूर युद्धांत जुंझले. त्या वेळीं त्यांचें वय १५ होतें. हैदरावरील एका युद्धांत यांचीं एका मागून एक अशीं तीन घोडीं मेलीं तरी भाऊ शौर्यानें लढले म्हणून २० सहस्रांचा सेनादाय यांना श्रीमंतांनीं दिला. कर्नाटकांतील पुष्कळ युद्धें, बोरघाटांतील इंग्रजांशीं युद्ध, खडर्याचें जुंझ इ० रणसंग्रामांत भाऊ प्रमुख होते. श्री० धा० बाजीरावांना प्रधानकी देण्यांत रा० नाना श्रीकरणाधिप

यांना यांचें च साहाय्य होतें. श्री० भाकटे चिमाजीआप्पा यांच्या प्रधानकीच्या भानगडींत यांचें आणि नानांचें बिनसलें त्या मुळें त्यांना कांहीं काळ वंदिवास झाला. पुढें दोघांचा समेट झाला. यांनीं तासगांव येथें वाडा, गणपतीचें मंदिर आणि प्रेक्षणीय गोपूर बांधलें. कोल्हापूरकरां वरील युद्धांत पट्टणकुडी येथें भाऊंचा अंत झाला (भाद्रपद वद्य ३ । १७२१). यांच्या पराक्रमाच्या अनेक गोष्टी प्रसिद्ध आहेत. मुद्राः—ᵕ ० श्रीगणपती । श्रीमंत पंतप्रधान चरणीं तत्पर । रामचंद्रसुत परशराम निरंतर ॥

पत्रः—सेवेसी परशराम रामचंद्र व रघुना(थराव नीळकंठ) ..... [पाठीमागें] ..... (चिरंजीव) राजश्री पांडुरंगराव व चिरंजीव राजश्री गंगाधरराव यांचे हाते सेवा घेऊन ऊर्जि { त } करणार स्वामी { सम }र्थ आहेत सेवेसी श्रृत होये कृपा कीजे हे विज्ञापना

संदर्भः—श्री० पंतप्रधान यांना, " रा० वामनराव पटवर्धनांच्या मृत्यूचें वर्तमान " कळविल्याचें पत्र.

(७) लेखकः—रा० चिंतामणराव(आप्पा) पांडुरंग पटवर्धन. गोविंद हरीचे तिसरे पुत्र पांडुरंगराव, त्यांचे हे पुत्र. सांगली संस्थानंचे संस्थापक. यांना एकंदर पटवर्धन संस्थानाच्या वांटणींत सांगली आणि ६॥ लाखांचा सेनादाय मिळाला. यांनीं च तेथील गड बांधला. तो " सिंहमुखी " होण्याचा असतां " व्याघ्रमुखी " झाला; (तो अपशकुनी) म्हणून थो० चिंतामणरावआप्पा आणि थो० धुंडीराजपंततात्या यांनीं त्याच्या मागें वसति केली. खर्ड्याच्या युद्धांत हे आप्पा होते. कित्तूर येथें धोंडी वाघा वर रा० धोंडोपंत गोखले चढाई करून गेले असतां आप्पा त्यांच्या संगतीं होते. श्री० धा० बाजीरावांनीं यांचा सेनादाय प्रतिबद्ध केला होता पण वेलस्लीच्या मध्यस्थीनें तो पुन्हां सोडून दिला. मृत्युः—आषाढ वद्य २।१७७३. यांचा वंश सांप्रत सांगलीस राज्य करीत आहे.

पत्रः—विनंति सेवक चिंतामणराव पांडुरंग कृता(नेक साष्टांग नमस्कार).....(ये वि) षई स्वामीनी समस्त ब्राह्मणास पत्र पाठविलें ते हि प्रविष्ट केलें **सेवेसीं विदित होयें हे विज्ञापनां**

संदर्भः—" प्रभु (चांद्रसेनीय कायस्थ) प्रकरण " विषयीं पत्र.

(८) लेखकः—रा०भीमराव यशवंत पानसी. पुरंदरा जवळच्या सोनेरीचे कुळकरणी. यशवंतराव हे श्रीशाहुमहाराजांचे ३०० राऊतांचे पथके. पुढें थो० बाजीरावांच्या कडे आल्या वर त्यांनीं यांना उल्हाटयंत्रशाळे वर नेमिलें. तेव्हां पासून शेवट पर्यंत पानसी मंडळी साम्राज्याच्या या शाळेचे मुख्याधिकारी होती. भीमराव हे राक्षसभुवन, तोतया, इंग्रज, इत्यादि प्रकरणांतील युद्धां मध्यें होते. तळेगांवच्या युद्धांत यांनीं फार शौर्य गाजविल्यानें (मार्गशीर्ष वद्य ८।१७००) यांना चौघडा, जरीपटका आणि ९० सहस्त्रांचा सेनादाय मिळाला. यांचा वंश सोनोरीस आहे.

पत्रः—शेवेसी भीमराव येसवत कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना येथील वर्तमान ताा छ १८ जिल्हेज पर्यंत मुकाम नजिक तलोजे यथास्थित (असे)

संदर्भः—" इंग्रज, संधी साठीं पुरंदरास श्रीमंतां कडे येत आहे " म्हणून नाना श्रीकरणाधिप यांना पत्र. सर्व पत्र भीमराव यांच्या हातचें.

(९) लेखकः—रा० शंकराजी केशव फडके. पंतप्रधानांचे पूर्वीचे उपाध्याय घराण्यांतील. साष्टी वसई प्रांत घेण्यांत उपयोगी पडल्यानें यांना तेथील देशाधिकारी मिळाली. यांच्या हातून श्री० थो० बाजीराव यांनीं अर्नाळा जलदुर्ग बांधविला. दुर्गाचे महाद्वारा वर जो शिलालेख आहे त्यांत ही गोष्ट

लिहून ठेविली आहे (श. १६५९). सर्वोत्तमपंत हे यांचे चिरंजीव. त्यांच्या कडे पश्चिम कांठा वरील जलदुर्गांची पहाणी करण्याचें काम होतें. शंकराजीपंतांचा मृत्यु, माघ १६९१.

पत्रः—विनंति शेवक शंकराजी केशव कृतानेक सा(ष्टांग नमस्कार).....[पाठीमागें] (कामकाज करावयाचें तें एक निष्ठेनें) केले हें स्वामीकार्याचे आहेत **सेवेसी विदित होये हे विज्ञापना**

संदर्भः—" बहादरपुरा (वसई) येथील उपसर्पणांतून गणेश हरी यांच्या विषयीं विनंति " पत्र श्री० चिमाजीआप्पा यांना.

(१०) लेखकः—माहादाजी बल्लाळ फडके, मूळ पुरुष बाळंभट, गुहागरचे वृत्तिवंत. पुण्यास रा० सदाशिव दीक्षित पटवर्धनांचे आश्रयास राहिले. यांचे वडील पुत्र बापूजी, दुसरे महादजी आणि तिसरे हरिपंत. हे राजकार्यसभेंत होते. बापूजी पानपतावर पडले.

पत्रः—शेवेसी माहादाजी बलाल सा नमस्कार विज्ञापना ता॥ छ ३ जाखर पावेतो यथा-स्थित असे विशेष आपण छ ३० जोवलचे पत्र पा॥ ते छ २ जाखरी

संदर्भः—गोविंदपंत खाजगीवाले यांची काशीयात्रा आणि श्रीरामराजेछत्रपति यांच्या राणी-वशा विषयीं पृच्छा; " नाना श्रीकरणाधिप यांस पत्र (कार्तिक शुद्ध ५ । १६८९). सर्व पत्र माहादाजीपंत यांच्या हातचें.

(११) लेखकः—रा० हरि बल्लाळ फडके. बाळंभट यांचे तिसरे पुत्र. प्रथम राजकार्यसभेंत लेखक. पुढें श्री० थो० माधवराव यांनीं दिवसेंदिवस यांना मोठमोठ्या अधिकारां वर नेमिलें. " गाडदी " म्हणून यांचा, सैन्यांतील पहिला उल्लेख आहे. शक १६९१ पासून राज्याचे मुख्य सेनापति झाले; नाना श्रीकरणाधिप यांचे विश्वासु; बारभाईंत प्रमुख. कर्नाटक, भोंसले, इंग्रज इ० युद्धांत हे च सेनापती होते. मृत्युः- ज्येष्ठ वद्य ७। १७१५. यांचा वंश पुण्यास आहे.

पत्रः--सेवेसी हरि बलाल कृतानेक साष्टांग नमस्कार विज्ञापना ता॥ छ १ मोहरम सायंकाल सु॥ पारनेर वर्तमान यथास्थित असे विशेष स्वामीनीं पत्र पो॥ ते पा(वले)

संदर्भः—" श्री० थो० माधवराव युद्धा वरून परत आले. शनवारवाड्यांत प्रवेशाचा मुहूर्त; गुरुवारीं सायंकाळीं घटका दीड घटका दिवस राहिला असतां प्रवेश करावा, म्हणून ठरल्याचें " नाना श्रीकरणाधिप यांना पत्र. सर्व पत्र हरिपंततात्यांच्या हातचें. हें युद्ध म्हणजे श्री० दादांशीं धोडप येथील. गुरुवार म्हणजे ज्येष्ठ शुद्ध ३।१६९० चा गुरुवार.

(१२) लेखकः—रा० जनार्दन बल्लाळ भानु. बल्लाळ म्हणजे बाळाजी महादेव; हे मूळचे वेळासचे. ते आणि श्री० बाळाजी विश्वनाथ भट हे उभयतां घाटा वर आले. बाळार्जानानांना प्रधानकी मिळाली. तेव्हां च बल्लाळपंतांस श्रीकरणाधिपाचें पद मिळालें. ते दिल्लीस स्वराज्याच्या राजपत्रांच्या युद्धांत पडले; म्हणून जनार्दनपंतांस वडिलांचें पद मिळालें. मृत्युः-कार्तिक १६७८.

पत्रः—गो॥ जनार्दन बलाल नमस्कार विनति उपरि येथील कुशल ता॥ छ ३ रबिलाखर जाणून स्वकीये लिहित गेले पाहिजे विशेष दरमाहेकडे सालमजकुरी (ऐवज)

संदर्भः—" ब्रह्मेंद्रस्वामी पुढें श्री० नानास्वामि भेटीचें द्रव्य किती ठेवीत ? " म्हणून, पृच्छा. सर्व पत्र जनार्दनपंतांच्या हातचें.

(१३) लेखकः—रा० बाळाजी जनार्दन अथवा नाना श्रीकरणाधिप. " खूप शर्तीनें महाराष्ट्र साम्राज्य राखणारे " प्रसिद्ध राजकार्यधुरंधर. तत्कालीन (मागें आलेल्या) " तिन्हीं शहाण्यांना "

या " अर्ध्या शहाण्यानें " पालथें घालून शेवट पर्यंत साम्राज्यसेवा केली. जन्मः–माघ वद्य ४।१६६३. यांचें चरित्र सुप्रसिद्ध आहे च. मृत्युः–फाल्गुन वद्य ३।१७२१. यांचे वंशज पुण्यास वेलबागेंत आहेत.

पत्रः—शेवेशी विज्ञापना आज्ञे प्रों कूच करून चाकुराकडे गेलों तेथे उभे राहातों कोठे मुकाम करावयाचा त्याची आज्ञा सत्वर आली म्हणजे त्या प्रो मुकाम करू तावत्काल पर्यंत उभे (च असतों हे विज्ञापना)

संदर्भः—" भोंसल्याच्या युद्धा " विषयीं थो० माधवराव यांना पत्र (आश्विन शुद्ध १५। १६९०). सर्व पत्र नानांच्या हातचें. सर्व छापलें आहे.

(१४) लेखकः—रा० बाबूराव राम फडणीस. रामाजीपंत भानु हे जनार्दन बल्लाळ यांचे चुलते. यांचे बाबूराव हे पुत्र. श्री०नानास्वामि आणि श्री० थो० माधवराव प्रधान यांचे वेळीं श्रीकरणाधिप होते. मृत्युः–श्रावण शुद्ध ६।१६९४.

पत्रः—**चिरंजीव राजमान्य राजश्री जनार्दनपंत यांस प्रति बाबूराव राम आसीर्वाद उपरि येथील कुशल ता। छ ५ जिल्काद जाणून स्वकीये लिहिणे**

संदर्भः—" आपल्या वाड्याच्या बांधणीस अडथळा होतो " म्हणून जनार्दन बल्लाळांना पत्र (भाद्रपद शुद्ध ७।१७७६). सर्व पत्र बाबूराव यांच्या हातचें.

(१५) लेखकः—रा० मोरो बाबूराव फडणीस. बाबराव राम यांचे पुत्र. यांचा वाडा पुण्यास सांप्रत आहे, तेथें पूर्वी प्रधानांची ' रथशाळा ' होती. थो० माधवराव यांच्या वेळीं हा वाडा बांधला. यांचा वंश पुण्यास आहे. हे साधारणतः श्री० दादास्वामि यांचे पक्षपाति. तथापि श्री० थो० माधवरावांनीं यांना आणि रा० नानांना मिळून श्रीकरणाधिपपद दिलें (भाद्रपद वद्य १३।१६८५). नाना पुण्यास रहात आणि मोरोवादादा श्रीमंतां समागमें युद्धां वर जात. मृत्यु शक १७२०.

पत्रः—पो मोरों बाबुराव सां नमस्कार विनंति उपरि... (का)रकुना पासून लिहिण्याचे कामकाज घेतो म्हणून लिहिले उतम आहे बोभाट न ये ते करावे बहुत काये लिहिणे लोभ कीजे हे विनंति

संदर्भः—" सेना पाठविल्या " विषयीं पत्र.

[छायाचित्र–पान १२]

(१) लेखकः—रा० रामाजी महादेव बिवलकर (आंग्रे). वसई-साष्टी-कल्याणचे देशाधिकारी. प्रधान–आंग्रे आणि वसईग्रहण प्रकरणांत प्रमुख. ठाणें येथील कौपिनेश्वराचें मंदीर श्री० चिमाजीआप्पांच्या आज्ञेनें रामाजीपंतांनीं बांधलें. इंग्रजींत प्रारंभीं बिवलकर हे कुलाब्यास आंग्र्यांचे कारभारी होते. म्हणून सांप्रत तें च आडनांव लावतात. मृत्युः—साधारणतः शक १६९४ श्रावण, पुणें येथें. यांचा वंश पुण्यास आहे.

पत्रः—**विनति सेवक रामाजी माहादेव प्रो ठाणे साष्टी चरणावरी मस्तक ठेऊन सां नमस्कार विनति विज्ञापना ता। छ १९ मोहरम आस्तमान पावेतो**

संदर्भः—" वसई–युद्धा विषयीं," श्री० चिमाजीआप्पांना वार्तापत्र. सर्व पत्र पंतांच्या हातचें.

(२) लेखकः—रा०नारो बल्लाळ भुसकुटे (गाडगीळ). यांचा वंश बुऱ्हाणपूर आणि टेंभुर्णी येथें नांदत आहे. खानदेश–बुऱ्हाणपुरा कडील प्रांत यांच्या हाता खालीं होता. शक १६८९ मध्यें हंडिया

प्रांताचे हे देशाधिकारी होते. यांच्या टेंभुर्णी गांवचें उत्पन्न त्या वेळीं ८६०१ रु० होते. यांनीं मकडाई प्रांत जिंकला म्हणून श्री० नानास्वामींनीं यांना तिकडील मंडलोई आणि कानुगोई दिली (माघ वद्य ११।१६७५). या च घराण्यांतील श्री० अमृतराव (श्री० दादास्वामि प्रधान यांचे दत्तक पुत्र) प्रधान होत. मूळ गांव पापडी (वसई).

पत्रः--पो नारो बलाल भुसकुटे कृतानेक सां (नमस्कार)...(आपणा)स लिहिले आहे बहुत काय लिहिणे हे विनति

संदर्भः--" श्री० राघोबादादा प्रकरण; महंमद इसफचा पाठलाग. " गोविंदपंततात्या खाजगीवाले यांना पत्र (ज्येष्ठ १६९७).

(३) लेखकः—रा० अंताजी माणकेश्वर गंधे. कामरगांवचे जोशी कुळकर्णी. प्रथम श्रीशाहुमहाराज यांच्या पदरीं उदयास आल्या वर मग थो० बाजीराव यांचे हस्तक बनले. प्रधानां कडून दिल्लीस सेनापति. शक १६७० पासून पानपता पर्यंत उत्तरे कडील राजकारणांत आणि देशाक्रमणांत शिंदेहोळकरबुंदेले यांच्या प्रमाणें अंताजीपंत हि प्रमुख होते. सखारामबापू हे, यांचे व्याही. पानपता नंतर परत येतांना फरुखाबादच्या भूमीयानें पंता वर छापा घालून त्यांना मारलें. यांचा वंश भेलशा कडे ' मांडके ' आडनांवानें विद्यमान आहे. मुद्राः-मुद्रैषा शंभुचरणद्वंद्वनिष्ठस्य सर्वदा । माणिकेश्वरसंभूतं अनंतस्य विराजते ॥

पत्रः--.....(सदैव) पत्र पाठऊन सांभाल करीत आसिले पाहिजे बहुत काये लिहिणें कृपा लोभ आसों दीजे हे विनंति

संदर्भः--विष्णुपंत दाजी यांना, " चिरंजीवा(वहिरव) वर लक्ष ठेवणें विषयीं " पत्र (पौष वद्य १३ । १६६८).

(४) लेखकः--रा० यमाजी शिवदेव चावरे (मुताल्लिक) वामणोलीकर. प्रथम परशुरामपंत प्रतिनिधी यांचे लेखक. त्या नंतर पंतप्रधानांनीं यांना प्रतिनिधींचे उपमंत्रि नेमलें (शक१६६४-६५); त्या मुळें पुढें तें च (मुताल्लिक) आडनांव. हे व यांचे बंधु अंताजीपंत दोघे हि प्रधानपंतांचे प्रतिस्पर्धी होते. यांचे विद्यमान वंशज सामंत नानाराव हे साताऱ्यास असतात. पंतांची मुद्राः-श्रीस्वामी श्रीराजा शाहु छत्रपती महिपालक । तस्य यमाजी सीवदेव सुभेदार ॥

पत्रः--सेवेसी विनंति सेवक येमाजी सीवदेऊ कृतानेक विज्ञा{ पना } ता। बुधवार आस्तमान साहेबाचे कृपेकरून सेवकाचे वर्तमान मुकाम (चिमणगाव)

संदर्भः--" रा० बाबूजी नाईक जोशी यांच्या प्रतिनिधी वरील चढाई संबंधीं " थो० बाजीराव यांना पत्र. सर्व पत्र पंतांच्या हातचें.

(५) लेखकः—रा० अंताजी सिवदेव मुताल्लीक. यमाजीपंतांचे बंधु. विशाळगड घेण्याचे वेळीं श्रीनिवासपंत प्रतिनिधी यांचे समागमें होते, त्या मुळें छत्रपतींची कृपा झाली. यमाजीपंतांच्या समागमें बहुतेक कार्यांत विद्यमान. मुद्राः—श्री राजाशाहु छत्रपती महिपालक । अंताजी सिवदेव तस्य सेवक ॥

पत्रः—श्री भवानी प्रसन्न

सेवेसी विनंति सेवक आंताजी सिवदेव व रामाजी नाईक वाकडे कृतानेक विज्ञापना ता। छ २६ मोहरम रविवासर प्रहर रात साहेबाचे कृपे करून

Gov.Photozinco.Office Poona./933.

Govt: Photozinco Office. Poona. 1933.

संदर्भः—" बराणजी मोहिते आणि निजाम यांच्या विषई " पंतप्रधानांस वार्तापत्र. सर्व पत्र पंतांच्या हातचें.

(६) लेखकः—रा० नारो शंकर दाणी, सासवडकर (राजेबहादर). शंकरराव प्रथम निजामा कडे सेवेस. नारोपंत प्रथम उदाजी पवार यांचे स्वतुरगी (शक १६४२); नंतर माळव्याचे देशाधिकारी. बुंदेलखंड हस्तगत करण्यांत प्रमुख म्हणून झांशीचा देशाधिकार मिळाला (१६६४); तो १४ वर्षें होता. पुढें कर्नाटकयुद्धांत प्रमुख. पानपताच्या वेळीं दिल्लीच्या रक्षणाचे आणि युद्धसाहित्य पोहोंचविण्याचे कामीं नेमणूक. श्री० राघोबादादा, प्रधान झाल्या वर नारोपंतांस प्रतिनिधीपद मिळालें. दिल्लीच्या शहानें यांना राजेबहादर पदवी आणि मालेगांव सेनादाय दिला. तेथील किल्ला 'खानदेशचें नाक' होता. नाशिकचें रामेश्वरचें देऊळ पंतांनीं बांधून, तेथें वसईहून आणलेली फिरंगी (सांप्रतची नारो शंकरी) घंटा ठेविली. मृत्युशक १६९६. यांचा वंश मालेगांवीं आहे. मुद्राः–श्रीराजारामछत्रपति कृपानिधि । नारो शंकर पंडित प्रतिनिधी ॥ (२) ० श्री ˘ मंगलमूर्तीचरणी तत्पर । नारो शंकर निरंतर ॥

पत्रः—(अत्रे यास आम)चा कांहीं आश्रा नाहीं **बहुत काये लिहिणे लोभ आसा द्रीजे हे** विज्ञा

संदर्भः—" सासवडकर अत्रे यांची कड घेतल्या विषयीं खुलासा "; अंबाजीपंत पुरंदरे यांस पत्र.

(७) लेखकः—रा० चिंतो विठ्ठल रायरीकर. मुंठें खोऱ्यांतील रायरीचे जोशी. सखाराम बापूच्या वर्गानें श्री० दादास्वामी कडे प्रवेश. शेवट पर्यंत त्यांच्या च पक्षाचे. मध्यंतरीं यांना भानूंचा श्रीकरणाधिपाचा अधिकार मिळाला होता, पण राक्षसभुवनाचे युद्धा नंतर तो पुन्हा भानू कडे गेला. महादजी शिंदे यांनीं, श्री० नारायणरावांच्या वधाच्या आरोपा वरून यांना पकडून मृत्यू पर्यंत उज्जनीस बंदींत ठेवलें. तेथें संन्यास घेऊन हे वारले (शक १७०३). यांचे वंशज सध्यां पुण्यास आहेत.

पत्रः— पो चिंतो विठल सां नमस्कार विनति..... **रा। २५ जिल्काद सु॥ इहिदे समानीन बहुत काय लिहिणे हे विनंति सदरहु येवज सरकारात पावता करून कबज घेतल्यास तुमचे खत रद (असे हे विनंति)**

संदर्भः—" ऋण घेतल्या विषयीं त्र्यंबक महादेव यांस, " पत्र (कार्तिक वद्य ४ । १७०२).

(८) लेखकः—रा० विसाजी गणेश (खांडेकर ?). हे थोरले बाजीराव पंतप्रधान यांचे वेळीं उत्तरे कडील कामा वर असत. विशेषतः माळव्या मध्यें यांचा प्रचार होता. धारकर रा० यशवंतराव पवार यांच्याशीं यांचा विशेष स्नेह होता. तसें च रा. बाबूजी नाईक बारामतकर हे हि यांचे स्नेही होते. पुणें येथें रविवार पेठेंत असलेला पवारांचा वाडा यांनीं च श्री. आप्पास्वामींच्या दृष्टी खालीं बांधला. पंतप्रधानांना लागणाऱ्या उत्तरे कडील मौल्यवान वस्तू हे तिकडून वारंवार पाठवीत असत.

पत्रः—विनंति सेवक विसाजी गणेश कृतानेक साष्टांग नमस्कार विनंति येथील वर्तमान ता। छ ३ रजब स्वामीच्या कृपावलोकने करून येथा(स्थित असे)

संदर्भः—" पवार आणि रा० बाबूजी नाईक जोशी यांच्या विषयीं, " श्री० चिमाजीआप्पा यांना वार्तापत्र. सर्व पत्र पंतांच्या हातचें.

(९) लेखकः—रा० विठ्ठल शिवदेव दाणी (विंचूरकर); निगडीचे मूळ रहिवासी. जन्म शक १५९७. साम्राज्यांतील एक शूर सेनापति आणि राजकार्यधुरंधर. नारो शंकर राजेबहादर हे,

यांच्या वडील शाखेंतील. श्रीशाहु छत्रपतींच्या सेनानायकां कडून राजसभेंत प्रवेश. दहा राऊतांच्या पथक्या पासून (शक १६४२) वाढत वाढत १६ लाख ८५ सहस्र रु० पर्यंतचे सेनादायी सेनापति झाले. उत्तर-दख्खन कडील बहुतेक युद्धांत होते. ग्वाल्हेरदुर्ग आणि दिल्ली यांनीं घेऊन शहाला हाता खालीं घातलें (१६७९). तेव्हां त्यानें यांना विंचूरचा सेनादाय आणि राजा, राजविश्वासनिधि या पदव्या दिल्या. यांनीं आपला कुलदेव नरसिंह याचें देऊळ नीरानरसिंगपुरीं बांधलें. मृत्यु श्रावण वद्य ११। १६८९. यांचा वंश पुणें आणि विंचुरास आहे.

पत्रः—विनंति सेवक विठल सीवदेऊ कृताने(क)...(नालबंद धोंडजी) व सुलबाजी पुणेकर याज बरावर नाल डबे सुमार८० व मेखा सुमार ४००० चार हजार पावल्या सेंवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति यास खर्चा(स)

संदर्भः--" शामल युद्धा " विषयीं श्री० चिमाजीआप्पांना पत्र.

(१०) लेखकः—रा० दामोदर माहादेव हिंगणे. पंतप्रधानांचे नाशीकचे उपाध्ये. महादेव भट, यांना पुत्र ४; दामोदर, बापूजी, पुरुषोत्तम, देवराव; हे सर्व दिल्ली आणि इतरत्र आपल्या वतीनें सुमंत. उत्तरेंत आणि दिल्लींत ३० वर्षांच्या अनुभवानें यांचें प्रस्थ माजलें होतें म्हणून तिकडील उलाढाल्यांत प्रमुख; आणि साम्राज्याचा पुरस्कार करण्यांत दक्ष. दामोदरताल्या १६७७ मध्यें गया-कुरुक्षेत्राचे देशाधिकारी होते. मृत्यु शक १६७९. यांचा वंश नाशिकास आणि चांदोरीस आहे.

पत्रः—श्रीमंत राजश्री पंत प्रधान स्वामिचे सो विनंति सेवक दामोदर माहादेव कृतानेक सा नमस्कार विनं(ति)

संदर्भः—श्री० पंतप्रधान यांना, " चि० गणपतरावांचे लग्नाची कुंकुमपत्रिका. " सर्व पत्र दामोदरताल्या यांच्या हातचें.

(११) लेखकः—रा० नारो त्रिंबक भट, श्रीवर्धनकर (राजमाचीकर). मूळ पुरुष माहादजी. त्यांचे पहिले पुत्र नारोपंत. नारोपंतांचे पुत्र दुसरे महादाजी, त्यांचे दुसरे नारोपंत, त्यांचे त्रिंबकपंत आणि त्यांचे हे तिसरे नारोपंत होत. यांच्या कडे राजमाची गडाची मुद्राधारी असल्यानें पुढें राजमाचीकर आडनांव पडलें. हे शक १६८६ च्या उंदेरी जलदुर्गाच्या राजकारणांत होते. यांचा वंश पुण्यास आहे.

पत्रः—आज्ञाधारक नारो त्रिवक चरणावर मस्तक ठेऊन सिरसास्टांग नमस्कार विज्ञप्त ता। छ २२ जिल्हेज पावेतो सेवकाचे प्रांत राजापूरचे वर्तमान यथास्थित असे विशेष साम्रत ये प्रां(ती)

संदभः—" कोंकण-जंजिरा युद्धा " विषयीं, श्री० भाऊस्वामींना पत्र (शक १६८०). सर्व पत्र पंतांच्या हातचें.

(१२) लेखकः—रा० शिवाजी बल्लाळ जोशी, गराडेकर. थो० माधवराव पंतप्रधान यांचे श्वशुर. राजपथकाचे लेखक. पहिली मुलगी (नर जोशी यांची नात) मुळाची निघाली म्हणून तिला नकार देऊन शिवाजीपंतांच्या कन्या रमाबाई यांच्याशीं श्रीमंतांचें लग्न लागलें. मिरजेचा गड प्रथम डुबला कडे श्रीशाहुमहाराजांनीं दिला होता, तो पुढें श्री० नानास्वामि यांनीं यांना दिला होता(१६७५). नंतर त्यांच्या कडून काढून थो० माधवरावांनीं पुन्हा पटवर्धनांकडे दिला. यांचा वंश पुण्यास आहे.

पत्रः—आज्ञाधारक शिवाजी बलाल चरणावरी मस्तक ठेऊन साष्टांग नमस्कार कृतानेक विज्ञापना तागा (येत)

संदर्भः—" पथका विषयीं, " श्री० भाऊस्वामि यांना पत्र. सर्व पत्र पंतांच्या हातचें.

(१३) लेखकः—रा० नारो बाबाजी अभ्यंकर (नगरकर). मूळ गांव गांवडें अंबेरें. नारोपंत घाटा वर आले. यांना प्रथमतः थो० बाजीराव यांनीं सासवडास आपल्या घरकारभारा वर नेमिलें. मग वाढत वाढत नगरगडाचे मुद्राधिकारी झाले. नारायणराव व्यंकटेश (पहिले) यांच्या नंतर हे धारवाड प्रांताचे देशाधिकारी होते. यांचे कडे नगरगड शक १६८७ पासून शेवट पर्यंत होता. हे कान्हूर येथें काळ-पुळीनें कार्तिकी अमावस्या शक १६९७ मध्यें वारले. नंतर यांचे पुत्र रा० माधवराव यांचे कडे नगरगड शक १७१२ पर्यंत होता. पत्रांत यांचें आणि धोंडोपंतांचें नांव आहे. धोंडो विश्वनाथ जोशी हे नारोपंतांचे आश्रित पण फार घरोब्याचे होते. पुढें माधवरावांचे पश्चात् त्यांचे पुत्र रा० रामचंद्रराव यांचे कडे नगरगड शक १७१७ पर्यंत होता. त्या नंतर तो रा० दौलतराव शिंद्यांना दिला. या घराण्यास प्रधान-घराणें घरोब्यानें वागवी. नगरगडा प्रमाणें देवगिरी दुर्ग हि या घराण्या कडे पुष्कळ वर्षें होता. रामचंद्रपंतांचे वडील पुत्र लक्ष्मणराव आणि त्यांचे धाकटे रामचंद्रराव. हे ब्रह्मावर्तास श्रीमंतां संगें गेले होते. तेथें यांच्या कन्येशीं श्रीमंतांनीं लग्न केलें. या पत्नीचें नांव सौ• सत्यभामाबाई होय. लक्ष्मणरावांचे भाऊ शिवराव यांचे वंशज रा० चिंतामणराव हे सांप्रत कान्हूर येथें असतात. तसें च माधवरावांचे वडील पुत्र यशवंतराव यांचे वंशज मोरो वामन हे पुण्यास असतात.

पत्रः—पो नारो बाबाजी सा नमस्कार विनति.....(वर्तण)क करू श्रीमत राजश्री बापूचे पत्र आले होते त्याचे उतर लिहून पाठविले आहे बहुत काये लिहिणे लोभ असो दीजे हे विनति

संदर्भः—" बारभाई–प्रकरण. चि० धोंडोपंत आणि चि० माधवराव नगरच्या गडांत आहेत. मा० पार्वतीबाई आणि मा० गंगाबाई पुरंदरास गेल्या " म्हणून नाना श्रीकरणाधिप यांस पत्र (माघी अमावस्या शक १६९५). शनवारवाड्याचीं लांकडें नारोपंतांनीं आणलीं म्हणून त्यांना टोपण आडनांव " लकडे " पडलें.

(१४) लेखक—रा० निळो महादेव चांदोरकर. उंदेरी जलदुर्गाचे मुद्राधारी. मूळगांव रत्नागिरी जवळचें, चांदोर. यांच्या पूर्वजांची एक शाखा सागर कडे रा० गोविंदपंत बुंदेले यांच्या समागमें गेली. त्यांतील रा० विसाजी गोविंद हे, रा० गोविंदपंतांचे जांवई होते. यांनीं पानपता नंतर रा० बाळाजी गोविंद खेर यांच्या सह पुन्हां बुंदेलखंड हस्तगत केला. म्हणून श्रीमंतांनीं यांना सागरचे देशाधिकारी नेमिलें. त्यांनीं २० वर्षें हें काम केलें. यांच्या वंशजास तिकडे ' सुभेदार ' म्हणतात. चांदोरकरांची दुसरी शाखा रा०केशव संभाजी यांची. हे कोंकणांतून घाटा वर येऊन वाघोलीस रा०पिलाजीराव जाधवांचे पदरीं कारभारी म्हणून राहिले. तेथें आणि जाधवांचे वाडीस यांचे वाडे, वृत्तीभूमी होती. पिंपरी ग्रामगणाची करणिकी यांना होती. त्यांचे तीन पुत्र, पुन्हां सागर कडे अधिकारा वर होते. त्यांच्या पासून म्हणजे केशवबाबा पासून संपादकांतील एक संपादक आबा चांदोरकर हे सहावे वंशज होत. चांदोरकरांच्या तिसऱ्या शाखेंतील रा० कृष्णाजीपंत हे श्री० बाळाजी विश्वनाथ प्रधानांच्या वेळीं राजसेवक होते. त्यांचे पुत्र रा० महादाजीपंत यांनीं " पन्नास वर्षें राजसेवा केली. " हे प्रथम राजकार्यसभेंत लेखक आणि मग आयव्ययपरीक्षक होते. यांचे पुत्र पत्रलेखक रा० निळोपंत होत.

पत्रः—सेवेसी निलो महादेव चांदोरकर मुक्काम जंजिरे उंदेरी चरणावर मस्तक ठेऊन सां नमस्कार विज्ञापना तगाईत छ ११ सावान पावेतो सेवकाचे व तो मजकूरचे वर्तमान यथास्थित असे विशेष ३० रजबी सं(ध्याकाळचे प्रहर दिवसास खांदेरकर यानी चार गोळे आपले किल्यावर टाकले)

संदर्भः--" इंग्रजाची उंदेरी वरील चढाई, आपण इंग्रजांस धुडाऊन दिलें " म्हणून श्री० पंत-प्रधानांस वार्तापत्र (फाल्गुन शुद्ध १३ । १७१५). सर्व पत्र निळोपंतांच्या हातचें.

(१५) लेखकः—रा० बाळाजी नारायण नातु. प्रथम हसबनीस; रास्ते इत्यादि कडे लेखक. नंतर राजकार्यसभेंत लेखक. वसईचे संधी नंतर था० बाजीराव यांचे कडून इंग्रजांकडे २०० रु. वेतना वर. शक १७४० नंतर सातारकर श्रीप्रतापसिंह छत्रपतींचे कांहीं दिवस कारभारी होते. था० शहाजीछत्रपति यांना गादी वर बसविण्यांत यांनीं सहाय्य केलें. सांप्रत यांचे वंशज पुण्यास आहेत.

पत्रः--पो वालाजी नारायण नातु सा नमस्कार विनंति ये(थील कुशल).....(सह परिवारें येऊ)न कार्यसिद्धी करावी बहुत काय लिहिणे लोभ करावा हे विनंति

संदर्भः--" चि० दाजीबा यांचा व्रतबंध फाल्गुन शुद्ध १०।१७४५ दिवशीं आहे, " म्हणून रा० नारायणराव वैद्य वांईकर यांना कुंकुमपत्रिका.

[छायाचित्र—पान १३]

(१) लेखकः—रा० खंडेराव (आप्पा) हरि भालेराव, मूळ गांव बोरसद. येथील जोशी. हरिपंताचे वडील रामाजी आणि आजे बावाजी हे थो० बाजीराव यांच्या वेळीं माळव्यांत कामा वर होते. खंडेराव हे रा०महादजी शिंदे यांचे सेनापति आणि मराठी साम्राज्याच्या वतीनें दिल्लीचे देशाधिकारी. यांचे पंज्यांत दिल्लीचा शहा होता (शक १७०६). यांनीं गोहदकरांचें आणि बुंदेलखंडचें बंड मोडलें. इस्माइल बेगास पकडल्यानें शहाची यांचे वर कृपा होती. यांचे बहुतेक पराक्रम आणि राजकारणें उत्तरे(विशेषतः दिल्ली)कडे घडलीं. यांनीं च प्रथम डिवाईन कडून शिक्षित पायदळें निर्माण केलीं. वृद्धपणीं संन्यास घेऊन मग यांनीं दिल्लीस यमुनेंत जलसमाधि घेतली. शक १७१९ आषाढ शुद्ध १. छत्री निगमोदा घाटा वर. यांचे वंशज रा० भास्कर रामचंद्र हे ग्वाल्हेरीस असतात.

पत्रः—पो खंडेराव हरि कृतानेक साष्टांग नमस्का(र)...(कमावीसदा)रास ताकीद पत्राची आज्ञा जाली पा सेवक पदरचा आहे सेवेसी श्रुत होय विज्ञप्ति

संदर्भः—" सुजालपूरहून रावजीस पाठविलेलें उत्तरे कडील वार्तापत्र " (चैत्र शुद्ध ५।१७०४).

(२) लेखकः—रा० यशवंतराव महादेव महाडकर, कोशाधिकारी. यांचे वडील महादेव (महादाजी) यांस थोरले श्रीशिवछत्रपति यांनीं राजगृहाधिकार दिला होता; त्यांचे वर्डील बंधु, पुरंदर लढविणारे प्रख्यात मुरार बाजी होत. यशवंतराव हे महादजीचे तिसरे पुत्र. यांना थो० शाहुमहाराजांनीं कोशाधिकार दिला. यांनीं जंजिऱ्याचें आणि रायगडचें कारस्थान केल्यानें रायगड " तख्ताची जागा " शामला कडून पुन्हां स्वराज्यांत आली. यांचा वंश उरवडें आणि पुणें येथें आहे.

पत्रः—पोष्यांकित येसवंतराऊ महादेव साष्टांग (दंडवत)...(बहुत) काय लिहिणें कृपा लोभ असो दीजे हे (विनंति)

संदर्भः—" रायगडाच्या मामल्या विषयीं " थो० बाजीराव यांना पत्र.

(३) लेखकः—रा० रामचंद्र (बाबा) मल्हार सुकठणकर. पंतप्रधानांच्या वतीनें शिंद्यां कडे नेमणूक. कांहीं दिवस त्यांचे कारभारी हि होते. राजकार्यधुरंधर आणि श्री० नानास्वामींच्या कृपेंतील. मृत्युः-आश्विन वद्य ३।१६७६. यांचा वंश गोमांतकांत आहे.

पत्रः—पोप्य रामचंद्र बावाजी कृतानेक दंडवत प्रणाम विनंति उपरि यथील कुशल जाणून स्वकीय कुशल लेखने संतोप पाववीत असिले पाहिजे विशे(ष)

संदर्भः—" कोंकण प्रकरणा विषयीं आणि चि० विठोवा सह कुटुंबाचा परामर्ष घेण्या विषयीं " रा० महिपतरावदादा यांस पत्र. सर्व पत्र बाबांच्या हातचें.

(४) लेखकः—रा० विठल विश्राम धुमे. सावंतवाडीकरांचे कारभारी. कोल्हापुरकरांस त्रास देत. श्री० माधवराव प्रधान यांनीं कोल्हापूरकरांचा पक्ष घेऊन विठलपंतांस कोपळगडा वर बंदींत ठेवलें होतें. यांचा वंश गोमांतकांत आहे.

पत्रः—सेवेसी विठल विश्राम विज्ञापना हेदवटीचा सितोला दौलतराव या बाबत कज्याचा आम्हासी सुलाखे येऊन भेटला मुख्य गोष्ट आपला अप(राध नाहीं)

संदर्भः—" शितोळें भांडण " सर्व पत्र विठलरावांच्या हातचें.

(५) लेखकः—रा० जिवाजी खंडेराव संदेशलेखक. खंडो बल्लाळ यांचे वडील पुत्र. खंडोबांच्या पश्चात् संदेशलेखकाचें पद यांना मिळालें. मृत्युः—पौष वद्य ७ ।१६६४. यांचा वंश वोरगांव येथें आहे.

पत्रः—पो जिवाजी खडेराऊ दंडवत प्रा विनंति येथी(ल)..... (जाव अगत्य) रूप आणवणे बहुत काये लिहिणे हे विनति

संदर्भः—" चेऊलच्या सरदेशमुखी " विषयीं, अमृतरावांस पत्र.

(६) लेखकः—रा० गोविंदराव (बाबा) खंडेराव संदेशलेखक. खंडो बल्लाळ यांचे धाकटे पुत्र. आपले कामांत तत्पर. श्रीशाहुछत्रपति, राणी सौ०सगुणाबाई, तसेंच विरूबाई आणि श्री० नानास्वामि प्रधान यांचा लोभ फार. महाराजांच्या अंतकाळीं प्रधानांनीं यांच्या विचारानें राज्याची व्यवस्था ठरविली. पुढें शेवट पर्यंत साताऱ्यास छत्रपतींच्या जवळ वास. मृत्युः—आषाढ शुद्ध २ ।१७०७. मुद्राः—०श्री ˘ जीवाजी प्रभु पुत्रस्य रामरावस्याधिमता । मुद्रा सर्व गुणोपेता राजसन्मान वर्धिनी ॥ संदेशलेखकाचा अधिकार गोविंदरावांचे पुतणे रामराव यांना मिळाल्यानें त्यांची च मुद्रा गोविंदराव वापरीत.

पत्रः—पोप्य गोविंद खंडेराव कृतानेक सा॥ दंडवत प्र॥ विनंति उपरि येथील कुशल जाणून स्वकीये कुशल ल्याहावयासी आज्ञा केली पाहिजे या नंतर

संदर्भः—" मा० अंबिकाबाई दाभाडे कडील लक्ष्मण जाधवास सेवेकरी ठेवण्या " संबंधीं, पंतप्रधानांस विनंतिपत्र. सर्व पत्र गोविंदरावांच्या हातचें.

(७) लेखकः—रा० माधवराव प्रयाग फणसे. औरंगझेब सातारा दुर्ग घेत असतां ज्या प्रयागजींनीं त्याचें मोठ्या शौर्यानें रक्षण केलें त्यांचे हे माधवराव पुत्र होत. यांचा वंश साताऱ्या कडे आहे.

पत्रः—सेवक माधवराव प्रयाग प्रभु कृतानेक साष्टांग दंड(वत) .... गावकराची पत्रें पाठविली तेथें कितेक दावे बद करावयाचा विचार त्याचे चितांत आहे बरें काये चिता आहे जे त्याचे थोरपणास

संदर्भः—" शिंद्याकडे द्रव्य द्यावयाची आज्ञा, तरी दोन महिन्यांचा अवधि द्यावा " म्हणून, नाना श्रीकरणाधिप यांस पत्र. प्रयागजींची मुद्राः—०ू श्री शिवचरणी तत्पर । प्रयाग अनंत निरंतर ॥

(८) लेखक:--रा० बाबुराव हरि गुप्ते. मुसेखोऱ्यांतील आंबेगांवचे. हे आणि यांचे बंधु सखाराम हरि यांना प्रथम जंजिरायुद्धांत (शक १६५६) पराक्रम गाजाविल्यानें थो० बाजीराव यांनीं पथके बनविले. थो० माधवरावांच्या वेळीं या दोघा भावांनीं अनेक युद्धांत शौर्य गाजविलें. पुढें दोघे हि श्री० राघोबादादांचे कट्टे अभिमानी बनले. त्यांनीं बाबूरावांस अमात्यपद दिलें (१६८३), तें ४॥ वर्षें होतें. यांस " एकांड्या " म्हणत. यांचे हातून प्रधानपंतांनीं पुण्याच्या पेठा वसविल्या. श्री० नारायणरावांच्या वधांत यांचें व सखारामबापूंचें अंग होतें असें वाटल्यानें दोघांना बंदिवास झाला. यांचे वंशज बडोद्यास आहेत.

पत्र:--पोष्य बबुाराव हरि सां दंडवत प्रणाम... . कृपा करून आमचे स्मरण धरून आज उद्या मनाचिठी येई ते केले पाहिजे बहुत काये लिहिणे लोभ आसो दिला पाहिजे हे विनंति

संदर्भ:—" ऋण फेडण्या " विषयीं नारोपंतनाना (तुळसीबागवाले ?) यांस विनंतिपत्र.

(९) लेखक:--मा० येसुबाई आळ डफळे; जत संस्थानच्या राणी. संस्थानचें संस्थापक रा० सटवोजीराव यांचे पुत्र बाबाजीराव, त्यांचें कुटुंब या येसुबाई. यांनीं जत संस्थानचा कारभार शक १६२८ पासून शेवट पर्यंत पाहिला. श्री० थो० शाहुमहाराजांच्या आश्रयास (दिल्लीकरांचा आश्रय सोडून) या राहिल्या. या फार सच्छील असून यांचें उपास्य दैवत बेळगांव जिल्ह्यांतील रामतीर्थ येथील रामेश्वर होय. अद्यापि हि तिकडील लोक यांना दुसऱ्या अहिल्याबाई (होळकर) म्हणतात. मूल नसल्यानें पुतणे यशवंतराव यांना यांनीं गादी दिली. या उमराणीस शक १६७९ मध्यें वारल्या. यांचा वंश जतेस राज्य करीत आहे. यांचे पुढील वंशज अमृतराव डफळे. यांची मुद्रा:-श्रीरामलिंग श्रीराजा श्रीशहाजी छत्रपति चरणी तत्पर । अमृतराव डफळे देशमुख परगणे जत करजगी निरंतर ॥

पत्र:--आज्ञाधारक येसुबाई डफली देसमुख समत ४.....(लिहिणे) शक्त नव्हे हे वीनती

संदर्भ:—" उदाजी चव्हाणानें मिरजे कडे धामधूम चालविली म्हणून आज्ञे प्रमाणें आम्ही तिकडे जातों, " असें मा० ताराबाई यांना पत्र.

(१०) लेखक:—रा० कान्होजीराव आंग्रे. खरें आडनांव सकपाळ. मूळ गांव हर्णे जवळची आंगरवाडी, म्हणून आंगरे. वडिलांचें नांव तुकोजीराव. यांस थो० शिवछत्रपतींच्या नौकादलांत २५ राऊतांचा अधिकार होता. शक १६१२ चे वेळीं कान्होजीराव हे सुवर्णदुर्गाचे सेनानि होते. संभाजी आणि थो० राजारामछत्रपति यांच्या राजवटींत यांनीं साम्राज्याची फार सेवा केली. राजाराम महाराजांनीं यांना ध्वजवृंदाधिकारी पदवी देऊन साम्राज्याच्या सर्व नौकादळाचे मुख्य अधिकारी केलें. इंग्रज, फिरंगी आणि मुसुलमान या तिन्ही राजसत्तांना ३० वर्षें यांनीं चळचळां कांपावयास लाविलें. यांनीं लोहगड भाऊपणाची शपथ घेऊन श्री० नानास्वामींस दिला. मृत्यु:-शक १६५१. मुद्रा:-० श्री ˘ राजाराम चरणीं सादर । तुकोजीसुत कान्होजी आंगरे निरंतर ॥ (२) ˘ श्री ० श्रीशाहुनृपतिप्रीत्या तुकोजीतनुजन्मना । कान्होजी सरखेलस्य मुद्रा जयति सर्वदा ॥ यांचा वंश अलिबागेस आहे.

पत्र:—(आलंकृ)त राजमान्य श्रो कान्होजी आंगरे सरखेल राम(राम)....(बहुत काय) लिहिणें रा॥ छ १७ माहे रबिलोवल हे विनती [स० मु०] " मोर्तबसुद "

संदर्भ:—" सिनाजी बेरड यास पाठविला आहे," म्हणून थो० बाजीराव यांना पत्र.

(११) लेखक:—रा० सेखोजीराव आंगरे. कान्होजीरावांच्या सहा मधील पहिले पुत्र. मराठी साम्राज्याचे नौकादलाध्यक्ष. मृत्यु शक १६५५.

पत्रः—...आलंकृत राजमान्य श्रीो सेखोजी आंगरे सर(खेल) ..... छ १७ माहे रबिलोवल बहुत काय लिो लोभ असों दीजे हे विनती [स० मु०] " मोर्तबसुद "

संदर्भः—" जावजी मराठ्याचे सामाना विषयी, श्री० वाजीराव पंडित प्रधान दाजी " यांना पत्र (फाल्गुन शुद्ध ४ । १६५१).

(१२) लेखकः—रा० संभाजीराव आंगरे ध्वजवृंदाधिकारी. कान्होजीरावांचे दुसरे पुत्र. मृत्युशक १६६३. मुद्राः-(१) (सरसुभेदार आरमार) ˘ श्री ० श्रीमत् कान्होजीसंभूतशंभो-शत्रूञ्जिगीषत । वर्धिष्णु राजरेखेव मुद्रा भद्रा विराजते ॥ (२) (सरखेल आरमार) ˘ श्री ० श्रीशाहूनृपहर्षेण कानोजीतनुजन्मनः । आंगरे सरखेलस्य शंभोर्मुद्रा विराजते ॥

पत्रः—छ सकलगुणालंकरण अखडित लक्ष्मीआलंकृत राजमान्य श्रीो संभाजी आंगरे सरखेल रामराम विनंति उपरि येथील कुशल

संदर्भः—श्री० चिमाजीआप्पा यांना " घरगुती पत्र." सबंध पत्र संभाजीबावांच्या हातचें.

(१३) लेखकः—रा० तुळाजीराव आंगरे ध्वजवृंदाधिकारी. कान्होजीरावांचे पांचवे पुत्र. मृत्युशक १६७८. यांचें आणि श्री० नानास्वामि प्रधान यांचें वांकडें आलें असतां, प्रधानांनीं इंग्रजांस घरांत घेऊन तुळाजींचा मोड केला आणि त्यांना बंदींत ठेविलें. बंदींत असतांना बंदनगडा वर हे वारले. यांचा इंग्रजांस इतका दरारा होता जेः-" देवा कसें हि करून यास आमच्या तावडींत आणून दे " असें ते नित्य म्हणत. ही त्यांची इच्छा प्रधानांच्या हातून पुरी होऊन मराठी नौकादळ रसातळास जाऊन साम्राज्याचें अपरिमित नुकसान झालें ! पत्रांत मुद्रा आली आहे.

पत्रः—...(ल)क्ष्मी आलंकृत राजमान्य श्रीो तुलाजी आंगरे सरखेल रामराम विनंति येथी(ल)... छ ११ माहे मोहरम बहुत काय लिहिणे लोभ असों दिल्हा पाहिजे हे विनंती [स० मु०] " लेखनसिमा "

मुद्राः—˘ श्री ० श्री शाहुनृपहर्षण सरखेलसमुन्नते तुलसिंहस्य मुद्रेयं सर्वोत्कर्षण राजते

संदर्भः—" संक्रमणाचे तीळ पाठविल्या " विषयीं, श्री० बाळाजीपंतनाना (प्रधान) यांस पत्र.

(१४) लेखकः—रा० मानाजीराव आंगरे सागराध्यक्ष. कान्होजीरावांचे चौथे पुत्र. यांचें आणि तुळाजीरावांचें भांडण होतें, तें मोडून नौकादळाची वांटणी श्री० श्रीशाहुछत्रपतींनीं करून दिली. यांचें आणि पंतप्रधानांचें बरें होतें. मृत्युः-शक १६८०. मुद्राः- ˘ श्री० शाहुकार्यधुरंधर्तुः कानोजीतनुजन्मना । मुद्रा वजारतमाबस्य मानसिंहस्य राजते ॥ आंगरे घराण्यानें साम्राज्याची महत्त्वाची सेवा केली आहे.

पत्रः— [मानाजी आंग्रे वजारतमाब] ..... (अधिकोत्तर) काये आहे कार्यसिधि संपादोन घेतली पाहिजें रा॥ छ ८ माहे राखर बहुत काय लिहिणे कृपा असों दीजे हे विनंति [स० मु०] " मोर्तुब सुद "

संदर्भः—" नाना दाजी (श्री० नानास्वामि) मोंगलाचे युद्धांत आहेत. श्री० माधवराव यांचा व्रतबंध फाल्गुन शुद्ध ११ शुक्रवार शक १६७३ रोजीं आहे, तें समजलें " म्हणून, श्री० विश्वासराव यांना पत्र.

(१५) लेखकः—रा० खंडोजीराव माणकर. मूळ गांव खरवली. फिरंग्यांशीं झालेल्या शक १६५९ ते १६६२ च्या युद्धांत प्रमुख. रा० मानाजी-संभाजीराव आंगरे यांच्या भांडणांत श्रीमंतांनीं यांना मानाजीरावांच्या साह्यास पाठविलें. साष्टीद्वीप आणि ठाण्याचा गड यांनीं च घेतला, म्हणून तेथले

मुद्राधारी यांना नेमलें. वसई युद्धांत यांनीं वानरें, वेसावें, धारवी इ० ठाणीं हस्तगत केलीं. वसई गडाचा भेद गुराख्याच्या वेषानें यांनीं च काढला होता. शूर सेनापति. यांचा वंश धार येथें आहे.

पत्रः–आज्ञाधारक खंडोजी माणकर मुकाम तला (गड)...सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति हे विःज्ञा

संदर्भः––" औषधास शहाळीं पाठविलीं आहेत, " म्हणून, थो० बाजीराव यांना पत्र.

(१६) लेखकः––रा० आप्पाजीराव पाटणकर. वडिलांचें नांव द्वारकोजीराव आणि आजाचें नांव चांदजीराव. ही सर्व मंडळी प्रधानांच्या सैन्यांत सामंत होतीं. मूळ आडनांव साळुंखे. एकदां गुलटेकडी जवळ श्री० माधवराव आणि श्री० नारायणराव हे गजयुद्ध पहात असतां एक हत्ती पळाला तो थेट श्रीमंतांच्या अंगांवर आला; तेव्हां या आप्पाजीरावांनीं त्याच्या सोंडेस कटयार मारून त्याला परतविलें. त्या साठीं यांना चौघडा मिळाला. श्री० नारायणरावांच्या वधाचे प्रसंगीं पुण्यास होते. हे धाकटे बाजीराव यांच्या वेळीं एक पथके होते. यांचा वंश पाटण येथें आहे.

पत्रः––[आपाजीराव पाटणकर].....(छ ५ माहे) मोहरम बहुत काय लिहिणे हे विनंती

संदर्भः––" अंबाजी यादव यास आपण ग्वाही आहों, " म्हणून पंतप्रधानांस गोही पत्र (पौष शुद्ध ६।१६९९)

[छायाचित्र–पान १४]

(१) लेखकः––रा० उदाजीराव संभाजीराव पवार. धार संस्थानचे संस्थापक. मूळ गांव पुण्या जवळचें मलठण. संभाजीराव हे थो० शिवछत्रपतींच्या पदरीं होते. उदाजीरावांनीं थो० राजारामम्हाराजांच्या वेळीं माळव्यांत प्रथम चढाई केली (शक १६२०). हे थो० बाजीराव यांचे खेळगडी असल्यानें माळवा, गुजराथेंत मराठी साम्राज्याचा विस्तार करण्याचें काम पंतप्रधानांनीं यांचे वर (शिंदे–होळकरां प्रमाणें) सोंपविलें. यांनीं धारेस राजधानी केली (१६४६). हे फार शूर असल्यानें " जिधर उदा उधर खुदा " अशी म्हण तिकडे होती. मुद्राः–श्रीशिवचरणीं दृढभाव । संभाजी सुत उदाजी पवारराव ॥ मृत्युः– मलठण येथें शक १६८२ (?). यांचा वंश धारेस राज्य करीत आहे.

पत्रः––...(राजमा)न्यें श्रहाकिंत उदाजी पवार कृतानेक दडवत विनति उपरि येथील कुशल तागाईत कार्तीक सुधे ७ जाणून स्वकीये स्वा (नंदवैभवलेखन करावयास)

संदर्भः––" श्री० नानास्वामी प्रधान यांस " औपचारिक पत्र. सर्व पत्र उदाजीरावांच्या हातचें.

(२) लेखकः––रा० यशवंतराव आनंदराव पवार. उदाजीरावांचे बंधु आनंदराव; त्यांचे हे पुत्र. शक १६५६ पासून पानपता पर्यंत यशवंतराव हे, मल्हारराव होळकर, राणोजी शिंदे यांच्या समवेत उत्तर हस्तगत करण्यांत साहाय्यक होते. दख्खन–कर्नाटकांतील युद्धांत हि हे लढले होते. उदगीरच्या खंडणींत मिळालेली राजराजेश्वराची मूर्ति श्रीमंतांनीं यांना दिली; ती सांप्रत धारेस राजवाडयांत आहे. उत्तरे कडील साम्राज्याच्या उत्पन्नांतून पवारांना शेंकडा १६ टक्के मिळत. हे पानपता वर मृत्यू पावले (पौष शुद्ध ७ । १६८२). मुद्राः–० श्री ˘ भवानीशंकर चरणी तत्पर । आनंदराव सुत यशवंतराव पवार निरंतर ॥

पत्रः––(राजमा)न्य श्रीं येशवंतराव पवार कृतानेक साष्टांग दंडवत.....(ऊर्जित) करणार स्वामि समर्थ आहेत लोभ आसो द्यावा हे विज्ञापती [स० मु०] " मोर्तबसुद "

संदर्भः––श्री० थो० बाजीराव यांचे छावणींतून श्री० आपास्वामीं(चिमाजी)स " वार्तापत्र."

पोथी ग्रंथ संग्रह
सं: नं. ...
हा. नं.

Gov't Photozinco Office Poona, 1933.

Govt. Photozinco Office Poona, 1933.

(३) **लेखक**:–रा० आनंदराव संभाजीराव पवार. उदाजीरावांचे धाकटे बंधु. मध्यंतरीं पंतप्रधानांच्या विरुद्ध होते; मग श्री० चिमाजीआप्पांनीं यांची समजूत केली. माळवा–गुजराथ–नेमाड–खानदेश यांतून भोज्यग्राम गोळा करण्याचें काम यांच्या कडे होतें. यांनीं शक १६५० पासून १६५८ पर्यंत राज्यकारभार केला. मृत्यु:–ज्येष्ठ १६५८. छत्री:–उज्जयिनी, मंदाकिनी घाटा वर. मुद्रा:–श्री सीवचरणी दृढभाव । संभाजीसुत आनंदराव पवारराव ॥

पत्र:––...(अग)त्यरूप पाठविले पाहिजे बहुत काये लिहिणे लोभ असों दीजे हे विनति [स० मु०] " मोर्तब सुद "

संदर्भ:––" सिन्नर प्रांतांत गोविंदराव सकपाळाचा दंगा झाल्या "विषयीं श्री० पंतप्रधानांस पत्र.

(४) **लेखक**:––रा० विठोजीराव राणोजीराव चव्हाण डिग्रजकर. मूळ गांव अथणी. हे मालोजीराव घोरपडे यांचे जवळ होते. यांनीं आणि थो० संताजीराव घोरपडे यांनीं मिळून औरंगझेबाच्या पटगृहाचे सोन्याचे कळस कापून आणल्यानें श्रीराजारामछत्रपतींनीं यांना " हिंमतबहादर " ही पदवी दिली. यांना रा० रामचंद्रपंत अमात्य यांनीं वाढविलें. बंगलोरच्या लढाईंत हे पडले (ज्येष्ठ शुद्ध ५ । १६१८). मुद्रा:– ० श्री ~ राजा शंभुछत्रपती चरणि तत्पर । राणोजि सुत विठोजी चव्हाण हिमतबहादर ॥ यांचा वंश डिग्रजेस आहे.

पत्र:— (राजमा)न्य श्रीो विठोजी चवाण दंड(वत)... (कृ)पा लोभ असों दीजे हे विनंती

संदर्भ:––" जुनें उगार गांव देवाच्या तळ्या कडे दान दिल्या " विषयीं पत्र.

(५) **लेखक**:—रा० उदाजीराव चव्हाण ममलकतमदार, हिंमतबहादर. हे, विठोजीरावांचे पुत्र. हे थो० शाहुमहाराजांच्या विरुद्ध मा० ताराबाई यांच्या पक्षांत नेहमीं असत; त्या मुळें जवळ जवळ ६० वर्षे तिन्ही पंतप्रधानांच्या विरुद्ध झालेल्या उलाढाल्यांत हे प्रमुख होते. यांनीं बत्तीसशिराळ्याचा गड घेऊन महाराजांना त्रास दिल्यानें त्यांनीं यांस शिराळे, कऱ्हाड येथील चौथाईची नेमणूक करून दिली. यांनीं त्या प्रांतांत चव्हाण पट्टी बसविली होती. मुद्रा:–(१)श्रीराजा शंभुछत्रपतीस्वामीचरणीं तत्पर। उदाजी चव्हाण हिंमतबहादर ममलकतमदार निरंतर ॥ (२)श्री राजाराम छत्रपती स्वामी चरणीं तत्पर । उदाजी चव्हाण हिंमतबहादर ममलकतमदार निरंतर ॥ मृत्यु:–कार्तिक वद्य ११।१६८४.

पत्र:––उदाजी चव्हाण हिमतबहादूर दंडवत विनंति .... (असो दे)णे हे विनंती [स० मु०] " मोर्तबसुद "

संदर्भ:––श्री० पंतप्रधानांस औपचारिक पत्र.

(६) **लेखक**:—रा० आनंदराव सोमवंशी, सरलष्कर. सोमवंशी घराणें साम्राज्यांतील एक अत्यंत शूर घराणें होतें. रा० दावलजीराव सोमवंशींचा आणि यांचा निकटचा आप्तपणा असावा (कदाचित् हे पुत्र हि असतील); दावलजीराव हे हि सरलष्कर होते. आनंदराव हे प्रधानांच्या बहुतेक युद्धांत असत. हे १७३२ मध्यें थो० शाहुछत्रपतींचे सरलष्कर होते. यांच्या पथकाचें नांव धाकटे बाजीराव यांच्या राजवटींत हि आढळतें. मुद्रा:–० ~श्रीराजाशाहु चरणी तत्पर। आनंदराव सोमवंशि सरलष्कर ॥

पत्र:—श्रीो अनंदराऊ सोमवंसी सरल(ष्कर दंडवत) ... (लिहि)णे कृपा लोभ आसो दीजे हे विनति [स० मु०] " मोर्तबसुद "

संदर्भः—" आपल्या साठीं नायगांव येथें घोडी घेतली आहे," म्हणून श्री० (चिमाजी) आपास्वामीस पत्र.

(७) लेखकः--रा० आवजीराव कवडे. थो० बाजीराव प्रधान यांनीं यांस सामंत केलें. हे अंतर्वेदींतील देशाक्रमण, डभईचें युद्ध, रा० रघूजी भोसले यांच्या वरील चढाई इ० प्रसंगांत होते. शूर सेनापति आणि प्रधानांचे विश्वासु सेवक. वऱ्हाड-खानदेशचे देशाधिकारी आणि मोंगलाईंतील स्वराज्याचे कर गोळा करणारे अधिकारी. यांचा वाडा पुण्यास कसब्यांत होता. तेथें मा० उमाबाई दाभाडे या शक १६७४ मध्यें राहिल्या होत्या. मृत्यु शक १६७९ चे पूर्वी. मुद्राः-श्रीमार्तंड चरणीं तत्पर। आवजी कवडे निरंतर ॥ यांचे चिरंजीव महिपतराव हे हि शूर असून अनेक युद्धें खेळले होते.

पत्रः--आज्ञाधारक आवजी कवडे दडवत विनति उपर काल साहेबाचा निरोप घेऊन गांवास आलो तो माहोर वगैरे सरकारचे कमावीसदार यांचीं पत्रें आले कीं आप्पा(साहेबाकडे जावयास तयार होत होतो)

संदर्भः—" माहूर प्रांतांतील धामधुमेचें " श्री० (चिमाजी)आप्पास्वामि यांस पत्र. सर्व पत्र आवजीबावांचें.

(८) लेखकः—रा० आनंदराव रुद्राजीराव धुळप. मूळ आडनांव मोरे (जावळीकर). थो० शिवाजीमहाराजांच्या भीतीनें हणमंतराव मोऱ्यांचा वंश धवडे बंदरीं राहिला. धुळप ही पदवी. शक १६८६ मध्यें आनंदराव हे साम्राज्याच्या नाविकदळाचे सर्वाधिकारी बनले. त्यांनीं १६९६ पासून १७०५ पर्यंत हैदर आणि इंग्रज यांच्या नौकादळाचा अनेकदां पराभव केला. यांनीं रत्नागिरी जवळ इंग्रजी नाविकदळाचा सडकून पराभव केला. त्या विषयीं इंग्रेजानें हि त्यांची स्तुति केली (चैत्र शु. ६। १७०५). त्या मुळें इंग्रेजानें २० लक्षांचा प्रांत परत दिला. मृत्यु शक १७१७. यांचा वंश विजय-दुर्गास आहे.

पत्रः--विनंति सेवक आनंदराव धुलप... (श्रुत) होय हे विज्ञापना

संदर्भः--" हरबाजी धुळप हे मार्गशीर्ष शुद्ध २ । १७१७ रोजीं वारल्या " विषयीं नाना श्रीकरणाधिप यांना पत्र.

(९) लेखकः--रा० खंडेराव दाभाडे सेनापति. मूळगांव तळेगांव. वडिलांचें नांव येसाजी; हे, थो० शिवाजीमहाराजांचे राजानुचर होते. पुढें थो० राजारामछत्रपति यांनीं खंडेरावांना प्रथम सेनाधुरंधरी आणि मग सेनाखासखेली दिली. त्या नंतर धाकटे शिवछत्रपति यांच्या वेळीं, खंडेरावांनीं खानदेशनेमाडांत मोंगलाला पायबंद बसविला. नंतर हे थो० शाहुराजांना मिळाल्यावर यांना सेनापति करण्यांत आलें. त्या वर यांनीं झुल्पिकाराचा पराभव करून गुजराथ-काठेवाड जिंकला. पहिल्या दोन पंत प्रधानांशीं यांचें सख्य होतें. श्रावणमास दक्षिणा आणि कोटी लिंगार्चन यांनीं पुढें चालविलें [श्रीसमर्थांनीं राज्याभिवृद्धी साठीं सांगितल्या वरून थो० महाराजांनीं या दोन गोष्टी चालूं केल्या. थो० राजाराम यांचे वेळीं हें कार्य सेनापती कडे नेमण्यांत आलें. पुढें तें पंतप्रधानां कडे शेवटपर्यंत होतें]. तत्कालीन मोठमोठ्या युद्धांत प्रमुख. मृत्युः—वैशाख वद्य १४ । १६५१. मुद्राः— ०श्री० राजा शाहुस्वामि छत्रपती । खंडेराव दाभाडे सेनापती ॥ यांचा वंश तळेगांव (दाभाडे) येथें आहे.

पत्रः--(चिरंजीव राजश्री दौलतराऊ दाभाडे) यासी खंडेराव दाभाडे सेनापती आसिर्वाद उपरि मा॥ आकाट मुकासा .... [पाठीमागें] (छ २२ मोहोर)म आसीर्वाद

संदर्भः--" चि- दौलतराव दाभाडे यांस, अर्काटच्या देशाधिकाऱ्यास उत्पन्न सुरळीत घेऊं देणें " म्हणोन, पत्र.

(१०) लेखकः--रा० त्रिंबकराव दाभाडे सेनापति. खंडेरावबाबांचे वडील पुत्र; यांनीं गुजराथ हस्तगत करून कर्नाटका वर हि चढाई केली होती. पुढें थो० बाजिराव यांच्याशीं वितुष्ट येऊन डभईच्या युद्धांत मृत्यु पावले (चैत्र शुद्ध ६ । १६५३). मुद्राः-ᵕश्री० राजाराम छत्रपतीस्वामी चरणी तत्पर । त्रिंबकराव दाभाडे सेनाखासखेल निरंतर ॥

पत्रः-...(रवाना) छ १८ माहे सवाल हे विनंति [स० मु०] " मोर्तबसुद "

संदर्भः—" दसऱ्या करितां साताऱ्याहून कापड आणलें; दस्तक असतां जकातदारानें अटकाव केला " म्हणून, श्री० बाळाजीपंत (श्री० बाळाजीनाना) प्रधान यांस पत्र. मुद्रा जुनी च वापरली आहे.

(११) लेखकः—रा० यशवंतराव दाभाडे सेनापति. खंडेरावबाबांचे दुसरे पुत्र. थो० बाजीराव यांनीं रा० त्रिंबकरावांचा शेवट केला म्हणून यांनीं त्यांच्या वर चाल केली. ती थेट साताऱ्या पर्यंत. तेथें थो० शाहुमहाराजांनीं यांची समजूत घातली. मुद्राः-०ᵕश्रीशाहुस्वामी छत्रपति । येसवंतराव दाभाडे सेनापति ॥ मृत्युः-वैशाख वद्य १२ । १६७६.

पत्रः-येसवंतराव दाभाडे सेनापति दंड(वत)...(छ १६ जमादि) लोवल बहुत काये लिहिणें कृपा असो दिल्ही पाहिजे हे विनंति [स० मु०] " मोर्तबसुद "

संदर्भः—" श्रीशाहुमहाराजांचे दर्शनास येत आहों " म्हणून थो० बाजीराव यांना पत्र.

(१२) लेखकः—रा० बाबूराव दाभाडे सेनाखासखेल. खंडेराव बावांचे तिसरे पुत्र. मुद्राः- ०ᵕश्रीराजाशाहुस्वामी चरणी तत्पर । बाबुराव दाभाडे सेनाखासखेल निरंतर ॥

पत्रः--...राखर हे विनति [स० मु०] " विलसति लेखनावधी मुद्रा "

संदर्भः—" गोपाळ नाईक, गोडसे यांना अभयपत्र " (भाद्रपद वद्य ११ । १६५७).

(१३) लेखकः—रा० जानोजीराव ढमढेरे. तळेगांवचे पाटील. पंतप्रधान घराण्याशीं या घराण्याचें फार सख्य होतें. जानोजीरावांची श्रीब्रह्मेंद्रस्वामीं वर फार भक्ति होती. प्रधानां समागमें हे युद्धां वर हि जात असत. राक्षसभुवनाच्या युद्धाचे वेळीं या घराण्यांत एक लहान १५ वर्षांचा मुलगा होता, त्याच्या आईनें आपल्या घराण्यांतील कोणी हि प्रौढ पुरुष प्रधानांच्या समागमें युद्धा वर जाण्यास नाहीं म्हणून श्री० दादास्वामि, नाहीं नाहीं म्हणत असतां या एकुलत्या एक मुलास पाठविलें; शेवटीं तो मुलगा युद्धांत पडला; तेव्हां श्री० माधवराव हे बाईच्या समाचारास गेले असतां बाई म्हणाल्या " स्वराज्याच्या कार्यीं मूल पडला उत्तम झालें ! " असें हें घराणें होतें. हें घराणें थोरल्या महाराजांच्या पूर्वी पासून तळेगांवचे पाटील होतें. यांचा वंश तेथें (तळेगांव-ढमढेरे) आहे.

पत्रः—...(क्षेम असो) या नंतर रा जोगोजी जाधव आपल्या जमावानसी स्वामीचे सेवेसी आले आहेत त्यासि नालबंदीपैकी बाकी रो ५०० पांचसे राहिले आहे [त] त्याचा निर्गम करून दिल्हा पाहिजे

संदर्भः—" श्री० (चिमाजी)आप्पास्वामी यांना आगामी द्रव्याच्या मागणीचें " पत्र. सर्व पत्र जानोजीबाबांच्या हातचें.

(१४) लेखकः—रा० रघोजीराव करंडे. थोरले रघूजीबाबा नागपूरकर भोसल्यांचे प्रमुख सेनापति. यांनीं गोंडवन हस्तगत केलें. विठ्ठल सुंदर यांनीं पुणें जाळलें त्या वेळीं त्यांच्या समागमें हे

रा० जानोजी भोंसल्यां कडून होते. जानोजीबाबां वर प्रधानांची चढाई झाली तेव्हां (माघ, शक १६९०) हे खानदेशांत होते. यांचा वंश नागपूर कडे आहे.

पत्रः—आज्ञाधारक रघोजी करंडे पागा दिमत राजश्री (सेनासाहेबसुभा).....बहुत काय लिहिणे हे विज्ञापणा

संदर्भः—" पुण्यास रा० नानाजी कृष्ण जोशी (हे, छायाचित्र पान ८, अंक १२ चे लेखक, रा० कृष्णाजी नाईक जोशी यांचे दत्तक पुत्र) यांना पाठविलें आहे " म्हणून, श्री० थो० माधवराव यांना पत्र (नानाजी हे, भोंसले यांच्या राजसभेंत प्रधानां कडील सुमंत होते. संदर्भः–पहा छायाचित्र पान ७, अंक १. हे, सावाजी–मुधोजी यांच्या कटकटींत सावाजीराव वारले त्या च वेळीं गोळी लागून वारले. पौष वद्य १० । १६९६).

(१५) लेखकः—रा० बाळोजीबाबा कुंजीर. पंढरपूर जवळील वांगापूरच्या पाटलांचे पुत्र. प्रथम रा० नाना पुरंदरे यांच्या पथकांत स्वतुरगी. धा० बाजीराव हे शिवनेरीहून पुण्यास अले त्या वेळीं यांनीं आपला प्रवेश त्यांच्या जवळ करून घेतला. पुढें हे, श्रीमंतांच्या गळ्यांतील कवच बनले. वसई संधी नंतर शिंद्यां कडे हि यांचें प्रस्थ माजलें. मृत्युः–शक १७२९ वैशाख वद्य ९ पंढरपूर. मुद्राः– ० श्री ˘ मार्तंडचरणीं तत्पर । बाळोजी कुंजीर निरंतर ॥ यांचा वंश पुण्यास आहे.

पत्रः—आज्ञा बाहेर नाही काळे रात्री जो हुकूम बटकीबरावर येईन चाकरी सांगतील ते करीन हे खातरजमा असावी सेवक स्वामीनी वाढविला होता तो च आहे सेवेसी श्रुत होय हे वि(ज्ञापना)

संदर्भः—" श्री० धाकटे बाजीराव यांना स्वामिनिष्ठेचें " पत्र. सर्व पत्र बाळोबातात्यांच्या हातचें असून, सर्व छापलें आहे.

(१६) लेखकः—रा० त्रिंबकजी डेंगळे. श्री० राघबाजींच्या पदरीं हेर. पुढें यांची कार्य-तत्परता, दक्षता पाहून उल्हाटयंत्रशाळे वर (पानशांच्या जागीं) मुख्याधिकारी केलें. सदाशिव माणकेश्वर हे इंग्रजाचे भेदी आहेत हें प्रथम यांनीं श्रीमंतांना पटविलें, म्हणून यांना च त्यांनीं मंत्रीपद दिलें. त्या नंतर कर्नाटकचे देशाधिकारी झाले. इंग्रजाचें कपट ओळखणारे आणि त्या वर तोड करणारे आणि साम्राज्य टिकविण्या साठीं धडपडणारे, त्या वेळीं रा० बापू गोखले आणि त्रिंबकजी हे च होते. यांनीं होळकर, शिंदे, भोंसले, पेंढारी यांना मिळवून घेण्याचा प्रयत्न चालविला. तेव्हां मार्गांतील कांटा दूर करण्या साठीं रा० गंगाधरशास्त्र्यांचा वध यांच्या अंगीं चिकटवून इंग्रेजानें, यांना आपल्या हातीं देण्याचा (सैन्याच्या बळा वर) श्रीमंतांना त्वष्ट लाविला. श्रीमंतांनीं अत्यंत निरुपायानें यांना इंग्रेजाच्या स्वाधीन केलें. त्यानें यांना ठाणें गडांत बंदींत ठेविलें. तेथून युक्तीनें सुटका करून घेऊन इंग्रेजा विरुद्ध बागलाण-खानदेश-सातारा प्रांतीं यांनीं धुमाकूळ घातला. या वेळीं कोरेगांव युद्ध होऊन अलपिष्टणाचा धांडोरा सर्वत्र प्रसिद्ध होऊन सर्व मराठे सामंत इंग्रेजास मिळाले होते. तरी हि यांनीं साम्राज्य तग-विण्याचे प्रयत्न चालू ठेविले. हे, अहिरगांवीं सासुरवाडीं भुयारांत गुप्तपणें रहात. त्यांच्या सेवकानें भेद करून इंग्रजास सूचना दिली. स्वान्स्टननें एक घोडदळ घेऊन घरास वेढा दिला. त्रिंबकराव भिंत फोडून बाहेर जात असतां सोपानाच्या वर एक पुरुष उभा राहून त्यानें वर येणाऱ्या तीस रावतांना भाल्यानें एका मागून एक यमसदनास पाठविलें. शेवटीं त्या पुरुषास गोळ्या घालून मारलें आणि पाहिलें तों, तो पुरुष नसून त्रिंबकरावांची पत्नी होय ! ! शेवटीं त्रिंबकरावांना एकाकी पकडलें. ते शेवट पर्यंत चुनारगडास बंदींत

ग्रंथ
स्थल पत्र
से. सं.
ला.

होते. या प्रमाणें साम्राज्याच्या पायीं या पतिपत्नी रत्नांची शेवटची ओंवाळणी झाली ! यांचा वंश नगर प्रांतीं आहे. मुद्राः–श्रीमंत पंतप्रधान चरणीं तत्पर । मल्हारजी सुत त्रिंबकजी डेंगले निरंतर ॥

पत्रः—श्रीगजानन

(राज)मान्य श्रो त्रिंबकजी पा डेंगले राम(राम)

संदर्भः—"गुजरायेच्या वसुला" संबंधीं, सदाशिवपंत आणि हरि भगवंत यांस पत्र.

(१७) लेखकः—रा० सखाराम यशवंत पानसे. उल्हाटयंत्रशाळेचे मुख्य अधिकारी. हे रा० नाना श्रीकरणाधिप यांच्या संगें बदामीच्या आणि पुढें खर्डे येथील युद्धांत प्रमुख होते. यांचा वंश सोनोरीस आहे.

पत्रः—पो सखाराम येशवंत दिमत तोफखाना.....(फडशांत आणावयासी) येईल र॥ छ ११ जिलकाद बहुत काय लिहिणे लोभ असो दीजे हे विनंती

संदर्भः—" गंगाधर त्रिंवक मोघे यांच्या भाऊबंदकी " विषयीं, कृष्णाजीपंतदाजी यांस पत्र.

(१८) लेखकः—रा० देवराव (दिवाकर तात्या) महादेव हिंगणे.. यांनीं संन्यास घेतला होता. यांची समाधि निंबगांवीं आहे. कालः–ज्येष्ठ वद्य ७ । १७२९. वृत्तांता साठीं छायाचित्र पान १२, अंक १० पहा. मुद्राः–श्रीमहालक्ष्मीचरनी तत्पर । देवराव महादेव निरंतर ॥

पत्रः—पोष्य देवराव महादेव सां नमस्कार विनंति.....(घरचो आनुपत्य खर्चावीण पा) हावत नाही मग न जाणो आपण खर्चायासी देत अस्ता ते च घरी पाठवीत नाहोत हे न कळे तर सर्व प्रकारे याचे ठिकाणी लोभ रिणपरिहार होऊन काही घरी येसे या दि(वसात)

संदर्भः—" वेंचाच्या ओढगस्ती " विषयीं, विश्वासराव यांना पत्र.

[छायाचित्र–पान १५]

(१) लेखकः—रा० राणोजीराव शिंदे. ग्वाल्हेर संस्थानचे संस्थापक. मूळ गांव कण्हेरखेड. श्री० बाळाजी विश्वनाथांच्या पदरीं प्रथम अश्ववह. पुढें थो० बाजीरावांच्या वेळीं प्रसिद्धीस आले. उत्तरे कडे देशाक्रमण करण्यांत प्रमुख. वसई युद्धांत हि होते. मृत्युः–श्रावण शुद्ध २।१६६७. सांप्रत यांचा वंश ग्वाल्हेरीस राज्य करीत आहे. मुद्राः–श्रीज्योतीस्वरूपचरणी तत्पर। खंडोजीसुत राणोजीशिंदे निरंतर ॥

पत्रः—विनति सेवक राणोजी सींदे कृतानेक वि(ज्ञापना).....(वर्त)मान निवेदन होईल त्याचे उतर अती सत्वरी र(वा)ना केले पाहिजे सेवसी श्रुत होये हे विज्ञाप्ती

संदर्भः—" जळवा पाठविल्या " म्हणून, थो० बाजीराव आणि आप्पा स्वामी यांना पत्र.

(२) लेखकः—रा० जयाप्पा(जयाजी)राव शिंदे. राणोजीराव यांच्या थोरल्या पत्नी मैना-(निंबा)बाई यांचे वडील पुत्र. उत्तरे कडील युद्धांत प्रमुख. यांनीं रोहिलखंड आणि राजपुताना हस्तगत केला. जोधपूरच्या भाऊबंदकींत नागोर येथें बिजेसिंगानें विश्वासघातानें यांचा वध केला (ज्येष्ठ वद्य ७ शक १६७७). मुद्राः–श्री ज्योतिर्लिंग चरणीं तत्पर । राणोजी सुत जयाजी निरंतर ॥

पत्रः—विनति सेवक जयाजी सिंदे कृतानेक दंड(वत).....(स्वानंदवीत) आसिलें पाहिजे विशेष काये लेहावें लोभ असों दिल्हा पाहिजे हे विज्ञाप्ती

संदर्भः—श्री० पंतप्रधानांना घरगुती पत्र.

(३) लेखकः—रा० दत्ताजीराव शिंदे. रा० राणोजीराव आणि मैना(निंबा)बाई यांचे दुसरे पुत्र. जयाप्पा नंतर यांनीं आणि जनकोजी बाबा यांनीं मिळून राजपुताना आणि पंजाब हस्तगत केला. निजामाचा पराभव करून २५ लक्षांचा प्रांत मिळविला. बिजेसिंगाचें राज्य खालसा करून (आणि जयाप्पांचे मृत्यूचें प्रतिफल उगवून) ५ कोटींची खंडणी घेतली. पुढें दिल्ली, पूर्णपणें मराठ्यांच्या हातांत गेल्यानें, नजीबानें आणि शहानें अबदालीस बोलाविलें असतां, शुक्रताला वर दत्ताजीरावांनीं त्याला पिटाळून लाविलें. शेवटीं सर्व मुसुलमान एक होऊन त्यांनीं पाटीलबावांस कुंजपुऱ्यांत कोंडलें. बदाऊंच्या घाटा वर गिलच्या आला, तेव्हां अपुऱ्या सेनासंभारा सह बावांनीं त्याचे वर चालून घेतले. समागमें जनकोजी हि होते. दोघांनीं जरीपटक्या भोंवतीं आपल्यां देहांचें कडें केलें. धाकटे बाबा जखमी झाले. थोरले हि जाले. तेव्हां, कुतुब(अबदालीचा सेनापति)नें हिणविण्या साठीं त्यांना विचारलें, " पटेल ! हमारे साथ लढेंगे ? " त्या वीरानें उत्तर केलें " हा ! बेशक ! बचेंगे तो और भि लढेंगे ! ! " आणि प्राण सोडला (पौष वद्य १, संक्राति १६८१).

पत्रः—विनंती सेवक दताजी सिंदे कृतानेक (दडवत) ... (आज्ञेप्रमाणें म)स्तकीं वंदून स्वीकारिला सेवेसी श्रुत होये हे विज्ञाप्ति

संदर्भः—" नागोरहून मकरसंक्रमणाचे तीळ श्री० भाऊस्वामि यांना " पाठविल्याचें पत्र.

(४) लेखकः—रा० महादजी(माधव)राव शिंदे आलिजाह बहादर. जन्मशक १६४९. राणोजीराव आणि चिमाबाई यांचे पुत्र. महाराष्ट्रसाम्राज्यांतील एक प्रख्यात सेनापति आणि राजकार्य-धुरंधर पुरुष. यांचें चरित्र म्हणजे नाना श्रीकरणाधिपांच्या चरित्रा सारखा ३५।४० वर्षांचा भारत-वर्षाचा च इतिहास होय ! श्री० नानास्वामि पंतप्रधान यांच्या संगतीनें राजकारण आणि दत्ताजी-जयाजी या भावांच्या, तसें च श्री० भाऊस्वामि यांच्या संगतीनें युद्धकला यांत हे निष्णात बनले. यांनीं शिक्षित पायदळांच्या साहाय्यानें इंग्रजांना थप्पड लगावून शहाअलमास आपल्या पंजांत आणलें. ज्या उदेपूर-करांनीं मोंगल शहास सन्मान दिला नाहीं, ते हि पाटीलबावांस सामोरे जात ! शहाअलमास नेमणूक करून देऊन बावांनीं त्याला महाराष्ट्रसाम्राज्याचा एक मांडलिक बनविलें. या वेळे पासून पुढें दहा वर्षें श्रीमंत पंतप्रधान हे च साऱ्या भारतवर्षाचे धनी होते; म्हणजे सर्व भारतवर्षांत महाराष्ट्रसाम्राज्य पसरलें होतें. मृत्युः—माघ शुद्ध १३ । १७१५. छत्री वानवडी येथें. मुद्राः—ज्योतिस्वरूप चरणी तत्पर । राणोजीसुत महादजी शिंदें निरंतर ॥

पत्रः—...(श्रु)त होईल सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

संदर्भः—श्री० दादास्वामि यांना, " बोलावल्या प्रमाणें येतों " म्हणून, पत्र.

(५) लेखकः—रा० जनकोजीबाबा शिंदे. जयाप्पा आणि सखुबाई यांचे पुत्र. लहानपणा पासून युद्धा वर जात. श्री० विश्वासरावांशीं विशेष स्नेह. वडिलांचा ज्या दिवशीं विश्वासघातानें वध झाला, त्या च दिवशीं यांनीं मेडतें हस्तगत केलें. दत्ताजीराव आणि जनकोजीबाबा यांनीं सर्व मारवाड खालसा केलें. पंतप्रधानांशीं द्रोह करण्याचें कांहीं सामंतांचें मत बाबांस पटत नसे ! बाबा शेवट पर्यंत प्रधानांशीं एकनिष्ठ राहिले. पानपता वर निदानीस श्री० भाऊस्वामींच्या जवळ, जरीपटक्याच्या खालीं, त्यांनीं आपला पार्थिव देह सोडून, भारतीय अभिमन्यू प्रमाणें कीर्तिरूप देह अजरामर केला (पौष शुद्ध ८ । १६८२). मुद्राः—श्रीजोतिस्वरूप चरणि तत्पर । जयाजीसुत जनकोजी सिंदे निरंतर ॥

पत्रः—विनति सेवक जनकोजी सींदे कृतानेक विज्ञाप[ना]... .(चालों) द्यावे सेवेसी श्रुत होय हे विज्ञाप्ति

संदर्भः--" अळसुंदच्या पाटीलकीचा तंटा. " श्री० नानास्वामि यांना पत्र.

(६) लेखकः—रा० दौलतराव शिंदे. महादजी बाबांचे सावत्र भाऊ तुकोजीराव, त्यांचे आनंदराव आणि त्यांचे दौलतराव. हे महादजीबाबांचे मानलेले पुत्र. वसईच्या संधी नंतर, पाटील-बाबांनीं इंग्रजां विरुद्ध दोन तीन वेळां राजकारणें उभीं केलीं, पण तीं फसलीं. मृत्युः—फाल्गुन वद्य ९।१७४८. मुद्राः—श्री ज्योतिस्वरूप चरणी तत्पर । महादजीसुत दवलतराव सिंदे निरंतर ॥

पत्रः—छ श्रो दौलतराव सिंदे रामराम.....(छ ७) जावेल बहुत काय लिहिणे [स० मु०] " मोर्तबसुद "

संदर्भः—" बुऱ्हाणपुराकडील प्रांतांस उपसर्ग न देण्या " विषयीं, त्रिंबकजी डेंगळे यांस पत्र.

(७) लेखकः—मा० सखुबाई शिंदे. जयाप्पाराव यांच्या पत्नी आणि जनकोजीबावांच्या मातुश्री. या हि राजकारणी असत. या जामगांवीं आणि ग्वाल्हेर येथें राहूंन कारभार करीत.

पत्रः--(राज)मान्य श्रो सकुबाई सिंदे.....दुसरा विचार न धरावा बहुत काये लिहा हे विनति [स०मु०] " मोर्तब सुद "

संदर्भः—" सुरेगांव येथील चौथाई " विषयीं, रामचंद्रपंत संदेशलेखक यांस पत्र. पत्रा वर जनकोजीबावा यांची च मुद्रा केलेली आहे.

(८) लेखकः—रा० मानाजीराव शिंदे फांकडे, कण्हेरखेडकर. वडिलांचें नांव नरसिंगराव, आजाचें साबाजीराव. श्री० दादासाहेबांचे पक्षपाती. मराठेशाहींतील " तीन फांकड्यां " तील एक. श्री० दादास्वामींनीं यांना मध्यंतरीं रा० महादजी शिंद्यांचा सेनादाय दिला होता. फार शूर आणि धाडसी. कधीं हि कोणास न दबणारे; मात्र श्री० थो० माधवरावांना वचकत. बारभाईत दादांचे पक्षास. शेवटीं दौलतराव शिंदे यांच्या विरुद्ध नाना श्रीकरणाधिपांस साहाय्य करणारे. तेलंगी ब्राह्मणांच्या मृत्यूची वार्ता श्रीमंतां कडे लावून घाशीरामांस शिक्षा करविणारे. यांचा वाडा पुण्यास भवानीपेठेंतील चावडी जवळ होता. साम्राज्याचें ५० वर्षांचें आयुष्य यांनीं पाहिलें. यांच्या शरीरा वर युद्धांतील ५०।६० व्रण होते. शरीर फार धिप्पाड होतें. प्राईस इंग्रज म्हणतो, "तळेगांवा वर आम्हीं यांना पाठी दाखविल्या होत्या. " मृत्यु शक १७२२ वैशाख. यांचा वंश सांप्रत वडोद्यास आहे.

पत्रः—... (कार्ये क)रून देवावे बहुत काये लिहिण हे विनंति

संदर्भः—" मुरा नायकीण इच्या पंचायती " विषयीं, आबा काळे यांस पत्र.

(९) लेखकः—रा० राघोजी आंगरे सागराध्यक्ष. श्री० सवाई पंतप्रधानांच्या वेळीं प्रख्यात सामंत. श्री० नारायणरावांना संकटाची सूचना प्रथम यांनीं दिली. श्रीमंतांच्या वधा नंतर हे बारभाईस अनुकूल होते. यांचा आणि रा० महादजी शिंदे यांचा आप्तपणा होता. यांचें राष्ट्रीय कार्य म्हणजे " तोतया "स पकडण्याचें. त्या साठीं त्यांना नवीन नेमणूक आणि सेनादाय मिळाला. नाना श्रीकरणाधिप यांच्या कृपेंत हे होते. श्री० सवाई पंतप्रधानांच्या लग्नांत हे सन्मानसमारंभाचे अधिकारी होते. मृत्युः—चैत्री पौर्णिमा १७१५, कुलावा येथें. यांचा वंश अलिबागेस आहे. मुद्राः—श्रीराजाराम नृप चरणी सादर। मानासिंहसुत राघव वजारतमाहा सरखेल निरंतर

पत्रः--सेवक राघोजी आगरे वजारतमाव चरणावरी ... (स)विस्तर बापट सेवेसी निवेदन करितील सेवेसी श्रुत होये हे विज्ञापना

संदर्भः--" मकरसंक्रमणाचे तीळ पावले; श्रीच्या तांदुळास जकातीचा उपसर्ग होणार नाहीं, " म्हणून, श्री० चिंचवडकर देवांना पत्र.

(१०) लेखकः—रा० सोनजीराव भापकर. श्री० थो० बाजीराव आणि श्री० नानास्वामि यांच्या राजवटींतील एक प्रख्यात सेनानायक. मूळगांव लोणी; येथील पाटील. फार शूर. पानपतावर १० सहस्र घोडदळांचे एक सेनानायक. त्या वेळीं त्यांनीं एकदां सूजाचा पराभव केला होता. शेवटच्या चढाईंत त्यांच्या कडे रा० मल्हारराव होळकरांच्या सह एक पक्ष (बगल) संभाळण्याचें काम होतें. तें काम पूर्ण करीत असतांना पानपतावर च मृत्यु पावले.

पत्रः—विनति सोनजी भापकर दंडव (त)..... सेवकाचे ऊर्जित केले पाहिजे बहुत काय लिहिणे हे विनति

संदर्भः—" कर्नाटकांतील कडाप्पा जवळील नबाबाचें युद्ध " श्री नानास्वामींना वार्तापत्र.

(११) लेखकः--रा० मल्हारराव खंडेराव होळकर " सुभेदार. " इंदूर संस्थानचे संस्थापक. मूळ गांव नीराकांठचें होळ. जन्मः--फाल्गुन वद्य ५ । १६१४. तळोदें येथील बारगळ हे यांचे मामा; त्यांच्या वतीनें कदमबांडे आणि नंतर थो० बाजीराव प्रधान यांच्या कडे प्रवेश. पुढें माळवा आणि मग उत्तरोत्तर उत्तर हिंदुस्थान आक्रमण करणाऱ्यांत प्रमुख. पंतप्रधानांनीं जी ८२ ग्रामगणांची माळव्यांत सेनादायी दिली तींतून इंदूर संस्थान निर्माण झालें. अलमपूर येथें वैशाख वद्य ११ । १६८८ मृत्यु पावले. यांना " चिरंजिव जडभरत बोधला मल्हारबा " असें श्रीब्रह्मेंद्रस्वामी पत्रांतून सदोदित लिहीत. मुद्राः—ु ० श्रीम्हाळसाकांतचरणीं तत्पर । खंडोजीसुत मलारजी होळकर ॥ (२) मार्तंड चरणीं दृढभाव । होळकर मल्हारराव ॥ यांचा वंश इंदुरास राज्य करीत आहे.

पत्रः--... (राजमा) न्यें श्रीं मलारजी होलकर कृता(नेक दंडवत)... . (ऊर्जित) करणार साहेब समर्थ आहेत सेवसी श्रृ{ त } हाये हे विइःपना [स०मु०] " मोर्तबसुद "

संदर्भः--" चंद्रसेन जाधवांचा पुत्र जसवंतराव याची पंतप्रधानाकडे प्रशंसा " केलेलें पत्र.

(१२) लेखकः--रा० खंडेराव होळकर. मल्हारराव आणि गौतमाबाई यांचे पुत्र. जन्मः-श० १६४५. यांची पत्नी प्रसिद्ध महासाध्वी अहिल्याबाई. या बीड ग्रामगणांतील चौंढे गांवचे पाटील माणकोजी शिंदे यांच्या कन्या. त्यांचा जन्मः-सामान्यतः शक १६४७; लग्नः-ज्येष्ठ शु० ७ । १६६०. श्वशुरानें बाईवर २४ व्या वर्षी पासून राज्यकारभार सोंपविला. परमार्थाची आवड अंबादास पुराणिकाकडून. अपत्यें दोन; मालेराव आणि मुक्ताबाई. कुंभेरीच्या वेढ्यांत खंडेराव पडले (१६७६). बाईंना मल्हारराव्यांनीं सहगमना पासून परावृत्त केलें. त्यांच्या मृत्यू नंतर बाई च संस्थानच्या सर्वाधिकारी. त्यांनीं मल्हारराव्याचे पुतणे तुकोजीराव यांस पुत्रवत् मानलें. बाई स्वतः युद्धा वर हि जात. त्यांनीं चंद्रावतांचें बंड स्वतः च मोडलें (१६९३). यांचें नांव सर्व भरतखंडांत गाजलें, तें त्यांच्या औदार्य, न्यायप्रियता, भूतदया, सदाचरण, धार्मिक व्यय इत्याद्यनेक कारणांनीं. बाईंचा मृत्युः-श्रावण वद्य १४।१७१७. खंडेराव यांची मुद्राः-श्री म्हाळसाकांत चरणीं तत्पर । मलारजीसुत खंडेराव होळकर ॥ (२) मल्हारिसुत खंडेरायस्य मुद्रेयं ॥

पत्रः—(सेवेसी) रवाना करून ते सागत वर्तमान कलो येईल हे विज्ञापना

संदर्भः--" मुकुंददऱ्या जवळील होळकर-निजाम युद्धाचें श्री० आप्पा स्वामींना वार्तापत्र. " कहून "=करूं.

(१३) रा० मालोजीराव (मालेराव) होळकर. खंडेराव आणि अहिल्याबाई यांचे पुत्र. जन्मः–शक १६६७ देपाळपूर. मृत्युः–फाल्गुन वद्य १२ । १६८८. यांना माळव्याची नेमणूक मिळाली (पौष शुद्ध १ । १६७७). मुद्राः–श्रीमतमल्हारी चरणीं तत्पर । खंडोजीसुत मालराव होळकर ॥

पत्रः––सेवक आइःनाधारक मालोजी होल्लकर दडवत विनती आपन पत्र पाटविल ते पावोन वर्तमान्य निवेदन (जाले)

संदर्भः––" सैन्या सह लवकर च येतो " म्हणून श्री० दादास्वामींना पत्र. सर्व पत्र मालेरावाच्या हातच.

(१४) लेखकः––रा० तुकोजीराव होळकर. जन्मः–शक १६४७. हे आपल्यास मल्हारावांचे पुत्र म्हणवीत; पण मूळचे त्यांचे पुतणे. अहिल्याबाईंच्या राजवटींत हे त्यांचे कारभारी. उत्तर आणि कर्नाटक इकडील युद्धांत हे सदोदित असत. यांनीं डथूडरनेक या फ्रेंचाच्या हाता खालीं शिक्षित पायदळें निर्माण केलीं. महादजी शिंदे यांच्या नंतर हे च उत्तरेकडे प्रमुख बनले. मृत्युः–गोकुळ अष्टमी शक १७१९. मुद्राः–श्रीम्हाळसाकांत चरणीं तत्पर । मलारजिसुत तुकोजी होळकर ॥

पत्रः––.....(राज)मान्य स्नीं तुकोजी होलकर दंडवत.....(रवाना) छ २१ जिलकाद बहुत काये लिहिणे हे विनति [स० मु०] " **मोर्तबसुद** "

संदर्भः––" श्री० दादास्वामि आणि इंग्रज गुजराथेंत आहेत, तिकडे सैन्य पाठविणें " म्हणून पाराशर दादाजीस आज्ञापत्र (शक १६९७ माघ).

(१५) लेखकः––रा० काशीराव होळकर. रा० तुकोजीरावांचे वडील पुत्र. हे उत्तरे कडे आणि मारवाड इत्यादि प्रांतीं चढाई करीत असत. मुद्राः–श्रीम्हाळसाकांत चरणीं तत्पर । तुकोजीसुत कासीराव होळकर ॥ मृत्युः–शक १७२०.

पत्रः––...(छ ६) जोवल सुा इहिदे मया तैन व आलफ बहुत काये लिहिणे हे विनंती [स० मु०] " **मोर्तबसुद** "

संदर्भः––" चांदवड ग्रामगणाच्या कारभारा " विषयीं मोत्याजी कालगावडे यास पत्र (आश्विन शुद्ध ८ । १७२२).

(१६) लेखकः––रा० यशवंतराव होळकर. तुकोजीरावांचे तिसरे पुत्र. यांनीं रंगराव ओढेकरांच्या हातांतून धार संस्थान वांचविलें. पुढें त्यांनीं डयूडरनेक यास मिळवून महेश्वर आणि इंदूर हस्तगत केलें; हेसिंगचा पराभव केला. हे कुशल सेनापति आणि घोड्या वर बसणारे निष्णात होते. मृत्युः–भानपुरा येथें कार्तिक शुद्ध ११।१७३३. मुद्राः–श्रीम्हाळसाकांत चरणी तत्पर । तुकोजीसुत यशवंतराव होळकर ॥ (२) इंद्रप्रस्थस्थितो राजा चक्रवर्ति भूमंडले । तत्प्रसादात्कृता मुद्रा लोकेस्मिनवै विराजते ॥ लक्ष्मीकांत पदांभोजभ्रमरायितचेतसः । यशवंतस्य विख्याता मुद्रैषा पृथिवीतले ॥

पत्रः––राजमान्य स्नो यशवंतराव होळकर...(छ २० जिल्हेज सुा तिसा मया) तैन व आलफ बहुत काय लिहिणे हे **विनति** [स० मु०] " **मोर्तब सुद** "

संदर्भः––" भीमाबाईचें लग्न–माघ कृष्ण ११ शुक्रवार १७३०; शरीरसंबंध रा० वुळे यांच्याशीं. " लग्नपत्रिका राजे चतरसिंग (भोंसले) यांना.

(१७) लेखकः––रा० राणोजीराव पिराजीराव घोरपडे, सेनापति कापशीकर. मूळ पुरुष महालोजीराव, त्यांचे पुत्र प्रसिद्ध (थोरले) सेनापति संताजीराव, त्यांचे धाकटे पुत्र पिराजीराव आणि त्यांचे पुत्र राणोजीराव. यांचें कापशी संस्थान मोडून टाकावें असें करवीरकर श्रीसंभाजीमहाराजांनीं

ठरविल्यानें, हे तिकडून निघून श्रीशाहुमहाराजां कडे साताऱ्यास आले; परंतु पुढें करवीरकरांनीं यांची समजूत काढिली. यांनीं आपल्या आजी(मा०द्वारकाबाई)च्या स्मरणार्थ कुरुंदवाडास कुलस्वामी सुब्रह्मण्य (कार्तिकस्वामी) मंदिर बांधलें. घोरपड्यांच्या पत्रां वर ' सुब्रह्मण्य ' असें नांव या मुळें असतें. हे पुढें सातारकर आणि करवीरकर या दोघां कडे हि संधान ठेवून वागत. यांचा आणि रा० व्यंकटराव घोरपडे इचलकरंजीकर यांचा भाऊपणा फार होता. प्रधानां समागमें एकादे वेळीं हे कर्णाटकांतिल युद्धा वर जात असत. मृत्यु शक १७०५.

पत्रः—राणोजी घोरपडे सेनापती दंडवत.....(लिहि)णें कृपा असो दीजे हे विनती [स० मु०] " लेखनसीमा "

संदर्भः—" दसरा झाल्या वर भेटीस येतों, मग कारस्थान करूं " म्हणून, श्री० थो० बाजीराव यांना पत्र.

(१८) लेखकः—रा० मुरारजी (मुरारराव) हिंदुराव घोरपडे सागराध्यक्ष, सेनापति. प्रसिद्ध संताजीराव घोरपडे यांचे बंधु बहिरजी त्यांचे पुत्र शिदोजी; त्या शिदोजीरावांचे पुत्र. गुत्ती आणि सोंडूर संस्थानचे संस्थापक. यांचे वंशज सांप्रत सोंडूरास राज्य करीत आहेत. यांनीं कर्नाटकांत स्वतंत्रपणें ३० वर्षें वागून हैदर, फ्रेंच, इंग्रज आणि अर्काट–सावनूर–कडाप्पा येथील त्रिवर्ग नबाब यांना सतत चळचळां कांपवून आपलें संस्थान वाढविलें. नेहमीं १० हजार घोडा यांचे हाता खालीं असे. श्री० नानास्वामि यांचे पासून श्री०सवाई माधवराव प्रधानां पर्यंत कर्नाटकांतील महाराष्ट्रसाम्राज्याचें संरक्षण मुख्यत्वें यांनीं केलें. अत्यंत शूर आणि राजकार्यधुरंधर. हैदरानें विश्वासघातानें यांना धरून कपाळ दुर्गांत बंदींत ठेविलें; त्यांत च त्यांचा अंत झाला (साधारणतः शक १६९८). मुद्राः–पत्रांत अस्पष्ट आहे. (पहिलीं चार अक्षरें लागत नाहीं) "+ + + + स्रीचरण भजन तत्पर । तत्सुत मुरारजी घोरपडे निरंतर ॥

पत्रः—अलंकृत राजमान्य श्री मुरारजी हिंदुराव घोरपडे वजारतमाव दंडवत् विनंती उपरि.....आहे ते सागता कलेल आपण लिहील जे जपणार सरदार आले आमच यण न जाहल्या प्रकार सुचविल आ (म्ही रायचूर प्राती मोकाम करून)

संदर्भः—कर्नाटकांत श्री० नाना स्वामि असतांना, " आपण भेटीस सत्वर येतों, " म्हणून त्यांना पत्र.

(१९) लेखकः—रा०दौलतराव हिंदुराव घोरपडे. मुरारराव घोरपड्यांचे धाकटे बंधु.शक १६९७ मध्यें कोल्हापूर कडील चढायांत प्रमुख. हिंदुराव ही पदवी पूर्वी ब्राह्मणी राज्यांतून मिळाली. हे गजेंद्रगड संस्थानचे मूळ पुरुष. हे प्रधानांच्या सेवेंत असत. टिपूनें गजेंद्रगड घेतला होता तो यांनीं रा० हरिपंत फडके यांच्या साह्यानें परत मिळविला. रा० परशुराम भाऊंचा आणि यांचा स्नेह फार. थो० माधवरावांनीं यांस आणीक सेनादाय दिला.

पत्रः—(रा) जमान्य श्री दौलतराव हिंदुराव घोरपडे दं (डवत्) ... (ना) हीं बहुत काये लिहिणे हे विनती

संदर्भः—" मकरसंक्रमणाची शर्करा पावल्या " विषयीं, श्री० राघोबादादा यांना पत्र.

[छायाचित्र—पान १६]

(१) लेखक:—रा० कृष्णशहा राजे जव्हारकर. जव्हार संस्थानचे राजे. मूळ गांव थळ घांटा जवळील मुकणें. " शहा " ही पदवी दिल्लीकर मुसुलमान शहानें ज्यांना दिली त्यांचें नांव नेमशहा. यांनीं आपला स्वतंत्र शक, शा० श० १२६५ ज्येष्ठ शु० १२ पासून चालूं केला. थो० शिवाजीमहाराजां पासून हें संस्थान महाराष्ट्रसाम्राज्यांत मोडत असे. हे कृष्णशहा दुसरे असून पहिल्या पतंगशहाचे दत्तक होते. यांनीं शक १६७२ मध्यें वांधलेला राजवाडा १७४४ पर्यंत होता. यांचे पुत्र दुसरे विक्रमशहा होत. यांचे विद्यमान वंशज जव्हारास राज्य करीत आहेत.

पत्र:—श्री० कृष्णशाहां राजे प्रांत जवार कृतानेक साष्टांग दंड (वत) ... आज्ञा कली पाहिजे बहुत काय लिहिणे कृपा वृध्धी करीत गेले पाहिजे हे विनंति

संदर्भ:—श्री० दादास्वामि यांना " भाजी, फळें पाठविल्याचें " घरगुती पत्र.

(२) लेखक:—रा० रामदेव राणा. रामनगरचे राऊळ. कोळवनांत जव्हार सारखें रामनगर हें लहानसें संस्थान आहे. हें साम्राज्यांतील एक मांडलिक संस्थान होतें. हें पूर्वी च थोरले महाराजांचे वेळीं रा० मोरोपंत पिंगळे प्रधान यांनीं जव्हार प्रमाणें हस्तगत केलें होतें. येथून सुरत ३० कोस आहे. हे रामदेव राणा जातीचे राजकोळी असून, थो० बाजीराव यांच्या काळीं विद्यमान होते. कोळी असून हि हे मोडींत चांगल्या अक्षरांची " विनति " लिहितात हें लक्ष्यांत ठेवण्या सारखें आहे.

पत्र:—श्रीसकलगुणालंकरण अखंडित लक्ष्मी आलंकृत राजमान्य प्रति माहाराज राजश्री राऊल रामदेव राणां राजे प्रांत रामनगर.....सर्वस्वें भरवसा गोसावी यांचा रक्षित असो वडीलपणे गौर(व) करणे विहित आहे विस्तार काये लिहावा हे विनती

संदर्भ:—" आपल्या प्रांतास प्रतापसिंह आणि हिरोजी चौधरी उत्पन्ना संबंधीं त्रास देतात " म्हणून कृष्णराव महादेव (चासकर) यांस पत्र.

(३) लेखक:—रा० पाम नाईक बहिरी. पहिले पाम किंवा पीड नाईक हे जातीनें बेरड असून कर्णाटकांतील वागिनगिरें गडाचे मुद्राधारी आणि संस्थानिक होते. औरंगझेबानें विजापूर राज्य बुडविल्या वर या गडा वर चढाई केली असतां त्याची पुष्कळ दिवस डाळ शिजली नाहीं; शेवटीं भेदानें गड पडला (श० १६०८). त्यानें च या पाम नाइकास " बहिरी बहादर " ही पदवी दिली होती. एके ठिकाणीं " पाम " याच्या जागीं " राम " नाईक असें नांव देऊन त्यांस " महार " म्हटलें आहे. (काइसंपया० पृ. २७) थो० राजाराम महाराज यांच्या नंतर " वागिनगिरापाल " मराठ्यांनीं घेतलें (श० १६२५, राज० १८ × ४८); बहुधां त्या च वेळीं हे दुसरे पाम नाईक विद्यमान असावेत. यांचा वंश पुढें (थो० माधवराव यांच्या वेळीं) सुरापूर येथें राज्य करीत होता. शक १७१५ मधील वंशज व्यंकटप्पा नाईक बहिरी यांस गोविंदराव काळे यांनीं पाठविलेलीं पुष्कळ पत्रें प्रसिद्ध आहेत (राज० १९). वागीनगिऱ्यास दुसरें नांव सगर किंवा सरतगड आहे. पत्रलेखक पाम नाईक हे बहुधां पहिल्या पाम नाइकाचे नातु असावेत; यांच्या वडिलांचें नांव पीड नाईक. हे बेरड जातीचे असतांहि मोडींत 'हे विनती' लिहितात हें लक्ष्यांत ठेवावयास पाहिजे.

पत्र:—(आलंकृ)त श्नेहाभिलाषी पामनाईक बहिरी कृता (नेक)...(म) नास आणून कृपा करोन सांभाल्ल करणार आपण समर्थ आहेत बहुत काये लिहिणे हे विनति

संदर्भः—" संस्थानचा सांभाळ करावा. श्रीमंतांकडे विंदो नारायण पाठविले आहेत, उत्पन्नाची सूट द्यावी " म्हणून पंतप्रधान यांना पत्र. मुद्रा (फार्सी):–पाम नायीक इब्न पीड नायीक वहिरी बंदा अलमगीर बादशहा गाझी. [स० मु०] मरतब शुद सन ११६८

(४) लेखकः––रा० रूपराम चौधरी. श्री० धा० बाजीराव प्रधान यांचे एक सेनापति. यांच्या हाता खालीं शिकलेलीं पायदळें होतीं. हे पुण्याच्या शेवटच्या युद्धांत होते (शक १७४०). हे जातीनें रजपूत असतां हि मोडींत " हे विज्ञापना " लिहीत आहेत !

पत्रः––विनंति सेवक रूपराम चौधरी विज्ञापना यैसी (जे)...(वैशाख शुद्ध १० शके १७३५ श्रीमुखनाम संव)त्सरे शेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

संदर्भः––" आज्ञे प्रमाणें अहमदनगर, जेऊर इकडील चोरांचा उपद्रव निवारण करतों " म्हणून श्री० धा० बाजीराव यांना पत्र (वैशाख शुद्ध १० । १७३५).

(५) लेखकः—रा० खुशरू शेट (खुसरवानजी जमशेटजी) मोदी; पारशी. मूळगांव खंबायत. जन्मः––शक १६७७. मालीटनें यांस इकडे आणले वर श्री०धा०बाजीराव प्रधानांच्या राजसभेंतील इंग्रजांचे मंत्रि झाले. लटपट्ये असल्यानें प्रधान आणि इंग्रज दोघां कडे हि संधान राखीत. पुढें रा० सदाशिव माणकेश्वर यांच्या हाता खालीं राहून इंग्रजा कडे प्रधानांच्या वतीनें समाजाविशी करीत. श्रीमंतांनीं मध्यंतरीं यांना कर्नाटकची देशाधिकारी दिली होती. अलपिष्टन, पुणें कारभारा वर येण्या पूर्वी आणि पुढें हि १६ वर्षें (शक १७२७-१७४३) येथील इंग्रज मंत्री यांच्या च पंजांत होते. हे पारशी असून हि " हे विनंति " बालबोधींत लिहित आहेत. यांचे वंशज सांप्रत रालेज (जि. खेडा) येथें आहेत. स्वतःचें मराठी राज्य नाहींसें करण्याचे बेत यांना माहीत असल्यानें आणि यांना प्रधानां कडून काढून लावण्याचे सारे प्रयत्न विफल झाल्या वर अलपिष्टनानें शेटजींना विषप्रयोग करून मारलें (माघ वद्य ५। १७३६). पुण्याचा " मोदीचा गणपती " यांनीं च स्थापन केला.

पत्रः––[पाठीमागें] ... (उत्तर लवकर) पाठवून द्यावे सदैव पत्र पाठवीत जावे बहुत काय लिहिणे लोभ करावा ही वीनती [प्रारंभीं] श्री खुश्रोजी सेट मोधी रामराम विनंति

संदर्भः—" जंबूसर परगण्याची मामलत; बडोद्यास इंग्रज आहे; गंगाधर शास्त्र्यांच्या कडून, गायकवाडांनीं स्वराज्यास उपसर्ग देऊं नये म्हणून केलेली खटपट; या विषयीं त्रिंबकजी डेंगळे यांना पत्र (फाल्गुन शुद्ध १ शक १७३५). " हे विनंति " गुजराथी वळणावर आहे.

(६) लेखकः—मा० पार्वती बाई भोंसले. श्रीशाहुमहाराज (थोरले) यांचे रा० कुसाजीराव आणि येसाजीराव म्हणून दासीपुत्र होते त्यांच्यां तील एकाच्या किंवा अष्टें येथील भोंसले घराण्यांतील या पार्वतीबाई असाव्यात. माल त्या मा०ताराबाई यांच्या निकटच्या आप्तवर्गांतील आहेत; त्यांना पत्रें लिहितांना " तीर्थरूप " आणि स्वतःला " अपत्यें " असें यांच्या सर्व पत्रांतून असतें. या शूर होत्या. यांनीं थोरातांच्या बंडांत स्वतः लढाई केली आहे आणि थोरातांस दमविलें आहे. एवढें च नव्हे तर तें काम ताराबाईंनीं प्रतिनिधीं वर सोपविलें असतां आणि त्यांचे कडून तें चांगल्या प्रकारें पार पडलें नसतां, मा० ताराबाईंनीं, " चि० पार्वती बायको माणूस असतां थोरातास नतिजा देतं आणि तुमचा उपाय चालत नाहीं हें अपूर्व होय " असा दोष त्यांना दिला आहे.

पत्रः—सेवेसी पार्वतीबाई कृतानेक विज्ञापना ता छ २५ रमजान मु (काम ठाणे अस्टे)..... (विदित जाले पा) हिजे सेवेसी श्रुत होय हे विज्ञापना

संदर्भः—" आपण थोराताच्या दंग्याचा अष्ट्यास मोड केला, तथापि आणखी सैन्य साह्यास पाठवावें " म्हणून, मा० ताराबाई यांना विनंतिपत्र.

(७) **लेखकः**—रा० बळवंतराव नागनाथ वामोरीकर. यांचे वडील नागो राम यांच्या कडे नगर प्रांतांतील घाट सांभाळण्याचें काम होतें. बळवंतराव हे मूळचे पथके; पुढें जुन्नरास धा० बाजीराव यांचे वर दृष्टि ठेवण्या साठीं नेमले गेले. श्रीमंतांनीं यांना वश करून यांच्या वतीनें श्री० प्रधानांशीं पत्र व्यवहार चालविला होता. या प्रमाणें हे धा० बाजीरावांच्या पक्षाचे बनले. यांनीं शनवारवाड्याच्या पूर्वे कडील नरसोबाच्या देवळा जवळ उभे राहून (बखरींत वाड्यांत च) श्री० सवाई पंतप्रधानांना जादु टोणा केला. म्हणून आणि वरील पत्रव्यवहार पकडून मग त्यांस धरून बंदींत टाकलें. मृत्युः-विजया दशमी १७३० शक.

पत्रः—पो बलवंतराव नागनाथ सां नमस्कार.... (दोनसें रुपये द्यावे) [पाठी मागें] **...लागतील ते ही पाठवावे बहुत काये लिहिणे उत्तर सत्वर घेऊन पाठवावे पाचसे रुपये मागील सिव्हस्तास दिल्हे होते**

संदर्भः—" गंगास्नानास रा०नाना (श्री करणाधिप) आणि रा० तात्या (फडके) चंद्रग्रहणा निमित्त येत आहेत " म्हणून रा० परशुरामभाऊ पटवर्धन यांस पत्र (वैशाख शुद्ध ७।१७१२).

(८) **लेखकः**—रा० विठ्ठलपंत तात्या पाध्ये (उपाध्याय). मूळ गांव गोळवली. मूळ पुरुष भास्करपंत. कोंकणांत जोसपणा विषयीं पाध्यांचा आणि जोशांचा वाद झाला. पंतप्रधानांनीं जोशांच्या वतीनें निर्वाह केला म्हणून या घराण्यांतील अनंत पाध्ये हे पंढरीस येऊन राहिले. यांना रा० मोरोपंत पराडकर हे गुरू मानीत. यांचे थोरले पुत्र रा० काशिनाथबाबा. अनंत पाध्ये यांना म्हातारपणीं विठोबाच्या प्रसादानें झाले ते दुसरे पुत्र, हे विठ्ठलपंत. यांच्या मातोश्री सती गेल्या. बाबांनीं पांडुरंगाचें माहात्म्य जास्त वाढविलें. त्यांनीं धर्मसिंधु रचला. यांची मुलगी आऊबाई मोरोपंतांचे पुत्र रा० रामकृष्णपंत यांना दिली. त्यांचें सासरचें नांव सुंदराबाई. तात्या हि प्रख्यात विद्वान होते. पंढरपुरास त्यांचा मान फार होता. पंतांचा आणि यांचा जिव्हाळ्याचा स्नेह होता. तात्या हि कवी होते, " ऐकुनि विश्व सुखावे ज्या केकीचा अपूर्व तो टाहो । त्याला आयुष्याचा ईशकृपेनें कधीं न तोटा हो ॥" ही आर्या तात्यांची च. मृत्युः-शक १७४५च्या नंतर.

पत्रः—[पाठीमागें].....(आ)पण हि उद्योग करून हें कार्य अगोधर केले पाहिजे **बहु काय लिंहावे लोभ करावा हे विनंती**

[प्रारंभीं] **श्री पांडुरंगः शरणम्**

संदर्भः—" पंढरपुरास पेंढाऱ्यांचा उपद्रव झाला आहे तो प्रधानां कडून दूर करविण्या विषयीं " रा० रावजीस पत्र.

(९) **लेखकः**—रा० दमाजीबाबा (दुसरे) गायकवाड सेनाखासखेल समशेरबहादर. वडिलांचें नांव पिलाजीराव. पिलाजीराव हे बडोदें संस्थानचे संस्थापक. मूळ गांव पुणें जिल्ह्यांतील धावडी. मूळ पुरुष पंहिले दमाजीराव. प्रथम थो० दमाजीराव, खंडेराव दाभाडे यांचे पदरीं होते. बाळापूरच्या निजामाच्या युद्धांत शौर्य गाजविल्यानें श्रीशाहुमहाराजांनीं समशेरबहादर पदवी आणि सेनापतीचा उप-मंत्रीचा अधिकार यांना दिला. यांचे दत्तक पुत्र पिलाजी. त्यांनीं सोनगड बांधला; येथें गायकवाडांची राजधानी वरे च दिवस होती. यांनीं आणि कदम बांडे यांनीं गुजराथ, स्वराज्यांत आणली; म्हणून यांना सेनाखासखेल पदवी छत्रपतींनीं दिली. यांचा डाकोरास अभयसिंग जोधपूरकरानें कपटानें वध

केला. यांचे वडील पुत्र प्रस्तुतचे दुसरे दमाजीबाबा. यांनीं अहमदाबाद घेऊन माळवा, काठेवाड इकडे चढाया केल्या. यांच्या वेळीं बडोदें राजधानी झाली. मध्यंतरीं प्रधानांशीं यांचें वांकडें आलें होतें; पण पुढें हे प्रधानांच्या देशाक्रमणांत असत. पानपताहून परत आल्या नंतर तांदुळज्याच्या युद्धांत हे लढले. मृत्युः–श्रावण शुद्ध ६ । १६९०. मुद्राः–श्रीराजारामछत्रपति अखिल प्रौढप्रताप पुरंदर । दमाजी गायकवाड सेनाखासखेल समसेरबहादर ॥ (२) श्रीमार्तंडचरणीं तत्पर। पिलाजीसुत दमाजी गायकवाड ॥ मोरतब ॥ यांचा वंश सांप्रत बडोद्यास राज्य करीत आहे.

पत्रः–श्रो दमाजी गायेकवाड सेनाखासखेल.....हे विनंती [स० मु०] " मोर्तबसुद "

संदर्भः—" मकरसंक्रमणाचे तीळ पावल्याचे " श्री० दादास्वामि यांना पत्र.

(१०) लेखकः—रा० गोविंदराव गायकवाड. दमाजीरावांचे (मानानें) पहिले पुत्र. हे श्री० दादास्वामींचे पक्षपाती, यांची आणि यांचे धाकटे बंधु फत्तेसिंगराव यांची भाऊबंदकी माजली. त्यांत सुरत, भडोच इ० ठाणीं पंजा खालीं दाबून घेऊन इंग्रजांनीं आपला लाभ करून घेतला. पुढें फत्तेसिंग यांनीं प्रधानांना खंडणी, भेट इ० देऊन सेनाखासखेलीचें पद निरंतरचें मिळविलें; त्या मुळें गोविंदरावांचा अधिकार नष्ट झाला. मुद्राः–श्रीराजाम छत्रपती आखिलप्रौढप्रतापपुरंदर। गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समसेरबहादर ॥ मृत्युः–शक १७२२.

पत्रः–...(लक्ष्मी) आलंकृत राजमान्य श्रीों [गोविंदराव] गायकवाड सनाखासखेल समसेर (बहादर) ..... (आ) हे शेवेसी विदित करितील त्यावरून श्रुत होईल रा छ २२ मोहरम बहुत काये लिहिणे लोभ कराव हे विनति [स० मु०] " मोर्तबसुद "

मुद्राः—श्रीराजारामछत्रपती अखिलप्रौढप्रतापपुरंदर। गोविंदराव गायकवाड सेनाखासखेल समसेरबहादर

संदर्भः–" खंडणी लवकर पाठवितों " म्हणून, पंतप्रधानांना विनंतीपत्र.

(११) लेखकः—रा. सयाजीराव पहिले, गायकवाड; गोविंदरावांचे (मानानें) धाकटे बंधु. यांचा गादी वरील अधिकार फत्तेसिंगरावांनीं प्रधानांच्या पुढें ठेवला, पण तो फारसा मान्य झाला नाहीं. कांहीं काळ यांना सेनाखासकेली मिळाली होती. हे भोळसर असल्यानें प्रथम फत्तेसिंगराव आणि मग मानाजीराव या दोन भावांच्या हातांत च वागत. मुद्राः–श्रीमार्तंडचरणी तत्पर । दमाजीसुत सयाजीराव गायकवाड समसेरबहादर निरंतर ॥

पत्रः—राजमान्ये श्रीो सयाजीराव गायेकवाड समशेर बहादूर दडवत विन (ती)..... (लि) हीत जावे रों छ २९ सफर बहुत काये लिहिणे हे विनती [स० मु०] " मोरतबसुद "

मुद्राः—" श्रीखंड चंर तत्पर दामाजी त सयाजीराव गायकवाड समसेरबहादर "

संदर्भः—" रावतांचे निषेधा विषयीं " रा० नारोपंतास पत्र. पत्रांतील मुद्रा अशुद्ध कोरलेली आहे (" राव, णीं, सु," इत्यादि अक्षरें कोरावयाचीं च राहिलीं आहेत; आहे तशी छापली आहे).

(१२) लेखकः—रा० आनंदराव गायकवाड. हे गोविंदरावांचे तिसरे पुत्र. हे भोळसर असल्यानें आणि यांना १० भाऊ असल्यानें राज्यांत अस्वस्थता माजली. यांचे कारभारी रावजी आप्पाजी यांनी या वेळीं बरा च प्रांत देऊन इंग्रजांस घरांत घेतलें आणि त्यांचें सेनादायी सैन्य हि ठेवलें. मृत्युः–आश्वीन शुद्ध १४ । १७४१. मुद्राः–० ∴ ᵕ ∴ श्रीराजाशाहुछत्रपती अखिलप्रौढप्रतापपुरंदर आनंदराव गायकवाड सेनाखासखेल समसेरबहादर (२) श्रीमार्तंडचरणीतत्पर गोविंदरावसुतआनंदराव गायकवाड निरंतर

पत्रः—श्री म्हात्लसाकांत
श्रो अनंदराव गायेकवाड सेनाखासखे (ल)

संदर्भः—त्रामनराव गिरमाजी जंबूसरचे अधिकारी यांस, " सामाजिक विषयां " तील पत्र (पौष वद्य ३ । १७३०).

(१३) लेखकः—रा० खेम सावंत राजे भोंसले; सावंतवाडीकर. यांच्या वडिलांचें नांव रामचंद्रराव. हे गादी वर शक १६७७ मध्यें आले. यांनीं, फिरंग्यांनीं घेतलेला आपला प्रांत परत मिळविला. यांना रा० जयाप्पा शिंदे यांची मुलगी दिली होती. मृत्युः—श. १७२५. यांचा वंश सांप्रत सावंतवाडीस राज्य करीत आहे.

पत्रः—...(स्नेहां) कित राजे खेम सावत भोसले वहादर सरदेसांई पाा कुडाल व माा (हाय) ..... (ताकीद हो) ती कलले पाहिजे बहुत काय लिहिणें कृपा लोभ असों द्यावा हे विनंती

संदर्भः—प्रभु प्रकरण (श्रावण वद्य ११ । १७१२), श्री० सवाई पंतप्रधान यांना पत्र. खेम-सावंत यांच्या पूर्वजां(नाग सावंतां)ची मुद्राः—० श्री ॅ सामंतकुलेशोभानुर्मांगलाख्य महेश्वरः । श्री नागसामंत मुद्रेयं जानभूत्यै विराजते ॥

(१४) लेखकः—सौ० सुलक्षणाबाई सावंत भोंसले सरदेसाई प्रांत कुडाळ, सावंतवाडीकर. (शक १६३१ मध्यें गादी वर असलेल्या रा० फोंड सावंत यांच्या पत्नी ?)

पत्रः—...(युक्ती प्र)युक्तीने बदोबस्ती करून द्यावी विस्तारे लिहिणे न लगे लोभ करावा हे आशीर्वाद

संदर्भः—" करवीरकरांनीं गांवाची खराबी केल्या " विषयीं, भवानराव निकम यांस पत्र.

(१५) लेखकः—रा० सुमेरसिंग सुभेदार. गाडद्यांचा अधिकारी; शक १६८३ पासून श्रीमंतां कडे सेवक; श्री० दादांच्या लोभांतील आणि कुटुंबांत वावरणारा, आणि शनवार वाड्यांतील मुख्य द्वारपाल. त्या मुळें वाड्यांतील व्यक्तींची, व्यवहारांची, वाड्याच्या रचनेची फार चांगली ओळख होती. याच्या लग्नास श्री० नारायणराव यांनीं साहाय्य केलें होतें तरी सुद्धां श्रीमंतांच्या वधांत यांचें च प्रमुख अंग होतें. श्री० दादांनीं " स्वदस्तूरचा हुकूम " द्यावा असें यानें म्हटलें आणि तो मिळाल्या वर यानें काम उरकलें. श्री० दादा म्हणतात " रावास धरण्यास हुकूम मीं दिला " या वरून आणि पुढें " ध " चा " मा " झाला, या गोष्टी वरून सुमेरसिंगास वाचतां येत होतें हें सिद्ध होतें, आतां या पत्रा वरून त्याला लिहितां हि येत होतें हें सिद्ध झालें. यास पकडण्या पूर्वीं च हा इंदूरास १६९६ च्या आषाढांत मृत्यू पावला. पत्रांतील बाळाजीपंत दामले हे गाडद्यां कडील लेखक; यांना पकडून चौकींत वसविलें होतें. त्यांना सुमेरसिंग प्रतिभू राहिला आणि त्यांची सुटका केली.

पत्रः—हे वीनंती

संदर्भः—" बाळाजी वामन दामले यांस सरकारनें कैद केलें, त्यांस मीं सोडविलें आहे, मी त्यांचे साठीं जामीन आहें " म्हणून श्री० दादास्वामि यांना पत्र. हें पत्र श्री० नारायणराव प्रधान यांच्या वधा नंतर चार दिवसांनीं (भाद्रपद वद्य ३ शुक्रवार । १६९५) लिहिलें आहे.


[छायाचित्र—पान १७]

(१) पत्र संदर्भः—शके १६४९ अश्विन शुद्ध १० गुरुवार या दिवशीं, चिंतो तानदेव इ० सहा पुरंदरे मंडळी कुळकर्णी आणि देशकुळकर्णी ग्रामगण सासवड यांना, भिवाजी कासी इ० सात अत्रे मंडळी यांनीं लिहून दिलेलें मुक्त—पत्र. वरील तिथीस भरलेल्या राजसभेंत गांवकुलकरणाचा आणि देशकुलकरणाचा वाद होऊन निर्वाह लागला. या पत्रांत " राजमुद्रा " हीं अक्षरें, श्रीशाहुछत्रपती तेथें आले नव्हते म्हणून रा० श्री० प० प्रतिनिधी यांनीं छत्रपतींच्या वतीनें आपल्या हातानें लिहिलीं आहेत. त्या नंतर अष्टप्रधान आणि राजसभेंतील प्रमुख सभासद, तसें च अधिकारी यांच्या मुद्रा आहेत. आणि त्या मुद्रांच्या वर मुद्रा-कर्त्यांनीं आपलीं नांवें स्वहस्तें लिहिलीं आहेत. म्हणजे त्या त्या व्यक्तीची (आजची) सही आणि मुद्रा यांत एकत्र पहावयास सांपडतात हें च या पत्रांतील वैशिष्ट्य आहे. यांतील पुष्कळशा व्यक्तींचीं हस्ताक्षरें मागें आलीं आहेत. समाकुल पांढरीचे अधिकारी आणि गोत या सभेंत विद्यमान असल्यानें शाहुमहाराजांनीं आपल्या 'देशमुख प्रांत वाई' आणि 'देशमुख प्रांत कऱ्हाड' या दोन मुद्रा, पत्रा वर (प्रतिनिधी करवीं) केल्या आहेत. चित्रांत आलेल्या मुद्रा आणि हस्ताक्षरां विरहित, समाकुल पांढरींत जमलेल्या सर्व जातींच्या आणि धंद्यांच्या कारूनारूंचीं नांवें आणि त्यांच्या पुढें धंद्यांचीं निदर्शक चिन्हें लिहिलीं आहेत; त्याच्या शेवटीं मुक्तपत्र आहे.

मुद्रांचा संदर्भः—[" राजमुद्रा " हीं अक्षरें श्री० प० प्रतिनिधि यांची], नंतरचा अनुक्रम— (१) मध्यवर्ति, प्रतिनिधि (संदर्भ छायाचित्र पान ६ अंक २ पहा); **यांच्या उजवे बाजूच्या मुद्रा.** (२) **पंडितराव.** यांचे मूळ पुरुष मल्हारभट अवींकर; हे, रा० बाबाजी राजे भोसले यांचे उपाध्ये. त्यांचे पुत्र लक्ष्मण भट, हे रा० मालोजी राजांच्या वेळीं होते. त्यांचे पुत्र मल्हारभट; यांनीं शहाजी महाराज बंदींत असतां अनुष्ठान करून त्यांच्या सुटकेस दैवी सामर्थ्य मिळविलें. या प्रसंगाच्या आठवणी साठीं म्हणून राजांनीं यांचें नांव शंभु (भट) ठेविलें. त्यांचे पुत्र हे सांप्रतचे मुद्राधिकारी मुद्गलभट. यांना शाहु महाराजांनीं राजपुरोहित आणि पंडितराय केलें. हे शक १६५० मध्यें न्यायशास्त्री होते. यांनीं थो० शाहुमहाराजांच्या घाटग्यांशीं शरीरसंबंधाच्या प्रसंगीं प्रयत्न केला होता (पहा छा० चि० ६ अ० ९). जन्मः—शक १५५२ शिवनेर येथें. मृत्युः—चैत्र वद्य ७।१६५१ सातारा येथें; यांचे वंशज सामंत रामचंद्रराव रघुनाथराव पंडितराव हे सातारा येथें असतात. (३) **अमात्य** (संदर्भ छा० चि० ४ अं० १२ पहा). (४) **मंत्रि** (संदर्भ छा० चि० ५ अं० ५ पहा). (५) रा० काशीराव अनंत **न्यायाधीश.** यांचे बंधु होनाजी अनंत, आडनांव वरेकर. होनोपंत हे धनाजी जाधवरावांचे पदरीं होते; त्यांस १६३५ मध्यें शाहुमहाराजांनीं न्यायाधीश केलें. यांची मुद्राः—०श्री ० मल्हारीपदनतेः शाहुराजकृपानिधेर्न्यायाधीशस्य मुद्रेयं होनोपंतस्य राजते ॥ त्यांचा मृत्यु शक १६६१. यांच्या मागून यांचे बंधु रा० काशीराव हे न्यायाधीश झाले. ते शक १६७२ मध्यें वारले. यांनीं भावाची च मुद्रा चालूं ठेविली. (६) **सेनापति** (संदर्भ छा० चि० १४ अं० ९ पहा). (७) **सेनाखासखेल** (संदर्भ छा० चि० १४ अं० १० पहा). (८) **चिटनवीस** खंडो (आप्पा) बल्लाळ चित्रे; बाळाजी आवजींचे दुसरे पुत्र. जन्मः—१५८८. सौ० मातुश्री येसुबाई यांनीं यांस लहानपणीं श्रीशंभुछत्रपतींच्या क्रोधांतून वांचविलें; आप्पांची निष्ठा पाहून महाराजांनीं त्यांस १६०५ मध्यें संदेशलेखकाचें पद दिलें. चंदीच्या वेढ्यांतून थो० राजाराम महाराजांना सोडविण्याच्या कामीं यांनीं सहाय्य केलें; रा० परशुरामपंत प्रतिनिधी यांना शाहुमहाराजांच्या क्रोधांतून यांनीं वांचविलें. मृत्युः—आश्विन शु०५।१६४८ (९) **सुभा प्रांत मावळ.** (१०) **देशमुख परगणे वाई.** (११) **देशमुख परगणे कऱ्हाड.** थो० शाहुमहाराज हे

श्री गजानन
प्रसन्न
प्रकाशन मंदिर
पुणे नं. २

Govt Photozinco Office Poona, 1933.



राजश्रीलु
दूलभट
बिल्लम
म्हारभट्ट
जगुरोहित
पंडितराय

श्रीमद्राजाधिराज
परमेश्वर

श्रीमद्राजाधिराज
परमेश्वर

श्रीमद्राजाधिराज
परमेश्वर

५९७

छत्रपती असून हि, वाई आणि कऱ्हाड ग्रामगणांचे देशमुख असल्यानें, त्या अधिकाराच्या दोन मुद्रा त्यांनीं येथें करविल्या आहेत. त्यांतील विशेष म्हणजे देशमुखाचें जें चिन्ह नांगर, तो त्यांत कोरला आहे. यांची सरदेशमुखीची मुद्राः–स्वस्तिश्री सुखदा मुद्रा प्रतापोत्कर्षवर्धिनि सरदेशमुखस्यैषा शाहूराजस्य राजते ॥ ही मुद्रा रा० " मानाजी केसरकर अजहत सरदेशमुख" यांनीं केली असून तिच्या वर वरील प्रमाणें आपलें हस्ताक्षर लिहिलें आहे. **डाव्या बाजूच्या मुद्रा.** (१२) **प्रधान** (संदर्भ छा० चि० ३, अं० २ पहा). (१३) **सचिव नारो शंकर पंडित.** हे शंकराजी नारायण आणि सौ० येसुबाई यांचे पुत्र. जन्मः–शक १६२७. शंकराजीपंतांनीं वचन राखण्या साठीं समाधि घेतल्या नंतर (१६२९), यांना शाहुमहाराजांनीं सचिवपद दिलें. दमाजी थोरातानें यांना बंदींत ठेविलें होतें. मृत्युः–ज्येष्ठ १६५९. पत्रा वर यांनीं वडिलांची मुद्रा केली आहे. (१४) **सुमंत** (संदर्भ छा० चि० ५ अं० १० पहा). (१५) **राजाज्ञा पंताजी सिवदेव** (संदर्भ छा० चि० ६ अं० ७ पहा). (१६) **सरलष्कर** सिदोजीराऊ निंबाळकर. हे थो० शाहुमहाराजांच्या वेळीं सरलष्कराच्या पदा वर होते. यांचा आणि दावलजी सोमवंशी सरलष्कर यांचा तंटा होता. (१७) **दिमत खालसा. स्वराज्या** शिवाय राहिलेल्या (मुसुलमाना कडोन) खालसा (केलेल्या) प्रांताचे मुख्याधिकारी रा० फत्तेसिंग ' राजकुंवर ' होते. त्यांचे कारभारी हे यादव गोपाळ होत. (१८) **सुभेदार खालसा.** आपाजी हणमंत. (१९) देशपांडे परगणे वाई. (२०) देशपांडे परगणे कऱ्हाड.

"राजश्री श्रीनिवास परशुराम पंडित प्रतिनिधी" [मुद्रा. अष्टकोनी] "० श्री ~ श्रीआई आदिपुरुष श्रीराजा शाहुछत्रपतिस्वामि कृपानिधि तस्य श्रीनिवास परशुराम प्रतिनिधि "

"राजश्री मुद्गलभट्ट बिन्न मल्हारभट्ट राजपुरोहित पंडितराय " [मु० अंडाकृति] " + ०~ + श्रीमुद्गलदयावाप्तशाहुराजप्रसादजा मुद्रापंडितरायस्य मुद्गलस्य विराजते "

"राजेश्री बालकृष्ण वासुदेव अमात्य" [मु०अंडाकृति] " मल्लनिषूदन भक्तेःशाहुराजपदैकनिष्टस्य श्री वासुदेव सूनोः बाबूरायस्य मुद्रेयं "

"राजश्री नारो राम मंत्री" [मु० गोल] " श्री शांतादेविभक्तस्य नारोरामस्य मुद्रेयं विराजते "

" राजश्री कासीराउ अनंत न्यायाधीश " [मु० गोल] " ० श्री ~ हानाजी अनात "

"राजश्री खडेराऊ दाभाडे सेनापती" [मु०अष्टकोणी] " ० श्री ~ राजाशाहुस्वामिछत्रपति खंडेराव दाभाडे सेनापति "

"राजश्री त्र्यबकराऊ दाभाडे सेनाखासखेल" [मु० अष्टकोणी] " श्रीराजाशाहु छत्रपति चरणी तत्पर खंडेराव सुत त्रिंबकराव दाभाडे निरंतर "

"खंडो बलाल चिटनीवीस " [मु० अक्षाकृति] " ~ श्री ० बाळाजी प्रभु पुत्रस्य खंडराजस्यधीमतः ॥ मुद्रा सर्व गुणोपेता राजसन्मान वर्धिनी "

"शामजी हरी नामजाद सुभा प्रांत मावले" [मु० सोळा पाकळ्यांची] " ~ ० श्रीमत्स्वामि शिवजी ठाई तत्पर शामजी हरी निर × तर × "

" राजश्री शाहूजी राजे भोसले देशमुख पा वाई " [मु० अष्टकोणी] " ० ~ श्री शांकर श्री शाहुजी राजे भोसले देसमुख प्रा वाई " [नांगर]

"राजश्री शाहुजी राजे भोसले देशमुख पा कऱ्हाड " [मु० अष्टकोणी] " ~ ० राजश्री शाहुजि राजे भोसले देशमुख प्रां कऱ्हाड "

"राजश्री बाजीराऊ बलाल पंडित प्रधान" [मु० गोल]" ० श्री ~ राजा शाहु नरपति हर्षनिधान बाजीराव बळाळ मुख्य प्रधा।० "

"राजश्री नारो पडित सचिव" [मु० आठपाकळा] " श्री शंकराजी नारायण "

"राजश्री आनदराऊ रघुनाथ पडित सुमत " [मु० अष्टकोणी] " श्रीराजा शाहुछत्रपति स्वामिचरणि तत्पर रघुनाथ सुत आनंदराव सुमंत निरंतर "

"पंताजी सीवदेव सा सरकार" [मु० गोल] " ० श्री ० भार्गव चरणी तत्पर पंताजी शिवदेव निरंतर "

"राजश्री सिदोजीराऊ नीवालकर सरलस्कर" [मु० चौकोनी] "० ० श्रीमद्राजासाहो छत्रपति स्वामी चरणी तत्पर सीदोजीराव निंबाळकर सरलस्कर निरंतर । "

"राजश्री यादव गोपाल दिमत खालसा " [मु० गोल] " ० श्री ० राजाशाहुछत्रपति चरणी तत्पर फतेसींग भोसले राजकुवर "

"राजश्री आपाजी हणमत सुभेदार खालसा प्रात सातारा" [मु०गोल] ० श्री ० राजाशाहु चरणी तत्पर आपाजी हनुमंत किंकर "

"भगवंत सामराज देशपाडे व गिरमाजी झुगो देशपाडे पा वाई"

"पिलाजी गोविदराऊ देसपाडे पा कराड"

"राजश्री मानाजी केशरकर अजहत सरदेशमुख " [मु० चौकोनी] " स्वस्ति श्री सुखदा मुद्रा प्रतापोत्कर्ष वर्धिनी ॥ सरदेशमुखस्यैषा शाहु राजस्य राजते" (ही मुद्रा छायाचित्रांत झांकली गेली आहे).

(२) लेखक:—श्रीसमर्थ रामदासस्वामी. सूर्याजीपंत आणि राणावाई यांचे धाकटे पुत्र. मूळ नांव नारायण. जन्म:—चैत्र शुद्ध ९ शक १५३० जांब येथें. समाधि:—माघ वद्य ९ शक १६०३, सज्जनगड येथें. महाराष्ट्रधर्माचार्य आणि थो० श्रीशिवाजी महाराजांचे सद्गुरु.

पत्र:—उतम गुणात्लंकृत रघुनाथभक्तीपरायेण परोपकार राजमान्य राजेश्री रघुनाथभट गोसांवी यांसी स्नेहपूर्वक सुचना तुमचा निरोप घेउनु हेलवाकीहून स्वार जालों ते सुखरू(प चाफलास पावलो)

संदर्भ:—श्रीसमर्थांनीं " पंडितरायासी...स्वहस्ताक्षर पत्र लिहिलें. " हें पत्र रामदास-रामदासी, भाग नववा, यांत प्रसिद्ध झालें आहे; त्या वर संपादकांचा विशेष खुलासा नाहीं. आतां पर्यंत हें पत्र दोन तीन ठिकाणीं प्रसिद्ध झालें आहे, पण ऐतिहासिक दृष्ट्या त्याची संगति कोणीं हि लाविली नाहीं; म्हणून आमच्या अत्यल्प ज्ञाना प्रमाणें आम्हांस त्याची जी संगति लागते ती पुढें देतों. तत्पूर्वी संदर्भा साठीं हें सर्व पत्र येथें उतरून घेतों; आणि आमचें पुढील म्हणणें उलगडावें म्हणोन प्रसंगवार त्याचे खंड पाडतों:—

श्रीसमर्थांचें पत्र:—(१) उतमगुणात्लंकृत रघुनाथभक्तीपरायेण परोपकार राजमान्य राजेश्री रघुनाथभट गोसांवी यांसी (२) स्नेहपूर्वक सूचना (३) तुमचा निरोप घेउनु हेलवाकीहून स्वार जालों ते सुखरूप चाफलास पावलों (४) संकल्पाची समाराद्ना जाली (५) पुढें शरीराचा उपचार हि हळु हळु होतो (६) तुमचें मन मजवरी बहुत आहे ते तुमचे आवडीचे गुणे कल्याण होईल ऐसें नेमस्त चिन्ह दिसतें (७) आपणे ते कर्कष सीतलाईमध्यें बहुत चि श्रम पावलों (८) तो माझा सकळ श्रम घेउनु मज निरोप दिधला तो उपकार देव जाणे (९) ये विसी चीत चमत्कारलें ते पत्री किती म्हणौनु लेहावे (१०) माझें अरिष्ट तुम्ही घेउन मज उष्ण देशारी पाठविले हा उपकार श्रीरघुनाथजीस जाला (११) मज रघुनाथजी वेगलें कोण्ही जिवलग नाही (१२) आपण जाला समाचार रघुनाथजीस विदित केला (१३) या उपरी माझे ठाई तुम्ही आहा (१४) रघुनाथ कृपेचा प्रत्यये तुम्हास आलिया

वरी प्रचीतीसीं कलें येईल (१५) वहुत का काये लेहावें (१६) वेदमूर्तीं दिवाकर भट गोसांवी तेथें आलिया वरी तुम्ही माझा समाचार घेयासी ये प्रांतीस आले पाहिजे (१७) स्नेह बहुत असों दीजे हा पत्रार्थ (१८) हें इतुके म्या आवडीच्या कलवळ्यानें लिहिले आहे (१९) मने मन साक्ष असेल परंतु तुम्हास उपचारसा वाटोन रजीस होल तरी न होणे (२०) जैसा दिवाकरभट तैसे तुम्ही हा इत्यर्थ आहे वरें कललें पाहिजे (२१) तुमचा आमचा येकात प्रसंग जालिया वरी मग ऐसे लिहिता न ये (२२) म्हणौनि ये संधी मधे प्रसग फावला पुढें फावेना म्हणौनि लाबे करून लिहिलें (२३) वरकड इतर भाव मना मधे असेल तरी रघुनाथ साक्ष असे (२४) तुम्ही रजीस न होणे आणि जे आहे ते लिहिलें या मधे मिथ्या स्तुती नाहीं (२५) तुम्ही सर्वज्ञ आहा तुमचे जे काही आहे ते माझें चि आहे (२६) म्या मज माझ्या मनास येईल तैसे लिहिलें येथें तुमचें काये गेले (२७) काही चिंता न कीजे (२८) तुम्ही आमचे चि आहा तुम्ही आम्ही सकल देवाचे आहों शरीरभेदा वरी न जाणे (२९) अतरस्थिति पाहिल्या उपरी कलो येईल.

साक्षीपत्र:—या श्रीं च्या पत्राचा पाठपुरावा करणारें, विठल गोसाव्यांनीं दिवाकर गोसाव्यांना लिहिलेलें एक पत्र आहे; त्यांतील कारणा पुरता उतारा पुढें देतोः—" नरसीगराऊ...परांजी देशमुख, नागोजीपंत देशकुलकर्णी, व नागोजी भाबे, नाईकवाडी या पांचाजणा कडून श्री च्या पुष्पीवर श्री नीं हस्त ठेविले कीं या अधिष्ठानाची भक्तीपरंपरा करावी.. सर्वस्वेस्वी साहे असावे...पुष्पा वरी हस्त पाचा जणानी ठेविले. ते कालीं पांचा जणांनी श्री स उभे राहून प्रार्थना केली कीं आम्हां कडून...पुष्पा वरी हस्त ठेविले तरी श्री नीं हि (पुष्पा वर हस्त ठेवणें)...(तें ऐकून) श्री नी हि प्रसाद पुष्पा वरी "मान्य" म्हणून हास्यवदने संतोषपूर्वक हस्त ठेविला... (या वरून हें सिद्ध होतें जे, " अधिष्ठान " म्हणजे "स्वराज्य स्थापना;" नाहीं तर श्रीसमर्थांनीं स्वतः शपथ घेण्याचें कारण काय ? नुसती श्रीरामाची स्थापना असती तर परस्पर शपथांची काय आवश्यकता ?) आनंद संवछरीं श्रीसमर्थ हेलवाकीचे घलयेस होते. च्यातुर्मास तेथे कृमिले. सीतलाई बहुत जाली म्हणून उष्ण देशासी चाफलाकडे आले. हेलवाकीचे घलयेस कितेक कार्ये सीध होणे होते म्हणून वेदमूर्ती रघुनाथ भट नवहस्त पंडितराये श्री चे उपाध्ये ... त्यासी ते स्थल सीध करावयासी ठेविले. आपण चाफलास आले. नवसाची समाराधना श्री चे द्वारी केली. शूद्राचे भोजन सीगणवाडीस केले. दुसेर दिवसीं पंडितरायासी...जैसा दिवाकर गोसावी तैसे च तुम्ही म्हणून गौरवयुक्ता स्वहस्ताक्षरें पत्र लिहिले आणि शहापुरास जावयास...स्वार जाले. बराबर तुम्ही व रामया व आपण...होते. भाबेवाडीचे दक्षण भागी वेतालचे खडिये पासी... तुम्हा आम्हास राहावयाची आज्ञा जाली.... श्री ची आज्ञा जाली कीं...राजगृही कार्यभाग संपादून घेणे हे सर्व दिवाकर गोसावी करीतो "(रा० रा० ९ पृ० ९१, ९२).

शक १५९६। ९७ मधील महाराजांच्या हालचालीः—वरील दोन पत्रांचा उलगडा करण्या पूर्वी शिवाजी महाराजांच्या, हेलवाकीप्रसंगाच्या आगेमागेंच्या हालचाली पुढील प्रमाणें होत्याः—(१) शक १५९६ चैत्र शुद्ध-मोंगल सेनापति बहादूर हा महाराजांना त्रास देण्या साठीं कोंकणांत उतरणार म्हणून महाराजांनीं डोंगरांतील वाटा मोडून अवघड ठिकाणीं कडक पहारे ठेवल्या मुळें तो परत फिरला (शि० का० प० सा० सं० ले० १६२५)(२) चै० शु०, चिपळुणास लष्करची पहाणी केली आणि (प्रतापराव वारल्या मुळें) हंबीररावांस सरनौबती (सर्व घोडदळाचें सेनापत्य) दिली (जेधे श०); (३) चै० वद्य-केळंजागिरी घेतला (जे० श०). या वेळीं "शामलाच्या नौकादळास जर इंग्रेज, मुंबईस राहूं देतील तर आपण त्यांचें पारिपत्य करूं," असें महाराजांनीं त्यांना दाबले. पुढें महाराजांच्या कोंकण

पट्टींतील कांहीं नौकास्थलें विजापूरकर अबूखान रुस्तुमजमानानें घेतल्यानें महाराजांनीं नौकादळ घेऊन त्याचा पाठलाग कारवार पासून १ दिवसाचे वाटे पर्यंत केला (चैत्र वद्य १२) तेव्हां खान पळाला (शि. का० ले० १६३२). (४) वैशाख वद्यांत, पंचमी पूर्वी महाराज, वरील धांवणी हून चिपळुणा वरून रायगिरीस परत आले (उक्त० १६४३). नंतर (श्रीसमर्थांच्या सांगण्या वरून) प्रतापगडच्या श्रीरामवरदायिनीस १। मणाचें सुवर्णछत्र स्वतः महाराजांनीं नेऊन अर्पण केलें आणि वद्य १२ ला, ते परत रायगिरीस आले (उक्त० १६४९). (५) मातुश्री जिजाऊ फार वृद्ध झाल्यानें, त्यांची जन्मा पासूनची इच्छा पूर्ण करावी म्हणून शत्रूंचा धुमाकूळ सर्वत्र चालूं असतां श्रीं च्या सांगण्या वरोन ज्येष्ठ शुद्ध १३ ला महाराजांनीं राज्याभिषेक करून सर्व महाराष्ट्राला आनंद संवत्सरीं आनंदांत पोहावयास लाविलें ! या च वेळीं फिरंग्या पासून चौथाईची निकडीची मागणी केली. थोड्या दिवसांनीं मातोश्रींनीं कैलासवास केला. (६) श्रावणांत औरंगाबादेस बहादूरचा धुव्वा उडवून महाराजांनीं इकडे विजापुरकरा वर हि चढाई करून दोघांना पायबंद लावून इकडे नवीन युद्धनौका बांधून नौकादल वाढविलें आणि अण्णाजीपंतास फोंड्या वर छापा घालण्यास पाठविलें. (शि. का. ले. १६६४-६६-७१-८४). (७) भाद्रपदांत फोंड्याच्या मुसुलमान मुद्राधाऱ्यानें महाराजांच्या एका व्यापाऱ्याला पकडल्यानें महाराजांनीं अण्णाजीस फोंड्या वरील चढाईची निकड लाविली. मुद्राधाऱ्यानें गड सिद्ध करून कारवारच्या इंग्रजां कडे उल्हाटयंत्रांची मागणी केली (उक्त० १६७५). (८) फोंड्याच्या मार्गा वर अबूखान होता त्याचा धुव्वा अण्णाजींनीं आश्विनात उडविला. त्या च वेळीं बहादूर (औरंगझेबाचा सेनापति) हा कल्याण कडे येत असतां त्याला महाराजांनीं प्रतिबंध करविला (उक्त० १६८३-८६-८७-९०). (९) कार्तिक शुद्ध सप्तमीस मुंबईचा अंजिअर लिहितो–" **अति गुप्त राखलेल्या** कोणत्या तरी कार्या वर महाराज मोठें सैन्य घेऊन गेले आहेत हें खचित " (उक्त० १६९४). विजापुरास राजसभेंत गोंधळ माजल्यानें तिकडून फोंड्यास किंवा अबूखानास सहाय्य होईना, एवढें च नव्हे तर, उलट अबूखानास विजापुरास बोलावून नेलें. ती संधि साधून महाराजांनीं बेळगांव-हुबळी या नगरां पासून खंडणी घेतली (उक्त० १६९४–९९). (१०) सुरतेकडे हूल दाखवून आणि कल्याणास असलेल्या मोंगली सैन्यास दाबांत ठेवून, इकडे महाराजांनीं बंकापूर-होसपेठ येथें मार्गशीर्षांत खंडणी जमा केली (उक्त० १७०९–१०). (११) पौषांत रामनगर घेऊन औरंगाबादेस मोंगल कुतुबखानाची महाराजांनीं पुरी रेवडी उडविली (उक्त० १७१६). (१२) माघांत संभाजी राजांची मुंज आटोपून, शामलास दंडाराजपुरीस कैचींत पकडलें; त्या कार्या वर दौलतखान आणि दर्या सारंग यांची नेमणूक होती; त्यांना सर्व सामग्री पुरविण्याची आज्ञा प्रभानवल्लीच्या देशाधिकाऱ्यांस केली असतां त्यांनीं ढिलाई केली म्हणोन तें (' ब्राह्मण म्हणोन मुलाहिजा कोण करतो '– राजवाडे खंड ८ ले० ३१) दटावणीचें पत्र महाराजांनीं त्यांना लिहून, तिकडे मोंगल दिलेरखानाचा पुरा फडशा पाडून, फोंड्याच्या चढाईची पूर्ण सिद्धता केली. या वेळीं सर्व कोंकण महाराजांच्या हातीं असोन, त्याचे अधिकारी अण्णाजी दत्तो होते (उक्त० १७१८-२३-२४-२९). या नंतर प्रथम अण्णाजींनीं जाऊन फोंड्यास वेढा दिला आणि नंतर पुढील वर्षीं (१५९७) स्वतः महाराज त्या कार्या वर निघाले. (१३) त्यांच्या मार्गांत मौनी (मोहनी) बाबांचें पाटगांव होतें; हेलवाक ते फोंडा यांच्या मध्यें हें गांव आहे. बाबा हे श्रीसमर्थांचे मित्र होते. तसेंच केळशीचे याकूब बाबा हि श्रीं चे मित्र होते. केळशी जवळ दाभोळ (अंजनवेल) येथें महाराजांच्या नाविक–दळाचा एक भाग होता. हें ठिकाण १५७४ मध्यें हस्तगत केलें होतें (इ०वृ०१८३५. पृ० ३२३). याकूबबाबा आणि मौनीबाबा यांचा श्रीं शीं गुप्त पणें स्नेहसंचार होता हें हनुमंतस्वामीच्या बखरी वरोन सिद्ध होतें. या दोघांना कोकणांतील फिरंगी आणि

स्थल प्रत
सं. ..... नं. .....
ता. .....

मुसुलमान यांच्या प्रांतांचें चांगलें ज्ञान होतें. म्हणून फोंड्या वर जातांना महीना राज रायगडहून फाल्गुन वद्य पंचमीस निघून पांचाड येथें आले, तेथून पुढें "पाटगांवीं मोहनीबाबा होते त्यांच्या दर्शनास गेले. उपरांतिक पूजा केली. त्यांणी तोंडातील उच्छिष्ट महाराजांच्या हातांवर दिलें...(सोन) चांफ्याच्या फुलांचा तुरा महाराजांच्या डोई वर खोंविला. लाभ मानून नमस्कार करून निघाले" (मसाछोब० पृ० ४४). नंतर प्रसिद्धगडा जवळ घाट उतरून राजापुरास आले. तेथें त्यांना त्यांचें ४० युद्धनौकांचें आणि १५ सहस्र घोडदळ, १४ सहस्र पायदळ आणि १० सहस्र वेठ्यांचें सैन्य मिळालें (शि० का० ले० १७४०). त्या सह चैत्र वद्य २ ला निघून वेंगुर्ले, रेडी, आग्वाद या जलदुर्गांच्या मार्गें मुरुमगांवच्या खाडीशीं येऊन थांबले; तेथून भूमीमार्गें पुढें सरकून वद्य पंचमीस फोंड्यास वेढा दिला. वैशाख शुद्ध द्वितीयेस फोंडा घेतला. या वेळीं विजापूरकरांचा एक सेनापती बहलोल हा (रुस्तूमच्या ठिकाणीं) मिरजेस होता. तो फोंड्याच्या सहाय्यास येण्यास निघाला, परंतु महाराजांनीं सर्व घाट बंद केले, "झाडें तोडून तीं आडवीं घालून मार्ग बंद केले आणि **सर्वत्र पहारे ठेविले** यामुळें त्याचें कांहीं चाललें नाहीं" (उक्त० १७५३). पुढें महाराजांनीं चढाई करून ज्येष्ठांत कारवार, शिवेश्वर, अंकोलें हीं नौकास्थानें हस्तगत केलीं आणि मग अगोटीच्या वेळीं रायगडास ते परत आले. या फोंडाग्रहणाच्या प्रसंगीं मोंगल बहादूरखान, आदिलशाही बहलोलखान, जंजीरेकर शामल आणि फिरंगी (हे फोंड्याचे मुसुलमान मुद्राधाऱ्यास गुप्तपणें शस्त्रास्त्रें पुरवीत होते) या सर्वांना हुलकावणी देऊन दाबांत ठेवणें अवश्य होतें; म्हणजे या कामीं सर्वत्र गुप्तपणें चळवळ करणें (पहारे ठेवणें, सैन्यानें पायबंद लावणें) आवश्यक होतें, म्हणजे त्या साठीं महाराजांच्या अगदीं अंतरंगांतील व्यक्तींची आवश्यकता होती. (१४) पुढें भाद्रपद वद्य ८ ला श्रीं च्या आज्ञे वरोन महाराजांनीं रामनगर पेठ वसविली. या प्रमाणें शक १५९६।९७ मधील महाराजांच्या हालचाली आहेत.

कोंकणचें महत्त्वः—पश्चिम समुद्राचें म्हणजे तिकंडील नौकास्थानांचें खरें महत्त्व महाराजांनीं पुरेपूर जाणल्यानें त्यांनीं कोंकण प्रथम हस्तगत केलें. विजापूरकरांचें नौकास्थान चेऊल त्यांनीं प्रथम घेतलें; त्या नंतर कारवार हें महत्त्वाचें नौकास्थान घेणें आवश्यक होतें. कारण, भारतवर्षांतील उत्तम मलमल आणि सोंधें येथील (सर्व जगांतील) उत्तम मिऱ्यें, येथून परदेशीं जात. मिरजवणें येथून मिऱ्यें, सोरा, सुपारी हीं सुरतेस जाई. हुबळीस अनेक प्रकारचीं वस्त्रें निर्माण होत; तीं आणि चिटें, रेशीम, लाख, इतर वस्तू वेंगुर्ले येथून बटेव्हिया, सीलोन, इराणी आखात, तांबडा समुद्र, यूरोप इकडे निर्गत होत, म्हणून हीं नौकास्थानें हातांत असल्यानें राज्याला मोठा लाभ होता. हें जाणोन अफजलवधा नंतर महाराजांनीं, १५८५।८६ पर्यंत वेंगुर्ले पर्यंत कोंकणकांठ हस्तगत केला. तथापि, महाराजांच्या, इकडे मोंगलांशीं झटापटी चालूं असतां, फोंड्याचा आणि कारवारचा आदिलशाही मुद्राधारी आणि अधिकारी महाराजांच्या प्रांतास मधून मधून उपसर्ग देत. त्या साठीं हीं ठाणीं हस्तगत करणें आवश्यक होतें. हें कार्य शेवटचें १५९७ मध्यें साधलें; कसें तें वर आलें च आहे.

धार्मिक अत्त्याचारः—मुसुलमानांनीं धार्मिक अत्त्याचार जसा इतरत्र केला तसा कोंकणांत हि चालविला होता. त्यांच्या च जोडीला फिरंगी हि येऊन बसले. " एखाद्या कुटुंबांतील कर्ता पुरुष मेला कीं मागें राहिलेल्या मुलाबाळांना ते जेसुईट, शाळांत डांबून टाकून परत आपल्या माणसांत जाऊं देत नाहींत. ही गुलामगिरी हिंदुंना फार असह्य होते" (शि० का० ले० १०३६). तसें च " शिवाजी राजे आणि पोर्तुगीज यांचें प्रत्यहीं भांडण होतें, ते, त्यांच्या जातींच्या (हिंदु) अनाथ मुलांना रोमन क्याथोलिक धर्माची दीक्षा देतात. म्हणून राजे त्यांचा फार द्वेष करतात" (उक्त० १७९८);

" प्रत्यहीं अनेक कुटुंबें पोर्तुगीजांचा मुलुख सोडून जातात. कारण त्यांना पाद्री लोकांचें भय वाटतें; एकादा इसम मृत्यु पावल्यास हे पाद्री त्याच्या सर्व मुलांना ख्रिश्चन होण्यास भाग पाडतात " (उक्त. १९१०). हें बाटविण्याचें काम फिरंग्या प्रमाणें आपण हि करावें असें इंग्रजांस हि वाटे आणि त्या साठीं त्यांचा प्रयत्न सुद्धां चालूं होता. " आम्ही येथील लोकांच्या मुलांना इंग्रजी शिकविण्या करितां एक दोन शाळा मास्तर ठेवावे...ख्रिस्ती धर्माचा प्रसार होण्यास या योगें उत्तम आरंभ होणार आहे " (उक्त. १२२४), असें मुंबईचा अधिकारी लिहितो. एवढें च नव्हे तर पुढें (मार्गशीर्ष वद्य २।१५९५) तो " ख्रिस्तीधर्म स्वीकारण्यास (हिंदूंना) उत्तेजन द्यावें ही आपली (लंदनच्या डायरेक्टरांची) आज्ञा आम्हांस महत्त्वाची वाटते; परंतु...हें आक्रमण गुप्तपणें च करणें जरूर आहे " (उक्त. १६०३) असें म्हणतो. सारांश, कोंकणांतील सर्व हिंदु या प्रमाणें बाटविण्याच्या " कर्कश सीतलाईत " गारठले जात होते !

वरील प्रसंगांत श्रीसमर्थांचें सहाय्य:—वरील सारा अर्थ लक्षांत घेऊन आतां, श्री समर्थांच्या पत्राची संगति लावूं. वर वर पाहतांना सुद्धां त्यांत विरोध दिसून येतो. उदाहरणार्थ श्री म्हणतात, " आपण ते कर्कश सीतलाईमध्यें बहुत चि श्रम पावलों. " जर खरोखर च श्रीं ना हिंवतापाचें दुखणें जडलें असतें आणि " शरीराचा उपचार हि हळु हळु होत " होता, तर श्रीं नीं चांफळच्या ऊष्ण देशीं महिना भर निदान एक आठवडा तरी वास केला असता; परंतु विठल गोसाव्यांनीं तर स्पष्ट म्हटलें आहे जे, " चाफलास आल्या वर दुसऱ्या दिवशीं समाराधना केली. नंतर वरील पत्र लिहून घोड्या वर बसून तत्काल श्रीसमर्थ शहापुरास गेले ! " तेव्हां याचा अर्थ काय? श्रीं च्या मुखांतून असत्य अक्षरें कशीं निघतील ? त्यांचें म्हणणें सत्य आहे पण तें गूढ आहे. त्यांची " कर्कश सीतलाई " म्हणजे कोकणांतील म्लेंछ-फिरंगी यांचा हिंदू वरील अत्याचार आणि म्लेंच्छांचें स्वराज्यावरील आक्रमण ! नाहीं तर भर पावसाळा ज्या घळींत काढला, तेथें त्या पुढील काळ घालणें काय कठीण होतें ? चातुर्मासाची शीतलाई आणि त्या नंतरची शीतलाई या दोन्ही त्या घळींत राहणाऱ्यास सारख्या च होत्या. सारांश, वर वर सुद्धां हा विरोध त्या पत्रांत दिसतो, मग सूक्ष्मपणें वाचल्यास त्यांत अनेक गूढें लपलीं आहेत हें ध्यानांत येईल यांत आश्चर्य नाहीं. या साठीं पत्राचा थोडासा विस्तार करूं. हेळवाकीची ही घळ, पाटणाहून जो मार्ग चिपळुणास जातो, त्या मार्गा वर, कुंभारलीच्या घाटाचे माथ्या वर आहे. माथ्याच्या जरा एके बाजूस ही घळ तर घाटाच्या पायथ्या जवळ चिपळूण आहे. चिपळूण येथें महाराजांच्या सैन्याचा एक विभाग सतत असे. सांप्रत, गांवाच्या बाहेर " पागा " म्हणून जें स्थळ प्रसिद्ध आहे तेथें या सैन्याची छावणी असे. चिपळूणच्या या सैन्यास गुप्त संदेश धाडण्यास आणि त्याचे वर दृष्टि ठेवण्यास हेळवाक सोईचें आहे. कऱ्हाड येथें आदिलशाही देशाधिकारी राही. त्यास कोकणांत उतरावयाचें असल्यास कुंभारली घाटानें च उतरावें लागे; म्हणजे कऱ्हाडवर हि दृष्टि ठेवण्यास हेळवाक हें उत्तम स्थान होय. या गांवच्या जवळ ही घळ आहे. हिची लांबी ९८, रुंदी १५ पासून ३० आणि उंची ५ हात असोन, मध्यें मध्यें भिंती घालून तिच्या पांच खोल्या केल्या आहेत. एका खोली समोरच्या डोंगराच्या भागांत, अद्यापि " महाराजांची पागा " आहे. अशा प्रकारच्या घळींत श्रीसमर्थ आपले देवतार्चन (कूट मंत्र) घेऊन रहात. शक १५९६ चे चातुर्मासांत श्रीं चा वास तेथें कशा साठीं झाला ? तेथें " कित्येक कार्यें सिध होणें होते " तीं कोणतीं ? तीं अपुरीं कार्यें म्हणजे " ते स्थल सीध करावयास " रघुनाथ गोसाव्यांना तेथें पाठविण्यांत आलें होतें. घळ सिध करणें म्हणजे काय झाडसारवण करून रंग देणें ? कां आंब्याच्या पानांचीं तोरणें बांधणें ? थंडीताप (खरा च असला तरी हि)

लाथाडून श्रीसमर्थ दुसरे दिवशीं घोडथा वर बसून शहापुरा कडे कोणत्या कार्या साठीं गेले ? ते शहापुरा कडे च कां गेले ? परळी कडे कां गेले नाहींत ? या प्रश्नांचीं उत्तरें आपल्यास प्रथम वाटतात तितकीं अवघड नाहींत. श्रीं च्या कृपेनें तीं सोडविण्याचा प्रयत्न करूं. कोंकणांत म्लेच्छ–शामल–फिरंगी यांचा धार्मिक अत्त्याचार होत होता हें "किती लोक ते बाटविले, किती स्त्रिया शामलानें जहाजीं फाकविल्या" या श्री वचना वरोन ध्यानांत येतें. महाराजांचा अवतार देवब्राह्मणसंरक्षणासाठीं होता हें प्रसिद्ध आहे. श्रीसमर्थरूपी "हृदयस्थ नारायणानें," हा उपद्रवी अत्त्याचार दूर करण्या विषयीं महाराजांना "प्रेरणा केली" होती. महाराजांना, कोंकण दोन कारणां साठीं हस्तगत करावयाचें होतें; मुख्यतः या धार्मिक अत्त्याचारास पायबंद लावणें आणि दुसरें तिकडील व्यापार हातांत आणून राजभांडारांत धनसंचय करणें आणि पाश्चात्यांना दाबांत ठेवणें. त्या साठीं पूर्वी च त्यांनीं हा उद्योग आरंभिला होता. मध्यंतरीं आग्रा येथें गेल्यानें, आदिलशहानें महाराजांचीं कोंकणांतील ठाणीं जिंकलीं होतीं; तीं पुनरपि परत घ्यावयाचीं होतीं. परंतु मातुश्री जिजाऊ या, या वेळीं अत्यंत वृद्ध झाल्या होत्या आणि त्यांचा–मुलाला छत्रपति करणें हा–उद्देश त्यांच्या डोळ्या देखत पूर्ण होणें अवश्य होतें. या च वेळीं मोंगल, शामल, आदिलशहा, फिरंगी या सर्वांनीं उचल केली होती. अशा स्थितींत पूर्ण विचार करून हीं कार्यें अत्यंत गुप्तपणें पार पाडावयाचीं होतीं. आमच्या मतें हीं सर्व कार्यें म्हणजे त्यांचीं आंखणी हेळवाकीच्या घळींत त्या गुरुशिष्यांनीं आंखिली. शक १५९५ च्या शेवटच्या दिवसांत श्रीं नीं आपला वास घळींत केला, गुरुशिष्यांचा मंत्र ठरला आणि त्याप्रमाणें एक एक कार्य घडूं लागलें. ज्येष्ठांत अभिषेक करावयाचा तर, तत्पूर्वी, राज्यांतील "प्रांत, गड, सैन्य, राजकारणी मंडळी या सर्वांची पहाणी" करणें अवश्य होतें; आणि तशी ती केली हें प्रसिद्ध च आहे. प्रतापराव वारल्यानें, हंबीररावांस सेनापति नेमिलें. मोंगल सेनापति आणि देशाधिकारी बहादूर हा औरंगाबादेहून वांई साताऱ्या कडे चालून येईल तर त्यास अडथळा करावा म्हणून या वाटे वरील केळंजागड महाराजांनीं प्रथम हस्तगत केला. हा गड मांढरदेवाच्या शिखरा वर असून अतीशय बळकट आहे; श• १७४१ मध्यें अलपिष्टणनें याचें "किल्लथांतील लोक जर नेटानें अडथळा करूं लागले तर हा किल्ला घेण्याचें काम अशक्य आहे" असें वर्णन केलें आहे. येथून डोंगरी मार्गानें हेळवाक जवळ आहे. बहादूरचे मार्ग बंद करून त्याच्या उरावर कल्याणास आपलें सैन्य महाराजांनीं ठेविलें आणि तिकडे आदिलशाही रुस्तुमास पळवून लाविलें. नंतर अभिषेक झाला. आतां या नंतर आदिलशाहीचें कोकणांतील महत्त्वाचें ठाणें जें फोंडागिरी तें घेण्याचें राहिलें. त्या साठीं हा मंत्र श्रीसमर्थांनीं आपल्या अंगावर घेतला. त्यांचें आणि याकुब बाबा तसेंच मौनी बाबा यांचें सख्य असे. हे दोघे कोंकणांत दाभोळ आणि पाटगांव येथें रहात. दाभोळ जवळ महाराजांचे नीकादलाचें ठाणें (अंजनवेलीस) होतें आणि पाटगांव हा गांव हेळवाक–फोंडा यांच्या मध्यें होतें. काय काय करावयाचें हें ठरल्यानंतर श्रीसमर्थ हेळवाकीहून निघून मार्गशीर्षांत चांफळास आले. आल्यावर पहिलें कार्य "संकल्पाची समाराधना" केली. आपल्या लाडक्या शिवबाला राज्याभिषेक होऊन तो छत्रपति व्हावा, हा जो श्रीं च्या मनांतील फारा दिवसांचा "संकल्प" तो प्रभु कृपेनें पार पडला म्हणोन ही समाराधना केली ! हा प्रसंग घडावा म्हणोन श्रीसमर्थांनीं श्रीरामरायां जवळ नवस हि नवसला होता; त्या "नवसाची समाराधना श्री चे द्वारीं केली (म्हणजे मुख्य जो काय नवस असेल तो फेडून महाद्वारा पाशीं ब्राह्मण भोजन घातलें आणि जेथें श्रीसमर्थांनीं, महाराजांस उपदेश केला त्या) शिंगणवाडीस शूद्रांचें भोजन केलें," आणि या प्रमाणें या आनंद संवत्सरीं चांफळ खोऱ्यांत श्रीसमर्थांनीं आनंद पिकविला ! आतां "शरीराचा उपचार

